20-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1



**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**पृ.शी.**: राज्यातील मान्यताप्राप्त शाळा अन्यायकारक मूल्यांकनामुळे बंद होणे

**मु.शी.**: राज्यातील मान्यताप्राप्त शाळा अन्यायकारक मूल्यांकनामुळे बंद होणे या विषयावर सर्वश्री. कपिल पाटील,रामनाथ मोते,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील व रामनाथ मोते यांना मी विनंती करतो की, आज दिवसभरामध्ये आपल्याला भरपूर कामकाज करावयाचे असल्यामुळे आपणास दिलेल्या वेळेमध्ये आपण आपले म्हणणे मांडावे व सभागृहाचे कामकाज पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी अल्पकालीन चर्चेला सुरुवात करावी.

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"राज्यातील बहुतांश मान्यताप्राप्त शाळा अत्यंत जाचक अन्यायकारक मूल्यांकनामुळे बंद होणे, परिणामी सुमारे २ लाख विद्यार्थी आणि सुमारे ४० हजाराहून अधिक शिक्षक यांच्यावर झालेला अन्याय, जिल्हा परिषदेच्या आणि खाजगी संस्थांच्या अनुदानित शाळांनी वीज बील न भरल्याने त्यांच्यावर गुन्हे दाखल होणे, वेतनेत्तर अनुदान नसणे, त्यामुळे शाळांच्या कामकाजावर परिणाम होणे, पटपडताळणीच्या नावाखाली विषय शिक्षकांच्याही रिक्त जागा भरण्याची परवानगी नाकारण्यात येत असल्यामुळे लक्षावधी विद्यार्थ्यांचे गणित, विज्ञान या विषयात प्रचंड नुकसान होत आहे, शिक्षण हक्क कायदा आणि सुप्रीम कोर्टाचा निर्णय यानुसार अशा सर्व शाळांमध्ये पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृहे यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिलेला नसणे, मुंबईतील झोपडपट्टीतील शाळांना अतिरिक्त एफ.एस.आय. देण्याची मागणी अजून मंजूर झालेली नाही, अपंग आणि विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या शाळांमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या कमी केल्याने या विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता आणि विशेष गरजांचा प्रश्न निर्माण झाला आहे, वसतीशाळा शिक्षकांना हिमाचल व उत्तर प्रदेश प्रमाणे नियमित करण्याची आवश्यकता आहे, या प्रश्नांकडे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

सभापती महोदय, कायम विना अनुदानित शाळांमधील "कायम" हा शब्द वगळण्यात आल्याबद्दल मी या शासनाचे आणि माननीय शिक्षण मंत्र्यांचे जरुर अभिनंदन करतो व आभार मानतो. हा "कायम" शब्द काढून टाकल्यानंतर या शाळांना अनुदान देण्यासाठी मूल्यांकनाचे निकष ठरविण्यात आले आहेत ते खूप जाचक आहेत. त्यामुळे या राज्यातील 50 ते 60 शाळासुध्दा अनुदानावर येऊ शकत नाहीत. या जाचक अटी कमी करण्यात याव्यात या करिता बाहेर आंदोलन सुरु आहे. या शाळांना अनुदान देण्यासाठी कठोर नियम असले पाहिजेत त्याबद्दल शंका घेणे किंवा आक्षेप घेण्याचे कारण नाही. परंतु त्या शाळांना अनुदान देण्याची जबाबदारी राज्य शासनाची असून ती शासनाने मान्य केले पाहिजे. एकदा आय.टी. पास केल्यानंतर ते अनुदान देण्यासाठी कोणत्याही प्रकारचा विलंब होता कामा नये अशाप्रकारची भूमिका शासनाने घेतली पाहिजे.

केंद्र शासनाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा मंजूर झाल्यानंतर तो राज्यांनी जसाच्या तसा स्वीकारला. तुम्ही ज्या दिवशी ती जबाबदारी घेतली त्या दिवसापासून तुम्ही त्यांचे देणे लागता. 3 वर्षाचा वायदा ही त्यात असलेली तरतूद हा सोयीचा भाग झाला तरी 3 वर्षे वाट पहाण्याची गरज नाही. त्याप्रमाणे 3 वर्षानंतर म्हणजे 1 एप्रिल 2013 पासून आपण शाळांना वेतनेतर अनुदान देणे लागणार आहात, ते कसे देता येणार नाही यासाठी मूल्यांकनाच्या अडचणी व अटी निर्माण केल्या आहेत त्याबद्दल माझा आक्षेप आहे. या बाबतीत दोन आक्षेप किंवा अटी कठोर असल्या पाहिजेत याबाबत मला शंका नाही. शाळेमध्ये पटावर मुले आहेत की नाहीत, मुले नसतील तर त्या शाळेबाबत बिलकुल विचार करु नका. त्याचप्रमाणे दुसरी अट अशी की,त्या शाळेमध्ये पात्र शिक्षक आहेत की नाहीत हे पहा, पात्र शिक्षक नसतील तर त्या शाळेबाबत बिलकुल विचार करु नका.

या दोन अटींची पूर्तता झाल्यानंतर त्या शाळेला इमारत आहे की नाही, शाळेमध्ये टॉयलेट आहे की नाही, खेळाचे मैदान आहे की नाही या गोष्टींची चर्चा करण्याची गरज नाही. संविधानाने आणि कायद्याने ज्या ज्या आवश्यक गोष्टी आहेत त्या जरुर दिल्या पाहिजेत. परंतु हे 2 निकष लावले तर आज जिल्हा परिषदेच्या व शासनाच्या शाळा अनुदानावर आहेत त्या सुध्दा बसणार नाहीत अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे भौतिक सुविधांच्या संदर्भातील कोणतीही जाचक अट आपण लावू नका.

20-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

पटसंख्या आणि पात्र शिक्षकांबाबत अटी लावण्यास आमचा आक्षेप नाही. रोस्टरच्या संदर्भात देखील कुणी आक्षेप घेणार नाही. परंतु त्याचबरोबर हे देखील लक्षात घेतले पाहिजे की, या शाळांना मान्यता देतांना आणि त्या शाळांमधील शिक्षकांना मान्यता देतांना त्या शाळेमध्ये रोस्टर आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी शासनाची आहे. त्यामुळे आज रोस्टर पाळले नाही म्हणून जुन्या शिक्षकांना घरी जा असे आपण सांगणार हे सुध्दा बरोबर नाही. त्यामुळे शासनाने ते रोस्टर पाळले पाहिजे. या पुढील काळात ज्या शिक्षकांनी गेली दहा वर्षे नोकरी केली आहे त्यांना घटनेतील तरतुदीनुसार आपल्याला सेवेतून काढता येणार नाही.त्यामुळे रोस्टर पूर्ण करण्याची हमी शासनाने घेऊन त्या शिक्षकांना नियमित करण्याची जबाबदारी शासनाने पार पाडावी अशी माझी प्रमुख मागणी आहे.

सभापती महोदय, 2 लाख 40 हजार विद्यार्थ्यांकरिता असलेल्या 30 ते 40 हजार शिक्षकांचा हा प्रश्न आहे. शाळांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत सुध्दा हे शासन चालढकल करीत आहे. त्यांना आपण मार्च 2014 नंतर वेतनेतर अनुदान देणार आहात हे सुध्दा बरोबर नाही, 1 एप्रिल 2013 पासून ते देण्याची शासनाची जबाबदारी आहे. वेतनेतर अनुदान दिले नाही तर एकही शाळा चालू शकणार नाही. सभापती महोदय, वीजेचे बिल भरण्यासाठी शाळेकडे पैसे नाहीत. हा प्रश्न केवळ खाजगी अनुदानित शाळांपुरता मर्यादित नाही तर जिल्हा परिषदांच्या शाळांनी सुध्दा वीज बिल भरले नाही. यामुळे एका जिल्हापरिषदेच्या, शासकीय शाळेच्या मुख्याध्यापकांवर गुन्हा दाखल करुन त्यांच्याविरुध्द केसेस दाखल केल्या आहेत. तुम्ही या बाबतीत काय करणार आहात? आपल्या शासनाचे एक डिपार्टमेंट शासनाच्या दुसऱ्या डिपार्टमेंटच्या कर्मचाऱ्यांवर, मुख्याध्यापकांवर केस दाखल करीत आहे.

गेल्या दोन वर्षापासून या सभागृहामध्ये मी अनेक वेळा हा प्रश्न उपस्थित केला आहे. यामधील अनेक प्रश्न असे आहेत की ते शिक्षण खात्याशी निगडीत नाहीत. त्यामुळे शिक्षण खात्याला लोकांच्या रोषाला, असंतोषाला, अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शासनाच्या इतर डिपार्टमेंटनी या अडचणी निर्माण केल्या आहेत याची मला पूर्ण कल्पना आहे. परंतु या बाबत सामूहिक जबाबदारी ही राज्य शासनाची आहे त्याकडे फक्त शिक्षण खात्यानेच पहावे, मंत्री

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

महोदयांनी आणि माननीय राज्यमंत्र्यांनीच पहावे. त्यांनी असंतोषाला तोंड द्यावे अशाप्रकारची पळवाट आपण शोधत आहात हे बरोबर नाही. या ठिकाणी माननीय संसदीय कार्य मंत्री उपस्थित आहेत त्यांनी आमच्या भावना माननीय मुख्यमंत्र्यांपर्यंत, माननीय वित्त मंत्र्यांपर्यंत पोहोचविल्या पाहिजेत. तुम्ही या दोन मंत्र्यांना आमच्या तोंडी देता आणि आपसात भांडत बसा असे सांगणे बरोबर नाही.

वीज बिल भरण्याची जबाबदारी तुमची आहे, जिल्हा परिषदेच्या शाळेचे वीज बिल भरण्याची जबाबदारी तुमची आहे. खाजगी आणि विनाअनुदानित शाळा देखील तुमच्या आहेत तर मग त्यांचे वीज बिल कोण भरणार आहे ? आम्ही एकही शाळेचे वीजेचे बिल शाळांना भरु देणार नाही ती शासनाची जबाबदारी राहील, त्या शाळेची वीज न कापता ती चालू राहील अशी किमान जबाबदारी आपण स्वीकारली पाहिजे. ही जबाबदारी न घेता आज मुलांना तुम्ही अंधारात शिका असे सांगणार काय? इयत्ता दहावी व बारावीची मुले शिकत असलेल्या वर्गामध्ये आज शाळेमध्ये लाईट नाही, पंखा नाही. या शाळांमध्ये दिवसा सुध्दा अंधार असतो. त्यांना मेणबत्तीच्या प्रकाशामध्ये अभ्यास करावा लागतो. अशा प्रकाकरे अंधारामध्ये हजारो मुले परिक्षा देतात त्या शाळांना लाईट पुरविण्याची जबाबदारी राज्य शासनाची नाही काय?

हे शासन वेतनेतर अनुदान देण्याच्या बाबतीत हलायला तयार नाही. 1 एप्रिल 2013 पासून त्यांना वेतनेतर अनुदान देण्याची जबाबदारी वित्त विभागाची, राज्य शासनाची आहे. त्यांना 1 एप्रिल 2013 पासून कोणतीही अटी न घालता मागील सर्व थकबाकीसह वेतनेतर अनुदान दिले पाहिजे. त्याकरिता थकबाकी देण्यासाठी आपण टप्पा ठरवावा. परंतु या वर्षीचे वेतनेतर अनुदान ते आपण ताबडतोब दिले पाहिजे. अन्यथा आज शाळेकडे खडू विकत घेण्यासाठी पैसे नाहीत. अनेक संस्थाचालक हे खडूसाठी शिक्षकांच्या खिशामध्ये हात घालीत आहेत. तर मग शिक्षकांना कसे जगायचे ते सांगा? शाळा चालविण्यासाठी माणसे नको, पैसे नको का?

आपण नवीन आकृतिबंध लागू केला त्यानुसार शाळेमध्ये पदे भरता येत नाहीत. शाळेत एक शिपाई सुध्दा नाही, क्लार्क नाही, रिटायर्ड झालेल्या क्लार्कच्या जागेवर दुसरा क्लार्क भरण्यास परवानगी नाही. एका बाजूला आपण अटी घालावयाच्या आणि दुसऱ्या बाजूला पैसे द्यावयाचे नाहीत तर मग या सरकारच्या शाळांचा कारभार चालणार तरी कसा? आपल्या या सभागृहाकरिता जर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

सफाई कामगार नेमला नाही तर काय अडचण निर्माण होईल याची आपल्याला कल्पना आहे. या बाबतीत सुप्रीम कोर्टाने निकाल दिला असल्यामुळे कायद्याने आपल्यावर बंधन घातले आहे. शाळेमध्ये मुला-मुलींसाठी वेगवेगळी स्वच्छतागृहे असली पाहिजेत, त्यांची नेहमी सफाई केली पाहिजे. मुलांना वेळेवर खिचडी मिळाली पाहिजे, त्यांचे वर्ग रोज स्वच्छ केले पाहिजेत. हे काम कुणी करावयाचे, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी करावयाचे काय?

आपण शिक्षकांना शिक्षणेतर काम देत असतो आता अशाप्रकारचे काम दिले जाणार असेल तर त्यामुळे मुलांचे प्रचंड नुकसान होणार आहे. मधल्या काळात पट पडताळणीचा एक मोठा एपिसोड झाला. ज्या शाळांनी बोगस विद्यार्थ्यांची पट संख्या दाखविली असेल तर त्या शाळेवर कारवाई करण्यासंबंधी दुमत असण्याचे कारण नाही. आपण त्यांना जरुर फाशीची शिक्षा द्यावयाची असेल तर द्यावी. परंतु पट पडताळणीच्या नावाखाली 19 हजार शिक्षकांना बाहेर काढून

(अपूर्ण -- यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR पूर्वी श्री.सरफरे . . . . 10.10

श्री.कपिल पाटील . . . .

कायम स्वरुपामध्ये जागा रिक्त केल्या. कारण पगाराच्या निमित्ताने 25 हजार रुपयांचे ओझे येते असे म्हटले जाते. अशा वेळी त्यातील 5-6 हजार कोटी रुपये कमी करावयाचे हा जर विभागाचा किंवा मंत्रीमंडळाचा प्रयत्न असेल तर ते अत्यंत निषेधार्ह आहे, ते अजिबात खपवून घेतले जाणार नाही. यापासून तुम्हाला पळून जाता येणार नाही.शासनाच्या एस.एस.कोड आणि शिक्षण विभागाच्या कायद्यामध्ये काय म्हटले आहे तर शाळेमध्ये 30 टक्के उपस्थिती असणे आवश्यक असेल तर ती तपासावी. एक जरी बोगस विद्यार्थी असेल तर विचारा.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी आपले भाषण लवकर संपवावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझे भाषण सुरु होऊन पाच मिनिटे देखील झाली नाहीत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांचे भाषण सुरु होऊन दहा मिनिटे झाली आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी बरोबर 15 मिनिट झाल्यावर थांबणार आहे. मी जास्त वेळ घेणार नाही. या चर्चेसाठी पाऊण तासाचा वेळ दिला आहे, तेवढ्या वेळेमध्ये भाषण संपवितो. त्याठिकाणी एक जरी विद्यार्थी बोगस असतील तर जरुर विचारणा करा. माझी काही तक्रार रहाणार नाही.पण मुलीं अनुपस्थित रहाण्याचे प्रमाण जास्त आहे.

वीटभट्टीच्या ठिकाणी काम करणाऱ्यां मुलांच्या बाबतीत सांगावयाचे तर ज्यांचे पोट हातावर आहे त्यांची उपस्थिती रहाणार नाही. मागणी मोठी आहे. पुणे, बीड, नांदेड येथे तांडेच्या तांडे मजुरी करण्यासाठी बाहेर जातात. जेथे दारिद्रय आहे तेथे खरी अडचण आहे. जेथे परंपरेकरता शिक्षण नाही. तेथील मुले शाळेत जाऊ शकत नाहीत किंवा जाऊ शकत नाहीत किंवा समाज व्यवस्था जाऊ देत नाही. मग अशा वेळी ती मुले शाळेमध्ये जात नसतील तर त्यांची अनुपस्थिती ठरविण्याचा तुम्हाला अधिकार नाही.

सभापती महोदय, मी मुंबईमध्ये रहातो आणि तेथील नाईट स्कूलमध्ये अधिकारी तपासणी साठी 6.00 वाजता आले आणि शाळा 6.30 वाजेपर्यंत थांबले आणि 6.45 वाजेपर्यंत शाळा सुरु झाली नाही म्हणून ते निघून गेले. त्यानंतर मी कलेक्टर यांना फोन केला. तेव्हा त्यांनी असे सांगितले की, आमची दहावी-बारावी तील मुले परीक्षा असली तरी उशिरा येतात. कारण ती मुले





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील . . .

काम करतात आणि मालकांने सोडल्यानंतर ती बिचारी कामगारांची मुले शाळेत येतात. अशा प्रकारे ती आपल्या कुटुंबाचे पोट भरतात. तेथील जिल्हाधिकारी चांगले होते. ते म्हणाले की, बरोबर आहे. मग त्यांनी पुन्हा रात्री 8.00 वाजता पहाणी करण्यासाठी पाठविले तेव्हा दोन-तीन मुले वगळता बाकी सर्वजण हजर होते. मग असे लक्षात आले की, याबाबत मुंबईतील नाईट स्कूलमधील मुलांची अडचण आहे. झोपडपट्टीतील मुलांची जी अडचण आहे, तीच ग्रामीण भागातील मुलांची अडचण आहे. जेथे-जेथे शेतमजूर आहेत किंवा मुंबई शहरामध्ये नाका कामगार, बांधकाम मजूर आहेत त्यांची मुले देखील काम करतात. अशा वेळी त्या मुलांची अनुपस्थिती बोगस ठरविणे हे कदापि सहन करता कामा नये.

सभापती महोदय, औरंगाबाद हाय कोर्टाने निर्णय दिलेला आहे की, याबाबतीत नीट तपासणी करण्यात यावी. या शाळा अचानकपणे बंद करता येणार नाहीत. ज्यांनी खरोखर चुकीचे केलेले आहे त्यांच्या वर तुम्ही जरुर क्रिमिनल केसेस दाखल कराव्यात त्याबद्दल आम्ही काही म्हणणार नाही. कोर्टाने जो निर्णय दिलेला आहे त्याबद्दल मी काही म्हणणार नाही. पण याबाबतीत शासनाने नीट पुनर्विचार केला पाहिजे.

पटपताळणीच्या नावाखाली ज्या विभागात पटसंख्या पुरेशी आहे त्यांच्यावर देखील दडपण आलेले आहे म्हणजे एका विभागामध्ये तुमच्या क्रायटेरियापेक्षा कमी मुले असतील तेथे तुम्ही त्यांना थांबवता हे बरोबर आहे, आवश्यक आहे.कारण अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांना कुठे समायोजित करावयाचे हा महत्वाचा प्रश्न आहे त्याबाबत मी तक्रार करीत नाही. पण ज्या विभागामध्ये अडचण नाही तेथील रिक्त पदे भरण्यासाठी देखील परवानगी दिलेली नाही. एक वर्ष उलटून गेले, यावेळी पहिली टर्म मोठी होती आणि त्या टर्ममध्ये सायन्स, गणित, इंग्रजी या विषयांसाठी शिक्षक नाहीत मग अशा वेळी मुलांनी काय करावयाचे हा प्रश्न आहे. अशा स्थितीत या मुलांनी दहावीच्या परीक्षेला कसे बसावयाचे. त्यामुळे या मुलांचा पहिला 50 टक्क्याचा भाग गेला आणि मी जेव्हा मागणी केली की,या विद्यार्थ्यांना त्या विषयांचे मार्क द्यावेत तर त्याबाबत सांगितले की, तो कमिटीचा भाग नाही. मराठी विषयाच्या शिक्षकांनी इंग्रजी शिकवले, इतिहास शिकविणाऱ्या शिक्षकांनी गणित शिकविले तर ते चालणार नाही. त्यांचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार नाही. अशा वेळी ज्या भागामध्ये अतिरिक्त शिक्षक नाहीत,पटपडताळणीचे प्रमाण निकषानुसार नाही. तुम्ही कायद्याने आणि नियमाने करीत आहात. तुमचा हेतू स्वच्छ आहे. तुमच्या हेतूबद्दल या सदनामध्ये आणि बाहेर सुध्दा शंका नाही.

सभापती महेदय,एक गोष्ट खरोखरच चांगली आहे की,शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांमध्ये,संस्थांमध्ये सुध्दा या दोन्ही माननीय मंत्री महोदयांच्या हेतूबद्दल, प्रामाणिकपणाबद्दल यत्किंचितही शंका नाही. पूर्वी तक्रारी करण्यात येत असत. पण यावेळेला तक्रार नाही, कोणीही व्यक्तिगत तक्रार करीत नाही. त्यांना हेही कळते की, राज्याच्या परिस्थितीचे, सरकारचे, मंत्रिमंडळाचे आणि आपण निर्माण केलेल्या अडचणींचे सुध्दा त्यांच्यावर दडपण आहे.पण ज्या विभागात अशी स्थिती नाही तेथे अधिवेशन संपण्यापूर्वी ताबडतोब आदेश गेले पाहिजेत. माननीय मंत्री महोदयांनी यासाठी थांबू नये आणि त्यांनी आजच्या आज ऑर्डर द्यावी की, ज्या विभागामध्ये अडचण नाही त्या विभागामध्ये पूर्णपणे शिक्षक द्यावे.

सभापती महोदय, मला दुसरा मुद्दा सांगावयाचा आहे आणि हा मुद्दा ग्रामीण भागातील नसून मोठ्या शहरातील आहे. मात्र ग्रामीण भागामध्ये काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात स्थलांतर घडत असते. आपल्याला माहिती आहे की, दक्षिण मुंबईत स्थलांतर होऊन जवळपास उपनगरात आणि त्यांच्या पलिकडे लोक गेलेले आहेत. मग तेथील शाळा व तुकड्या बंद होतात. मुंबईमध्ये सतत प्रोजेक्टस् सुरु असतात. मग एस.आर.डी.चा किंवा एम.एम.आर.डी.ए.चा प्रोजेक्ट असेल, एम.यु.टी.पी.चा प्रोजेक्ट आहे, रस्त्यांचे प्रोजेक्ट आहेत तसेच झ ोपडपट्टया हलविल्या जात आहेत. या कामांसाठी गरीब लोकांची वस्ती हलविली जाते आणि मग तेथील शाळांमधील मुले कमी होतात, त्यामुळे पटसंख्या कमी होते. मग लगेच शिक्षकांची संख्या कमी केली जाते. माझे असे म्हणणे आहे की, एखाद्या तुकडी मध्ये किती मुले असावीत याचे निकष ठरलेले आहेत. मग किमान तुकडीचा जो निकष आहे तो पूर्ण करीत असलेली मुले तेथे जोपर्यंत आहेत तोपर्यंत शिक्षकांना सरप्लस करता कामा नये. हे फार अतिशय महत्वाचे प्रश्न आहेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे जवळजवळ 15 मिनिटे भाषण करीत आहेत. त्यांनी आपले भाषण लवकर संपवावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी माझे भाषण लवकर संपवितो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर संपवावे.

4..



असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मला दोन-चार मिनिटे द्यावीत. मी आपल्याला विनंती करतो. याठिकाणी सदरहू विषयावर फक्त सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते भाषण करणार आहेत. दोन-तीन सन्माननीय सदस्य बोलणार आहेत, बाकी सन्माननीय सदस्य बोलणार नाहीत.

. **तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर संपवावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी माझे भाषण दोन-तीन मिनिटांमध्ये संपवितो. ज्या गरीब वर्गाला शिक्षणाची आस आहे त्यांच्यासाठी परंपरेने ज्यांनी शिक्षण घेतले आहे, त्यांनी थोडा वेळ दिला पाहिजे अशी आपल्याला विनंती आहे. मुंबईतील अनेक शाळांमधील दोन-चार मुले कमी झ ााली म्हणून एकेक शिक्षक काढून टाकले. 50 मुले आहेत आणि तेथे एक विद्यार्थी कमी झाला तर किमान अशा ठिकाणी शासनाचे तुकडीच्या बाबतीत जे निकष आहेत ते पूर्ण करीत आहेत तोपर्यंत किमान त्या तुकडीला आवश्यक असलेले शिक्षक कमी करु नयेत एवढीच माझी यानिमित्ताने विनंती आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा शिक्षण विभागाशी निगडित असला तरी शिक्षण विभागाची ती जबाबदारी नाही आणि इतर विभागांची जास्त आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी आणि स्वच्छ स्वच्छतागृहांची जबाबदारी आपण कायद्याने शाळांवर टाकलेली आहे आणि राज्य शासनाने ती शाळांवर टाकलेली आहे. 97 टक्के जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये व्यवस्था असल्याचा कागदोपत्री पुरवा आहे. मुंबई किंवा झोपडपट्यांमध्ये 60 ते 70 टक्के शाळा आहेत. पण तेथे बाथरुम नाही, मुलींसाठी तेथे स्वच्छतागृहे नाहीत. पिण्याच्या पाण्याची चांगली सोय नाही. याबाबत सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे की, 1 एप्रिल 2013 पूर्वी यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन यासंबंधातील सर्व व्यवस्था करावी आणि ते शासनासाठी बंधनकारक आहे. याबाबतीत शिक्षण विभागाने माननीय स्वच्छता मंत्री आणि गृह मंत्री यांच्याकडे पाठपुरवा करावा. तसेच मुंबईसाठी ताबडतोब अतिरिक्त निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी करतो.

सभापती महोदय, मुंबईतील झोपडपट्टयांमधील शाळांच्या बाबतीत राईट टू एज्युकेशचा मुद्दा येतो. त्यांनी असे सांगितले आहे की,इन्फ्रास्ट्रक्चर पाहिजे, इमारत पाहिजे, वर्ग खोल्या पाहिजेत. पण ते करावयाचे कसे हा प्रश्न आहे. झोपडपट्टीमुळे एका बाजूला एस.आर.ए.चे अतिक्रमण सुरु आहे आणि झोपडपट्टया विस्थापित होत आहेत. मी माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो. कारण त्यांनी मागच्या नागपूरच्या अधिवेशनामध्ये एस.आर.ए.मधील शाळांना अतिरिक्त एफ.एस.आय.



श्री.कपिल पाटील . . . .

.उपलब्ध करुन देण्याबाबत घोषणा केली. त्याचे नोटीफीकेशन देखील निघाले होते पण ते मंत्रालयाला लागलेला आगीमध्ये जळून गेले. पण आता पुन्हा नोटीफीकेशन काढण्यात येणार आहे तेव्हा ते लवकरात लवकर काढण्यात यावे अशी विनंती आहे. यातून अतिरिक्त एफ.एस.आय मिळेल त्याचबरोबर काही ठिकाणी अतिक्रमण केलेल्या जमिनीवर या झोपडपट्टीतील शाळां आहेत, त्या जमिनी त्यांच्या मालकीच्या नाहीत कारण त्यांनी अतिक्रमण केलेले आहेत. अशा प्रकारे ज्या भूखंडावर शाळा आहेत ते भूखंड तेथील संस्थांच्या नावावर करुन द्यावेत आणि ती जागा शैक्षणिक बाबींसाठी आरक्षित करावी जेणेकरुन त्या जागेवर बिल्डर किंवा इतर कोणी अतिक्रमण करणार नाही. तसेच त्याठिकाणी शैक्षणिक आरक्षण ठेवले तर प्रश्न येणार नाही. या दोन गोष्टी कराव्यात अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, यानंतर माझा शेवटचा मुद्दा असून तो विशेष गरज असलेल्या मुलांच्या प्रश्नाबाबत आहे. डिस-ॲडव्हान्टेज ग्रुप जो आय.टी.ने दिलेला आहे. त्यामध्ये अनेक गोष्टी असून मी त्या सगळयाचा उल्लेख करीत नाही. पण शारीरिक डिस-ॲडव्हान्टेज पासून भौगोलिक डिस-ॲडव्हान्टेज पर्यंत या सगळया गरजांकडे आपण विशेष लक्ष देण्याची गरज आहे. हा विषय सामाजिक न्याय विभागाशी निगडित असला तरी याबाबतीत संबंधित विभागाचे मंत्री महोदय उपस्थित नाहीत.परंतु त्यांनी याबाबत पाठपुरावा करावा अशी विनंती आहे. या विशेष शाळांसाठी म्हणजे अंध मुले, मतिमंद मुले असतात, जी दुसऱ्यावर अवलंबून आहेत, ऑटिस्टीक मुले आहेत, त्यांच्यासाठी जो कर्मचारी वर्ग आहे तो कमी केला तर ही मुले काय करतील ? याबाबतीत डॉक्टरच चांगल्या प्रकारे सांगू शकतील. अशा शाळांसाठी ज्या माणसांची गरज आहे ती ताबडतोब कमी करु नका. कारण आपण कमी करण्याच्या नावाखाली या मुलांना वाऱ्यावर सोडतो. आपल्या प्रशासनामध्ये अशा खूप जागा आहेत की जेथे कात्री लावण्याची गरज आहे तेथे पाहिजे तेवढ्या कात्र्या लावा. पण किमान शिक्षणाला, निधीला कात्री लावू नका, अनुदानाला कात्री लावू नका, माणसाला कात्री लावू नका आणि मुलांना चांगले दर्जेदार शिक्षण द्या अशी मी विनंती करतो आणि थांबतो. धन्यवाद.

----

यानंतर श्री.बरवड . . ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या ठिकाणी ज्या विषयावर अल्पकालीन चर्चा सुरु आहे याच विषयाच्या अनुषंगाने 12 तारखेला मी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. माननीय सभापती महोदयांनी ती सूचना राखून ठेवली होती. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनीही त्या विषयाच्या संदर्भात सूचना दिली. त्यामध्ये त्यांचे काही विषय वेगळे होते पण ती सूचना स्वीकृत झाली आणि आज आम्हाला चर्चा मिळाली. माननीय सभापती महोदयांनी आम्हाला न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून आज ही चर्चा लावली त्याबद्दल मी मनापासून माननीय सभापती महोदयांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत आणि आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जे मुद्दे उपस्थित केले, त्यांनी जे निवेदन केलेले आहे, जे विवेचन केलेले आहे त्या सर्व मतांशी मी सहमत आहे. मी फक्त एकाच विषयाच्या संदर्भात बोलणार आहे. बाकीचे विषय जे सन्माननीय सदस्यांनी मांडले त्याच्याशी मी सहमत आहे. पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृहाच्या संदर्भामध्ये या सभागृहामध्ये मी अर्धा-तास चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी सन्माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार सर्व शाळांमध्ये या सोयीसुविधा उपलब्ध होतील या दृष्टीकोनातून आम्ही प्रयत्न करीत आहोत. परंतु त्याकडे थोडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, वेतनेतर अनुदानाच्या बाबतीत मी आदरणीय शिक्षण मंत्री महोदयांचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांना मनापासून धन्यवाद देतो. सर्व अडचणी असताना सुध्दा त्यांनी तो विषय लावून धरला. माननीय मुख्यमंत्र्यांकडे जाऊन, वित्त मंत्र्यांशी अनेक वेळा चर्चा करुन त्यांनी तो विषय एकदाचा मार्गी लावला. वेतनेतर अनुदान देण्याचा हा एक धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने घेतला. या निमित्ताने मी एवढीच विनंती करतो की, या संदर्भातील जी.आर. लवकर निघावा. मी या निमित्ताने मागणी करतो तसेच लोकांचीही मागणी आहे. संस्था कर्जबाजारी झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने वेतनेतर अनुदान देता येईल का याचा जरुर विचार करावा आणि या संदर्भातील आदेश लवकर काढावा. जर आपल्याला खऱ्या अर्थाने या संस्था चालकांना मदत करावयाची असेल तर त्या संदर्भात मी एक सूचना करु इच्छितो. या पूर्वी आपण अनुदानाची फाईल म्हणजे ऑडिट रिपोर्ट देत होतो आणि त्यानंतर अनुदानाचे निर्धारण होत होते. त्यानंतर वर्ष

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

दोन वर्षाने ते अनुदान मिळत होते. या अनुदानाच्या बाबतीत एक टक्का अधिक चार टक्के असे एकूण पाच टक्के वेतनेतर अनुदान द्यावयाचे असा आपला रेश्यो ठरलेला आहे. ते वेतनाच्या पाच टक्के असे जर आपण म्हटले तर दरमहा आमचे जे वेतन बिल जाते त्यामध्येच एक रकाना वाढवून त्यामध्ये हिशेबाच्या आधारे पाच टक्के रक्कम दरमहा या संस्था चालकांना हजार रुपये, पंधराशे रुपये, दोन हजार रुपये, जी काही रक्कम मिळावयाची असेल ती दरमहा खर्चासाठी मिळू शकेल आणि दैनंदिन खर्चाच्या दृष्टीने संस्था चालकांना फायदा होऊ शकेल. याचा शासनाने जरुर विचार करावा.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा वीज बिलाच्या संदर्भात आहे. वीज बिल भरले नाही म्हणून अनेक शाळांचे कनेक्शन तोडलेले आहेत. आज आमचे संगणक बंद आहेत. संगणक विषय शिकविला जात नाही. त्यामुळे नगरपालिकांच्या, महानगरपालिकांच्या, जिल्हा परिषदांच्या किंवा ज्या खाजगी शाळा असतील त्यांच्या वीज बिलाच्या संदर्भामध्ये त्यांची वीज जोडणी पूर्ववत सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा.

सभापती महोदय, वस्तीशाळांच्या संदर्भामध्ये आपली सहानूभुती आहे. आपण याची गांभीर्याने दखल घेऊन विचार करीत आहात. अन्य राज्यांमध्ये हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश असेल, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी त्याचा उल्लेख केला, त्या राज्यांमध्ये ज्या पध्दतीने या वस्तीशाळा शिक्षकांना संरक्षण देण्याचा, त्यांचे समायोजन करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्याची माहिती घेऊन त्याच धर्तीवर आपल्याला आपल्या राज्यामध्ये या दृष्टीकोनातून विचार करता येईल का याचाही शासनाने जरुर विचार करावा, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा सर्वात महत्वाचा आहे. या राज्यामध्ये पटपडताळणीच्या अनुषंगाने काही शाळांमध्ये अनुपस्थिती पन्नास टक्केपेक्षा अधिक होती. त्यामुळे या सर्व शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत असे शासनाचे म्हणणे आहे. या शाळांच्या बाबतीत शेकडो पिटीशन्स हायकोर्टामध्ये दाखल आहेत. न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. या संदर्भामध्ये एक पीआयएल सुध्दा दाखल झालेली आहे. महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियमावलीमध्ये, कायद्यामध्ये किंवा माध्यमिक शाळा संहितेमध्ये कोठेही विद्यार्थी संख्या कमी झाली म्हणून शाळेची

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

मान्यता काढून घेण्याची, शाळा बंद करण्याची कोणतीही तरतूद नाही. या एका तांत्रिक मुद्यावर या सर्व शाळांना स्थगिती मिळालेली आहे. या सर्व शाळा सुरु आहेत. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जे सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे. ज्या शाळांनी बोगस पटनोंदणी दाखविलेली आहे, बोगस विद्यार्थीसंख्या दाखविलेली आहे, शासनाचे अनुदान लाटले आहे किंवा काही फायदे घेतले आहेत त्यांचे आम्ही समर्थन करीत नाही. आम्ही त्याला पाठिंबा देत नाही. पण केवळ काही तांत्रिक कारणामुळे, काही स्थानिक अडचणीमुळे त्या दिवशी विद्यार्थी संख्या कमी होती आणि नंतर मात्र विद्यार्थी संख्या बरोबर आहे किंवा थोडाफार फरक आहे पण ती अनुपस्थिती म्हणजे त्या विद्यार्थ्यांची संख्या बोगस आहे असे अजिबात नाही. बोगस विद्यार्थी किंवा बोगस पटसंख्या दाखविणाऱ्या शाळांचे आम्ही समर्थन करीत नाही हे मी पुन्हा स्पष्टपणे सांगू इच्छितो. पण ज्या शाळेमध्ये खरोखरच विद्यार्थी संख्या आहे पण काही कारणामुळे विद्यार्थी गैरहजर राहात असतील तर त्याचा विचार करता या पटपडताळणीच्या अनुषंगाने जर काही शाळा बंद पडणार असतील आणि जे शिक्षक अतिरिक्त होणार आहेत त्यांचे समायोजन करावयाचे असेल तर त्यांच्यासाठी संपूर्ण राज्याला वेठीस धरणे बरोबर नाही.

सभापती महोदय, संपूर्ण राज्यातील भरती बंद आहे. शिक्षकांची भरती होत नाही. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती होत नाही. शाळांमध्ये गेल्या सहा वर्षापासून शिक्षक नाहीत. त्यांचे समायोजन व्हावयास पाहिजे याही मताशी आम्ही सहमत आहोत. समायोजनाची पध्दत ठरलेली आहे. माध्यमिक शाळांसाठी विद्यार्थी आणि शिक्षकांच्या गुणोत्तराचे प्रमाण नाही. त्यामुळे तो मुद्दा बाजूला जातो. या शाळांमध्ये विद्यार्थी संख्येच्या आधारे आम्हाला जेवढे शिक्षक मिळावयास पाहिजेत तेवढे शिक्षक मिळतीलही परंतु त्यांचे समायोजन करावयाचे आहे. समायोजनाची पध्दत ठरलेली आहे. प्रथम त्या संस्थेमध्ये समायोजन होईल. संस्थेमध्ये झाले नाही तर त्या जिल्ह्यामध्ये समायोजन होईल. जिल्ह्यामध्ये समायोजन झाले नाही तर विभागामध्ये होईल आणि विभागात समायोजन झाले नाही तर राज्यामध्ये समायोजन करण्याचा प्रश्न निर्माण होतो. म्हणून केवळ एका जिल्ह्यासाठी किंवा एका विभागासाठी संपूर्ण राज्यभर भरतीला बंदी घालणे बरोबर नाही. यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ...

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी परवा या सभागृहामध्ये आश्वासन दिले आणि त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली आणि सांगितले की, पंधरा दिवसांमध्ये आम्ही याचा फेरविचार करतो. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून आम्ही या भरतीच्या संदर्भामध्ये परवानगी देण्याचा विचार करीत आहोत असे सांगितले. तो निर्णय त्यांनी लवकरात लवकर घ्यावा. ही पटपडताळणीच्या अनुषंगाने भरतीवर घातलेली बंदी आहे पण दुसरा मुद्दा असा आहे की, चतुर्थश्रेणी कर्मचारी असतील किंवा लिपिक संवर्गातील पदे असतील ती पदे दोन वर्षापासून भरलेली नाहीत. 5 जून, 2010 नंतर 2010-2011 मध्ये कोणतीही भरती झालेली नाही. ती बंदी एक वर्ष वाढविली. 2011-2012 मध्ये एकही भरती झाली नाही. आता परत आपण 2 मे, 2012 ला जी.आर. काढला. त्यामुळे आता भरतीला बंदी आहे. सातत्याने या भरतीवर बंदी आहे. आमचे म्हणणे असे आहे की, जरी या भरतीवर बंदी असली तरी पूर्वीच्या दोन वर्षात किंवा आता सुध्दा ज्या ठिकाणी ज्या संवर्गामध्ये एकही पद भरलेले नाही, सगळी पदे रिक्त आहेत, आमच्या शाळेमध्ये एकच लिपिक आहे आणि तो निवृत्त झाला, मग काम कोण करणार ? एकच शिपाई आहे. खरे म्हणजे आकृतिबंधाचा वाद सुरु होता. त्यामध्ये मी जात नाही. पण ज्या ठिकाणी एकच शिपाई आहे आणि एकच क्लार्क आहे आणि जर क्लार्क आणि शिपाई निवृत्त झाले तर ती शाळा कशी चालणार ? त्यामुळे ज्या ठिकाणी एकाकी पदे आहेत आणि ती पदे रिक्त असतील तर ती पदे भरण्याच्या संदर्भात शासनाने त्याला पडताळणीचा वगैरे निकष न लावता ही पदे भरण्याच्या संदर्भामध्ये तातडीने परवानगी देण्याची आवश्यकता आहे. या सर्व विषयाच्या बाबतीत शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी अशी मी त्यांना विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मी दोनच मुद्दे मांडणार आहे. एक मुद्दा जे अपंग विद्यार्थी आहेत आणि ज्यांना विशेष दर्जा आहे अशा विद्यार्थ्यांच्या संदर्भात आहे. त्यांच्यासाठी आज मुंबईमध्ये स्पेशल स्कूल्स नाहीत. वास्तविक ही काळाची गरज आहे. ही गरज ओळखून अशा प्रकारे ज्या संस्था पुढे येणार असतील त्यांना आपण प्राधान्य द्यावे. त्यांच्यासाठी विशेष शिक्षक तयार करण्याची भूमिका राज्य शासनाची असावी. कारण यांना जे शिक्षक लागतात ते वेगळ्या पध्दतीचे लागतात. त्यांच्याकडे खूप मोठा पेशन्स असावा लागतो. असे शिक्षक तयार करण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घ्यावा आणि त्यांना विशेष अनुदान देऊन त्या शाळा चालू कराव्यात.

सभापती महोदय, आपण स्वच्छतागृहाच्या बाबतीत बोलतो, पिण्याच्या पाण्याबाबत बोलतो ते बरोबर आहे. पण या स्वच्छतागृहाचे किंवा पिण्याच्या पाण्याचे कधी तरी आपण मॉनेटरींग या शाळांमधून केले आहे का ? त्याचा जर सर्व्हे रिपोर्ट असेल तर तो कृपया सभागृहासमोर ठेवावा. आता कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे कॅन्टीन शाळेच्या बाहेर असावे अशा प्रकारचा निर्णय झाल्याचे माझ्या ऐकिवात आहे. ते कन्फर्म झालेले नाही. जर त्या शाळेत कॅन्टीन नसेल तर त्या शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी कोठे जावे, हा एक प्रश्न आहे. या तीन प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

डॉ. अपूर्व हिरे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेला एकही मुद्दा मी रिपीट करणार नाही. मी फक्त दुसरे दोन मुद्दे मांडणार आहे. ज्या विनाअनुदानित शाळांना अनुदानावर आणण्याच्या बाबतीत शासनाच्या वतीने प्रक्रिया सुरु करण्यात आली त्यामध्ये बहुतांश शाळा रोस्टरमुळे अनुदानावर येऊ शकलेल्या नाहीत. परंतु ज्या पध्दतीने आपण अनुदानित शाळांना अनुशेष काढून दिला आहे आणि संस्थांकडून हमी घेऊन आपण तो भरुन देण्याची प्रक्रिया काही ठिकाणी राबवित आहात त्याच पध्दतीने विनाअनुदानित शाळांमध्ये सुध्दा करणे शक्य आहे. भविष्यामध्ये जेव्हा या जागा निर्माण होतील त्यावेळी आपल्याला या रोस्टरचा विचार निश्चितपणे करुन तो भरुन घेण्याचा बॉण्ड आपल्याला त्या त्या संस्थेकडून करुन घेणे शक्य आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, आपल्या ज्या अनुदानित शाळा आहेत त्यांची आपण जी पटपडताळणी किंवा तपासणी केली त्यामध्ये विद्यार्थी कमी आहेत किंवा विद्यार्थी हजर नाहीत या मुद्यावर आपण अनेक शिक्षकांना अतिरिक्त ठरवित आहोत.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 10:30

डॉ. अपूर्व हिरे...

केन्द्र सरकारच्या नवीन कायद्यानुसार शाळेतील तुकडी 30 विद्यार्थ्यांची होणार आहे. या बाबतीत शासन काय विचार करणार आहे ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी फायरआर्म्सचा उल्लेख केला. या संबंधी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. त्याची देखील अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. यासाठी शासनाने खास अनुदान द्यावे. ग्रामीण भागातील अतिदुर्गम भागातील शाळांमध्ये वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे फार गैरसोय होत असते. त्या शाळांतील मुलांना संगणक वापरता येत नाही. इनव्हर्टर असला तरी विजेशिवाय तो चार्ज करता येत नाही. केंद्र शासनाच्या नवीन कायद्यानुसार प्राथमिक आणि माध्यमिकच्या व्याख्या बदलाव्या लागणार आहेत. आपण 4थी ते 7वी पर्यंत प्राथमिक शाळा चालवितो. केन्द्र शासनाच्या नियमाप्रयमाणे प्राथमिक शाळा 8वी पर्यन्त आहे. राज्य शासनाने आता नवीन कायदा आणलेला आहे. त्यामध्ये यासर्व तरतुदी केलेल्या आहेत. ज्या अनुदानित शाळा चालू आहेत त्या बाबतीत काय कारवाई करणार यासंबंधीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, सन्माननीय सदस्य डॉ. अपूर्व हिरे यांनी भाग घेऊन उपयुक्त सूचना केलेल्या आहेत. कोणताही धोरणात्मक निर्णय घेताना सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना निश्चितच विचारात घेण्यात येतील.

सभापती महोदय, आपल्या देशाला महासत्ता बनिवण्याचे आपले उद्दिष्ट आपल्याला साध्य करावयाचे असेल तर त्यासाठी शिक्षण हा एकच मार्ग आहे. आज राज्य शासनाने आपले सर्व लक्ष शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर केंद्रीत केलेले आहे. आपले हयुमन रिर्सोसेस खरोखरच सक्षम करावयाचे असतील, येणा-या नजिकच्या काळात देशाला शक्ती द्यायची असेल तर दर्जेदार शिक्षण देण्याशिवाय पर्याय नाही. सर्वांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, सर्वांना ॲक्सेसिबिलीटी असली पाहिजे, सर्वांना जवळ शाळा उपलब्ध झाली पाहिजे, या गोष्टी डोळयासमोर ठेवून आपण काम करीत आहोत. आता केन्द्राचा राईट टु एज्युकेशन कायदा आलेला आहे. त्या कायद्याचे स्पिरिट देखील हेच आहे. सर्व मुलांना शिक्षणाचे अधिकार देत असताना शाळांची उपलब्धता असली पाहिजे. या कामामध्ये समाजातील सर्व घटकांचा समावेश असला पाहिजे. या कायद्याची अंमलबजावणी अगदी शेवटच्या स्तरापर्यंत झाली तरच हा कायदा यशस्वी झाला असे आपल्याला म्हणता येईल. आपण हे करु शकू की नाही अशी संभ्रमावस्था असता कामा नये. लोकप्रतिनिधी, पालक, या सर्वांना यामध्ये प्रोॲक्टीव्ह रोल घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ॲटीटयूड दोन प्रकारचे असू शकतात. मी हे दोन शब्दात सांगते." I can " हा एक अटिटयूड असू शकतो आणि "Can I" असा देखील ॲटिटयूड असू शकतो. आपल्याला "I can" असा सकारात्मक ॲटिटयूड ठेवून शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये काम करावयाचे आहे. सर्वशिक्षा अभियान आणि राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान किंवा राईट टु एज्युकेशनचा कायदा या सगळया गोष्टी बरोबर घेऊन आपल्याला उद्दिष्ट गाठायचे आहे. आपल्याकडे भरपूर इन्फ्रास्टक्चर आहे. 1,38,000 शाळांना केटर करावयाचे आहे. हे खूप मोठे आव्हान आहे. यामध्ये अनेक डिस्पॅरिटीज आहेत. यामध्ये शहरी तसेच ग्रामीण भाग आहे. गरीब आहेत, श्रीमंत आहेत. सर्वांसाठी समान शिक्षण देण्याचे आव्हान आपणासमोर आहे. इतके प्रचंड काम असताना सर्व विद्यार्थ्यांना

..3..



MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 10:30

आपल्याला घडवायचे आहे, त्यांना सुसंस्कृत करायचे आहे. या क्षेत्रामध्ये आमच्या विभागाने भरीव असे काम केलेले आहे. शासनाने या बाबतीत काय काय निर्णय घेतलेले आहेत त्याची यादी मी आपणास वाचून दाखविते.

सभापती महोदय, महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क नियमनाचा कायदा आपण केला, त्यामुळे लोकांचे एक्स्प्लॉयटेशन थांबले. बालकांच्या सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या अधिकाराची नियमावली तयार केली. या नियमावलीची अंमलबजावणी करण्याकरिता आम्हाला मार्च 2013पर्यंत अवधी आहे. आरटीईसाठी अपेक्षित असलेले सर्व निर्णय आमच्या विभागाने घेतलेले आहेत. सर्व इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करण्यासाठी बृहत आराखडा करण्यात आला. प्रत्येक एक किलोमीटरमागे शाळा उपलब्ध होण्यासाठी प्लॅनिग करुन त्याच्या अंमलबजावणीस सुरुवात केली. शिक्षण सेवकांच्या मानधनामध्ये वाढ केली. मूल्यांकनाची मान्यता देण्यात आली. सर्व शाळा अनुदानित असतील अशा प्रकारचा निर्णय घेतला. सीमा भागात मराठी शाळांना परवानगी देण्याचा निर्णय घेतला, कॉपीमुक्त अभियान राबविले. त्यामुळे शिक्षणाच्या दर्जामध्ये वाढ झाल्याचे दिसून आले. कॉपीमुक्त अभियानामुळे पहिल्यावर्षी कमी निकाल झाला. मात्र नंतर निकालामध्ये आमूलाग्र सुधारणा झाली. विद्यार्थ्यांनी खरोखरच अभ्यास करण्यास सुरुवात केली याची खात्री पटू लागली. 10वी आणि 12वीच्या परीक्षांचे वेळापत्रक एकवर्ष आधी करण्याचा निर्णय घेतला, शाळांना मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला. आरटीईचा कम्प्लायन्स करीत आहोत. पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे इत्यादी मूलभूत सुविधा मार्च 2013 पर्यंत उपलब्ध करुन देण्याचे नियोजन केलेले असून त्यासाठी तरतूद करण्याचे काम केलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पटपडताळीच्या बाबतीत अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. हे सर्व प्रश्न एकमेकांशी निगडित आहेत. आपल्या समोर अनेक आव्हाने आहेत. त्या आव्हानांचा सामना करुन त्यातून बाहेर पडण्यासाठी युद्धपातळीवर काम करण्यात आलेले आहे. आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी यामध्ये लक्ष घातलेले आहे. त्यांच्या सोबत अनेक बैठक झालेल्या आहेत. शालेय शिक्षण खात्याच्या माननीय मंत्री महोदयांनी तर धावपळ करुन सर्वतोपरी प्रयत्न केलेले आहेत. व्हिडिओ कॉन्फरन्सिग फॅसिलिटी प्रत्येक तालुकास्तरावर उपल्बध करुन दिलेली

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आहे. त्यामुळे तालुकास्तरावरील ॲडमिनिस्ट्रेशनशी थेट संपर्क साधता येतो. नियमित शिक्षकाची अन्यत्र नियुक्ती झाल्यास शिक्षण सेवक योजना लागू न करण्याचा निर्णय घेतलेला आहे. 1995च्या ज्या शंभर टक्के अनुदानित शाळा आहेत त्या शाळांच्या बाबतीत पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. इंग्लिश इम्प्रुव्हमेण्टचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. युनायटेड किंग्डम सोबत ग्लोबल स्कूल पार्टनरशीप करुन शिक्षकांना इंग्रजी विषयामध्ये कसे प्रावीण्य मिळविता येईल या दृष्टीने हा कार्यक्रम घेण्यात आला. उच्च प्राथमिक शाळांसाठी केवळ डीएड नाही तर बीएड देखील एलिजिबल केलेले आहेत. या निर्णयाच्या माध्यमातून आपण ग्रज्युएशनला प्राधान्य दिल्यामुळे प्राथमिक स्तरावर देखील आपल्याला ग्रॅज्युएट शिक्षक उपलब्ध होण्यास सुरुवात झाली आहे.

...नंतर श्री. गिते....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

सभापती महोदय, आम्ही डी.एड.साठी सुध्दा अशा प्रकारचा निर्णय घेणार आहोत. डी.एड.बरोबरच ग्रज्युएशनला प्राधान्य दिले तरच आपल्याला सुरुवातीपासून ग्रॅज्युएट असलेले चांगले शिक्षक आपल्याला उपलब्ध होतील. याबरोबरच टीचर्स इलिजिबिटी टेस्ट घेणार आहोत. शिक्षकांचा दर्जा निश्चितच वाढविण्याचे काम या राज्यामध्ये आपल्याला करावयाचे आहे व ते काम करण्यासाठीच्या प्रकियेस सुरुवात करीत आहोत.

सभापती महोदय, इ.सी.एस.प्रणालीच्या माध्यमातून शिक्षकांचे पगार महिन्याच्या एक तारखेस मिळावेत अशी मागणी होती, त्या मागणी प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. काही ठिकाणी ही कार्यप्रणाली अंमलात आणली आहे. राज्यातील 1 लाख 38 हजार शिक्षकांना महिन्याच्या एक तारखेस पगार देणे ही काही छोटी गोष्ट नाही. या बाबतीत निर्णय घेण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, या राज्यात सर्व शाळांमध्ये संगणकाचे प्रशिक्षण देण्याचे काम सुरु केलेले आहे. पुनर्रचित अभ्यासक्रम सुरु झालेला आहे. दर्जेदार शिक्षणासाठी नवीन अभ्यासक्रम पाहिजे, नीड बेस आणि चॉईस फूल या पध्दतीचा अभ्यासक्रम आपण सुरु करीत आहोत. उच्च माध्यमिक स्तरावर संगणक प्रशिक्षणाचे काम सुरु करण्यात आलेले आहे.2013-14 पासून इयत्ता 9 वी,10,11 वी व 12 वी मध्ये नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात येईल. मला सांगण्यास आनंद होतो आहे की, एका सीबीएससीच्या सदस्यांनी मला सांगितले की, तुमच्या टेक्स्ट बुक आम्ही बघितल्या त्या खूपच चांगल्या आहेत. त्या टेक्स्ट बुक मागविण्यासबंधी आम्हाला सांगण्यात आले आहे. ॲनॅलिटीकल ॲबिलिटी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी अशा प्रकारचे टेक्स्ट बूक केलेले आहेत.

सभापती महोदय, शिक्षणासंबंधी आपल्या समोर अनेक आव्हाने आहेत. शालेय शिक्षण विभागावर शासन खर्च कमी करीत नाही. या विभागावर 29 लाख 3 हजार 73 कोटी रुपये खर्च करीत आहोत. यात योजनेतर बाबीवरील खर्च 92.03 टक्के एवढा आहे. सगळया शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून अनेक चांगले निर्णय घेण्यात आले आहेत. काही कठोर निर्णय सुध्दा विभागाकडून घेतले गेले आहेत. पट पडताळणीचा कठोर निर्णय विभागाने घेतलेला आहे. शासन योजना राबविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देत असते, तो निधी योग्य ठिकाणी व योग्य योजनेवर खर्च होतो किवा नाही यावर

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

नियंत्रण असले पाहिजे. त्यामुळे पटपडताळणी करण्याचा कठोर निर्णय विभागाने घेतलेला आहे. पट पडताळणीची मोहिम हाती घेण्यात आली, त्यावेळी शिक्षकांच्या समायोजनाचा प्रश्न समोर आला. यासंदर्भातील न्यायालयात केसेस दाखल झाल्या. समायोजन केल्या शिवाय नवीन भरती कशी करणार ? जर अतिरिक्त शिक्षक ठरत असतील तर त्या शिक्षकांचे समायोजन झालेच पाहिजे अशा प्रकारचे शासनाचे आदेश आहेत. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्यास शासन कटिबध्द आहे. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याचे काम शासनाचे आहे आणि शासन ते काम करणार आहे. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याचे काम तत्काळ करावे अशा प्रकारचे आदेश देण्यात आलेले आहेत. यासंबंधीची संपूर्ण माहिती विभागाकडे उपलब्ध झालेली आहे. समायोजनाच्या कार्यवाहीचे काम पूर्ण झाल्या बरोबर रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रश्न ताबडतोबीने हाताळता येईल.

सभापती महोदय, एखाद्या विषयाचे शिक्षक एक्सेस नसतील व त्या विषयाच्या शिक्षकांची आवश्यकता आहे अशा ठिकाणी एखाद्या विषयाचे शिक्षक दुसऱ्या ठिकाणाहून कसे उपलब्ध करुन देता येतील या बाबतीत चर्चा झालेली आहे. यासंबंधी देखील लवकरात लवकर निर्णय घेण्याचा विभाग विचार करीत आहे.यात कायदेशीर बाबी आहेत. अनेक गुंतागुत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी कायदेशीर बाबीचा उल्लेख केला म्हणून मी हरकत घेण्यास उभा राहिलो आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी काय उत्तर द्यावे हा त्यांचा अधिकार आहे. मी त्यास आक्षेप घेत नाही. कायदेशीर बाबी शिक्षक नेमण्यामध्ये नाही. उलट आर. टी. इ. नुसार शिक्षक उपलब्ध करुन देणे ही तुमची जबाबदारी आहे. त्यामुळे जेथे शिक्षक नाहीत, तेथे शिक्षक दिलेच पाहिजे. कायदेशीर बाबी आहेत म्हणून शिक्षक देता येत नाहीत हे कारण संयुक्तिक वाटत नाही.

प्रा.फौजिया खान : कायदेशीर बाबींचा प्रश्न नाही. ज्या ठिकाणी शिक्षकांची रिक्त पदे आहेत तेथे शिक्षक दिलेच पाहिजेत. रिक्त असलेल्या शिक्षकांच्या पदांवर शिक्षक नेमले जाणारच आहेत. या बाबतीत आम्हाला लवकरात लवकर निर्णय घ्यावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांची शिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबतची जी मागणी केली आहे ती मागणी

3...

अ सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



प्रा.फौजिया खान...

मला मान्य आहे. या बाबतीत तातडीने कार्यवाही करीत आहोत. रिक्त पदांवर शिक्षक नेमले गेले पाहिजेत यासंबंधी विभागास देखील चिंता आहे. याबाबतीत ज्या काही उपाययोजना करावयाच्या आहेत त्या करण्याचे काम आम्ही करीत आहोत.

सभापती महोदय, शाळा इमारतीसाठी वापरल्या जाणाऱ्या वीज बिलाच्या बाबतीत या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. आम्ही नोडल डिपार्टमेंट म्हणून सर्व संबंधित विभागांना बोलावू आणि त्यांचेशी चर्चा करु. आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग या विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करु. शाळासाठी विशेष कॅटेगरी गृहीत धरुन वीज पुरवठा करण्यात यावा व वीज देयके देण्यात यावीत यासंबंधीचा निर्णय शासन स्तरावर झालेला आहे.

महोदय, मुंबईतील शाळांच्या संदर्भात एफएसआयच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यां समवेत चर्चा करण्यात येईल.

महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांच्याकडून अतिशय चांगली सूचना या ठिकाणी करण्यात आलेली आहे. जे मानसिकदृष्टया, शारीरिकदृष्टया खूपच ग्रासलेले आहेत, त्यात विद्यार्थ्यांची ग्रेड महत्वाची आहे. आपल्याला आरटीई प्रमाणे सगळयांना मेन स्ट्रीम मध्ये आणून त्यांना त्याच वर्गामध्ये शिकविण्याची गरज आहे. पण ते ऑटिस्टीक किती प्रमाणात आहे. ज्याच्यामध्ये ऑटीझमचे प्रमाण कमी असेल त्याला आपल्याला फिजीकली मूव्ह करता येत नाही, त्याप्रमाणे त्या मुलांना मेन स्ट्रीममध्ये आणता येणार नाही. त्यांच्यासाठी स्पेशल स्कुलचा विचार करणे गरजेचे आहे असे मला वाटते. हा खूप महत्वाचा मुद्दा आहे. या बाबतीत माननीय मंत्री महोदय व मी एकत्रिपणे निश्चितपणे विचार करु व या बाबतीत सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न करु.

सभापती महोदय, वस्ती शाळामधील शिक्षकांच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करण्यात आला. या मुद्यांच्या बाबतीत खूप कायदेशीर अडचणी आहेत. कोर्टाने् अनेक निर्णय दिलेले आहेत. कोर्टाने एक निर्णय दिलेला आहे, तो निर्णय माझ्या हातात आहे. "With reference to regularization of temporary employees- State of Rajasthan V/s Dayalal., dated-January 2011." या संदर्भात विधी व न्याय विभागाचा अभिप्राय घेऊ. यासंदर्भात अतिशय चांगल्या स्वरुपात प्रस्ताव पाठविलेला आहे. यातून मार्ग काढण्याची भूमिका शालेय शिक्षण विभागाची आहे.

4...



श्री.कपिल पाटील : वस्ती शाळा नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव पाठवावा.

प्रा.फौजिया खान : तसा प्रस्ताव पाठविला आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी माझे उत्तर पूर्णपणे ऐकून घ्यावे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत, त्या सूचनांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल. या ठिकाणी स्थलांतराचा एक विषय उपस्थित करण्यात आला आहे. या संदर्भात देखील चांगले काम करण्याचा विभाग प्रयत्न करील एवढे सांगून मी या विषयाबाबतचे माझे मनोगत पूर्ण करते.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी ) : अल्पकालीन चर्चा आता संपलेली आहे.

----------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : महिलांवरील अत्याचारांच्या घटनात झालेली लक्षणीय वाढ

**मु.शी.** : महिलांवरील अत्याचारांच्या घटनांत झालेली लक्षणीय वाढ याबाबत सर्वश्री. विनोद तावडे,दिवाकर रावते,पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.दीपक सावंत, श्री.रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.चंद्रकांत पाटील,ॲड.अनिल परब, सर्वश्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, विनायक राऊत, डॉ.रणजित पाटील, श्री.सुमंत गायकवाड, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी 1 तास 15 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"राज्यात गर्भातील भ्रूणापासून ते वयोवृध्द महिलांचा जीव असुरक्षित असणे, गत काही वर्षात महिलांवरील अत्याचारांच्या घटनात लक्षणीय वाढ होणे, महिला पोलिसांचा विनयभंग होणे, मानखुर्द येथील महिला सुधारगृहामध्ये महिलांवर अत्याचार झाल्याचे निदर्शनास येणे, महिलांवरील अत्याचाराचे दिवसेंदिवस वाढत चाललेले प्रमाण, परिणामी महाराष्ट्रातील कोट्यावधी महिलांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

सभापती महोदय, या विषयाच्या बाबतीत म.वि.प.नियम २८९ अन्वये प्रस्ताव दिला होता. परंतु आज या विषयाच्या अनुषंगाने नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चेस मी सुरुवात करीत आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/पूर्वी श्री.गिते 10:50

श्री.विनोद तावडे..........

सभापती महोदय, ही चर्चा सुरु करण्यापूर्वी मी असा विचार करीत होतो की, या प्रस्तावावरील चर्चेला महिला सदस्यांनी सुरुवात करावी. परंतु हा विषय केवळ महिलांचाच नसून संपूर्ण समाजाचा हा विषय आहे. त्यामुळे काल देखील विधानभवनाच्या पायऱ्यांवर जी निदर्शने झाली त्यामध्ये पुरुष सदस्य सुध्दा सहभागी झाले होते. आज समाजाची मानसिकता अशी निर्माण झाली आहे की, महिलांचे विषय हे महिलांपुरते मर्यादित आहेत. वास्तविक असे न मानता एकत्रितपणे या विषयाला तोंड देण्याची गरज आहे. त्या दृष्टीने मी जाणीवपूर्वक या विषयावरील चर्चेला सुरुवात करीत आहे.

सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, महात्मा फुले यांचे स्मारक उभारण्याबाबत चर्चा झालेली आहे. महाराष्ट्रामध्ये असे एकाहून एक उत्तुंग व्यक्तिमत्व होऊन गेले. महाराष्ट्राच्या भूमीवर त्यांची स्मारके उभारण्याबद्दल आम्हाला अभिमान वाटणे साहजिकच आहे. ज्यांचे या राज्यामध्ये वास्तव्य होते अशा महापुरुषांच्या स्मारकांबद्दल विचार करतो त्याच वेळी या महाराष्ट्रामध्ये महिलांच्या विषयाची काय अवस्था आहे? जी स्मारके उभारणार आहोत त्यांच्या आधारे या राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखणार आहोत का? आज राज्यामध्ये अनेक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या पुतळयांची स्थापना केलेली आहे. परंतु त्यांनी जे विचार आपल्या समाजाला दिले त्या दिशेने महाराष्ट्र राज्याची वाटचाल सुरु आहे का?

सभापती महोदय, आज महाराष्ट्रामध्ये गर्भातील भ्रूणापासून शाळेतील मुली, कॉलेजमधील तरुणी, नोकरी करणाऱ्या महिला किंवा घर सांभाळणाऱ्या महिला असतील, वरिष्ठ नागरिक असतील, यांच्या बाबतीत गेल्या काही दिवसातील स्थिती खूपच भयानक असल्याचे दिसून येते. त्यामुळे या विषयावर या अधिवेशनात चर्चा होणे महत्वाचे आहे असे मला वाटते. राज्यातील महिलांविषयीची स्थिती वाईट आहे असे मी म्हणत नाही. राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रतिनिधींनी 17 डिसेंबर, 2012 रोजी माझी भेट घेऊन मला निवेदन दिले. त्या निवेदनात म्हटले आहे की, "महाराष्ट्रात महिला युवतींवर हल्ले, छेडछाड करणे आदी गंभीर स्वरुपाच्या घटना घडत आहेत. या संदर्भात गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिलेला नाही असे दिसते." राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..........

अध्यक्षा माननीय खासदार श्री.सुप्रिया सुळे-पवार या आहेत. एका बाजूला शासनाच्या वतीने महिलांचे सबलीकरण करण्याचा प्रयत्न होत असताना महिलांविषयीचे गंभीर स्वरुपाचे प्रश्न समोर येत आहेत, असे निवेदनात म्हटले आहे. या स्थितीला केवळ कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती जबाबदार आहे असे मला वाटत नाही. कायदा व सुव्यवस्था सुधारल्यामुळे ही स्थिती बदलेल का? बहुतांश बदलता येईल. पण त्यानंतर सुध्दा 21 व्या शतकातील वातावरणामध्ये जी आव्हाने समोर येत आहेत त्या आव्हानांना तोंड देण्यासाठी समाजाला सुध्दा स्वत:ची जबाबदारी उचलावी लागणार आहे.

सभापती महोदय, गर्भातील स्त्री भ्रूण सुध्दा आज सुरक्षित नाही. भूतलावर आल्यानंतर आणखी आव्हाने त्यांच्यासमोर उभी राहतात. पुरोगामी महाराष्ट्रामध्ये गर्भातील मुलींची हत्या होण्यामध्ये वाढ झालेली आहे. या विषयाबाबत मागील अधिवेशनात चर्चा झालेली आहे. बऱ्याच वेळेला जे डॉक्टर अशा प्रकरणामध्ये दोषी आढळले त्यांच्यावर आवश्यक तेवढी कारवाई झाली नाही. शासनाने या संदर्भात परिपत्रक निर्गमित करावे म्हणून मी संबंधित विभागाला पत्र दिले होते. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाला पत्र पाठवून अशा दोषी डॉक्टरांबाबत प्रॅक्टिस करण्याचे अधिकार का काढून घेत नाही म्हणून विचारणा केली होती. त्यांनी कळविले की, ज्यावेळी पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली जाते त्यावेळी संबंधित पोलीस ठाण्याकडून मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाला कळविले पाहिजे. त्या तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई केली जाते. महाराष्ट्रामधून अशा तक्रारी येत नाहीत. म्हणून आम्हाला कारवाई करता येत नाही, असे त्यांनी मला कळविले आहे. अशा घटनांबाबत तक्रार दाखल झाल्यास संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी ताबडतोब मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाला कळविले पाहिजे म्हणून मी पाच महिन्यांपूर्वी राज्याच्या पोलीस महासंचालकांना लेखी पत्र पाठविले होते. परंतु मला अद्याप काय प्रगती झाली हे कळलेले नाही. गृह विभागाने स्वत: पुढाकार घेऊन या संदर्भातील परिपत्रक निर्गमित करणे आवश्यक होते, त्याची अंमलबजावणी केली नाही. या विषयाबाबत सभागृहात चर्चा झाल्यांनतर शासनाने ज्या गोष्टी करणे आवश्यक होते त्याबाबत कोणती कार्यवाही झाली आहे याची मला अद्याप माहिती मिळालेली नाही.

..3..



SGB/ D/ KTG/पूर्वी श्री.गिते 10:50

श्री.विनोद तावडे..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, महाराष्ट्रात गेल्या काही दिवसात घडलेल्या घटना लक्षात घेतल्यानंतर महिलांची सुरक्षितता किती धोक्यात आहे हे सहज लक्षात येईल. 12 डिसेंबर रोजी सिरोंचा तालुक्यात 9 वर्षाच्या मुलीवर दोन शिक्षकांनी बलात्कार केला. कोल्हापूर जिल्हयातील लक्ष्मी नारायण हायस्कूलमधील 13 वर्षाच्या विद्यार्थीनीवर अत्याचार करण्यात आले. नाशिक जिल्हयात शाळकरी मुलीवर बलात्कार झाल्यानंतर त्या मुलीने जाळून घेतल्याची घटना काही दिवसापूर्वी घडली. डोंबिवली शहरात शाळकरी मुलांची ने-आण करणाऱ्या रिक्षा चालकाने 4 वर्षाच्या बालिकेवर बलात्कार केल्याची घटना नुकतीच घडली आहे. तरुण महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. नागपूरच्या होमिओपॅथी कॉलेजमध्ये परिचारिका पदावर काम करणाऱ्या तरुणीने संस्था चालकांविरुध्द लैंगिक छळ केल्याची तक्रार केली असता संस्था चालक एका राजकीय पक्षाचा मोठा नेता असल्यामुळे त्याच्याविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही हे वास्तव आहे. मुंबई शहरातील वडाळा येथे पल्लवी पूरकायस्थ या तरुणीवर बलात्कार करुन नंतर तिची हत्या करण्यात आली, त्या संदर्भात बरीच चर्चा झाली आहे.

सभापती महोदय, स्त्री भ्रूण, शाळेतील मुली, तरुण महिला किंवा महिलांच्या संदर्भात आपला दृष्टीकोन कसा आहे याचे एक उदाहरण देऊ इच्छितो. नवजीवन महिला वसतिगृहाच्या विषयाबाबत मी अनेकदा संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांबरोबर चर्चा केलेली आहे. 12 नोव्हेंबर, 2012 रोजी नवजीवन महिला वसतिगृहाला भेट देऊन समितीने अहवाल तयार केला. त्या अहवालामध्ये महत्वाच्या बाबींचा उल्लेख केलेला आहे. 6 फेब्रुवारी, 2012 रोजी तेथून दोन महिलांनी पलायन केले होते, पुन्हा 26 ऑक्टोबर, 2012 रोजी 12 महिलांनी पलायन केले. या महिला अद्याप परागंदा आहेत. महिलांच्या सुरक्षिततेसाठी महिला सुधारगृह स्थापन केलेली आहेत. एका असुरक्षित वातावरणातील महिलांना सुरक्षित वातावरणामध्ये आणण्याचा आपण प्रयत्न करतो. त्या सुधारगृहातून या महिला पलायन का करतात? या घटनेच्या मागे फ्लेश ट्रेड आहे का? अनैतिक धंदे कारणीभूत आहेत का? सुधारगृहातील महिलांना पळून जावेसे का वाटते? नरकातून चांगल्या ठिकाणी पुनर्वसन झाल्यानंतर तेथील वातावरण नरकापेक्षा भयानक आहे ही जाणीव त्यांना होते. म्हणून त्या पलायन करतात. या संदर्भात वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द





श्री.विनोद तावडे..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाल्यानंतर समितीने त्या ठिकाणाला भेट दिली. तेथील गैरव्यवस्था निदर्शनास आल्या आहेत. सुधारगृहामध्ये 16 स्वच्छतागृहे आहेत. त्यापैकी 12 स्वच्छतागृहे बंद आहेत. घाणीच्या साम्राज्यामुळे तुंबलेली आहेत. निकृष्ट दर्जाचे अन्न, तेथील दुरवस्थेचे फोटो पाहिल्यानंतर कोणाचेही मन हेलावल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे तेथील महिलांचे म्हणणे आहे की, या ठिकाणी राहणे यापेक्षा आधीच्या नरकात जाणे आम्हाला केव्हाही चांगले वाटेल. तेथे ज्या गडबडी चालतात त्या सरकारने केलेल्या नाहीत.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने हस्तक्षेप केल्यानंतर यातून सर्व गोष्टी बाहेर पडल्या. 5 नोव्हेंबर, 26 नोव्हेंबर, 30 नोव्हेंबर, 5 डिसेंबर, 12 डिसेंबर, 13 डिसेंबर अशा सलग 6 तारखांना न्यायालयाने काही ना काही म्हटलेले आहे व यातून शासनाचे खरे रुप प्रकट झाले. अगोदर श्री.पोटे आणि डीसीपी यांची चौकशी करण्यासाठी नेमणूक करण्यात आली होती. श्री. पोटे यांनी यामध्ये थोडा गोंधळ घातला होता. परंतु महिला जबरदस्तीने बाहेर जात नाही असे म्हटल्यानंतर न्यायालयाने पुढाकार घेऊन श्री.पोटे यांच्या ऐवजी श्रीमती रश्मी करंदीकर आणि हरिष शेट्टी यांची नेमणूक केली. यांनी यासंदर्भात जे रिपोर्ट दिले त्यातून अजून सत्य स्थिती बाहेर आली. त्यांच्या रिपोर्टमध्ये त्यांनी असे म्हटले होते की, एक महिला जेव्हा या सुधारगृहात आली त्यावेळेस तिची सर्व टेस्ट घेण्यात आली त्या टेस्टमध्ये ही महिला गरोदर नव्हती परंतु 3-4 महिन्यांनतर पुन्हा टेस्ट घेतल्यानंतर ही महिला गरोदर असल्याचे दिसून आले. याचा अर्थ सुरक्षित सुधारगृहात आलेली महिला गरोदर राहते तेव्हा या सुधारगृहात काय काय होते हे दिसून येते.

सभापती महोदय, मुंबईत नवजीवन सुधारगृहाच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम जोरदार करण्यात आला होता. या सुधारगृहाची क्षमता 100 महिलांची असतांना त्या ठिकाणी प्रत्यक्षात 350 महिलांना ठेवले जाते. या ठिकाणच्या महिलांना योग्य पोषण आहार दिला जात नाही, स्वच्छतागृह चांगली नाहीत, औषधे मिळत नाहीत, महिलांच्या शारीरिक आरोग्याच्या संदर्भात ज्या काही गोष्टी असतात त्या मिळत नाहीत. अशा अनेक भयानक गोष्टी समोर आल्या आहेत. या ठिकाणी आवश्यक स्टाफ नसल्यामुळे किती महिला आल्या, किती गेल्या याची नोंद ठेवली जात नाही. आपली काही जबाबदारी आहे असे सरकारला वाटतच नसेल तर त्याचा काही उपयोग नाही. या ठिकाणी प्रोबेशन ऑफिसरची नियुक्ती करण्यात आली नाही, महिला सुरक्षा रक्षकांची भरती करण्यात आलेली नाही. सुधारगृहाची सुरक्षा वाढविण्याच्या बाबतीतील I सुध्दा अनेक प्रश्नआहेत.

सभापती महोदय, विवाहीत स्त्रियांवरील अत्याचाराचा विषय आहे तसेच गुंडांचा सुध्दा विषय आहे. संभाजी नगरमधील युवती मेळाव्यात माननीय गृहमंत्री गेले होते ती सर्व माहिती आम्ही टीव्हीवर पाहिली होती. त्या ठिकाणच्या महिलांना हुंडयांच्या बाबतीत आबांकडे तक्रार केली त्यावेळेस आबांनी त्यांना सांगितले "तुमच्याकडे कोण हुंडा मागतो, त्याची जवळच्या पोलीस



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

स्टेशनमध्ये तक्रार का करीत नाही" असे आबांनी म्हटल्यावर त्या मुली म्हणाल्या की, "आबा तुमचे पोलीसच जास्त हुंडा मागतात." त्यावर आबा म्हणाले की, "तुम्ही मला फोन करा." त्यावेळी त्या मुली म्हणाल्या की, "आबा तुमचा फोनच लागत नाही." मला वाटते महिलांच्या संदर्भातील एक प्रातिनिधीक स्वरुप आपल्याला पहावयास मिळाले आहे.

सभापती महोदय, आज महिला पोलीस कर्मचाऱ्यांची काय अवस्था आहे ? आझाद मैदानावर महिला पोलिसांची घटना घडल्यानंतर त्या ठिकाणच्या 5 महिला पोलिसांना दम देण्यात आला की, यासंदर्भातील माहिती बाहेर अजिबात जाऊ द्यावयाची नाही." या घटनेच्या संदर्भात मी हॉस्पीटलला भेट दिल्यानंतर कोणी तरी परिचित आहे असे त्या महिला पोलिसांना वाटल्यानंतर त्या महिलांनी त्या ठिकाणी नेमके काय घडले याची माहिती दिल्यानंतर व मी या विषयावर बोलल्यानंतर त्या महिला पोलिसांची तक्रार नोंदवली गेली. या महिलांच्या मेंटल हेल्थची काळजी अजून तरी सरकारने घेतलेली नाही. त्या सर्व घटनेची माहिती मी ठेवलेली आहे. परंतु यासंदर्भात सरकारने जेवढी जबाबदारी घ्यावयास पाहिजे होती ती घेतली नाही ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, कोल्हापूरमध्ये जी घटना घडली त्याचा आपल्याकडे अहवाल आला असेल त्यासंदर्भात आपण काही तरी कार्यवाही केली असेल. त्यातील काहींना आपण निलंबित सुध्दा केले असेल.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : हा विषय अतिशय गंभीर असल्यामुळे या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांना आपले म्हणणे मांडावयाचे आहे. या विषयाच्या संदर्भात 11.30 वाजता माननीय मंत्रीमहोदयांना रिप्लाय सुरु करावयाचा आहे. त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले म्हणणे थोडक्यात पूर्ण करावे.

श्रीमती शोभा फडणवीस :महिलांचा एवढा गंभीर विषय असतांना एवढा कमी वेळ तरी का देता ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, महिलांच्या सुरक्षेच्या संदर्भात आपले राज्य, आपले शहर, आपले गाव, आपला वॉर्ड, आपली विधानसभा सुरक्षित करण्यासाठी ऑडीट करण्याची गरज आहे.

..3..

श्री. विनोद तावडे.....

सभापती महोदय, काही महिलांनी माझ्या समोर भावना व्यक्त केल्या की, मी होस्टेलमध्ये राहते, मी शिकावे अशी आई वडिलांची इच्छा असल्यामुळे मी खेडयातून नागपूरमध्ये आले. परंतु नागपूरमध्ये भर दुपारी सुध्दा भीती वाटते. शांत रस्त्यावरुन मागून कोण मोटासायकल स्वार येईल आणि पाठीवर हात फिरवून जाईल याचा भरोसा राहिलेला नाही. सायकलने जात असतांना मागून कोणी तरी येतो आणि छातीवर, पाठीवर हात फिरवून सुसाट निघून जातो. अशा प्रसंगाने थरकाप उडतो, भीती वाटते, घरी सांगितले तर कॉलेजला जाणे बंद करतील म्हणून घरी सांगता येत नाही. हा अन्याय सहन करीत शिकत असते. सावित्रीबाई फुले यांच्या महाराष्ट्रातील मुलींनी या चिंता व्यक्त केलेल्या आहेत. मुली सांगतात की, शाळा सुटली की, बसने घरी येते, बसमध्ये गर्दी असते, नाईलाजाने गर्दीमध्ये चढावे लागते, गर्दीत मागेपुढे असणारे लोक चिटकून उभे राहतात, नको तेथे हात लावतात, शिसारी येते, पुढे सांगता येत नसल्यामुळे मुलगी रडू लागते. हे असे घाणेरडे वातावरण आपण आता तरी बदलणार आहोत की नाही ?

सभापती महोदय, चिंचवडे येथे खाजगी नर्सला फोन करुन एक व्यक्ती छेडछाड करीत होती. या घटनेचा तपास एका महिला इन्स्पेक्टरला देण्यात आला. चौकशी करण्यासाठी महिला इन्स्पेक्टरने त्या व्यक्तीला फोनवरुन संपर्क साधला असता हा महाभाग त्या नर्सला बरोबर घेऊन महिला इन्सपेक्टरला त्रास देऊ लागल्यामुळे सिनियर महिला इन्स्पेक्टरकडून केस काढून ती केस पुरुष इन्स्पेकटरकडे दिली.

सभापती महोदय, एका मुलीने सांगितले आहे की, क्लास संपल्यानंतर बसमध्ये चढतांना रोज एकच कंडक्टर दिसत होता, प्रथम त्याचा धक्का लागला नंतर नंतर तो खेटून उभा राहू लागला, अस्वस्थ वाटू लागल्यामुळे जर दुसरीकडे सरकली असतांना सुध्दा पुन्हा खेटू लागला. त्याच्याकडे रागाने बघितल्यानंतर तो हसला. तिला उबग आली, भीती वाटू लागली, दुसऱ्या दिवशी लवकरच्या बसने घरी आली, तिसऱ्या दिवशी उशिराच्या बसने घरी गेली. वडिलांनी विचारले तर काय सांगायचे असा प्रश्न पडला. बस तिला नकोशी वाटते, अभ्यास नकोसा वाटतो फक्त वाटते भीती. अशा अनेक घटना सावित्रीबाई फुंलेंच्या महाराष्ट्रात घडत आहेत.

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

सभापती महोदय, या घटना घडू नये यासाठी काय केले पाहिजे ? खरे म्हणजे यासाठी कायदा अधिक मजबूत करण्याची गरज आहे. परंतु कायदा मजबूत करण्याचा प्रयत्न होतांना दिसत नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस,सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे या महिला आयोगावर अध्यक्षांची नेमणूक करा असे नेहमी बोलत असतात. आघाडी सरकार चालवितांना एवढी अडचण येते का ? आम्ही सुध्दा युतीचे शासन चालविले होतेच. तुमच्यामध्ये एवढी भांडणे आहेत ? तुम्हाला महिलांच्या सुरक्षेकडे लक्ष द्यावयास वेळ मिळत नाही? महिला आयोगाला अध्यक्ष नाही. यासंदर्भात मंत्री खासगीत सांगतात की, अजून आमचे वाटप ठरत नाही. आपले वाटप ठरत नसल्यामुळे महिलांची अस्वस्थता वाढलेली आहे.

सभापती महोदय, दिवसेंदिवस महिलावरील अन्यायामध्ये वाढ होत आहे. महिला आयोगाला अध्यक्ष नसल्यामुळे पीएनडीपी समितीची बैठकच होत नाही. स्त्रीभ्रूण हत्येच्या संदर्भात पीएनडीपी हा विषय अतिशय महत्वाचा आहे. महिला संघटनांनी आपल्याला वारंवार सांगूनही आपण कार्यवाही करीत नाही.

सभापती महोदय, आझाद मैदानावर महिला पोलिसांवर जो अन्याय झाला होता तो विषय राष्ट्रीय महिला आयोगाकडे गेला. परंतु आपल्या राज्यातील महिला आयोगाला अद्यापही अध्यक्ष मिळालेला नाही. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात आपले सरकार सिरियस आहे हे दिसून येते.

सभापती महोदय, सन 2010-2011,2011-2012, 2012-2013 च्या बजेटची माहिती घेतली असता राज्याच्या बजेटच्या सव्वा ते दीड टक्के खर्च महिला व बाल कल्याणावर आपण करत नसल्याचे दिसून आले आहे. पहिला कट महिला व बालकल्याणला लागत असतो. सुप्रीम कोर्ट असे म्हणते की,जे काही खाणे पिणे चालते त्यावर हा खर्च होत असेल.

सभापती महोदय, कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याच्या संदर्भात विषय उपस्थित झाला तेव्हा टाटा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्सने सांगितले की, 16 जिल्हयात संरक्षण अधिकारी म्हणून मान्यता देण्यात आली.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

पण आर्थिक तरतुदींचा अभाव व कंत्राटी नेमणुकामुळे केंद्राचे काम प्रभावीपणे होऊ शकले नाही. कामाच्या ठिकाणी लैगिंक शोषण व घरगुती हिंसाचार हा विषय देखील महत्त्वाचा आहे. घरगुती हिंसाचाराला व कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक शोषणाला प्रतिबंध करण्यासाठी शासनाने अधिकारी नेमणे गरजेचे होते. त्यानुसार अधिकारी नेमले. पण यास प्रतिबंध करण्यासाठी व्यापक प्रचार करणे आवश्यक होता तो केला नाही. पूर्णवेळ संरक्षण अधिकारी हा घरगुती हिंसाचार रोखण्यासाठी नेमणे आवश्यक आहे. तो आपण नेमला आहे काय ? जिल्हा महिला अध्यक्षावरच आपण हे काम सोपविले आहे. त्याच्याकडे असलेले काम त्याला झेपत नसताना आपण त्याच्यावर आता संरक्षण अधिकाऱ्याचा भार टाकलेला आहे. संरक्षण अधिकाऱ्याच्या नवीन नेमणुका आपण करीत नाही. मला असे वाटते की, आपण या संबंधातील सर्व कायदे कडक केले पाहिजेत. या गुन्ह्यातून गुन्हेगारांचे सुटण्याचे प्रमाण जास्त आहे. हे सर्व कायदे इंग्रजांच्या काळातील आहेत. त्यात थोडेसे बदल करून, आज आवश्यक असणाऱ्या तरतुदी त्यात समाविष्ट केल्या पाहिजेत. पण तसे कायदे आपण आणत नाही. डिजिटल क्रांती मुळे आज 21 व्या शतकात नवीन आव्हाने आपल्या समोर उभी रहात आहेत. त्याला तोंड देण्यासाठी ज्या कायद्यांची गरज आहे, तसे कायदे करण्याचा आपण गांभीर्याने कधी विचार केला आहे काय ? असे म्हणणे मोठ्या पदावर असलेल्या प्रथितयश महिला आयपीएस अधिकाऱ्यांचे आहे. आम्हाला त्या गुन्हेगाराला, कितीही मेहनत घेतली तरी पोचवताच येत नाही. बलात्कार केल्यानंतर जिच्यावर बलात्कार झाला हे तिने सिद्ध करायचे असते. तो नाही म्हणून मोकळा होतो. अॅट्रॉसिटीची केस करतो तशी पद्धत येथे अवलंबिली पाहिजे. ज्यावर अॅट्रॉसिटी केस दाखल होते त्याला सर्व बाबी सिद्ध कराव्या लागतात. असे काही बलात्काराच्या केसमध्ये करता येईल काय, याचा देखील विचार करावा. कायद्यामध्ये अशी तरतूद केली पाहिजे की, बलात्कार केलेला नाही हे त्याने सिद्ध केले पाहिजे. अशा प्रकारचा बदल कायद्यामध्ये करण्याची गरज आहे काय यासंबंधी अधिक विचार करावा लागेल.

सहा महिन्यामध्ये फास्ट ट्रॅक कोर्टाचा निकाल लागला पाहिजे ही सगळी चर्चा मी ऐकली आहे. सहा महिन्यात निकाल लागल्यानंतर तो खटला वरच्या कोर्टामध्ये स्टँड होऊ शकतो काय ? आष्टी येथे महिला अधिकाऱ्यावर बलात्कार झाला. ती केस अजून मोक्का कोर्टात सुरू आहे. सदर घटना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

नगर बीड रस्त्यावर घडली. त्याचा निकाल लागला का ? अजून पर्यंत त्याचा निकाल लागला नाही. आपण सर्व करतो पण त्याचा निकाल लागत नाही. तेव्हा दशहत बसेल असे काही तरी केले पाहिजे. उद्या फाशीची शिक्षा ठोठावून सुद्धा दहशत बसणार नाही. कारण फाशी द्यायची की नाही असा मुद्दा उपस्थित होतो. संसदेवर हल्ला करून अफझल गुरूच्या बाबतीत काय झाले ? शेवटी कायदा व सुव्यवस्थे संबंधात सरकार कोणत्या गतीने काम करते हे सर्वात महत्त्वाचे आहे. आज जगात वेगवेगळे प्रयोग झालेले आहेत. रासायनिक नपुंसकत्वाची चर्चा काल आपण ऐकली. त्यासंबंधातील रिपोर्ट काय आहेत ते पहावे व ते आपण यात ॲड करू शकतो काय हे पहावे. या सगळ्या गोष्टीचा अभ्यास केला पाहिजे. अशा प्रकारे आपल्याला नवीन पद्धतीने बदल करायला पाहिजे.

पुरूषी अहंकार हा कुटुंबातून जोपासला जातो. त्यासंबंधी समाजामध्ये वेगळ्या प्रकारचे जागरण केले पाहिजे. सर्वात मोठे चॅलेंज डिजीटल क्रांतीचे आहे. आज सोशल नेटवर्कीमुळे एक्सप्लोजर मिळत आहे. त्यातून सर्व प्रकारच्या कल्पना सुचतात. त्यामुळे भावना भडकतात. अशा भावना नियंत्रणात आणण्यासाठी आपल्याला काय करता येईल हे ही समाज म्हणून पाहणे आवश्यक आहे. यासंबंधी सरकार ठोस पावले उचलत आहे. आंदोलने झाली. एखादा विषय मोठा घडला की त्यावर वक्तव्ये करायची आणि नंतर विसरायची असे न करता त्याचे सातत्य पुढे टिकवून ठेवले पाहिजे. आपण ज्या महनीय व्यक्तींचे स्मारक बनविणार आहोत त्यांना लाजेने मान खाली घालावी लागेल असे स्मारक बनविता कामा नये. जे स्मारक बनविणार आहोत ते वैशिष्ट्यपूर्ण बनवावे एवढीच या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो.

.............



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, मी येथे विविध सूचना करणार आहे. घटना कुठून सुरू करायची आणि कुठे संपवायची हा मोठा प्रश्न आहे. कारण ह्या घटना अनंत आहेत. मी नियम 93 अन्वये सूचना देखील दिली आहे. आपले अधिवेशन नागपूर मध्ये होत आहे. त्याच नागपूर मध्ये 12 वर्षाच्या अंध मुलीवर अत्याचार करण्यात आलेले आहेत. गावगुंडांना वैतागून महिलांचा रात्रभर पोलीस चौकीत मुक्काम अशी घटना यवतमाळ येथे घडली आहे. कालच एका चौकीदाराने एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची भीषण घटना घडलेली आहे. या सर्व घटनेकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, या चर्चेसाठी पाच मिनिटे पुरेशी नाहीत. पूर्वी आमच्या कुटुंबात मागची पंगत अशी पद्धत असायची. पुरूषांची पंगत आटपली की, महिलांनी मागच्या पंगतीला बसायचे. त्याच पद्धतीने सभागृहात महिला आमदारांना वागणूक मिळते हे मला येथे नोंदवायला पाहिजे. आम्हाला पाच मिनिटे नसली तरी 2 मिनिटे पुरेशी आहेत. याचे कारण न्यायासाठी सुरूवात करणे महत्वाचे असते.

विशाखा प्रकरणाच्या निकाला नुसार गाईड लाईन्सची अंमलबजावणी झाली पाहिजे या संबंधातील माझी पहिली सूचना आहे. न्यायालयात स्त्रीभ्रूण हत्येच्या केसेस प्रलंबित आहेत. ज्या न्यायालयातील निकाल लागले नाहीत तेथे सरकारी वकिलांची नियुक्ती करून ते ताबडतोब निकालात काढावेत. राज्य महिला आयोगावर सदस्य नेमून महिला आयोग सक्षम बनविणे आवश्यक आहे. 354 कलम अजामीनपात्र करावे व कलम 376 ची व्याख्या अधिक व्यापक केली पाहिजे. कलम 354 अजामीनपात्र करण्यासंबंधी वेळोवेळी अनेक आश्वासने देण्यात आली होती. इतर राज्यांमध्ये हे कलम अजामीनपात्र करण्यात आले आहे. त्यास आपल्या राज्याकडून विलंब का होत आहे, याचा खुलासा करण्यात यावा. यामध्ये दिरंगाई होता कामा नये अशी आमची अपेक्षा आहे.

109, 103 या पोलिसांच्या हेल्पलाईन्स आहेत. त्या लाईन्स वाढविल्या गेल्या पाहिजेत. त्या प्रत्येक तालुक्यात व शहरात कार्यान्वित करणे गरजेचे आहे. ज्या भागातील स्त्री मागणी करेल तिला शस्त्रे देखील दिली पाहिजेत, अशी मागणी मी मुद्दाम करीत आहे. विशेषत: जेथे महिलांना रात्रीचा एकट्याने प्रवास करावा लागतो तेथे शस्त्रांची परवानगी स्त्रियांना मिळाली पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

मुंबईच्या भाभा रूग्णालयामध्ये मारहाणीमुळे जखमी झालेल्या स्त्रिया येतात. तेथे मुंबई महानगरपालिका आणि सेहत या संस्थेच्या वतीने वन स्टॉप क्रायसिस हेल्थ सेंटर चालविले जाते. एखाद्या महिलेल्या शारीरिक उपचारा बरोबरच मानसिक उपचार देखील उपलब्ध होतात. ती योजना सर्व राज्यात राबवावी अशी माझी सूचना आहे.

पोलीस ठाण्यामध्ये एफआयआर लिहिणारे रायटर्स असतात. त्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. एफआयआर लिहिणारा रायटर शब्दामध्ये मुलीला प्रश्न विचारत असतो. ते शब्द कायद्या नुसार नसतील तर तो गुन्हा सिद्ध होणार नाही हे त्याला माहीत असते. पण ते शब्द बोलत असताना सौम्य भाषेत कसे बोलावे, याचे प्रशिक्षण रायटर्सना दिले पाहिजे. सदर एफआयआर ताबडतोब ऑनलाईनद्वारा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तपासण्यासाठी पाठविले पाहिजेत. एफआयआर दाखल झाल्यानंतर चार्जशिट होई पर्यंत मधल्या काळातील साक्षी पुरावे अतिशय कच्च्या स्वरूपाचे असतात. ते व्यवस्थित आले पाहिजेत, असे अनेक वेळा ॲड.उज्ज्वल निकम यांनी आम्हाला सुचविले आहे. चार्ज शिट फाईल करण्यापूर्वी आण्खी कोणते साक्षी पुरावे घेतले पाहिजे याबाबत सरकारी वकिलांचे मत घेतले पाहिजे.

पंच आणि साक्षीदार यांच्यासाठी प्रोत्साहनपर योजना असली पाहिजे. याचे कारण आपल्याला बऱ्याच वेळा पंच फुटलेले दिसतात. जो पर्यंत केसचा निकाल लागत नाही तो पर्यंत पीडितांची विचारपूस करणे गरजेचे आहे असे मला वाटते म्हणून त्याकडे मला आपले लक्ष वेधावेसे वाटते.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..

सभापती महोदय, मानखुर्दच्या होम्ससंबंधी बरीच चर्चा झालेली आहे. माझी सूचना आहे की, जी होम्स आहेत तेथील दरवाज्यांवर आणि काही महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावून त्याचे कनेक्शन पोलीस स्टेशनला जोडण्यात यावे. जेणेकरुन त्या ठिकाणी काही गैरप्रकार होत असल्याचे तेथे ताबडतोब सुरक्षा देणे शक्य होईल.

सभापती महोदय, क्राईम अगेंस्ट वुमेनसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये न्यायालये उभारणे गरजेचे आहे याकडे मी शासनाचे लक्ष वेधत आहे.

सभापती महोदय, वेबसाईटवर रेप गेम्स हा गेम डाऊनलोड करुन खेळला जातो. त्या रेप गेममध्ये एक आई आणि दोन मुली जाताना दाखविल्या जातात. त्या गेममध्ये प्रथम आईवर बलात्कार करायचा असतो आणि नंतर त्या दोन मुलीवर बलात्कार करायचा. हा जॅपनीज गेम आहे. हा गेम डाऊनलोड करुन घेऊन खेळला जात आहे. तेव्हा माझी माननीय गृह मंत्री महोदयांना विनंती आहे की, जे कस्टर्ड रिव्हेंज आणि रेप गेम्स आहेत त्यावर निर्बंध आणले पाहिजेत. दीड ते दोन हजार रुपये देऊन हा गेम डाऊन लोड करण्यात येतो. खेळ म्हणूनच महिलांवर रेप केला जातो. मानसोपचार तज्ज्ञांचे असे म्हणणे आहे की, अशाप्रकारे माणसाचे मन बोथट झाले तर रेप गेम हा नेहमीचा गेम आहे असे त्याला आयुष्यात वाटायला लागते. तेव्हा या गोष्टींवर बंधन आणणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शुभम शिर्के केसमध्ये माननीय गृहमंत्री महोदयांनी स्वत: भेट दिली. या केसमध्ये ॲड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. मी या संदर्भात स्वत: फॉलोअप ठेवला आहे. त्या संदर्भात माननीय गृह मंत्री महोदयांना निवेदन दिलेले आहे. ॲड उज्वल निकम यांच्याशी मी बोलले आहे. शुभम शिर्के यांच्या आईवडिलांना सांगितले आहे की, ॲड.उज्ज्वल निकम यांची नियुक्ती झाली नाही तर आम्ही कोर्टात जायचे किंवा कसे याचा विचार करीत आहोत. ॲड उज्वल निकम यांची नियुक्ती करता येत नसेल तर दुसऱ्या कोणत्या वकिलाची नियुक्ती करण्यात येणार आहे हे शुभम शिर्केच्या आईवडिलांना समजले पाहिजे. माननीय गृह मंत्री महोदयांनी त्यांच्या घरी भेट दिल्यामुळे त्यांनीच त्याबद्दलची माहिती शुभ्म शिर्केच्या आईवडिलांना दिली पाहिजे. कारण आम्ही त्यांना काही सांगितले तर ते विचारतात की माननीय गृह मंत्री का आले नाहीत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..

सभापती महोदय, संभाजीनगरमधील एका महिला कॉन्स्टेबलचे प्रकरण माझ्याकडे आले आहे. तिला आलेले सर्व एसएमएस तिने मला दाखविले आहेत. मी ही बाब माननीय गृह मंत्री महोदयांना सांगितलेली आहे. ते एसएमएस वाचल्यास मान शरमेने खाली घालावी लागेल अशाप्रकारचे एसएमएस अधिकाऱ्यानी तिला पाठविलेले आहेत. त्या अधिकाऱ्याने दुसरी व्यक्ती सुध्दा चालेल का ? असे त्या एसएमएसमध्ये विचारलेले आहे. संबंधित अधिकारी मला वेगवेगळ्या व्यक्तींकडून भेटण्यासाठी निरोप पाठवित आहे. मी त्यांना सांगितले की, तुम्हाला चपलेचा मार खायचा आहे काय ? मी अनेक अधिकाऱ्यांकडे निरोप पाठविले की, आम्हाला अजिबात ॲप्रोच व्हावयाचे नाही. मी या संदर्भात श्री.संजय कुमार यांना भेटले. त्यांनी मला सांगितले की, त्यांनी प्रथम मुलीचे निलंबन रद्द केले. त्या अधिकाऱ्यांनी त्या मुलीला निलंबित केले होते. तेव्हा आझाद मैदानातील महिला कॉन्स्टेबलच्या सुरक्षिततेचा प्रश्न असेल किंवा असे गैरप्रकार चालू असतील तर त्या घटनेमध्ये जे जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

सभापती महोदय, पोलीस अधिकारी श्री.बोरुडे यांनी स्वत: आत्महत्या केली , पालवेच्या केसमध्ये सर्व निर्दोष सुटले. मला माननीय गृहमंत्री महोदयांच्या निदर्शनास एक गोष्ट आणून द्यायची आहे की, आपण गृह मंत्री पद स्वीकारल्यानंतर ज्या ज्या केसचा आम्ही उल्लेख केला त्या केसची आज काय स्थिती आहे, त्या केसचा कोर्टात निकाल लागला किंवा कसे, केसचे निकाल लागले असतील तर गुन्हेगारांना शिक्षा झाली की ते निर्दोष सुटले याची सर्व माहिती पटलावर ठेवावी. कारण वर्षानुवर्षे या केसेस सुरु आहेत.

सभापती महोदय, औरंगाबाद केसमध्ये त्या मुलीला पुणे किंवा नगरमध्ये बदली करुन पाहिजे, ज्या संदर्भात पावले उचलली गेली पाहिजेत.

सभापती महोदय, आज राजरोसपणे स्त्रियांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरीचे प्रमाण वाढलेले आहे. त्या बाबत लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी.

सभापती महोदय, नागपूरमध्ये स्त्रियांनी जसा कायदा हातात घेतला. तसाउद्या दुर्दैवाने महिला कायदा हातात घेऊन गुन्हेगार पुरुषाला तेथल्या तेथे नपुंसक बनविण्याचा शिक्षा देऊ लागल्या तर आपण महिलांना दोष देऊ नका, एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते.

-------

..3..

श्रीमती दीप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी महिलांच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या असलेल्या प्रश्नावर चर्चा घडवून आणलेली आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, महिलांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा विषय येथे चर्चेला आलेला आहे. दोन दिवसांपूर्वी दिल्ली शहरामध्ये जो गॅंगरेप झाला त्याच्या तीव्र प्रतिक्रिया देशभर उमटल्या आहेत. आज महिला मग ती दिल्लीतील असो किंवा महाराष्ट्रातील असो, ती असुरक्षित आहे. आज महिलांवर मोठ्या प्रमाणावर अत्याचार होत आहेत ही अतिशय गंभीर बाब आहे.

सभापती महोदय,शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांची गौरवशाली परंपरा या महाराष्ट्राला आहे. अशा या महाराष्ट्रात महिलांवर होणारे अत्याचार मोठ्या प्रमाणात आहेत हे आकडेवारीवरुन सिध्द होते. गेल्या काही दिवसांमध्ये देशातील विविध भागांमध्ये ज्या घटना घडत आहेत त्यावरुन देशातील महिला असुरक्षित असल्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तेव्हा महिलांवरील अत्याचारामध्ये गुंतलेल्यांसाठी कठोर शिक्षा असावी अशी मागणी जोर धरु लागली आहे. देशातील महिलावंर होणाऱ्या अत्याचाराची आकडेवारी पाहिल्यास कठोर शिक्षेची खरोखरच गरज आहे हे लक्षात येते.

सभापती महोदय, पाटलाने एका महिलेवर अत्याचार केला म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या पाटलाचे हात कलम केले होते. तशाच शिक्षेची तरतूद असावी अशी महिलांची मानसिकता झालेली आहे. अन्यथा आताच सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे महिला सुध्दा शस्त्र बाळगायला लागतील.

सभापती महोदय, रक्षकच जेव्हा भक्षक बनतात तेव्हा तीव्र संताप होतो. पोलीस किंवा शिक्षक स्त्रियांवर अत्याचार करतात असे आपण जेव्हा वाचतो तेव्हा अतिशय दु:ख आणि संताप देखील होतो. नवरा आणि नातेवाईकांकडून होणाऱ्या अत्याचाराच्या घटना कमी नाहीत.

सभापती महोदय, बीपीओमध्ये काम करणाऱ्या महिलांना रात्री अपरात्री नोकरीकरिता जावे लागते. त्यांना होणारा त्रास त्यांनी घरी सांगितला तर त्यांना नोकरीवर जाऊ दिले जाणार नाही या भीती पोटी महिला तक्रारी करीत नाहीत किंवा घरी वाच्यता करीत नाहीत.

..4..



श्रीमती दीप्ती चवधरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, महिलांची छेडछाड करणाऱ्यांना कोणाचीच भीती वाटत नाही. त्यांना आपल्या कृतीबद्दल पश्चाताप वाटत नाही. त्यांची महिलां विषयीची मानसिकता अतिशय घृणास्पद आहे. काही समाजकंटकामध्ये पश्चातापाची भावनाच नसते त्यामुळे ते महिलांची छेडछाड करण्यास धजावत असतात. यासाठी महिलांनी सशक्त होण्याची गरज आहे. जर कोणी एखाद्या महिलेची छेड काढत असेल तर आजूबाजूला असलेल्या महिलांनी एकत्र येऊन त्याला अशी काही शिक्षा द्यावी की तो या पुढे अशी छेडछाड करण्यास धजावणार नाही. महिलांनी असे पाऊल उचलल्यास अशाप्रकारचे गुन्हे कमी होतील.

सभापती महोदय, पुरुषांची मानसिकता बदलण्याची गरज आहे. स्त्रियांकडे भोग वस्तू म्हणून पाहण्याची त्याची सवय आहे ती बदलण्याची गरज आहे. स्त्रियांना नेहमीच दुय्यम प्रकारची वागणूक मिळत असते. महिलांवर रोज होणारे अत्याचार पाहता महिलांसाठी करण्यात आलेली विधेयके अजूनही प्रलंबित आहेत.

सभापती महोदय, महिला व बाल विकास विभागाने एक नवीन योजना आणली आहे. पीडित महिलेला पुनर्वसनासाठी दोन लाख रुपये देण्याची ती योजना आहे. ही योजना लवकरात लवकर लागू करण्यात यावी अशी विनंती आहे. तसेच स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारा संदर्भात स्वतंत्र न्यायालय असावे.

सभापती महोदय, जेंडर बजेट हा फार महत्वाचा विषय आहे. महिलांवर नेहमी अत्याचार होत असतात. परंतु जोपर्यंत जेंडर बजेट होत नाही तोपर्यंत महिलांविषयी ज्या ज्या गोष्टी आहेत त्या जेंडर बजेटमध्ये मांडता येणे अशक्य आहे.

सभापती महोदय, डोंबिवलीमध्ये झालेली घटना कोणी विसरू शकणार नाही. अशाप्रकारच्या घटना ज्यावेळी घडतात तेव्हा त्या अत्याचारित मुलीला पुन्हा समाजामध्ये उभे राहण्याची गरज असते.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : माननीय सदस्यांनी आपले भाषण आटोपते घ्यावे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण आमच्या भाषणावर वेळेचे बंधन घालू नका. आपणास महिलांचा विषय महत्वाचा वाटत नसेल तर आमच्यापैकी कुणीही महिला सदस्य या चर्चेमध्ये भाग घेणार नाही. हा विषय गंभीर असल्यामुळे आम्हाला बोलण्याकरिता भरपूर वेळ दिला पाहिजे. या प्रस्तावावरील चर्चा दिवसभर चालली तरी हरकत नाही.

**तालिका सभापती** : आज सभागृहापुढे भरपूर कामकाज आहे ते आपल्याला दिवसभरामध्ये संपवावयाचे आहे, त्याकरिता आपण सहकार्य करावे अशी विनंती आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, या सभागृहामध्ये आम्ही जेमतेम चार महिला सदस्य आहोत. या सभागृहामध्ये आम्हा महिलांकरिता वेळेचे आरक्षण ठेवले गेले नाही. आम्हाला बोलण्याकरिता जर दोन-तीन मिनिटांचा वेळ देणार असाल तर ते बरोबर नाही. त्यापेक्षा या प्रस्तावावर चर्चा करु नका, महिलांवर जे अत्याचार होत आहेत ते असेच पुढे होत राहू द्या आणि सभागृहाचे कामकाज मंजूर करुन टाका. माझ्या भाषणाच्या वेळी आपण कृपा करुन बेल वाजवू नका एवढीच मला विनंती करावयाची आहे.

श्रीमती दीप्ती चवधरी : सभापती महोदय, महिलांवर ॲसिड टाकण्याच्या घटना होतात, बलात्काराच्या घटना घडतात. मागील महिन्यात डोंबिवली येथे 16 वर्षाच्या मुलीवर चाकूचा हल्ला झ ाला. आरोपीने त्या मुलीच्या घरामध्ये घुसून आई-वडिलांच्या आणि भावंडासमोर चाकू हल्ला केला. काय झाले हे कळण्यापूर्वीच तो पसार झाला. त्या मुलीवर गेल्या महिन्याभरापासून उपचार सुरु आहेत. तिच्यावर एक फार मोठी शस्त्रक्रिया देखील करावी लागली. तिचा उजवा पाय निकामी झ ाला आहे. पोलिसांनी अशा आरोपीला पकडल्यानंतर संध्याकाळी त्याची सुटका होते. त्या आरोपीला पोलिसांकडून पकडण्यात येते परंतु त्याला शिक्षा होत नाही. या ठिकाणी माननीय गृहमंत्री आणि माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत त्यांना माझी विनंती आहे की, अशा गुन्हेगारांना ताबडतोब सोडता कामा नये. काही आरोपींना सकाळी अटक केल्यानंतर त्यांची संध्याकाळी सुटका होते. पोलिसांकडून त्यांची तत्काळ सुटका होऊ नये या करिता आपण कडक कायदा करावा अशाप्रकारची अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपविते. धन्यवाद.

-----

20-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) J 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, दिल्लीमध्ये चालत्या बसमध्ये एका मेडिकल स्टुडंटवर जो बलात्कार झाला या घटनेचे वृत्त त्या संपूर्ण देशामध्ये सर्व चॅनेल्सवर दाखविले जात आहे. या घटनेचा संताप व्यक्त करण्यासाठी सर्व तरुण मुले आणि मुली, खासदार मंडळी रस्त्यावर उतरुन आक्रोश करीत आहेत. अशाप्रकारे महिलांवरील अत्याचाराच्या घटना केवळ दिल्लीमध्ये नव्हे तर मुंबई व नागपूरमध्ये देखील घडत आहेत. संपूर्ण देशामध्ये महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण दिवसें दिवस वाढत आहे. त्यामुळे आमच्या सारख्या महिलांच्या दृष्टीने हा चिंतेचा विषय झालेला असल्यामुळे या चर्चेमध्ये भाग घेणाऱ्या महिला सदस्यांवर वेळेचे बंधन घालीत आहात हा एक प्रकारे आमच्यावर अन्याय आहे. सभापती महोदय, पहिल्यांदा आपणास महिलांवर होणाऱ्या अत्याचारासंबंधीचा चर्चेचा विषय महत्वाचा वाटतो काय हे आपणास विचारावयाचे आहे? गेल्या तीन दिवसापासून या विषयासंबंधी सभागृहामध्ये चर्चा सुरु असल्यामुळे हा महत्वाचा विषय झ ाालेला आहे. तुमचे आमचे आघाडीचे शासन सत्तेवर आहे तर मग तुम्ही या चर्चेमध्ये भाग कशासाठी घेत आहात असे आम्हाला विचारले जात आहे.

मला या ठिकाणी असे सांगावेसे वाटत आहे की, आम्ही सत्तेवर असलो, आमच्याकडे गृह मंत्रालय असले तरी पोलीस दलाबद्दल आमच्या मनामध्ये खूप अभिमान आहे. मुंबईमध्ये जेव्हा अतिरेक्यांकडून हल्ले झाले त्यावेळी हेमंत केंकरे, तुकाराम ओंबळे, विश्वास नांगरे पाटील, सदानंद दाते इत्यादी पोलीस अधिकाऱ्यांनी केलेला पराक्रम आम्ही विसरु शकणार नाही. यामध्ये विश्वास नांगरे पाटील, सदानंद दाते या पोलीस अधिकाऱ्यांनी तर आपल्या जीवाची पर्वा न करता एक रिव्हॉल्व्हर घेऊन निधडया छातीने ताजमहाल हॉटेलमध्ये अतिरेक्यांशी दोन हात केले. त्यांच्याबद्दल आम्हाला अभिमान वाटत असल्यामुळे आम्ही त्यांना नाव ठेवीत नाही. परंतु ज्यावेळी एखादी महिला किंवा एखादी मुलगी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यासाठी जाते त्यावेळी पोलिसांकडून तिला सहानुभूतीपूर्वक वागणूक मिळाली पाहिजे. पोलीस स्टेशनमध्ये गुन्हेगारांना कशाप्रकारे हँडल करावे याची पोलिसांना माहिती असल्यामुळे तेच पोलीस महिला व मुलींना रुडली हँडल करतात. त्यामुळे अत्याचारित महिला किंवा मुलगी ही मानसिक आणि शारीरिकदृष्टया खचून गेली असतांना जर पोलीस स्टेशनमध्ये तिला व्यवस्थित वागणूक मिळाली नाही तर ती कोणत्या शब्दामध्ये आपले म्हणणे मांडून तक्रार करणार? याबाबत मला सांगावेसे वाटते की, पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करावयास गेलेल्या महिलांना पोलिसांकडून जी वागणूक मिळते त्यामध्ये सुधारणा झाली पाहिजे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

सभापती महोदय, आज 70 टक्के शाळा कॉलेजमधील विद्यार्थी आणि विद्यार्थीनींनी सांगितले आहे की, आमची छेडछाड केली जात आहे, आमच्यावर अत्याचार होत असल्यामुळे शाळा-कॉलेजमध्ये जाण्याची आम्हाला भीती वाटत आहे. 13-14 वर्षे वय असलेल्या शाळेत जाणाऱ्या मुली, 17-18 वर्षे वय असलेल्या कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुली, घरातील वातावरणातून थेट कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुली, ज्या मुलींना कॉलेजच्या वातावरणाचा अनुभव नसतो अशा मुली घाबरुन जातात, त्यांच्या तोंडामधून शब्द फुटत नाही. अशा अवस्थेत जर त्यांच्यावर एखादा प्रसंग उद्‌भवला तर त्यांनी गप्प बसावे काय, त्यांना मदत करण्यासाठी कुणीही पुढे यायचे नाही काय?

सभापती महोदय, डोंबिवलीची घटना अतिशय भयानक आहे. त्याठिकाणी 17-18 वर्षाच्या मुलांनी एका मुलीवर चाकू हल्ला केला आहे. ते सराईत गुन्हेगार होते काय? त्या करिता समाजाने देखील दोन्ही बाजूने विचार करण्याची गरज आहे. पूर्वीचे सिनेमे चित्रपटगृहामध्ये दाखविले जात होते. माझी आई मला संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर असे सिनेमे दाखवीत होती. परंतु आजच्या परिस्थितीत आई-वडिल कामानिमित्त बाहेर गेल्यामुळे शाळेमधून मुले घरात आल्यानंतर ती मुले टी.व्ही. चालू करुन त्यावरील हिंदी सिनेमातील अचकट-विचकट, हिडीस गाणी बघतात. हिंदी सिनेमा आणि हिंदी सिरियलमध्ये जे दाखविले जाते त्याचा बाल मनावर परिणाम होतो. त्यामधून जर अशा मुलांनी मुलींची छेड छाड केली, त्यांच्यावर अत्याचार केले तर त्यामध्ये काहीही वावगे वाटता कामा नये. अशाप्रकारे चॅनेल्सवर दाखविल्या जाणाऱ्या दृश्यांवर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही. आज सेन्सॉर बोर्ड अस्तित्वात आहे की नाही हे विचारण्याची पाळी आमच्यावर आली आहे.

पूर्वी एकत्र कुटुंबामध्ये आई-आजोबा घरामध्ये असायचे, मुलांना चांगल्या गोष्टी सांगून त्यांच्यावर संस्कार होत होते. माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे आज रेप करण्याचे सुध्दा गेम कॉप्युटरवर डाऊनलोड केले जातात हे ऐकून मला धक्का बसला. असे जे प्रकार होत आहेत त्यावर आपण बंदी घालणार आहोत की नाही हा एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे? त्या करिता शासनाच्या पातळीवर उपाय योजना करण्याकरिता कडक स्वरुपाचा कायदा करणार आहोत की नाही? आजचे कायदे कुठेतरी कमी पडत असल्यामुळे व आरोपी निर्दोष सुटत असल्यामुळे आम्हा महिलांचा न्याय व्यवस्थेवरील विश्वास सुध्दा उडत चालला आहे.

अप्रसिद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

सभापती महोदय, मी काल एक लक्षवेधी सूचना मांडली होती तिच्यावर निवेदन करतांना शासनाने सांगितले की, स्पॅनिश महिलेवर अत्याचार करणारा आरोपी हा पाच वेळा जेलमध्ये जाऊन शिक्षा भोगून आला होता. त्याला न्यायालयाने पाच वेळा जामिनावर सोडले होते. त्या माणसाचे हातपाय त्यावेळीच तोडले असते तर त्या महिलेवर अत्याचार करण्याची त्याची हिंमत झाली नसती. इतर वेळी मात्र पोलीस एन्काऊंटर करुन गुन्हेगारांना खतम करुन टाकतात. तर मग अशा गुन्हेगारांना पोलीस न्यायालयापर्यंत कशासाठी नेतात, ही या मागील आमची दु:खाची भावना आहे. या गोष्टींना पायबंद घालण्यासाठी शासनाने कडक कायदा केला पाहिजे.

आज महिलांवर केवळ बलात्कारच केले जात नाहीत तर त्यांच्यावर ॲसिडचा हल्ला देखील केला जातो. एखाद्याने महिलेवर ॲसिडचा हल्ला केला तर जखमी करणे या करिता आयपीसी मधील 320, 322, 325 आणि 326 ही कलमे लावली जातात. परंतु युगांडा, युके किंवा शेजारच्या बांगला देशामध्ये सुध्दा या गुन्हयांकरिता स्वतंत्र कायदा करण्यात आलेला आहे. न्यायमूर्ती ए. के. लक्ष्मण यांच्या नेतृत्वाखालील लॉ कमिशनने ॲसिड हल्ला करणाऱ्यावर आयपीसी कलम 326 (अ) मध्ये दुरुस्ती करुन सेशन्स कोर्टामध्ये खटला चालविण्याबाबत सूचना केली आहे. त्याप्रमाणे आपण आयपीसी कलमामध्ये केव्हा बदल करणार आहात? सभापती महोदय, यामध्ये असलेले गुन्हेगार हे अतिशय निर्ढावलेले असतात. या करिता असे गुन्हेगार जामिनावर सुटता कामा नये. त्याकरिता त्यांचे हातपाय तोडून टाका. आज वर्तमानपत्रातील बातमी वाचली त्यामध्ये एका संघटनेच्या महिला अध्यक्षांनी या गुन्हेगारांना नपुंसक करण्याची कारवाई करा असे सांगितले आहे. अशा गुन्हेगारांना खरोखरच नपुंसक केले पाहिजे. आमच्या मुली-बाळी रस्त्यावर फिरत असतात, त्यांचे अशा घटनेमुळे आयुष्य बरबाद होते. उद्या एखाद्या जज्जची मुलगी असेल, एखाद्या मंत्र्यांची मुलगी असेल, एखाद्या आमदारांची मुलगी असेल असा प्रसंग कुणावरही उदभवू शकतो. अशावेळी आपण गप्प बसणार आहात काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण . . ..

गरिबांच्या मुली पोलीस स्टेशन मध्ये गेल्यानंतर त्यांच्या तक्रारीची दखल घेतली जात नाही असे भयानक वातावरण आहे. तसेच पहिल्यांदा मेडिकल टेस्ट केली जाते, त्यामध्ये देखील अनेक अडचणी आहेत. एकतर अशा अवस्थेमध्ये महिला पोलीस स्टेशनमध्ये जाण्यासाठी धजावत नाही. जर ती पोलीस स्टेशनमध्ये गेली तर त्यांची तक्रार नोंदविली जात नाही. जाऊ दे, अशा प्रकारे छेडछाड होते किंवा नंतर तक्रार कर असे त्या महिलेला सांगण्यात येते.

एखाद्या महिलेवर बलात्कार झाल्यानंतर तिला तातडीने डॉक्टरकडे नेऊन त्याचा मेडिकल रिपोर्ट तयार केला पाहिजे. तिचे कपडे सील केले पाहिजेत. तसेच त्या महिलेला तातडीने हॉस्पिटलमध्ये नेऊन उपचार केले पाहिजेत आणि अशा गुन्हेगारांना कधीही जामीन मिळणार नाही यादृष्टीने पोलिसांनी तजवीज केली पाहिजे. अशा घटनेमुळे पीडित महिलेला शारीरिक व मानसिक त्रास होतो. जर एखाद्या महिलेवर ॲसिडचा ॲटॅक झाला तर तिला काही वर्षे उपचार घ्यावे लागतात.. कधी-कधी प्लॅस्टीक सर्जरी करावी लागते. या सर्व गोष्टींचा खर्च कोण देणार आहे हा प्रश्न आहे. तिचा काहीही दोष नसताना तिला हे सर्व सहन करावे लागते. तसेच सदरहू महिला विद्रूप झालेली असल्याने त्या महिलेला नोकरीही मिळत नाही. ती महिला एवढी विद्रुप झालेली असते की घरातील लोकांना देखील तिच्याकडे पहावत नाही. अशा स्थिती मध्ये त्या महिलेने आपले संपूर्ण आयुष्य कसे काढावयाचे हा प्रश्न आहे. तिने पैसा कुठून आणावयाचा असे अनेक प्रश्न तिच्यासमोर उभे रहातात. या सगळया प्रश्नांची उत्तरे याठिकाणी मिळाली पाहिजेत.

सभापती महोदय, माझ्याच मनामध्ये नाही तर इतरही अनेक महिलांच्या मनात अतिशय संतापाची भावना आहे. अशा घटनांच्या वेळी आमची न्याय व्यवस्था काय करते, पोलीस काय करतात, आमचे शासन काय करीत आहे हा प्रश्न आहे. म्हणून याबाबतीत ज्या काही उपाययोजना करता येतील त्या तातडीने कराव्यात आणि अशा प्रकारचे अत्याचार करण्यासाठी पुन्हा गुंड धजावणार नाहीत अशा प्रकारची आपण काळजी घेतली पाहिजे. आपण माध्यमांना स्वातंत्र्य दिलेले आहे. घराघरामध्ये टी.व्ही.वर सिरिअल्स् दाखविल्या जातात, तसेच सिनेमे दाखविले जातात पण त्यासाठी जे सेन्सॉर बोर्ड आहे त्याची पुनर्रचना करावयास पाहिजे. तसेच सिनेमामध्ये काम करणाऱ्या ज्या तारका आहेत, त्यांना पैसा मिळतो, प्रसिध्दी मिळते. परंतु त्यामध्ये ज्याप्रकारे पुरुषी भावनांचे विकृतीकरण होते आणि त्याला आमच्या मुली बळी पडत आहेत परंतु आता आम्ही ते सहन करणार नाही. आम्ही मॉरल पॉलिसिंग करीत आहोत असे तुम्ही म्हटले तरी चालेल. परंतु याबाबतीत काहीतरी नियंत्रण आणले

असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ....

पाहिजे. तसेच पोलीस दलाने अत्यंत संवेदनशीलपणे महिलांचा एक वेगळा कक्ष करुन त्यांच्या ज्या तक्रारी आहेत त्याबाबतीत एन.जी.ओ.च्या मदतीने त्याची नोंद घेतली पाहिजे. धन्यवाद.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, खऱ्या अर्थाने या विषयाच्या बाबतीत किती वर्णन करावे हाच खरा महत्वाचा प्रश्न आहे. मुंबईमध्ये आझाद मैदानावर रझा अकादमीच्या मोर्चेकऱ्यांनी महिला पोलिसांचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. ज्यांनी याचे फुटेज पाहिलेले आहे त्यांनी त्याचे भयंकर वर्णन केले. महिलांचा विनयभंग करण्यात आला त्या बाबतीत पोलिसांनी किती गुंडांना अटक केली आहे? जणूकाही पोलिसांच्या संवेदनाच मरुन गेल्या आहेत असे आमचे मत आहे. महिलांवर काहीही अत्याचार झाले तर मुळमुळीत उत्तर द्यावयाचे. जे स्वत:च्या पोलिसांना वाचवू शकत नाहीत ते समाजातील महिलांना वाचविण्यासाठी कुठून हिंमत आणणार हा प्रश्न आहे. त्यावेळी आयुक्तांनी घोषणा केली की, वर्दीतील पोलिसांच्या अंगाला हात लावला तर पाहून घेईन. पण त्यांनी याबाबतीत काही केले नाही. याबाबतीत नुसती घोषणा झाली. त्यावेळी किती लोकांना पकडण्यात आले? किती लोकांवर कारवाई केली? तेथील महिलांवर अत्याचार झाल्यानंतर सुध्दा जर गुन्हेगारांवर कारवाई होत नसेल तर समाजातील लोकांनी कोणाकडे पहावयाचे हा प्रश्न आहे.अशा परिस्थितीत तुमच्याकडून जनतेमध्ये कोणत्या प्रकारचा मॅसेज गेला आहे. याचा कधीतरी विचार होणार आहे की नाही हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या घटनेच्या बाबतीत किती जणांवर कारवाई झालेली आहे, किती जणांना अटक करण्यात आली आहे याची माहिती द्यावी. मला हे माहिती आहे की, त्यावेळी ईद होती म्हणून तुम्ही कोणालाही पकडले नाही. त्यांना का सोडून दिले? सण हा कोणाच्या अत्याचाराचा किंवा बलात्काराचा विषय होऊ शकत नाही तर तो मानसिकतेचा विषय आहे. पण जणूकाही आपल्याकडे मानसिकताच नसल्यासारखी परिस्थिती आहे. आपण स्वत:ला शिवाजी महाराजांचे वंशज म्हणवतो.

शिवरायाच्या भूमीवरती आम्ही असे षंड कसे,
पायाखाली आग तरी आमचे डोके थंड कसे.

असे म्हणण्याची वेळ आली आहे. आता असे वाटू लागले आहे की, आम्ही सदनामध्ये कितीही चर्चा केली तरी महिलांना न्याय मिळत नाही. वर्षानुवर्षे महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढतच असून बिहार राज्याला देखील मागे टाकून याबाबतीत महाराष्ट्र पुढे गेला आहे. आता असे वाटू लागले आहे की, या महाराष्ट्र सरकारने हे राज्य गुंडांच्या पदरात टाकले आहे काय आणि त्यांच्यापुढे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

शरणागती पत्करली आहे काय? अशी स्थिती निर्माण झालेली आहे काय याचे आम्हाला उत्तर पाहिजे. पुरुषार्थाचे तसेच याबाबतीत काहीतरी करण्याच्या अनुषंगाने उत्तर द्यावे.



श्रीमती शोभा फडणवीस . . . .

याठिकाणी असे सांगितले जाते की, हे कायद्याचे राज्य आहे. पण कायद्याचे राज्य कुठे आहे? आज पोलीसच अन्याय करतात. पोलीस महिलांवरील बलात्काराच्या केसेस नोंदवून घेत नाहीत. हुंडाबळीच्या केसेसमध्ये गुन्हेगाराला बोलवितात आणि त्यांच्याकडून पैसे घेऊन या केसेस दाबण्याचा प्रयत्न करतात. परंतु आम्ही "मर्दानी" या संस्थेच्या माध्यमातून या केसेस उघडकीस आणल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. तसेच पोलीस स्टेशनवर रेटच्या बाबतीत फलक लावण्यात यावा की, बलात्काराच्या प्रकरणाबाबत इतका रेट, हुंडाबळीच्या प्रकरणाबाबत इतका रेट , खूनाच्या बाबतीत इतका रेट, मग महाराष्ट्र राज्यामध्ये काय सुरु आहे हे तरी आम्हाला कळू शकेल. राज्यामध्ये असे जे प्रकार सुरु आहेत त्याबाबतीत शासन काही विचार करणार आहे की नाही हा प्रश्न आहे.

नागपूर येथील वसंतराव नाईक झोपडपट्टीमधील काही लोकांनी तक्रार केली की, त्याठिकाणी एक गुंड लोकांना त्रास देतो,. कोणत्याही महिलेवर अत्याचार करतो, बलात्कार करतो. तेथे त्याचे दारुचे अड्डे आहेत. पण आतापर्यंत किती लोकांना न्याय मिळाला तर कोणालाही न्याय मिळाला नाही. शेवटी लोकांनी कायदा हातात घेतला आणि त्या गुंडाचा खून केला. त्यानंतर तुम्ही जागे होऊन. पोलिसांवर कारवाई केली. जर या गुंडांच्या बाबतीत पोलिसांनी अगोदर कारवाई केली असती तरच तेथील लोकांना न्याय मिळाला असता. मात्र शासनाने काय केले तर ज्यांनी खून केला त्यांना खुनाच्या आरोपाखाली अटक केली. मग जर असे होणार असेल तर आम्हाला एकच गोष्ट करावी लागेल की, खून करा आणि जेल भरा. अशा प्रकारचा कार्यक्रम राबवावयाचा काय ?

सभापती महोदय, याठिकाणी कशावर चर्चा करावयाची. न्यायालयातील केसेसचे निकाल लागतात त्याबाबत सांगावयाचे तर एकंदर 10 हजार केसेसच्या बाबतीत जे निकाल लागतात त्यामध्ये 9 हजार केसेस मधील आरोपी पोलिसांच्या अपयशामुळे सुटत असतील तर याला न्याय म्हणावयाचे काय हा प्रश्न आहे. केवळ 5 टक्के निकाल गुन्हेगारांच्या बाजूने लागतात आणि 95 टक्के निकाल जर विरोधामध्ये लागत असतील तर त्याला काय राज्य म्हणावयाचे, याला संरक्षण म्हणावयाचे, याला लोकशाही म्हणावयाची की याला गुंडशाही म्हणावयाची हा देखील महत्वाचा विषय आहे. तसेच 292 हे जे कलम आहे त्यानुसार अश्लील फोटो असतील आणि लोकांच्या भावना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चेतावणारे लिखाण असेल तर संबंधितांवर कारवाई केली पाहिजे. अशा लोकांना विना वॉरंट पकडण्याचा अधिकार आहे. त्यामध्ये दोन वर्षाची शिक्षा, दोन हजार रुपये दंड किंवा पाच वर्षाची शिक्षा आणि पाच हजार रुपयांचा दंड आहे. याबाबत आतापर्यंत किती लोकांवर कारवाई झाली हा प्रश्न आहे.



श्रीमती शोभा फडणवीस . . . .

सभापती महोदय, मी याठिकाणी काही फोटो दाखवू शकत नाही. महिलांचे नग्न फोटो आहेत
मी ते फोटो आपल्यामार्फत माननीय गृह मंत्र्यांकडे पाठवित आहे. जर हे मटेरिअल भर बाजारामध्ये विकले जात असेल, मिरर मध्ये अशा प्रकारचे फोटो येत असतील तर मग मुलांना काय दोष देणार हा प्रश्न आहे. श्रीमंतांच्या मुलांचे चोचले पुरविण्यासाठी जर अशा प्रकारचे फोटो काढले जात असतील तर समाजातील मुली सुरक्षित रहातील काय ? तुमची-आमची कोणाचीच मुलगी सुरक्षित राहू शकत नाही. याठिकाणी केवळ चर्चा करुन काही होणार नाही. याबाबतीत शासन काय करणार आहे हे सांगण्याची आवश्यकता आहे. आपण मिरर मधील फोटो पहावेत. मुंबईमध्ये प्रत्येकाच्या घरामध्ये हा पेपर जातो. पण या पेपरच्या बाबतीत किती जणांनी आक्षेप घेतला? परंतु लोकांनी आक्षेप घेऊन तरी काय होणार आहे? कारण याबाबतीत ॲक्शनच घेत नाहीत.

मागच्या वेळेला मी छत्तीसगढी डान्सच्या बाबतीत विषय मांडला होता. याबाबत शासनाने आदेश काढला आणि फक्त चंद्रपूर जिल्ह्यामध्ये छत्तीसगढी डान्स दाखविला जाणार नाही एवढेच सांगितले. आज नग्न पुरुष स्टेजवर महिलाना नग्न करुन हजारो लोकांच्या समोर तमाशे दाखवित असतील आणि रात्रीच्या वेळेला पुरुषाच्या भावना चाळवल्या आणि त्यातून जर बलात्कार झाला तर त्याला दोष द्यावयाचा काय? पोलीस अशा प्रकारच्या डान्सला कशी परवानगी देतात हा प्रश्न आहे. मी स्वत: एस.पी.यांना सी.डी.दाखविली आणि सांगितले की, हे पहा. कोणता सज्जन पुरुष हे सर्व पाहू शकतो. मग कोण आपल्या मुलींचे संरक्षण करु शकतो. उघडे, नग्न डान्स करावयाचे, लोकांच्या भावना चेतवावयाच्या आणि कोणावर बलात्कार झाला तर आम्ही कारवाई करतो असे सांगावयाचे. याबाबतीत आम्ही केसेस दाखल करा असे म्हटले तर पोलीस त्या दाखल क रुन घेत नाहीत. अशा पध्दतीचे वातावरण निर्माण होत असेल तर महाराष्ट्रमध्ये स्त्री जगू शकणार नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे शासन या सगळयावर बंदी घालणार आहे काय? छत्तीसगढी डान्सवर बंदी घालणार आहात काय? मुंबइतील बार बंद झाल्यानंतर तेथील बारबाला खेड्यामध्ये

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

जाऊन डान्स करायला शिकल्या. अशा पध्दतीने समाजाचे वातावरण दूडुषित करण्याचे काम पोलिसांच्या माध्यमातून होत असेल तर आम्ही याला काय म्हणावयाचे हा प्रश्न आहे. याबाबत कोणाकडे न्याय मागावयाचा? न्याय करणारेच अन्याय करीत असतील, संरक्षण देणारेच आम्हाला असुरक्षित ठेवत असतील तर खऱ्या अर्थाने आम्हाला न्याय कसा मिळेल ते सांगावे, नाहीतर आम्हालाही हातामध्ये शस्त्रे घेऊन अशा लोकांची कत्तल करण्याची वेळ येणार आहे हे विसरु नका एवढेच मला सांगावयाचे आहे.

-----

s20-12-2012 (असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही) के-6

APR 11.40

श्रीमती अलका देसाई(नामनियुक्त) : सभापती महोदय, मी या सदनामध्ये अत्यंत खेदाने, दु:खाने उभी आहे. याचे कारण असे आहे की, स्त्री कडे केवळ भोगवस्तू म्हणून पहाण्याचा जर कोणी प्रयत्न करणार असेल तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. भारत देश आणि महाराष्ट्र राज्य हे संस्कृतीप्रधान असल्याची एक ओळख आहे. दिल्लीमध्ये जे झाले ते एवढे घृणास्पद आहे की, त्याठिकाणी क्रौर्याची परिसीमा झाली आहे. अशा प्रकारची भावना आमच्यासारख्या स्त्री कार्यकर्त्यांच्या मनात आल्याशिवाय रहात नाही.

यानंतर श्री.बरवड . . .

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

सभापती महोदय, ज्या वेळेला मुंबई शहरामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये अशा प्रकरणांमध्ये वाढ झाली तेव्हा जिजाऊंचा महाराष्ट्र आणि सावित्रीबाई फुल्यांचा महाराष्ट्र हाच आहे का, आमची संस्कृती लोप पावली का, अशा प्रकारच्या शंका तुमच्या आमच्या मनामध्ये आल्याशिवाय राहात नाहीत. मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या मुद्याला धरुन मी सांगू इच्छिते की, आज कोणत्याही टी.व्ही. चॅनेलवर किंवा कोणत्याही सिनेमावर आमचा कोणाचाही अंकुश नाही. हे सर्व आपण केंद्र सरकारकडे पाठविणार हे मला माहीत आहे. माझी आपल्याला विनंती आहे. महाराष्ट्र शासनाच्या कायदा विभागाने आणि संबंधित अधिकाऱ्याने कृपया माझ्या विचाराची नोंद घ्यावी आणि तशा प्रकारची सूचना केंद्र सरकारकडे पाठवावी. त्याचे कारण असे की, आज टी.व्ही. चॅनेल्स अनिर्बंध झालेले आहेत.

सभापती महोदय, 26/11 च्या हल्ल्यामध्ये आमचे जे अधिकारी मारले गेले ते या टी.व्ही. चॅनेल्सच्या अती उतावीळपणामुळे मारले गेले. माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील या ठिकाणी उपस्थित आहेत. ते म्हणतील की, तुम्ही काय बोलत आहात ? मी मुंबई शहरामध्ये राहते आणि संबंधित ठिकाणावर जाण्यासाठी मला अर्ध्या तासाचा वेळ लागतो आणि म्हणून मी अत्यंत जबाबदारीने बोलते. तेव्हा पासून आमच्या सारखे लोक टी.व्ही. चॅनेल्सशी पत्रव्यवहार करीत आहेत. म्हणून आज मी त्यांच्या बाबतीत बोलत आहे. त्यांच्यावर आज कोणतेही निर्बंध नाहीत. तीच अवस्था आज सेन्सॉर बोर्डाची आहे. आपल्याकडे कशा प्रकारचे सिनेमे येत आहेत ? आता थियेटर्सच्या मोठमोठ्या उत्तुंग इमारती बांधत आहेत. प्रत्येक चॅनेल्सवर हे सर्व सिनेमे जातात. जी मोठमोठी शहरे आहेत त्या शहरामध्ये आई-वडील नोकरी करतात. त्यांच्या मुलांवर दुष्परिणाम करण्याचा आम्ही हा एक कारखाना उघडलेला आहे का याचा देखील विचार होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी आणखी दोनच मुद्दे मांडणार आहे. ज्या महिलेवर किंवा मुलीवर बलात्कार होतो तिची मानसिक अवस्था अतिशय नाजूक झालेली असते. पोलीस स्टेशनला गेल्यानंतर आमचे पोलीस अधिकारी कधी कधी चेष्टेच्या सुरामध्ये अगदी मिशीवर ताव मारुन बोलत असतात. मग त्यांनी तुम्हालाच कसे विचारले, तुम्हालाच कसे सांगितले, असे ते विचारतात. त्यांनी यांच्या घरच्या मंडळींकडे जावयास पाहिजे होते का आणि तेव्हा त्यांना असे विचारण्यास सुचले असते का ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

अशा प्रकारची ही धृणास्पद वक्तव्ये करतात ते योग्य आहे का याचा देखील विचार होणे गरजेचे आहे. एक तर पोलीस अधिकारी, कॉन्स्टेबल यांची संख्या कमी आहे. अशा ज्या घटना घडतात त्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनला आपण एक वेगळा अधिकारी देणार आहात की नाही ? माझी या सभागृहामध्ये मागणी आहे की, अशा ज्या घटना घडतात त्यासाठी आपल्याला प्रत्येक पोलीस स्टेशनला एक अधिकारी द्यावा लागेल तरच आमच्या महिला, मुली निर्भीडपणे त्या ठिकाणी जाऊन तक्रार करु शकतील.

सभापती महोदय, जेव्हा अशा केसेस होतात त्यामध्ये जी कोणी बलात्कार करणारी व्यक्ती असेल त्याला कायद्याने फाशीची शिक्षा देण्याची तरतूद करावी. जर आपण एक दोन लोकांना या महाराष्ट्रामध्ये फासावर लटकवले तर परत कोणाचीही हिंमत होणार नाही. त्यामुळे ती व्यक्ती फासावर जाईल अशी कायद्यामध्ये तरतूद करावी. अमक्याने अमुक महिलेवर बलात्कार केला आणि ते सिध्द झाले आणि त्याला आम्ही फासावर लटकविले असा संदेश महाराष्ट्रभर आणि देशामध्ये जाऊ द्या ही माझी तिसरी मागणी आहे. जेव्हा अशी चर्चा होते तेव्हा महिला सदस्यांनीच बोलले पाहिजे अशा प्रकारची कोठेही वाटणी केलेली नाही. पुरुषांची सुध्दा तेवढीच मानसिकता असली पाहिजे आणि सर्वांच्या बरोबरीने पुरुषांनी सुध्दा आमच्या खांद्याला खांदा लावून उभे राहिले पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ( महिला व बालविकास मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्या सर्वश्रीमती दिप्ती चवधरी, विद्या चव्हाण, शोभाताई फडणवीस, अलका देसाई या सर्व सन्माननीय सदस्यांनी या विषयावर चर्चा करीत असताना अनेक गोष्टींचा उल्लेख केला. महिला मंत्री म्हणून आणि महिला सदस्य म्हणून त्यांच्या भावनांशी मी सुध्दा सहमत आहे. कायद्याची कडक अंमलबजावणी झाली पाहिजे अशी त्यांची जी मागणी आहे त्याला मी सुध्दा पाठिंबा देते. बलात्काराच्या ज्या केसेस होतात त्या संदर्भात कायद्याची कडक अंमलबजावणी झाली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा मुद्दा उपस्थित केला तो केंद्र शासनाशी निगडित आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, टीव्हीवर ज्या सेन्सर गोष्टी दाखविल्या जातात त्या संदर्भात मागच्या वेळी सुध्दा माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील यांच्याशी आम्ही चर्चा केली होती आणि त्यांनी मागच्या भाषणात सुध्दा सांगितले होते की, त्या संदर्भात ते केंद्र शासनाला शिफारस करतील.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी भाषण करीत असताना नवजीवन शासकीय महिला वसतिगृहाच्या संदर्भात काही गोष्टी सांगितल्या. या संदर्भात मला काही गोष्टी आपल्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत. आमच्याकडे जानेवारी 2012 मध्ये 128 मुली होत्या. फेब्रुवारी महिन्यामध्ये आमच्याकडे मुलींची संख्या 150 झाली. मार्चमध्ये ती संख्या 133 झाली. एप्रिलमध्ये ती संख्या 158 झाली. मे महिन्यामध्ये ती संख्या 291 झाली. जून महिन्यामध्ये त्यांची संख्या 224 झाली. जुलै महिन्यामध्ये मुलींची संख्या 314 झाली. ऑगस्ट महिन्यामध्ये मुलींची संख्या 327 झाली आणि सप्टेंबर महिन्यामध्ये मुलींची संख्या 325 झाली. सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, आमचे नवजीवन महिलांचे जे स्वाधारगृह आहे त्याची कॅपॅसिटी 100 ची आहे आणि आमच्याकडे येणाऱ्या मुलींची संख्या जर आपण पाहिली तर आता ती संख्या 327 आहे आणि त्या काळामध्ये 300 च्या वर संख्या होती. सन्माननीय सदस्यांनी सर्व घटनाक्रम सांगितला. त्या घटनाक्रमात मी जात नाही. कारण माननीय गृह मंत्री श्री. आर.आर. पाटील यांना सुध्दा या ठिकाणी उत्तर द्यावयाचे आहे.

सभापती महोदय, ज्या समित्या नियुक्त झाल्या त्यामध्ये एक समिती मी आधीच नियुक्त केली. कारण मी तीन वेळा स्वाधरगृहामध्ये गेले. मी प्रथम त्या ठिकाणी 12.9.2012 रोजी गेले. त्यानंतर मी ही समिती 5.10.2012 ला स्थापन केली. आमच्या सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड .....

अध्यक्षतेखाली महिला सदस्यांची समिती तयार केली. या व्यतिरिक्त माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री. अंबादास पोटे, पोलीस उपायुक्त गुन्हे अन्वेषण, यांच्या अंतर्गत चौकशी केली. लोकलेखा समितीने त्या ठिकाणी जाऊन चौकशी केली आणि सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हायकोर्टाच्या समितीने सुध्दा त्या ठिकाणी जाऊन चौकशी केली. न्यायमूर्ती स्वाती चव्हाण यांच्या माध्यमातून याची चौकशी केलेली आहे. काही शिफारशी आलेल्या आहेत. त्या दृष्टीकोनातून आम्ही काम करण्याचा प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सांगितले. कर्मचाऱ्यांची 22 पदे आहेत आणि ती पदे भरलेली आहेत. पण त्या ठिकाणी अजूनही एक कौन्सिलर आणि एक पर्यवेक्षण अधिकारी रुजू झालेला नाही. ते लवकरात लवकर कसे रुजू होतील या संदर्भात पूर्ण काळजी घेतली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तेथील स्नानगृहाबद्दल, तेथील प्रसाधनगृहाबद्दल सांगितले. ते सुध्दा स्वच्छ ठेवण्याचे काम सुरु केलेले आहे. मधल्या काळामध्ये आपण सर्वप्रथम एक वेलकम किट आणि तेथून जात असताना दुसरी एक किट देण्याचे मान्य केलेले आहे. महत्वाचा जो एक प्रश्न होता तो सन्माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस यांना माहीत आहे. त्या ठिकाणी वरचा माळा वाढविण्याच्या संदर्भात सुध्दा आम्ही सांगितलेले आहे. वित्त विभागाने त्याला तत्वत: मान्यता दिलेली आहे. भिंती वाढविण्यापासून बाकीच्या ज्या गोष्टी आहेत त्या बाबतीत सुध्दा वित्त विभागाकडे पाठपुरावा करीत आहोत. सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यापासून खाजगी सुरक्षा रक्षक देण्यापर्यंत ज्या ज्या शिफारशी समितीने केल्या त्या सर्व शिफारशींवर काम सुरु आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी आम्ही दोन जिल्हा पर्यवेक्षक अधिकारी, एक जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, एक कनिष्ठ वाहक आणि एक स्वयंपाकी यांना सेवेतून निलंबित केलेले आहे. डेप्युटी कमिशनर, डिव्हीजनल कमिशनर यांना सुध्दा आम्ही कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्यामुळे आम्ही पूर्णपणे कारवाई करण्याचे काम करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न डोमेस्टिक व्हायोलन्स ॲक्टच्या संदर्भात उपस्थित केला. आपला जो कौटुंबिक हिंसाचार कायदा आहे त्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, संरक्षण अधिकाऱ्यांची पदे पूर्णवेळ केली पाहिजेत. मला सांगितले पाहिजे की, मधल्या काळामध्ये आपण संरक्षण अधिकारी, डाटा एंट्री ऑपरेटर आणि



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

प्रा. वर्षा गायकवाड .....

विधी सल्लागार यांची एकूण 111 पदे नियुक्त केलेली आहेत आणि पुरवणी मागण्यांमध्ये त्याचा उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केला की, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षाचे पद लवकरात लवकर भरले पाहिजे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड...

काल देखील महिला आमदारांचे एक शिष्टमंडळ माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले. मी देखील त्यांच्या बरोबर होते. आम्ही सर्वांनी त्यांना विनंती केलेली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : याबाबतीत घोषणा करावी.

प्रा. वर्षा गायकवाड : विशाखा गाईड लाईन्सच्या संदर्भात शासनाने 4ऑक्टोबर 2010 रोजी जी.आर. काढलेला आहे. त्या गाईड लाईन्स प्रमाणे प्रत्येक शासकीय, निम-शासकीय, तसेच खाजगी आस्थापनांनी महिला तक्रार निवारण कक्ष स्थापन करुन काम केले पाहिजे. सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी स्त्रियांची होणारी छेडछाड हा विषय या ठिकाणी मांडला. या बाबतीत मुंबई विद्यापीठाने एक उपक्रम सुरु केलेला आहे. प्रत्येक महाविद्यालयामध्ये मुलींसाठी वुमन वेल्फेअर कक्ष स्थापन केलेला आहे. विशाखा गाईड लाईन्स प्रमाणे प्रत्येक कॉलेजने सिनिअर महिला प्राध्यापिकेच्या अध्यक्षतेखाली असा कक्ष स्थापन करुन मुलींच्या तक्रारींची दखल घ्यावी अशा सूचना दिलेल्या आहेत. प्रसंगी राज्य महिला आयोगापर्यंत देखील महिलांच्या तक्रारी नेता येतील यादृष्टीने उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाकडे मागणी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, पीडित महिलांसाठी राज्य शासनाने कोणती योजना सुरु केलेली आहे अशी विचारणा सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी केली. या संदर्भात केन्द्र शासनाची एक योजना होती. बलात्कारित, पीडित महिलेचे पुनर्वसन व्हावे अशी संकल्पना होती. राज्य शासनाच्या वतीने ही योजना करण्यास विभागाने सांगितले आहे. बलात्कारित महिलेची मानसिकता आणि तिचे आरोग्य सुधारावे, तिचे कौन्सिलिंग व्हावे आणि भविष्यात तिचे पुनर्वसन व्हावे यासाठी 2 लाख रुपयाऐवजी 3 लाख रु. देण्याची योजना विभागाने शासनाला सादर केलेली आहे. या योजनेमध्ये ॲसिड हल्ला झालेल्या मुलींचा देखील समावेश केलेला आहे. ॲसिड हल्ला झालेल्या मुलींचा चेहरा विद्रूप होतो. प्लॅस्टिक सर्जरी करण्यासाठी मोठा खर्च येतो. म्हणून अशा मुलींना देखील या योजनेत समाविष्ट केलेले आहे. ही योजना शासनाला सादर केलेली असून येत्या महिनाभरामध्ये ती मंत्रिमंडळाकडून मंजूर करुन घेण्याचा आम्ही प्रयत्न करु.

सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांनी या गोष्टीचा येथे उल्लेख केला की, जेव्हा महिला तक्रार करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये जाते त्यावेळी तिला अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. त्यांना पोलीस स्टेशनमध्ये होणारा त्रास लक्षात घेता पोलीस स्टेशनमध्ये देखील कौन्सिलिंग

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड...

सेंटर सुरु करण्यात येत आहे. एका जिल्हयात तीन तालुक्यामध्ये हे सेंटर सुरु करीत आहोत. या प्रमाणे 35 जिल्ह्यामध्ये 115 कौन्सिलिंग सेंटर सुरु करीत आहोत. 51 ठिकाणी एनजीओजना सपुदेशन केंन्द्र सुरु करण्याच्या ऑर्डर्स दिलेल्या आहेत त्याप्रमाणे ते काम करतील. महिलांवरील अत्याचारा संदर्भातील कायदे कडक करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज असल्याचे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता असते, म्हणून स्त्रीकडे एक भोगवस्तू म्हणून न पाहता ती देखील एक माणूस आहे. म्हणून माणूसकीच्या दृष्टीकोनातून तिच्या बाबतीत विचार झाला पाहिजे अशी भावना सन्माननीय सदस्यांनी व्यक्ती केली. त्यांच्या या भावनेशी मी सहमत आहे.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ( गृहमंत्री ) : सभापती महोदय, या सदनाचे माननीय विरोधी पक्षनेते आणि विशेषत महिला सन्माननीय सदस्यांनी एका गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी गांभीर्यपूर्वक चर्चा येथे उपस्थित केलेली आहे. त्या चर्चेला थोडक्यात उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, परवा दिल्लीमध्ये अतिशय गंभीर घटना घडली आणि त्या घटनेची प्रतिक्रिया संपूर्ण देशामध्ये व्यक्त झाली. त्या पार्श्वभूमीवर आपल्या सदनामध्ये चर्चा होणे ही अपरिहार्य गोष्ट होती. महिलांच्या प्रतिनिधींनी या सदनामध्ये जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी उपाययोजना करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. काल या सदनामध्ये असे सांगितले गेले की, सरकारच्या वतीने तीच तीच उत्तरे दिली जातात. मी त्याच त्याच उत्तरामध्ये जाणार नाही. मी आकडेवारीवर जास्त भर देत नाही. आपण नेहमी छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नावे घेतो, त्यांना आदर्श मानतो. त्यांच्या राज्यामध्ये किती घटना घडल्या आणि संख्येने त्या किती कमी झाल्या याची माहिती न देता सरकारच्या वतीने ज्या उपाययोजना आतापर्यन्त करण्यात आलेल्या आहेत आणि त्यामध्ये ज्या त्रुटी आहेत त्यासंदर्भात विचार होणे आवश्यक आहे. दिल्लीमध्ये घडलेल्या घटनेने आपल्या देशातील कायद्याची अंमलबजावणी करणारी पोलीस यंत्रणा, न्यायालये या सर्वांमधील त्रुटी स्पष्ट केलेल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अशी विचारणा केली की, राज्यामध्ये पोलिसांचा वचक आहे काय ? उच्च न्यायालयाने देखील "पोलिसांचा वचक गेला कुठे" अशी भावना व्यक्त केली.या प्रश्नाच्या खोलात जाण्याची निश्चितच आवश्यकता आहे. आपले कायदे कडक करण्यासाठी त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. दिल्लीची घटना घडल्यावरच नव्हे तर अशा प्रकारची घटना आपल्या राज्यातील नगर जिल्ह्यातील कोठेवाडीमध्ये घडली होती. ती घटना देखील तितकीच गंभीर होती. त्यावेळी महाराष्ट्रातील कायदे हे महिलांना सुरक्षा देणारे असावेत अशी भूमिका घेतली गेली. तरी सुध्दा या टप्प्यावर कायद्यामध्ये बदल केले जावेत असे पोलीस दलाला आणि गृह विभागाला वाटते. म्हणून छेडछाडीच्या संदर्भात जे गुन्हे अदखलपात्र होते ते दखलपात्र व्हावेत अशा प्रकारची मागणी सदनामध्ये झाली होती. राज्य शासनाने केन्द्र

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाच्या आयपीसी आणि एव्हिडन्स ॲक्टमध्ये बदल केला पाहिजे आणि शिक्षेची तरतूद वाढविली पाहिजे अशी भूमिका घेतली आणि विधिमंडळाच्या दोन्ही सदनामध्ये तशा प्रकारचा प्रस्ताव करुन तो केन्द्राकडे पाठविला. केन्द्र सरकारने देखील याबाबतीत काही पावले उचललेली आहेत. राज्य सरकारने जी अपेक्षा व्यक्त केली तशा प्रकारची दुरुस्ती विचाराधीन असून कायद्याचे प्रारुप लोकसभेमध्ये सादर झालेले आहे असे केन्द्र सरकारने आम्हाला लेखी कळविलेले आहे.

सभापती महोदय, आपले कायदे असे आहेत की, 9 गुन्हेगार सुटले तरी चालतील पण एका निरपराध्याला शिक्षा होता कामा नये. मग गुन्हेगारांना प्रोटेक्शन मिळाले तरी हरकत नाही. म्हणून या भूमिकेमध्ये बदल करुन कायद्यामध्ये शिक्षेच्या ज्या तरतुदी आहेत त्यामध्ये काही बदल करण्याची आवश्यकता आहे. कालची दिल्लीतील घटना पाहिल्यानंतर जे गँगरेप होत आहेत, दिवसाढवळया जमावाने अत्याचार केला असेल आणि मदतीसाठी कोणी येणार नसेल तर अशा गुन्ह्यांच्या संदर्भात राज्य सरकारची आणि माझी व्यक्तिगतसुध्दा अशी भूमिका आहे की अशा गुन्ह्यासाठी फाशीची शिक्षा असली पाहिजे. नवा कायदा करताना राज्य शासनाची अशा प्रकारची शिफारस केन्द्राला करण्याची ठाम भूमिका राहील अशी मी या सदनामध्ये ग्वाही देतो.

सभापती महोदय, राज्यातील आकडेवारी पाहिली तर 2011 मध्ये महिलांवरील होणा-या अन्याय आणि अत्याचारासंबंधी विविध कायद्याखाली जे गुन्हे नोंदविले जातात त्यामध्ये दीड टक्क्यांनी घट झालेली आहे. ही आकडेवारी राज्य शासनाच्या वतीने नुकतीच घोषित करण्यात आलेली आहे. या संदर्भातील कन्व्हिक्शन रेट वाढावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. एका बाजूला बलात्कार सारख्या घटनामध्ये आपल्या राज्यामध्ये क्राईम रेट थोडासा बरा असला तरी सुध्दा तो आणखी कमी करणे आवश्यक आहे. त्यामध्ये दीड टक्क्याने जरी घट झालेली दिसत असली तरी काही महत्वाचे गुन्हे आहेत त्यामध्ये अंशत: वाढ झालेली आहे. मी येथे आकडेवारीला फारसे महत्व देत नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

सभापती महोदय, ज्यावेळी आपण आपल्या राज्याच्या सुरक्षिततेसंबंधी विचार करतो, राज्यात घडलेल्या गुन्हयांच्या घटना या ठिकाणी पोटतिडकीने मांडतो. राज्यातील सगळयाच महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणार नाही या गोष्टीची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना एवढेच सांगतो की, महिलांवरील अत्याचाराच्या संदर्भामध्ये देशात एकूण गुन्हे घडत आहेत त्यामध्ये महाराष्ट्राचा क्रमांक 18 वा आहे. देशातील अन्य 17 राज्यांमध्ये महाराष्ट्रापेक्षा जास्त गुन्हे घडत आहेत. देशात एकूण महानगरे आहेत, त्यात मुंबईचा क्रमांक 48 वा आहे. म्हणजे 47 महानगरे देशामध्ये अशी आहेत की, महिलांवर अत्याचार करणारे गुन्हे त्या ठिकाणी जास्तीचे घडत आहेत. मी जास्त सांगण्याची आवश्यकता नाही. बलात्काराच्या बाबतीत देशामध्ये महाराष्ट्राचा क्रमांक 24 वा आहे. देशातील महानगरामध्ये मुंबई शहराचा क्रमांक 34 वा आहे.

सभापती महोदय, विनयभंग,लैंगिक अत्याचार, मुलींचे अपहरण करणे, मुलींना पळवून नेणे आणि हुंडाबळीमध्ये आपल्या राज्यापेक्षा अन्य राज्ये पुढे आहेत. जेवढे गुन्हे घडत आहेत त्याचे प्रमाण कमी आहे असे न मानता यामध्ये निश्चित काही गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. त्या गोष्टी करण्याचे काम शासनाने हाती घेतलेले आहे.

सभापती महोदय, ज्या बलात्काराचे प्रकरण डोळयासमोर ठेऊन सभागृहात चर्चा झाली, त्या गोष्टीचे आपण संशोधन केले तर गेल्या नोव्हेंबर पर्यंत बलात्काराच्या घटनांच्या तक्रारी नोंदविल्या गेल्या, ती माहिती तर अत्यंत धक्कादायक आहे. राज्यात बलात्काराच्या ज्या घटना नोंदविल्या गेल्या, त्यातील 98 बलात्कार हे नातेवाईकांकडून केले गेलेले आहेत. ओळखीच्या माणसाकडून बलात्कार केला अशा 861 केसेस आहेत. 43 बलात्कार क्लोज फॅमिली मेंबर्सकडून झालेले आहेत. 310 बलात्काराच्या घटना जवळ राहणाऱ्या शेजाऱ्यांकडून झालेल्या आहेत. आजोबाने नातीवर बलात्कार केला अशी परवा घटना घडलेली आहे. सांगलीमध्ये मुलाने आईचा खून केला. या घटना पाहता नीतिमत्तेचा स्तर घसरला आहेच. पण त्या बरोबर मुख्य प्रश्न उपस्थित केला जातो आहे की, पोलिसांचा आणि आपल्या व्यवस्थेचा दरारा कमी होतो आहे काय? इतक्या महत्वाच्या विषयावर मी खरे बोलण्याची आवश्यकता आहे. केवळ बाजू मांडण्यासाठी वेगळी भूमिका घेणे

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

मीही योग्य मानत नाही.

महोदय, मी ज्यावेळी पोलिसांची बाजू घेतो. त्यावेळी तुम्ही चुकीचे सुध्दा समर्थन करता. ज्यावेळी आपण डान्स बार बंद करण्याचा निर्णय महाराष्ट्रात घेतला. त्यावेळी मॉरल पोलिसींग करीत आहात अशा पध्दतीच्या टीका मी सहन केलेल्या आहेत. पोलिसांचे मॉरल कोठेही कमी होऊ नये यादृष्टीने अनेक वेळा मी माझी भूमिका स्पष्ट केलेली आहे. एका बाजूने पोलिसांचे मॉरल वाढेल, कठोरपणाने पोलीस कारवाई करतील त्यासाठी त्यांना संरक्षण देण्याची सुध्दा नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, एका पाठोपाठ एक त्यांच्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणा आम्ही दुसऱ्या बाजूने निर्माण केलेल्या आहेत. पोलिसांनी चांगल्या हेतूने कारवाई केली असली तरी अतिरिक्त कारवाई झाली तर दुसऱ्या बाजूने सस्पेन्शन ठरलेले आहे. एखाद्या गुन्हेगाराला पोलिसाने भर चौकात थप्पड मारली तर थप्पड मारण्याचा अधिकार पोलिसांना आहे काय असाही प्रश्न विचारणाऱ्यांची संख्या मोठी आहे. एका बाजूने वाटते की, गंभीर गुन्हेगाराचे हातपाय मोडावेत. परंतु अशा गुन्हेगारांना बेडया घातल्या तर पोलिसांना सस्पेंड केले जाते. गुन्हेगाराला थप्पड मारली तरी पोलिसांना सस्पेंड केले जाते. आज खूप मोठया अडचणीतून पोलिसांना कामे करावी लागत आहेत ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, हेतू चांगला असेल, प्रसंगी पोलिसांनी जास्तीची कारवाई केली, थोडीशी चूक जरी झाली तरी अशा पोलीस अधिकाऱ्यांची आणि पोलिसांची पाठराखण निश्चितपणे केली जाईल असे मी गृह मंत्री म्हणून पोलीस अधिकाऱ्यांना सांगतो. त्यांच्यांकडे जास्त संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे. त्यामध्ये कोठे कमतरता आढळून आली, काही त्रुटी राहिल्या, तक्रार करुन पोलीस अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असेल, पोलीस स्टेशनला तक्रार करण्यास गेल्यानंतर अनावश्यक प्रश्न विचारुन त्यांची बदनामी होत असेल अशी भूमिका घेतली जात असेल तर मी पुन्हा या सदनात सांगतो की, एका बाजूने चांगल्या हेतूने काम करणाऱ्या, प्रसंगी चुकणाऱ्या अधिकाऱ्यांची पाठराखण करण्याची भूमिका जशी आम्ही घेऊ, तसे चुकणाऱ्या अधिकाऱ्यांना, दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि असंवेदनशील भूमिका घेणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना कोठेही माफ करण्याची भूमिका घेतली जाणार नाही याही गोष्टीची मी ग्वाही देतो.

3...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 12:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने जनरल विषयांवर खूप चर्चा झाली. मी सर्व महिला सदस्यांना आवाहन करीन की, आपण जनरल चर्चा करण्यापेक्षा माझ्याकडे स्पेसिफीक तक्रारी केल्या तर हे अधिवेशन संपण्यापूर्वी चौकशीची प्रक्रिया सुरु करण्याची भूमिका शासनाच्या वतीने घेतली जाईल. माझे या चर्चेवरील उत्तर पूर्ण झाल्यावर मी एक तास वेळ महिला सदस्यांसाठी देतो. त्यांनी माझ्याकडे येऊन स्पेसिफिक तक्रारी द्याव्यात. जर कोणी चुकीचे वागले असेल तर त्यांना पाठीशी घालण्याची भूमिका शासनामार्फत घेतली जाणार नाही. महाराष्ट्रात महिला सुरक्षित राहिल्या पाहिजेत.

सभापती महोदय, आज महाराष्ट्रातील अनेक पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलिसांची आणि महिला पोलीस अधिकाऱ्यांची संख्या कमी आहे. अनेकांची वेगळी मते असताना सुध्दा पोलीस दलात महिलांचे प्रमाण 30 टक्के झाले पाहिजे म्हणून मी नेहमी आग्रही भूमिका घेतलेली आहे. मी नम्रपणे सांगतो की, मागील चार वर्षामध्ये पोलीस दलात सामील झालेल्या महिला पोलिसांची संख्या बघितली तर मागील 20 वर्षामध्ये जेवढया महिला पोलीस, महिला पोलीस अधिकारी होत्या त्यापेक्षा किती तरी पटीने वाढ झालेली आपल्याला दिसून येईल. महिला पोलिस आणि महिला पोलीस अधिकारी यांचे प्रमाण 30 टक्के होईल त्यावेळी महिलांसाठी अधिक सुविधा निर्माण करणे निश्चितपणे गृह विभागास शक्य होणार आहे आणि त्या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरु आहेत. महिलांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले जाऊ नये म्हणून महिला सहाय्य कक्ष निर्माण केलेले आहेत. महिला सुरक्षा समित्या निर्माण केलेल्या आहेत. राज्यात 23 ठिकाणी महिला समुपदेशन केंद्रे सुरु इ ाालेली आहेत. महिलांवरील अत्याचार व बलात्काराचे खटले निकाली काढण्यासाठी 12 विशेष न्यायालये आतापर्यंत स्थापन करण्यात आलेली आहेत. महाराष्ट्रात 100 फास्ट ट्रॅक कोर्ट सुरु होते, केंद्र सरकारने त्यांचे अनुदान कमी करण्याचा निर्णय घेतल्या नंतर सुध्दा पुढच्या पाच वर्षासाठी 100 फास्ट ट्रॅक कोर्ट सुरु राहतील. महाराष्ट्रात जे महत्वाचे गुन्हे घडलेले आहेत, त्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय होतील या दृष्टीकोनातून राज्य सरकारकडून प्रयत्न केला जाणार आहे.

सभापती महोदय, आताच्या निर्णयाप्रमाणे महिलावरील अत्याचार तसेच बलात्काराच्या घटनांची जी प्रकरणे एका वर्षापासून प्रलंबित आहेत. ती प्रकरणे फास्ट ट्रॅक कोर्टाकडे वर्ग

4...



श्री.आर.आर.पाटील...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावीत अशा पध्दतीच्या सूचना सरकारने दिलेल्या आहेतच. यापुढच्या काळामध्ये अशी प्रकरणे कोर्टात सहा महिने प्रलंबित राहिली तर ती फास्ट ट्रॅक कोर्टाकडे जावीत आणि तातडीने निकाल लागावेत असा शासनाचा प्रयत्न आहे. प्रसंगी फास्ट ट्रॅक कोर्टाची संख्या वाढविण्याची आवश्यकता वाटली तर त्या बाबतीत सकारात्मक भूमिका घेतली जाईल. उशिरा दिलेला न्याय हाच एक प्रकारचा अन्याय असतो. अशी प्रकरणे प्रलंबित राहिली तर या प्रकरणांमधील साक्षी पुराव्यांमध्ये बदल होण्याची शक्यता असते. त्यामुळे राज्यात फास्ट ट्रॅक कोर्टाची संख्या वाढविली जाईल. प्रकरणे निकाली काढण्याच्या बाबतीत कालबध्द कार्यक्रम आखला जाईल. त्या कोर्टांमध्ये निर्भीडपणे कामकाज चालेल, तेथील कामकाजाला प्रसिध्दी दिली जाणार नाही याची देखील दक्षता घेण्यात येईल. मृत्यूपूर्व जबाब नोंदविताना त्याचे कॅमेऱ्यांमार्फत शुटींग करुन ठेवले जाईल अशा सर्व गोष्टींना प्राधान्य दिले जाईल. बाधित व्यक्ती ज्या वकिलाची मागणी करतील, तो वकील नेमण्याची तरतूद केली जाईल. सरकारी यंत्रणेच्या वकिलावर जर त्यांचा विश्वास नसेल तर खाजगी वकील घेण्याची केस बघून परवानगी देण्याची भूमिका घेतली जाईल.

सभापती महोदय, मी विनम्रपणे सांगतो की, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी साहेब यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केलेली आहे. त्या समितीने जवळ जवळ 82 शिफारशी केलेल्या आहेत. 67 शिफारशींची अंमलबजावणी अंतिम टप्प्यावर आहे....

यानंतर श्री. भोगले....

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ पूर्वी श्री.गिते 12:20

श्री.आर.आर.पाटील.......

आताचे असलेले कायदे, त्यातील त्रुटी आणि कायद्याची अंमलबजावणी करताना प्रशासकीय यंत्रणांमध्ये असलेली कमतरता या बरोबरच महिलांच्या अधिक सुरक्षिततेसाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत याबद्दल या समितीने अतिशय चांगल्या शिफारशी केलेल्या आहेत. येत्या चार महिन्यात या समितीचा अंतिम अहवाल सरकारकडे येईल. मी सदनाला इतकेच सांगेन की, या समितीच्या शिफारशी अंमलात आणल्यानंतर, त्रुटी दूर केल्यानंतर आज असलेल्या महिलांच्या सुरक्षिततेमध्ये आणखी 100 टक्के वाढ झालेली आपल्याला दिसून येईल. महिलांना धोका वाटला, अडचण वाटली, अन्याय होत आहे असे वाटले तर मुंबईमध्ये 103 क्रमांकाची हेल्पलाईन सुरु केली आहे. विशेषत: प्रसिध्दी माध्यमांच्या प्रतिनिधींना विनम्रपणे सांगू इच्छितो की, या संदर्भात जास्तीत जास्त प्रसिध्दी मिळावी. ग्रामीण महाराष्ट्रामध्ये मुंबई खेरीज कुठेही महिलांना मदत हवी असेल तर 1091 क्रमांकाची टोल फ्री लाईन गृह खात्याच्या किंबहुना पोलीस दलाच्या वतीने सुरु केलेली आहे. याचे काम देखील तपासले जाते. ही टोल फ्री लाईन सुरु केल्यापासून 1665 कॉल प्राप्त झाले. प्रत्येक कॉल अटेण्ड करुन शंकेचे निराकरण करण्यात आले आहे.

सभापती महोदय, अन्याय होतो, अत्याचार होतो म्हणून पोलीस ठाण्यामध्ये येण्याची आवश्यकता नाही. फक्त फोनवरुन कळविले तरी पोलीस स्वत:हून दखल घेतील. दखल घेण्यास दुर्लक्ष केले जाईल तेथे निश्चितपणे कारवाई केली जाईल या गोष्टीची मी हमी देतो. महाराष्ट्र आज अन्य राज्यांच्या तुलनेत निश्चितपणे महिलांसाठी सुरक्षित राज्य आहे. मुंबई शहर अन्य महानगरांच्या तुलनेत सुरक्षित आहे. याचे सगळे श्रेय पोलिसांचे नाही. पण महाराष्ट्रीय माणसांचा स्त्री वर्गाकडे बघण्याचा दृष्टीकोन निश्चितपणे चांगला आहे. अधूनमधून अनेक कारणांमुळे गुन्हे होतात आणि गुन्हयांना प्रोत्साहन देणाऱ्या गोष्टी घडतात, त्यावर प्रतिबंध करणाऱ्या उपाययोजना खात्रीने केल्या जातील.

सभापती महोदय, आज काही वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द झालेल्या अश्लील जाहिराती माझ्याकडे पाठविण्यात आल्या आहेत. माननीय सदस्यांनी दिलेली माहिती अपुरी आहे. ज्यांना अतिशय मोठी लोकमान्यता आहे, फार मोठ्या प्रमाणात ज्यांचे सर्क्युलेशन आहे अशा प्रिंट मीडियाच्या माध्यमातून देव देवतांचे नग्न फोटो छापले जातात. यासाठी आमचा विशेष सेल लक्ष देईल. असे जर काही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.......

अश्लील दृश्ये करणारी पब्लिकेशन्स असतील ती कोणाचीही असली तरी त्यांच्यावर कालबध्द कार्यक्रम आखून तीन महिन्यांच्या आत कोर्टात प्रकरणे दाखल केली जातील.

सभापती महोदय, भ्रूण हत्येच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. वास्तविक आरोग्य विभागाच्या संदर्भातील ही बाब असून त्या विभागाने समिती नेमली आहे. त्या समितीने गुन्हे नोंद केल्यानंतर पुढील संबंधाने कारवाई करण्याची जबाबदारी पोलिसांवर आहे. मी इतकेच सांगेन की, महाराष्ट्रामध्ये भ्रूण हत्येच्या संदर्भात सर्वाधिक गुन्हे दाखल झालेले आहेत आणि डॉक्टरांना अरेस्ट करण्याचे काम देशात महाराष्ट्राने सर्वाधिक केले आहे. मध्यंतरी सरकारने ज्या कठोर कारवाया केल्या त्याचा कुठे ना कुठे परिणाम दिसून येत आहे. अजूनही मार्ग काढण्याचा प्रयत्न होत आहे. फिरती सेंटर्स काही ठिकाणी निघाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. कुठेही अशा पध्दतीने भ्रूण हत्येचा प्रयत्न होईल तेथे पोलीस स्वत:हून पुढाकार घेतील इतकेच या निमित्ताने सांगतो. सार्वजनिक ठिकाणी साध्या पोलिसांची गस्त वाढविणे, सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, शैक्षणिक संस्था, प्रमुख धार्मिक स्थळे, सिनेमा हॉल, रेल्वे स्थानक, बस स्टॅण्डच्या ठिकाणी महिलांची छेडछाड होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, अधिक पोलीस मनुष्यबळ ठेवणे, सार्वजनिक वाहनांमध्ये छेडछाडीच्या घटना घडू नयेत म्हणून शक्य असेल तेथे कॅमेरे बसविणे, गुप्त वेशातील पोलीस ठेवणे, आलेल्या तक्रारींची योग्य ती दखल घेणे, महिलांसाठी हेल्पलाईन सुरु करणे, पीडित महिलांबाबत काही आवश्यक सवलत देणारी योजना सुरु करणे या सर्व उपाययोजना केल्या जातील. अतिशय संवेदनशीलपणाने महिलांच्या तक्रारींची नोंद घेतली जाईल. महाराष्ट्र महिलांसाठी सुरक्षित राज्य होते, आजही आहे आणि भविष्यातही सुरक्षित राहील.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर भागामध्ये आजही छत्तीसगढी नाच सर्रासपणे सुरु आहे. यासाठी पोलिसांकडून परवानगी कशी दिली जाते?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, डान्सबारची एक केस न्यायालयात सुरु आहे. नेमके डान्स म्हणजे काय, त्यात अश्लीलता काय असा प्रश्न आहे. ज्याच्या डोळ्याला जे वाटेल तसे तो समजतो. त्याची निश्चित व्याख्या नाही. डान्सबार बंद केले आहेत. छत्तीसगढी नाच संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांना लक्ष घालण्यास सांगून त्यात अश्लीलता असेल तर निश्चितपणे तो

..3..





श्री.आर.आर.पाटील.......

बंद करण्याच्या सूचना मी देईन. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने, मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ज्या उपाययोजना आवश्यक आहेत त्या केल्या जातील. ज्या महिला सदस्यांनी भावना व्यक्त केल्या, ज्या पोलीस स्टेशनच्या एरियाच्या संदर्भात व्यक्त केल्या, जरुर माझ्याकडे तक्रारी अधिवेशन संपण्यापूर्वी द्याव्यात किंवा आज द्याव्यात. वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत संबंधित तक्रारीची चौकशी करु. दोषी आढळले तर निश्चितपणे कारवाई करु. छेडछाडीच्या तक्रारी येऊनही, विनयभंगाच्या तक्रारी येऊनही महिलांच्या तक्रारीची गांभीर्याने दखल घेतली जात नाही अशा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केलेली आपल्याला दिसेल याची ग्वाही पुन्हा एकदा देतो.

सभापती महोदय, दिल्ली येथे दोन दिवसांपूर्वी घडलेले गंभीर प्रकरण लक्षात घेऊन महाराष्ट्रातील महिला अधिक सुरक्षित रहाव्यात म्हणून ज्या पोटतिडकीने भावना व्यक्त केल्या त्याची दखल घेतली जाईल आणि आवश्यक उपाययोजना केल्या जातील. महिलांसाठी महाराष्ट्र सुरक्षित ठेवला जाईल या गोष्टीची मी पुन्हा एकदा ग्वाही देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, अनेक मुलींनी सांगितले की, कॉलेजबाहेर कॉलेजमधील विद्यार्थी असतात असे नाही, कॉलेजच्या बाहेरची टोळकी जमतात. पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये जी महाविद्यालये आहेत तेथे पोलिसांचे पेट्रोलिंग वाढविले किंवा मुख्याध्यापकांशी संपर्क ठेवला तर पुढील प्रसंग टळू शकतात. तशी उपाययोजना केली जाईल काय?

श्री.आर.आर.पाटील : अशी जर टोळकी जमत असतील तर त्यांना चोपून काढण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या जातील. कायद्याच्या बाहेर वेगळया पध्दतीने पोलिसांना सांगून अशा गुन्हेगारांचा बंदोबस्त आपण करु.

**उप सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येतील.

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : विदर्भातील विणकरांच्या प्रश्नाकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष

**मु. शी.** : विदर्भातील विणकरांच्या प्रश्नाकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष
यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"विदर्भातील हजारो विणकरांच्या प्रश्नांकडे शासन वर्षानुवर्षे दुर्लक्ष करीत असल्याने केंद्र सरकारने जाहिर केलेल्या कर्जमाफी आणि इतर अनेक योजनांपासून ते वंचित राहणे, परिणामी विणकर त्यांच्या व्यवसायापासून दूर होत जाणे, सूताच्या किंमतीत वाढ आणि सूत पुरवठ्यातील अनियमितता यामुळे विणकर सहकारी संस्था डबघाईला येणे, सहकारी संस्था आणि खाजगी हातमागांवर काम करणाऱ्या विणकरांसाठी केंद्र शासनाने हातमाग उद्योग पुनरुज्जीवन, सुधारणा आणि पुनर्रचना योजना राज्यात लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेऊन एक वर्ष लोटले तरी त्यांची अंमलबजावणी न होणे, परिणामी विणकरांच्या हाताला काम मिळेनासे झाल्याने हजारो विणकर व त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची व बेकारीची आलेली वेळ, केंद्र शासनाने विणकरांसाठी एकात्मिक हातमाग विकास योजना, हातमाग विणकर कल्याण योजना, महात्मा गांधी बुनकर विमा योजना, विपणन व निर्यात प्रोत्साहन योजना अशा अनेक योजना सुरू केल्या असल्या तरी अनेक योजना या समूह गटांशी संबधित असल्याने त्यांचा थेट फायदा न होणे, परिणामी या विणकरांमध्ये व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये निर्माण झालेली नैराश्याची भावना, याबाबत, शासनाने विणकरांच्या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन एकत्रित योजना आखण्याची आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.प्रकाश सोळंके (वस्त्रोद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..



लक्षवेधी सूचना क्रमांक-1........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, निवेदनामध्ये एक ते सहापर्यंत जे मुद्दे नमूद केले आहेत त्यापैकी दुसऱ्या मुद्यामध्ये पुनर्रचना पॅकेजची योजना सांगितली आहे, त्या योजनेसाठी 61.64 लाख रुपये खर्च झाला आहे. हा खर्च कोणत्या कालावधीत झालेला आहे? हातमाग उद्योगाचे पुनर्जीवन या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पात्र ठरणाऱ्या संस्थांना कशा पध्दतीने लाभ होणार आहे, या योजनेचे स्वरुप काय आहे? महाराष्ट्रात आणि देशभरात ग्रामोद्योगाची दुकाने आहेत. अनेक ठिकाणी विणकरांनी तयार केलेली उत्पादने विक्रीस ठेवली जातात. 1970 मध्ये 1.40 लाख हातमाग होते याची आपल्याला कल्पना आहे.

नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

आता विणकराची संख्या 6 हजारावर आलेली आहे. हातमागाची संख्या आता दिवसेंदिवस कमी कमी होत चालली आहे. हातमागाद्वारे तयार केलेल्या उत्पादनाला बाजारपेठ मिळण्याच्या दृष्टीने खादीग्रामोद्योगच्या दुकानांशी टायअप केला नसेल तर तो केला जाईल काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर देतो की, ही योजना मध्यवर्ती वित्तीय संस्थांना 4.5 टक्के दराने व्याज अनुदानाची ही योजना आहे. या योजनेअंतर्गत 61.64 लक्ष रुपये 518 संस्थांना सन 2006-2007 आणि 2007-208 मध्ये वितरित करण्यात आलेले आहेत. केंद्र शासनाने हातमाग उद्योगाची पुनर्जीवन व पुनर्ररचना पॅकेजच्या माध्यमातून विणकरांना 100 टक्के कर्ज माफी देण्याची ही योजना आहे. ही योजना राबविण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. विणकरांची थकीत रक्कम 100 टक्के माफ करायची आहे. 25 टक्के व्याजाची रक्कम शासन भरेल व 75 टक्के व्याजाच्या रक्कमेचा भार बँकेने उचलावयाचा अशा ही योजना आहे. परंतु या योजनेचा आढावा घेतला तेव्हा महाराष्ट्रातील एकही संस्था त्यामध्ये पात्र होत नाही असे जेव्हा आमच्या लक्षात आले. तेव्हा या योजनेच्या संदर्भात केंद्र शासनाने जे काही निकष ठरवले आहेत त्यामध्ये काही बदल करावेत, जेणेकरुन जास्तीत जास्त या संस्थांना लाभ मिळेल यासाठी आमचा पाठपुरावा सुरु आहे व त्यास केंद्र शासनाचा सुध्दा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. योजनेमध्ये हा बदल करण्यात आला तर महाराष्ट्रातील बहुसंख्य म्हणजे 516 संस्थांना या योजनेचा लाभ मिळू शकेल.

सभापती महोदय, विणकरांच्या बाबतीत विपणन निर्यात प्रोत्साहन योजना आपण राबवित आहोत. यामध्ये राष्ट्रीय प्रदर्शन,राज्यस्तरीय प्रदर्शन तसेच जिल्हास्तरीय प्रदर्शनाची ही योजना आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून जास्तीत बाजारपेठ या उत्पादकांना मिळावी यासाठी आपला प्रयत्न आहे. सन 2011-2012 मध्ये विदर्भात 5, मराठवाडा 4 आणि उर्वरित महाराष्ट्रात 14 प्रदर्शने भरविण्यात आली होती. एका वर्षात 23 प्रदर्शने भरविण्यात आली व त्या माध्यमातून या संस्थेच्या उत्पादनाला बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला. सन्माननीय सदस्यांनी सूचना केली आहे की, या उत्पादनाला खादी ग्रामोद्योगाच्या माध्यमातून चालना दिली जाणार आहे काय ? सन्माननीय सदस्यांनी ही जी सूचना केलेली आहे ती सूचना तपासून त्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही केली जाईल.

------------





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक दोन संदर्भात**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी लक्षवेधी सूचना पहिल्या दिवशी सभागृहात उपस्थित झाली होती. या लक्षवेधी सूचनेला आदरणीय मुख्यमंत्री उत्तर देणार होते म्हणून ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलली गेली व ही लक्षवेधी सूचना आज सभागृहासमोर आली आहे. माझ्या लक्षवेधी सूचनेला उत्तर न देण्याचा विचार माननीय मुख्यमंत्र्यांनी का बदलला हे मी जाणून घेण्यास जास्त उत्सुक आहे. माझ्या लक्षवेधी सूचनेला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे असा मी आग्रह धरला नव्हता तर माननीय मुख्यमंत्र्यांनी निरोप पाठवून कळवले होते की, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मला स्वत:लाच उत्तर द्यावयाचे आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना शेवटच्या दिवसापर्यंत राहिली. त्यावेळी माननीय सभापती महोदयांनी सांगितले होते की, आपल्या लक्षवेधी सूचनेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार असल्यामुळे आपली लक्षवेधी सूचना पुढे ढकलत आहे.

**उप सभापती** : यासंदर्भात मी पुन्हा एकदा निरोप पाठवतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री येणार नसतील व माझ्या लक्षवेधी सूचनेला माननीय मंत्री महोदय श्री. भास्कर जाधव हे उत्तर देणार असतील तर माझी त्याला हरकत राहणार नाही. भविष्यामध्ये इतर सन्माननीय सदस्यांवर अन्याय होऊ नये याची काळजी घ्यावी. आता आपण जो काही निर्णय द्याल तो बदलणार तर नाही ना ?

सभापती महोदय, तुळजापूर मंदिराच्या रस्ता विकासाच्या संदर्भात माननीय पालक मंत्र्यांनी विशेष लक्ष घालून बैठक घेतली होती. विकासाच्या संदर्भात अनैतिक बाबी मंत्रीमहोदयांच्या लक्षात आल्यानंतर प्राधिकरण सदस्य श्री. व्यंकट कोळी यानी मुख्याधिकारी संतोष जीगरे यांच्यावर त्या बैठकीत दोषारोप ठेवले होते. त्यामुळे संतोष जिगरे यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती हे खरे आहे काय ? नोटिशीमध्ये त्यांच्या दोषाची कोणकोणती कारणे दिली होती ? त्यांना 48 तासात उत्तर द्या अन्यथा तुमच्यावर तातडीने कारवाई करण्यात येईल असे नोटीसमध्ये म्हटले होते काय, संबंधितांकडून 48 तासात उत्तर आले नसेल तर आपण त्यासंदर्भात कोणती कारवाई केली आहे ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय रावतेसाहेबांनी लक्षवेधीच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले आहे. तुळजापूर मंदिराचा 12 मीटरचा रस्ता होणार की, नाही

..3..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

किंवा सर्वच ठिकाणी सर्व्हेनुसार, नियोजनानुसार काम होणार की, नाही असा त्यांचा प्रश्न आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्या ठिकाणच्या बैठकीमध्ये झालेल्या वृत्तांतासंदर्भात तसेच तेथील सदस्यावर कारणे दाखवा अशी जी नोटीस बजावली होती त्यासंदर्भात स्वत: माहिती देऊन प्रश्न विचारलेला आहे. परंतु तशा प्रकारची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न लक्षवेधी सूचनेशी निगडित नसतांना सुध्दा मी उत्तर देण्यास तयार आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. माननीय महसूल मंत्र्यांना विधानसभेत जावयाचे असल्यामुळे आता लक्षवेधी सूचना क्रमांक 17 घेण्यात येईल.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्यासंबंधी

**मु. शी.** : ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, चरणसिंग सप्रा, डॉ.सुधीर तांबे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाची प्रक्रिया शासनामार्फत सुरू असणे, विभाजनाच्या प्रस्तावात "पालघर" हा नवा जिल्हा निर्माण करण्यात आला असून, यामध्ये पालघर, वसई, डहाणू, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, तलासरी व वाडा इत्यादी आदिवासीबहुल भागांचा समावेश असणे, ठाणे शहर जिल्ह्यात ठाण्यासह नवी मुंबई, बदलापूर, शहापूर, मुरबाड, मिरा-भाईदर, कल्याण या भागांचा समावेश असणे, ठाण्याचे शहरी व ग्रामीण असे दोन भाग करुन "पालघर" या जिल्ह्याची निर्मिती होण्याची शक्यता असणे, तथापि, ठाणे जिल्ह्याचे त्रिभाजन करुन "कल्याण" जिल्हा स्वतंत्र करण्याबाबत ठाणे जिल्ह्यातील २४ पैंकी ११ आमदारांची अनकुलता असून "कल्याण" जिल्हा निर्माण करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, एक कोटीहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या ठाणे जिल्ह्याचे वेगाने नागरीकरण होत असणे, लोकसंख्या वाढीचा हा दर कल्याण पट्टयात सर्वाधिक असल्याने "कल्याण" हा स्वतंत्र जिल्हा करण्याबाबत राज्यशासनाने निर्णय घेऊन, याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया."

श्री. बाळासाहेब थोरात ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मला महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याची संधी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून दिल्याबद्दल मी सर्वप्रथम माननीय सभापती महोदयांचे व आपले आभार मानतो. सन 2001 च्या जनगणनेनुसार मुंबई उपनगर नंतर ठाणे जिल्हा हा राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा जिल्हा असून या जिल्हयाने 1 कोटींची लोकसंख्या पार केलेली आहे. या जिल्हयाचे क्षेत्रफळ 9,558 चौ.कि.मी आहे. या जिल्हयामध्ये 13 पंचायत समित्या असून 24 विधानसभा मतदार संघ असून 4 लोकसभा मतदारसंघ आहेत. या जिल्हयाच्या विभाजनाचा प्रश्न प्रलंबित असतांना आपले लक्ष आकर्षित करु इच्छितो की, जिल्हयाच्या विभाजनाचा निर्णय 1 मे, 1999 साली झाला होता त्यावेळी परभणीतून हिंगोली व भंडाऱ्यातून गोंदिया जिल्हा निर्माण झाला होता. त्यानंतर जिल्हा विभाजनाचा निर्णय सरकारने घेतलेला नाही. त्यामुळे ठाणे जिल्हयाच्या विभागणीचा प्रश्न तेव्हापासून आहे. जिल्हा मोठा असल्यामुळे लोकांना त्रास होतो, योजनांची अंमलबजावणी योग्य होत नाही. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय महसूल मंत्र्यांनी या प्रश्नाकडे आता लक्ष दिलेले आहे.

ठाणे जिल्हयाच्या विभाजनाच्या संदर्भात माझे 3-4 स्पेसिफिक प्रश्न आहेत. यासंबंधी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीने कोणता अहवाल सादर केला याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. विभाजनाच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी शासन काही कालमर्यादा ठरविणार आहे काय ? विभाजनाचे निर्णय घेण्यासाठी किती तरी दशके लागत असतात त्यामुळे ठाणे जिल्हयाचे विभाजन करतांना पुढील 20-25 वर्षाचा विचार करुन सरकारने यासंदर्भात निर्णय घ्यावा.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त....

ठाणे जिल्ह्याचे आकारमान, लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्र, प्रशासकीय सोयी विचारात घेऊन जिल्हा विभाजनाचा निर्णय घ्यावा. पालघर ठाणे बरोबरच कल्याण जिल्ह्याची देखील निर्मिती करावी. कारण लोकसंख्या वाढीचा दर सर्वात जास्त कल्याणपट्ट्यात आहे. तेथे झपाट्याने नागरीकरण होत आहे. कल्याण येथे पायाभूत सुविधा देखील आहेत म्हणून माझा तिसरा प्रश्न असा आहे की, ठाणे जिल्ह्याचे विभाजन करताना ठाणे, पालघर बरोबर कल्याण जिल्ह्याचा सुद्धा शासन विचार करणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय. महाराष्ट्रातील ठाणे हा देशातील सर्वात मोठा लोकसंख्या असलेला जिल्हा आहे. येथे विकासाच्या दृष्टीने देखील खूप गती आहे. येथील महानगरपालिकेची लोकसंख्या देखील खूप मोठी आहे. या जिल्ह्यात ग्रामीण, सागरी आणि डोंगरी भाग आहे. अशी विविधता या जिल्ह्यात आहे. ठाणे जिल्ह्याचे विभाजन व्हावे ही फार जुनी मागणी आहे. आपण दिनांक 8.2.2012 रोजी आयुक्तांची समिती घटित केली होती. या समितीचा अहवाल आलेला आहे. ठाणे जिल्ह्याचे दोन भागात विभाजन करावे असा अहवाल त्यांनी दिलेला आहे. त्यांनी पालघर हे मुख्यालय सुचविले आहे. तसेच, जव्हारचे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय हे तेथे कायम ठेवावे असे सुचविले आहे. येथे मला प्रोसिजरचा मुद्दाम उल्लेख करावा लागेल. हा विषय आम्ही मंत्रिमंडळापुढे लवकरात लवकर नेत आहोत. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर ड्राफ्ट नोटिफिकेशन निघेल व सूचना, हरकती मागविण्यात येतील. जनतेच्या सूचना व हरकती आल्यानंतर अंतिम स्वरूप दिले जाणार आहे. त्यामुळे जनतेला ज्या काही सूचना किंवा हरकती मांडायचा असतील त्यासाठी संधी आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कल्याण जिल्हा निर्मितीची जी सूचना केली आहे ती यामध्ये मांडू शकतात. तशी संधी त्यांना उपलब्ध होणार आहे. हे सर्व लवकर व्हावे असा आग्रह देखील आहे. लवकरात लवकर ठाणे जिल्ह्याचे विभाजन दोन जिल्ह्यात करण्याचा प्रयत्न आमचा आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाचा विषय हा अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. माननीय सदस्य श्री.चिंतामण वनगा हे पहिल्यांदा आमदार झाले तेव्हापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. या विभाजनाच्या मुद्यामध्ये आता त्रिभाजन व चौभाजनाचा मुद्दा आला आहे. सागरी, डोंगरी, नागरी आणि आगरी असा उल्लेख सन्माननीय मंत्री श्री.गणेश नाईक यांनी केला होता. लोकप्रतिनिधीसह सर्व पक्षांचे कार्यकर्ते ठाणे जिल्ह्याचे विभाजन करावे असा आग्रह करत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. या विभाजनासाठी 250 कोटी रूपये लागतील की, 650 कोटी रूपये लागतील यावर मुद्दा अडलेला आहे. यासंबंधात अर्थ व महसूल खात्यांमध्ये गोंधळाची परिस्थिती आहे. काही जण म्हणतात की, 250 कोटी रूपये खर्च असेल तर पटकन मान्यता देतो. एखाद्या जिल्हा निर्मितीला किती पैसे लागतात, याचे उत्तर शोधायला 4-4 महिने लागत नाही. तेव्हा या प्रश्नासंबंधी जनतेला उगाचच झुलवत ठेवू नका. यासंबंधी आम्ही 8 दिवसांमध्ये घोषणा करू असे सांगावे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये खर्च येणार आहे. नवीन कार्यालयासाठी इमारती बांधाव्या लागतील. त्या व्यतिरिक्त नवीन स्टाफ नेमावा लागेल. या सगळ्याकरिता खर्च आहे. यामध्ये खर्च येणार असला तरी तो खर्च करण्याची शासनाची तयारी आहे. त्या पद्धतीने या जिल्ह्याचे विभाजन केले जाईल.

श्री.जयंत प्र पाटील : सभापती महोदय, 1980 साली माननीय श्री. अंतुले साहेबांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी दोन जिल्ह्यांची घोषणा केली. त्यावेळी कोणते प्रोसिजर वापरण्यात आले होते. त्यांनी सिंधुदुर्ग आणि उस्मानाबाद जिल्ह्याची घोषणा केली होती. त्यावेळी कोणती ऑब्जेक्शन्स घेण्यात आली होती, त्यावेळी राज्य शासनाने कोणते प्रोसिजर वापरले होते ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मागील जिल्ह्याची निर्मिती करताना जी प्रोसिजर वापरण्यात आली होती ती प्रोसिजर आम्ही तपासून पाहिलेली आहे. त्यावेळी देखील घोषणा केल्यानंतर सुद्धा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे गेला होता व त्यानंतर ड्राफ्ट नोटिफिकेशन निघाले होते, हरकती व सूचना मागविल्या होत्या व अंतिम नोटिफिकेशन निघाले होते. त्यावेळी देखील ह्या सर्व प्रोसिजर फॉलो केल्या होत्या.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्र्यांचे आभार मानतो.

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेवर आता अधिक उप प्रश्न विचारण्यात येणार नाही. सन्माननीय नगरविकास राज्य मंत्री श्री.भास्कर जाधव यांना विधान सभेच्या सभागृहात 4 लक्षवेधी सूचना आहेत. त्यामुळे आजच्या कामकाजात दाखविलेल्या त्यांच्या विभागाच्या तीन लक्षवेधी सूचना मी प्राथम्याने घेत आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 7 घेण्यात येईल.

.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किनारपट्टीवर पर्ससीन ट्रॉलर्सवर बंदी घालणे

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किनारपट्टीवर पर्ससीन ट्रॉलर्सवर बंदी घालणे यासंबंधी श्री.विनायक राऊत ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक राऊत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मत्स्य व्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सिंधुदुर्ग जिल्हयातील किनारपट्टीवर परराज्यातील पर्ससीन ट्रॉलर्स घुसखोरी करुन मच्छीमारी करीत असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, त्यामुळे स्थानिक मच्छीमारांवर त्याचा विपरीत परिणाम होऊन त्यांना तोटा सहन करावा लागणे, समुद्रात पर्ससीन ट्रॉलर्स घुसखोरी करीत असल्याची माहिती दिली तरी शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, अशीच माहिती दिनांक 10 ऑक्टोबर,2012 रोजी मालवण येथील सहायक मत्स्यव्यवसाय अधिकाऱ्यांना दूरध्वनीद्वारे देऊनही त्यांनी त्याकडे केलेले दुर्लक्ष, कोकण किनाऱ्यावर परराज्यातील पर्ससीन ट्रॉलर्स तसेच बहुराष्ट्रीय कंपन्या कायदे धाब्यावर बसवून पर्ससीन जाळयाच्या मदतीने बेसुमार मच्छीमारी करित असल्याने मासळीच्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण होणे, त्यामुळे स्थानिक नाखवांना रिकाम्या हाताने परतावे लागणे, देशाला कोटयावधी रुपयाचे उत्पन्न मिळवून देणाऱ्या स्थानिक नाखवांचे अस्तित्वास धोका निर्माण होणे, पर्ससीन ट्रॉलर्सना अटकाव करण्यासाठी शासनाकडे उपलब्ध असलेली मत्स्यव्यवसाय खात्याची गस्ती नौका बंद पडली असल्याने पर्ससीन ट्रॉलर्सवर कोणतेही नियंत्रण ठेवता न येणे, परिणामी स्थानिक मच्छीमारांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, त्यामुळे परराज्यातील पर्ससीन ट्रॉलर्सना सिंधुदुर्ग जिल्हयातील किनारपट्टीवर मज्जाव करण्यासाठी शासनामार्फत पर्यायी व्यवस्था करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव (मत्स्य व्यवसाय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, कोकणातील खास करून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मच्छीमारांच्या दृष्टीने ही लक्षवेधी सूचना फार महत्त्वाची आहे. 120 कि.मी.सागरी अंतरा करिता एक गस्ती नौका असल्याचे शासनाने मान्य केले आहे. सध्याची एक गस्ती नौका 120 कि.मी.साठी अपुरी पडत आहे त्यात अधिक भर घालून पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना शासन संरक्षण देणार आहे काय ? शासनाने दिनांक 10 डिसेंबर 1987 आणि 13 ऑक्टोबर 1999 रोजी शासन निर्णय काढून पर्ससीन नेटवर बंदी आणण्याचे ठरविले. दुर्दैवाने न्यायालयाने ते आदेश रद्द ठरविले. सन 2004 साली सरकारने एसएलपी दाखल केली आहे. गेल्या 7-8 वर्षामध्ये ती सुनावणीला आली नाही. त्याची सुनावणी तातडीने होण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञाची नियुक्ती शासन करणार आहे काय ? पर्ससीन नेटने मासेमारी केली जाते तेव्हा मत्स्यबीज आणि मत्स्यखाद्याचा बिमोड केला जातो. आज मत्स्य संवर्धन करण्याची नितांत आवश्यकता आहे. तेव्हा शासन पर्सीसन नेटवर कायमची बंदी घालण्याचा विचार करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारले आहेत. त्यांनी एक गस्ती नौका ऐवजी आणखी गस्ती नौका वाढविता येतील काय असा प्रश्न विचारला आहे. 15 जून ते 15 ऑगस्ट पर्यंत मत्स्य विभागाकडे अशा प्रकारची गस्ती नौका नव्हती. त्यामुळे परराज्यातील बोटी आपल्या येथे येऊन मासेमारी करून जायच्या. त्यांना पकडण्याची सोय नव्हती म्हणून गेल्या वर्षी सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्याकरिता मासेमारी बंदीच्या कालावधीकरिता बोटी घेण्याची तरतूद केलेली आहे. तसेच ठाणे व मुंबईसाठी देखील 4 गस्ती नौका घेण्यासाठी तरतूद केली आहे.

दुसरा प्रश्न पर्सीसन नेट संबंधातील आहे. पर्ससीन नेट बाबत आपण कोर्टात हरलो आहे. स्थानिक छोटे छोटे मच्छीमार आहेत त्यांच्या व्यवसायावर, पोटापाण्यावर घाला येता कामा नये अशा प्रकारचे शासनाचे धोरण आहे. ज्यावेळी शासनाने जी.आर.काढला तेव्हा पर्ससीन नेटच्या बाजूने असलेली मंडळी कोर्टात गेली. त्यावेळी कोर्टाने सांगितले की, अशा प्रकारचा तुमचा कायदा अस्तित्त्वात नाही. त्यामुळे अशा प्रकारची बंदी तुम्हाला लागू करता येणार नाही. तो निकाल शासनाच्या विरोधात गेला म्हणून शासन सर्वोच्च न्यायालयामध्ये गेले आहे. दरम्यानच्या काळात फिशरीज विभागाचे संचालक श्री.सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून या समितीने अहवाल देखील दिला आहे. त्यांनी 18 प्रकारच्या चांगल्या सूचना केल्या आहेत. ह्या सूचना छोट्या छोट्या मच्छीमारांना न्याय देणाऱ्या अशा आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

पर्ससीन नेटवर कायमची बंदी घालता येईल काय, असा त्यांचा तिसरा प्रश्न होता. 468 पर्सीसीन नेटला आपण परवानगी दिलेली आहे. तूर्त या संबंधातील परवानगी देणे बंद केले आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, समितीने शिफारस केल्याप्रमाणे कायद्यामध्ये सुधारणा केव्हा करण्यात येणार आहे ? या संबंधातील केस सर्वोच्च न्यायालयात आहे. विधिमंडळाला कायदा दुरुस्त करता येतो. तेव्हा शासन कायद्यामध्ये दुरुस्ती केव्हा करणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या संदर्भातील कायद्याचा मसुदा तयार झालेला आहे. लवकरात लवकर हा कायदा अस्तित्वात आणत आहोत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा विषय अनेकदा लक्षवेधी सूचना आणि अन्य प्रश्नांच्या माध्यमातून चर्चिला गेला आहे. या ठिकाणी सांगण्यात आले की, परराज्यातून ट्रॉलर येऊन मासेमारी करतात. माझा प्रश्न आहे की, आतापर्यंत परराज्यातील किती ट्रॉलरवर कारवाई केलेली आहे ? या संदर्भातील कायदा आणल्याशिवाय आपणास सर्वोच्च न्यायालयात देखील जाता येणार नाही. तेव्हा हा कायदा पुढील अधिवेशनापूर्वी आणणार काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण जोपर्यंत गस्ती नौका ठेवल्या नव्हत्या तोपर्यंत परराज्यातून मोठ्या प्रमाणावर होड्या येत होत्या. परराज्यातून येणाऱ्या होड्या हा लक्षवेधीचा विषय नसला तरी पर्ससीन संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. तरी सुध्दा परराज्यातून येणाऱ्या होड्यांचे प्रमाण अत्यंत कमी झालेले आहे. गेल्या वर्षी परराज्यातून फक्त पाच होड्या आल्या आणि त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. या संदर्भात कायदा अस्तित्वात नसला तरी आपण पर्ससीनला बंदी केलेली आहे. तहसीलदार त्या संदर्भात दंडाची कारवाई करतात. ती फिशरीज विभागाने आकारावी. मी देखील कोकणातील आहे. या संदर्भातील कायदा अस्तित्वात आला नसला तरी त्या संदर्भात कारवाई कठोर केल्यामुळे या गोष्टीस पूर्णपणे आळा बसलेला आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :ठाणे शहराच्या पश्चिमकेडील भागातील यशस्वीनगर ते मुंबई विद्यापीठाच्या उप केंद्रापर्यंतच्या रस्त्याचे काम प्रलंबित असणे

**मु. शी.** :ठाणे शहराच्या पश्चिमकेडील भागातील यशस्वीनगर ते मुंबई विद्यापीठाच्या उप केंद्रापर्यंतच्या रस्त्याचे काम प्रलंबित असणे या संबंधी श्री निरंजन डावखरे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे शहराचा झपाट्याने विकास होत असून पश्चिमेकडील बाळकुम या परिसरात मोठ्या प्रमाणात रहिवासी संकुले तयार झाली असून तेथे जवळपास चार हजाराहून अधिक कुटुंब स्थायिक होणे, या परिसरातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असणे, त्यातच सदर परिसरातच मुंबई विद्यापीठाचे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या सोयीच्या दृष्टीने उपयुक्त असणारे उपकेंद्र विकसित करण्याचे काम सुरु असणे, त्यामुळे सदर परिसरातील आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी या परिसरातील जनतेला व विद्यापीठात येणाऱ्या विद्यार्थ्यांना वाहतूक,दळणवळणासाठी उपयुक्त ठरणारा यशस्वीनगर ते मुंबई विद्यापीठाच्या उप केंद्रापर्यंतचा विकास आराखड्यातील 20 मीटरचा रस्ता मागील 6 वर्षांपासून अपूर्णावस्थेत असणे, तो तातडीने विकसित करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. भास्कर जाधव ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, ठाणे शहराचा झपाट्याने विकास होत आहे. ठाणे शहराच्या पश्चिमेकडील बाजूस घोडबंदर येथे झपाट्याने नागरीकरण वाढत आहे. त्या ठिकाणी मुंबई विद्यापीठाचे एक सबसेंटर झालेले आहे. डहाणू, पालघर या भागातील विद्यार्थ्यांना कलिना येथे किंवा चर्चगेट येथील मुंबई विद्यापीठात जाणे गैरसोयीचे होते म्हणून ठाणे येथे सब-सेंटर करण्यात आले आहे. तेथील 20 कि.मी. रस्त्याचे काम मागील सहा वर्षापासून प्रलंबित आहे. ठाणे महानगरपालिकेने त्या संदर्भातील निधी वर्ग केल्यानंतरही ते काम अद्याप झालेले नाही.

सभापती महोदय, या संदर्भात शासनाने समाधानकारक उत्तर दिलेले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, "उर्वरित रस्त्याच्या भागाकरिता प्रशासनामार्फत संबंधित जमीन मालकांशी सन 2008 मध्ये रस्त्याचे क्षेत्र संपादित करण्याच्या अनुषंगाने पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. तथापि,संबधित जमीन मालकांनी त्या बाबत सहकार्य केलेले नाही." गेली सहा वर्षे हा प्रश्न प्रलंबित आहे. तेव्हा माझा प्रश्न आहे की, या संदर्भात ताबडतोब कार्यवाही होईल काय ? मला अशी माहिती मिळाली की, त्या जमीन मालकाने शासनाला ॲक्सेस मिळू नये म्हणून काल रात्रीपासून तेथे कंपाऊंड वॉल बांधण्यास सुरुवात केलेली आहे. तेव्हा जमीन मालक शासनापेक्षा मोठा आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची काम करण्याची आणि कामाचा पाठपुरावा करण्याची पध्दत चांगली आहे. या प्रश्नाच्या संदर्भात त्यांनी मला नकाशासह संपूर्ण माहिती दिली. विभागाकडून जमीन मालकाशी संपर्क साधण्यात आला तेव्हा त्यांनी सांगितले होते की, कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण न करता जागा हस्तांतरीत करण्यात येईल. परंतु सन्माननीय सदस्यांनी अधिकची माहिती देताना सांगितले की, शासनाला जमीन मिळू नये म्हणून त्यांनी कंपाऊड वॉल बांधण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी सन्माननीय सदस्यांना आश्वासित करु इच्छितो की, जमीन मालकाने अशाप्रकारे अडथळा आणण्याचा प्रयत्न केला असेल तर त्या संदर्भातील माहिती तत्काळ घेण्यात येईल आणि कायद्यातील तरतुदीचा वापर करुन अडथळा दूर करण्यात येईल. एका बाजूला समन्वयाची भूमिका घ्यायची तर दुसऱ्या बाजूला अडथळा आणण्याचा प्रयत्न करायचा असे जर होत असेल तर त्या जागेचे शासकीय कायद्याप्रमाणे भूसंपादन करण्याची कार्यवाही तत्काळ सुरु करण्यात येईल.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :ठाणे् येथील मॉडेला वुलन मिलच्या जागेवर स्मशानभूमीसाठी आरक्षण ठेवणे

**मु. शी.** : ठाणे येथील मॉडेला वुलन मिलच्या जागेवर स्मशानभूमीसाठी आरक्षण ठेवणे या संबंधी श्रीमती अलका देसाई,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती अलका देसाई ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" मॉडेला वुलनमिल, ठाणे ही अनेक वर्षाची कंपनी बंद करुन या कंपनीची जमीन खाजगी विकासकांना विकण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर,2012 रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, या जागेवर निवासी व व्यापारी गाळे विक्रीसाठी बांधण्यात येत असल्याचे आढळून येणे, ठाणे शहराच्या लोकसंख्येचा विस्तार पाहता एवढया मोठ्या जागेवर स्मशानभूमीचे आरक्षण नसणे, ठाणे शहरात दादोजी कोंडदेव स्टेडियमच्या जवळ स्मशानभूमी व वागळे इस्टेट येथे स्मशानभूमी असून या दोन्ही स्मशानभूमी दूरवर असल्याकारणाने ठाणे शहराच्या मॉडेला वुलनमिल व त्या परिसरातील नागरीकांना आपल्या प्रियजनांच्या अंत्यविधीस जाण्याकरीता फारच गैरसोयीचे होत असणे, सदरहू जागेवर स्मशानभूमीसाठी आरक्षण ठेवणेबाबत ठाणे महानगरपालिकेकडे नागरीकांची होत असलेली मागणी, याकडे महानगरपालिकेचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी ठाणे शहराच्या या परिसरात अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमी नसल्याने स्थानिकांत पसरलेले तीव्र चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, सबब ठाण्यातील लोकसंख्येचा वाढता विस्तार लक्षात घेऊन सदरहू जागेवर स्मशानभूमीचे आरक्षण घोषित करुन नागरीकांच्या सोयीसाठी स्मशानभूमी बांधण्याकरीता शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव ( नगर विकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, ठाणे येथील मॉडेल वुलन मिल ही अनेक वर्षापासून बंद असली तरी मालकाने किंवा अन्य कोणी तरी ती विकसित करण्यासाठी घेतली आहे. ठाणे शहर झपाट्याने वाढत आहे. तेव्हा आपण त्याठिकाणी बेसिक ॲमिनिटीज दिल्या नाहीत तर आपण येणाऱ्या काळाला कुठेतरी बाजूला ठेवतो आहोत असे मला वाटते. तेव्हा माझा प्रश्न आहे की, या जागेचा ले-आऊट मंजूर करताना तेथील रहिवाशांसाठी ज्या बेसिक ॲमेनिटीज आहेत त्यामध्ये गार्डन, प्ले-ग्राऊंड किंवा स्मशानभूमी इत्यादीची तरतूद केली आहे काय, नसल्यास, सेक्शन 37 (अे) नुसार शासन या ले-आऊटमध्ये अशाप्रकारच्या ॲमेनिटीज देण्याची तरतूद करणार आहे काय, तशी तरतूद झाली नसेल तर ती केव्हा करणार आहात ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपणा सर्वांना माहीत आहे की, हा इंडस्ट्रीअल पट्टा आहे. अशा भागामध्ये इतर भागांच्या तुलनेत कमी वस्ती असते. मला मान्य आहे की, ही कंपनी बऱ्याच वर्षापासून बंद होती. या कंपनी कडून ले-आऊटमध्ये एक छोटीशी चौकी वजा छोटेसे ऑफीस बांधण्यासाठी एक प्लान मंजुरीसाठी महानगरपालिकेमध्ये आला. त्यावेळी महानगरपालिकेने सांगितले की, एवढ्या मोठ्या 5.79 हेक्टर ले आऊटमध्ये आपणास केवळ चौकी बांधता येणार नाही. आपण संपूर्ण ले-आऊट प्लान सादर करावा. त्यानंतर त्यांनी एक प्लान सबमिट केला. शासनाने रेन्टल हाऊसिंग स्कीम जाहीर केलेली आहे. त्या रेन्टल हाऊसिंग स्कीम अंतर्गत महानगरपालिकेकडे त्यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे. त्यास अजून मंजुरी मिळालेली नाही. मंजुरी मिळण्याच्या मार्गावर आहे. त्याला एलवाय दिलेला आहे. त्या ठिकाणी ॲमिनिटीज देण्याबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले. आराखड्यास मंजुरी देताना डी.सी.रुल प्रमाणे काळजी घेतली जाईल. या ले-आऊटमध्ये पार्किंग किंवा स्मशानभूमी ठेवण्यात येईल काय असे त्यांनी विचारले. त्याबाबत सांगू इच्छितो की, तशी व्यवस्था याच ले-आऊटमध्ये ठेवता येईल असे सांगता येत नाही. परंतु सेक्टर 3 मध्ये हे ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी महानगरपालिका विचार करु शकेल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी पार्किंगचा उल्लेख केलेला नाही. मी प्लेग्राऊंड आणि गार्डन असा उल्लेख केलेला आहे. त्या ठिकाणी स्मशानभूमी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. तेव्हा त्या ठिकाणी स्मशान भूमी होईल काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सेक्टरमध्ये तसे करता येईल, परंतु या ले-आऊटमध्येच असे म्हणता येणार नाही.

-------

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे शहरात झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांच्या पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे

**मु. शी.** : पुणे शहरात झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांच्या पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे यासंबंधी श्रीमती दीप्ती चवधरी, सर्वश्री सुभाष चव्हाण, संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती दीप्ती चवधरी ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुणे शहरात ऑगस्ट, 2012 च्या सुमारास झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांच्या पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी तब्बल 30 कोटी रुपये उपलब्ध करुन दिल्याचे शासनाने घोषित करणे, मुंबईवर झालेला 26/11 चा दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर झालेला 13/7 च्या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर शहरातील गर्दीची ठिकाणे, महत्वाची कार्यालये, चौक, रेल्वे स्टेशन, बस स्थानकांच्या परिसरात सुरक्षा मजबूत करण्यासाठी लंडनच्या धर्तीवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे निर्माण करण्याची योजना आखण्यात येणे, स्वयंसेवी संस्थेनी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्तावही शासनास देणे, लंडन शहराच्या धर्तीवर शहरात सुमारे पाच ते सहा हजार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे उभारुन, त्यांच्या माध्यमातून दहशतवाद्यांवर लक्ष ठेवण्याची योजना गृह विभागाने आखणे, त्यासाठी गृहमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळही इंग्लडला जाऊन येणे, त्यानंतर शहरात टप्प्याटप्प्याने पाच हजार कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव गृह विभागाने तयार केल्यानंतर राज्य मंत्रिमंडळाने सुमारे 600 कोटी रुपये खर्चाच्या या प्रस्तावास आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीस दिनांक 19 ऑक्टोबर, 2010 रोजी बैठकीत मान्यताही देण्यात येणे, त्यानंतर सहा महिन्यांत म्हणजेच एप्रिल, 2011 पर्यंत सीसीटीव्ही कॅमेरे लागतील अशी घोषणा शासनाकडून करण्यात येणे, प्रत्यक्षात मात्र अजूनही ही योजना

..8..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी.....

कागदावरच रखडलेली असणे, मुंबई शहरात बॉम्बस्फोटांची पार्श्वभूमी लक्षात घेता मुंबईतील संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही लावण्याबाबतही शासनाने पुणे शहराप्रमाणे निधी उपलब्ध करुन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..9..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी : सभापती महोदय, पुणे शहरात ऑगस्ट 2012 मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्र्यांनी एक मिटींग घेतली. पुणे शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी लोकप्रतिनिधी 10 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. मनपाने 10 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. तसेच राज्य शासनाने 10 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. असे एकूण 30 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले असताना अजूनही पुणे शहरात सीसीटीव्हे कॅमेरे लागलेले नाहीत. निवेदनात नमूद केले आहे की, फेर निविदेमुळे ही कार्यवाही झालेली नाही. या संदर्भातील फेर निविदा काढलेली नाही. तेव्हा माझा प्रश्न आहे की, फेरनिविदेची प्रक्रिया केव्हा पूर्ण होणार आहे ? पुणे शहाराच्या सुरक्षिततेसाठी अधिकचा निधी उपलब्ध करुन पुणे शहरातील सर्व भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येतील काय ? मुंबईत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या संदर्भात सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केलेली आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी . . . .

. मुंबई आणि पुणे या दोन्ही शहरांचा निर्णय एकत्रितपणे घेणार आहात काय ?

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ दुपारी 1 वाजून 45 मिनिटांपर्यंत वाढविण्यात येत आहे. त्यामुळे सर्व लक्षवेधी सूचनांवरील चर्चा पूर्ण होईल. सन्माननीय सदस्यांनी काळजी करु नये.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की, मुंबई आणि पुण्याच्या बाबतीत एकत्रितपणे निर्णय घेणार आहात काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मुंबईच्या बाबतीत फेर निविदा काढण्यात आली आहे. पुण्याच्या बाबतीत निर्णय झाला होता त्यामध्ये रिक्वेस्ट फॉर प्रपोजल हे आपण 26 तारखेला उघडणार आहोत. ते उघडल्यानंतर मग पुढील टेंडरच्या संबंधातील प्रपोजल तयार करुन साधारण पणे तीन महिन्यामध्ये ही प्रोसीजर पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, अनेक शासकीय योजनांच्या ज्या निविदा आहेत, त्या रि-कॉल करण्याचा प्रसंग अनेक वेळा येत असतो. माझा एक साधा प्रश्न आहे की, यासाठी आपण कन्सलटंट कंपनी नेमली आहे. यामध्ये प्राईज वॉटर हाऊस कुपर्स् नावाची जी कन्सलटंट कंपनी आहे या कंपनीला मुळात अशा स्वरुपाच्या कामाचा अभ्यास करुन त्याबाबत कन्सल्टन्सी देण्याचा अनुभव आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्या कंपनीची नियुक्ती सुध्दा टेंडर काढून त्यांचा अनुभव लक्षात घेऊनच करण्यात आली होती. मात्र याठिकाणी फेर टेंडर एवढ्यासाठी काढले की, दोनच टेंडर आली होती. एका कंपनीचे टेंडर 824 कोटी रुपयांचे होते आणि दुसऱ्या कंपनीचे टेंडर 17 हजार कोटी रुपयांचे होते. इतका मोठा फरक किंमतीच्या बाबतीत होता. 824 कोटी रुपयाचे टेंडर ज्या कंपनीचे होते, त्या कंपनीची एक सहयोगी कंपनी होती तिला एम.टी.एन.एल. कंपनीने ब्लॅक लिस्ट केले होते. त्यामुळे चीफ सेक्रेटरीच्या अध्यक्षतेखाली जी समिती गठीत केली होती, त्यांच्यापुढे अडचणी होत्या की, जास्त किंमतीचे टेंडर स्वीकारावे तर एवढ्या किंमतीचे टेंडर का स्वीकारले अशी विचारणा झाली असती आणि कमी किंमतीचे स्विकारले असते तर ज्या कंपनीला ब्लॅक लिस्ट केले आहे त्यांचे टेंडर कसे स्वीकारावयाचे हा प्रश्न होता. याबाबतीत ॲडव्होकेट जनरल यांचा सल्ला घेण्यात आला होता. ॲडव्होकेट जनरल यांनी दिलेल्या सल्ल्या-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

प्रमाणे फेर टेंडरची प्रक्रिया सुरु केलेली आहे आणि ही प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये असून लवकरच ते फायनल केले जाईल.

**उप सभापती** : आता आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील 4 थ्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी मघाशी प्रश्न विचारण्यासाठी हात वर केला होता.

**उप सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये एकंदर 17 लक्षवेधी सूचना आहेत. त्यामुळे प्रत्येक लक्षवेधी सूचनेला न्याय मिळाला पाहिजे. सगळयांनी प्रत्येक लक्षवेधी सूचनेवर बोलावयाचे ठरविले तर एक देखील लक्षवेधी सूचना होणार नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे शहराच्या बाबतीत प्रश्न आहे.

**उप सभापती** : पुणे शहराच्या बाबतीत नाही तर आपण महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत बोलत आहोत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, प्रश्न विचारण्यासाठी हात वर केला तर तुम्ही परवानगी देत नाही.

**उप सभापती** : तुमची नेहमीच तक्रार असते हे बरोबर नाही. सभागृहामध्ये सर्वात जास्त तुम्ही बोलता.

-----

. . . .एस-3

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी. : बांद्रा, मुंबई येथील पेरी क्रॉस रोड येथील फ्लॅटमध्ये रहाणाऱ्या स्पेन येथील विदेशी महिलेवर झालेला बलात्कार

मु.शी. : बांद्रा, मुंबई येथील पेरी क्रॉस रोड येथील फ्लॅटमध्ये रहाणाऱ्या स्पेन येथील विदेशी महिलेवर झालेला बलात्कार यासंबंधी श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करते.

"बांद्रा, मुंबई येथील पेरी क्रॉस रोड येथे फ्लॅटमध्ये भाड्याने राहणाऱ्या स्पेन येथील विदेशी महिलेवर दिनांक 5 नोव्हेंबर 2012 रोजी मोहम्मद बादशाह मोहम्मद इस्माईल अन्सारी याने बलात्कार करणे, या महिलेच्या घरात चोरी करणे, अशा प्रकारचे गुन्हे त्याने बऱ्याच वेळा केलेले असूनही त्याला केवळ अटक होऊन तत्काळ जामीन मंजूर होणे, जामिनावर सुटलेल्या अशा आरोपीकडून समाज विघातक कृत्ये होत राहणे, स्त्रियांवर बलात्कार, चोरी, अत्याचार असे अनेक प्रकार या गुन्हेगारांकडून होत असणे, मात्र पोलिसांकडून अशा गुन्हेगारास प्रत्येक वेळी दुर्लक्षित करणे, परिणामी परिसरात निर्माण झालेले भीतीचे व दहशतीचे वातावरण, याबाबत शासनामार्फत सखोल चौकशी करुन सदर नराधमावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .एस-4

असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मला जे उत्तर मिळालेले आहे त्यानुसार आरोपीला न्यायालयाने सहा गुन्ह्यामध्ये दोषमुक्त केलेले आहे. तसेच त्याला एक वर्षाकरता तडीपार करण्यात आले होते. माझा प्रश्न असा आहे की, जो गुन्हेगार जामिनावर सुटतो त्याला पोलीस स्टेशनवर हजेरी लावण्यासाठी बोलविले जात नाही काय ? तसेच ज्या गुन्हेगाराला सात-सात वेळा जामीन मिळालेला आहे, दोन वेळा शिक्षा झाली आहे अशा गुन्हेगारांना पोलीस स्टेशनवर हजेरी लावण्यासाठी बोलविले जात नाही काय? यापुढे जर जामिनावर सुटलेल्या गुन्हेगाराने बलात्कारासारखा किंवा खुनासारखा गुन्हा केला तर त्याची जबाबदारी पोलीस स्टेशन किंवा न्यायालय घेणार आहे काय?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या गुन्ह्याच्या बाबतीतील सर्व रेकॉर्ड तपासल्यावर पोलिसांची चूक आहे असे मला वाटत नाही. पोलिसांनी सर्व कलमे लावून त्याच्यावर कोर्टामध्ये केसेस टाकलेल्या आहेत. या माणसाला वेगवेगळया 35 केसेसमध्ये अटक करण्यात आली मग त्याला कोर्टातून जामीन मिळाला. नंतर त्याला तडीपार केला आणि ती मुदत संपल्यानंतर पुन्हा मोक्का लागू शकत नव्हता. मोक्का लावण्यासाठी वेगळी कलमे लावावी लागतात. दोन चार्जशीट पेडींग असावी लागतात. तसेच मोक्काचे जे क्रायटेरिया आहेत त्यामध्ये ही केस बसत नव्हती. हद्दपारीमध्ये बसत होती. पोलिसांनी त्याला हद्दपार केले होते. त्याची कायमची मोडस ऑपरेंडी पाहिल्यानंतर त्या दिवशीसुध्दा तो घरफोडी करावयास गेला होता. पण एकटी महिला असल्याचे पाहून त्याने बलात्करासारखी गंभीर गुन्हा केला असून आता त्याला अटक केली आहे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, याठिकाणी माझे स्पेसिफीक प्रश्न आहेत. उत्तरामध्ये दोन वेळा त्याला हद्दपार करण्यात आल्याचा उल्लेख आहे. एकदा दिनांक 5-2-2007 मध्ये दोन वर्षासाठी म्हणजे तो 2009 पर्यंत हद्दपार होता. नंतर दुसऱ्या वेळी दिनांक 15-3-2011 रोजी हद्दपार केले याचा अर्थ तो दिनांक 15-3-2012 पर्यंत हद्दपार होता. जो आरोपी 35 केसेसमध्ये गुन्हेगार आहे, ज्या आरोपीला कन्व्हीक्शन सुध्दा झालेली आहे, ज्याला दोन वेळा हद्दपारी झाली आहे. अशा आरोपीला कायम स्वरुपात हद्दपार, तडीपार करण्याची प्रोव्हीजन शासनाकडे आहे काय? असल्यास त्याप्रमाणे केले आहे काय ? हा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा की, अशा प्रकारे गंभीर गुन्हे असलेला आरोपी बांद्रे पोलीस स्टेशनच्या परिसरामध्ये फिरत होता, त्यावेळी त्या परिसरातील अधिकाऱ्यांचे याकडे लक्ष का नव्हते? याचे माननीय गृहमंत्र्यांनी उत्तर द्यावे.

एस-5 . . .



असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अशा प्रकारे गुन्हेगारांना कायम स्वरुपामध्ये तडीपार करण्याचे अधिकार पोलिसांना नाहीत.आपल्या कायद्यामध्ये तशी तरतूद नाही. तसेच ज्योवळी त्याने गुन्हा केला तेव्हा त्याच्यावर त्या एरियाची तडीपारी नव्हती.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, वारंवार अनेक गुन्ह्यांमध्ये पोलीस आपले शौर्य दाखवून आरोपींना पकडत आहेत. मात्र अशा अनेक केसेसमध्ये आरोपी पकडले जात आहेत. त्याकरता पोलीस कष्ट करीत आहेत. मात्र ते नंतर जामिनावर सुटतात आणि बाहेर येऊन परत गुन्हे करतात. त्यामुळे ज्यांची अगोदरची क्रिमिनल हिस्ट्री आहे, अशा गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यासाठी आपण या कायद्यामध्ये काही सुधारणा करणार आहात काय?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही बाब विचाराधीन आहे आणि अशा गुन्हेगारांच्या बाबतीत पुढच्या अधिवेशनामध्ये वेगळा कायदा आणण्याचा आमचा विचार आहे.

-----

. . . .एस-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी.: जळगाव जिल्ह्यात तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात

जात पडताळणी कार्यालय सुरु करण्याची आवश्यकता

मु.शी.: जळगाव जिल्ह्यात तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जात पडताळणी कार्यालय सुरु करण्याची आवश्यकता याबाबत डॉ.अपूर्व हिरे वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.अपूर्व हिरे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग इ.प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारांना शिक्षण, नोकरी, निवडणूकांसाठी जातीचे प्रमाणपत्र पडताळणी करणे आवश्यक असणे, जळगांव जिल्ह्यात जात पडताळणीचे कार्यालय नसणे, त्यामुळे जळगाव जिल्ह्यातील लोकांना जात पडताळणीसाठी धुळे व नंदूरबार येथे जावे लागणे, त्यामुळे वेळेचा होणारा अपव्यय, आर्थिक नुकसान, घालावे लागणारे हेलपाटे व त्यामुळे होणारा मानसिक त्रास, परिणामी जात पडताळणीस विलंब होणे,जळगाव जिल्ह्यात जात पडताळणी कार्यालय व्हावे म्हणून सर्व पक्षीय शिष्टमंडळाने दिनांक 21 नोव्हेंबर 2012 रोजीचे निवेदनाव्दारे मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे केलेली मागणी, शासनाने जळगाव जिल्ह्यात तसेच राज्यात प्रत्येक जिल्ह्यात जात पडताळणी कार्यालय सुरु करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .एस-7



डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, याठिकाणी मी जळगाव जिल्ह्याच्या अनुषंगाने ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. याठिकाणी जात प्रमाणपत्र पडताळणीचे कार्यालय आहे.त्याबाबत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगावयाचे तर नंदूरबारमध्ये एस.टी. समाजातील लोकांसाठी कार्यालय आहे. तसेच ओबीसी, एन.टी.,एस.सी. यांची जर जातपडताळणी करावयाची असेल तर त्यासाठी त्यांना धुळे येथील कार्यालया मध्ये जावे लागते. जळगाव येथे रहाणाऱ्या माणसाला नंदूरबारला जावयाचे असेल तर ते अंतर 200 कि.मी.इतके आहे आणि धुळे येथे जावयाचे असेल तर ते अंतर 90 कि.मी.आहे आणि दोन्ही जिल्हे वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. माझा स्पेसिफीक असा प्रश्न आहे की, शासनाने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी ही सोय केली पाहिजे म्हणजे जळगाव येथे हे कार्यालय स्वतंत्ररीत्या सुरु करणार आहात काय? तसेच प्रत्येक जातीची पडताळणी करण्याची व्यवस्था त्या-त्या जिल्ह्याच्या ठिकाणी शासन करणार आहे काय?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, एस.टी.आणि इतर मागासवर्गीय यांच्यासाठी दोन सब कमिट्या आहेत. म्हणजे 45 टक्के समाजकल्याण विभागाकडे आणि 60 टक्के ट्रायबल विभागाकडे आहेत.आमच्याकडे 15 कमिट्या आहेत. पण मागील एक वर्षापासून आम्ही नवीन व्यवस्था केलेली आहे. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सर्व कलेक्टरांच्या अध्यक्षतेखाली वेगळ्या कमिट्या स्थापन केल्या आहेत. अशा प्रकारे 15 कमिट्यांकडे ही व्यवस्था केली आहे. तसेच माझ्या निवेदनामध्येही म्हटले आहे की, आता आम्ही नऊ जिल्हे प्रस्तावित केले असून त्या मध्ये सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे त्या जिल्ह्यांचा समावेश होईल.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही लवकरच नऊ जिल्ह्यामध्ये तसेच जळगाव येथे व्यवस्था करणार आहोत. ही व्यवस्था केव्हा करण्यात येणार आहे? तसेच दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, नोव्हेंबर अखेरपर्यंत 19 हजार 23 प्रकरणे प्रलंबित असून त्यापैकी 15 हजार 65 इतकी शैक्षणिक प्रकरणे प्रलंबित आहेत. जर 15 हजार 65 इतकी शैक्षणिक प्रकरणे प्रलंबित असतील तर विद्यार्थ्यांचे भविष्य कसे घडेल? यासाठी अधिकारी वर्ग वाढविला पाहिजे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे तर तीन महिन्याच्या आत स्टाफ वगैरे बाबत व्यवस्था करु. जेव्हा मुले अकरावीची परीक्षा पास होऊन`` बारावीची परीक्षा पास झाल्यानंतर मेडिकल, इंजिनिअरींग साठी जातात, तेव्हा आपण दोन वर्षे अगोदर हे काम करतो. त्यामुळे ही संख्या जास्त वाटते.

अग्रिम प्रत / ग्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अनुदानित महाविद्यालयातील व्यावसाायिक अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील विद्यार्थ्यांना फी सवलत न मिळणे

**मु. शी.** : अनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील विद्यार्थ्यांना फी सवलत न मिळणे यासंबंधी डॉ. रणजित पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. रणजित पाटील ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील विद्यार्थ्यांच्या पालकाची आर्थिक मर्यादा वाढविण्याबाबत शासन निर्णय दिनांक 16 मे, 2012 रोजी घेण्यात येणे, तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला येथील सन 2010-11 व 2011-12 करिता आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी सवलत मंजुरी बाबत निवेदन देवूनही अद्यापपर्यंत सवलत न मिळणे, यासंदर्भात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला यांनी दिनांक 10 ऑक्टोबर, 2012 रोजी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांना एका निवेदनाद्वारे मागणी करुनही त्या मागणीवर कोणत्याही स्वरुपाची अद्यापपर्यंत कार्यवाही न होणे, त्यामुळे आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये शासनाविषयी निर्माण झालेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना न्याय देण्याची आवश्यकता, व शासनाची यासंदर्भातील भूमिका."

डॉ. विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक शुल्कातील सवलतीबद्दलची ही लक्षवेधी सूचना आहे. शासनाने 2009 साली एक परिपत्रक काढून आर्थिकदृट्या दुर्बल घटकातील पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा 15 हजार रुपयांवरुन 1 लाख रुपयांपर्यंत वाढविली. 2009 साली हे परिपत्रक निघाल्यानंतर सर्व खात्यांनी त्या परिपत्रकावरुन आपापल्या खात्यात त्याची अंमलबजावणी केली. या सवलतीचा फायदा सर्व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळावयास पाहिजे होता. आपण वैद्यकीय शिक्षण खात्याच्या अनुदानित महाविद्यालयांना ही सवलत देत होतो. आज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी या सवलतीपासून वंचित राहण्याची कारणे काय आहेत ? वर्षभर मी स्वत: या गोष्टीचा पाठपुरावा केला. मी तीन वेळा सचिवांना भेटलो. मी मंत्री महोदयांची सुध्दा भेट घेतली. माझ्या असे लक्षात आले की, अमरावती विभागामध्ये लेखानुदान अधिकारी या कारणावर अडून बसले होते की, त्या परिपत्रकामध्ये वैद्यकीय शिक्षण आणि विशेषकरुन शासकीय वैद्यकीय शिक्षण हे शब्द अंतर्भूत नाहीत. म्हणून या विद्यार्थ्यांना गेली तीन वर्षे या सवलतीचा फायदा मिळाला नाही हे खरे आहे का ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, 16 मे, 2012 रोजी हा निर्णय घेतला. ज्या ज्या वेळी आपण शिक्षण शुल्काच्या संदर्भात आदेश काढत होतो त्यामध्ये उच्च व तंत्रशिक्षण आणि वैद्यकीय शिक्षण यांचे आदेश एकत्रितपणे निघत होते. पण 25 मे, 2012 रोजी जे आदेश काढले त्यामध्ये मेडिकल एज्युकेशनचा उल्लेख राहून गेला होता. उच्च शिक्षण विभागाने आदेश काढलेले आहेत. 2012-2013 पासून जी शैक्षणिक सवलत द्यावयाची आहे त्या संदर्भात आम्ही आदेश काढण्यास सांगितले आहे. 2012-2013 पासून त्यांना याचा लाभ मिळेल.

----

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

**औचित्याच्या मुद्याबाबत**

**उप सभापती** : पुढची लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्याच्या अगोदर मी माननीय मंत्रिमहोदयांना एक अत्यंत महत्वाची आणि गंभीर बाब सांगू इच्छितो. काल या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी औचित्याच्या मुद्याव्दारे असा मुद्दा उपस्थित केला होता की, मुंबईतील सी-लिंकच्या उजव्या बाजूला जवळपास 300 ते 400 झोपड्या म्हाडाच्या प्लॉटवर बांधण्याचे काम गेल्या दोन दिवसात फार जोरात चालू आहे. त्या झोपड्या ताबडतोब निष्कासित करण्याबाबत मी काल आदेश दिले होते. एवढेच नव्हे तर या अनधिकृत झोपड्या बांधल्याबद्दल संबंधित पोलीस स्टेशनकडून जे कोणी झोपड्या बांधत आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यास सांगितले होते. या संदर्भात मी आजच निवेदन करण्यास सांगितले आहे. आपल्याकडून म्हाडाला कळविण्यात यावे की, त्या झोपड्या आजच्या आज निष्कासित करण्यात याव्यात तसेच अनधिकृत बांधकाम केल्याबद्दल संबंधितांवर पोलीस कारवाई करण्याबाबत आदेश देणार का ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, संबंधितांवर कारवाई करण्यात येईलच पण जर आज झोपड्या निष्कासित करावयाच्या असतील तर आजच्या आज या कामासाठी आवश्यक असलेला बंदोबस्त दिला जाईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी या ठिकाणी सांगितले आहे. या बाबतीत आजच्या आज निवेदन करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, त्या ठिकाणी जे रहिवाशी आहेत त्यांच्यासाठी म्हाडाने वेगळे शेल्टर हाऊस बांधलेले आहेत आणि त्यांना तो हक्क दिलेला आहे. या दोन दिवसात जी काही डेव्हलपमेंट झालेली आहे ती अतिशय बेकायदेशीर आहे. अधिकारी आपल्याला असे काही सांगण्याची शक्यता आहे. आपण वेळीच या गोष्टीवर बंधन घातले नाही तर त्यातून वाईट संदेश जातो. म्हणून मी आपल्याला ही अधिकची माहिती दिलेली आहे.

**उप सभापती** : यामध्ये कोणाच्याही दबावाला बळी न पडता त्या ठिकाणचे लोकप्रतिनिधी असो किंवा कोणी अनधिकृत बांधकाम करणारा असो, जो जबाबदार असेल त्याला शासन झाले पाहिजे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

**पृ. शी.** : तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर ते शुक्रवार पेठ पाण्याच्या टाकीपर्यंतच्या रस्त्याच्या कामाकडे होत असलेले दुर्लक्ष

**मु. शी.** : तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर ते शुक्रवार पेठ पाण्याच्या टाकीपर्यंतच्या रस्त्याच्या कामाकडे होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील श्री तुळजाभवानी मंदिर ते शुक्रवार पेठ पाण्याच्या टाकीपर्यंत बारा मीटर रुंदीचा रस्ता करण्याच्या कामास मंजुरी देणे, सिटी सर्व्हे कार्यालयाच्या सर्व्हेनुसार हा रस्ता काही ठिकाणी 10 तर काही ठिकाणी 8 आणि काही ठिकाणी 11 तसेच काही ठिकाणी 12 मीटर रुंदीचा बनविण्यात येणे, रस्त्याच्या बांधकामासाठी घरांचे बांधकाम पाडताना कंत्राटदार काही घरमालकांची घरे वाचवित असल्याचे आढळून येणे, घरे पाडून सात आठ महिने झाले तरी रस्त्यांची कामे सुरु न होणे, याकडे नगरपालिका, महसूल तसेच तुळजाभवानी मंदिर प्राधिकरणाचे आणि पालकमंत्री यांचे होत असलेले दुर्लक्ष, रस्त्याचे बांधकाम बऱ्याच कालावधीपासून अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे स्थानिक नागरिकांना होत असलेला त्रास, प्रशासकीय मंजुरी प्रमाणे रस्त्याचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी लक्षवेधी क्रमांक 2 च्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे आता उत्तर आलेले आहे. मी पुन्हा तोच प्रश्न विचारतो. माननीय पालकमंत्र्यांनी याचा आढावा घेतला. तुळजापूर मंदिराजवळील रस्त्याचे रुंदीकरण झाल्याशिवाय तेथल्या भाविकांची कोंडी फुटणार नाही म्हणून शासनाने 360 कोटी रुपयांचा मोठा प्रस्ताव तयार केलेला आहे आणि हे काम होण्याच्या संदर्भामध्ये सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर माननीय पालकमंत्र्यांनी लक्ष घातले. त्यांच्या असे लक्षात आले की, या भागातील काम व्यवस्थित चालू नाही, आखणी केल्याप्रमाणे रस्त्याचे काम होत नाही. वर जी पाईपलाईन टाकावयाची आहे ते काम अव्यवस्थित झाले आहे. त्याची पाहणी केल्यानंतर प्राधिकरणाचे सदस्य श्री. व्यंकट कोळी आणि मुख्याधिकारी श्री. संतोष दिर्घे यांना कारणे दाखवा नोटीस दिली. त्या कारणे दाखवा नोटीसमध्ये काय काय म्हटले आहे ते माननीय मंत्री महोदयांनी उद्‌धृत करावे. त्यांनी 48 तासामध्ये खुलासा करावे असे सांगितले होते. त्यांना 48 तासामध्ये खुलासा करता आला नसेल तर त्यांच्यावर कोणता दोषारोप ठेवला आहे ? आम्ही या ठिकाणी प्रश्न विचारल्यानंतर संबंधितांची बदली करण्यात येईल असे सांगण्यात येते. हा प्रशासकीय व्यवस्थेचा भाग असल्यामुळे मी निलंबनाची मागणी करीत नाही. कारण या सदनामध्ये निलंबनाची घोषणा होते पण काही तथ्य नसल्यामुळे सहा महिन्यानंतर ते परत रिइन्स्टेट होतात. ते 75 टक्के पगार घेतात आणि उर्वरित रक्कम नंतर व्याजासह घेतात. माझी एवढीच विनंती आहे की, श्री. दिर्घे यांच्या बाबतीत दोष आढळून आला असेल तर त्यांची एक वेतनवाढ थांबविणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी नावामध्ये थोडी सुधारणा करतो. श्री. संतोष दिर्घे हे आताचे मुख्याधिकारी आहेत. पूर्वी जे मुख्याधिकारी होते आणि ज्यांच्यावर नोटीस बजावली होती त्यांचे नाव श्री. संतोष ढेंगळे असे आहे. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते बरोबर आहे की, त्या ठिकाणी माननीय पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. ती बैठक झाल्यानंतर त्या ठिकाणी जे काम आहे ते लोकांना त्रास होऊ नये म्हणून दसऱ्याच्या दरम्यान करुन घेण्याकरिता सांगण्यात आले होते. परंतु त्यानंतर त्या कामामध्ये झालेली अनियमिता, देखरेखीमध्ये झालेला हलगर्जीपणा, तेथील रस्त्यावर असलेले मातीचे ढिगारे, त्यामुळे लोकांना झालेला त्रास, या सर्व बाबींची गंभीर दखल घेऊन माननीय पालकमंत्र्यांनी तेथील उपविभागीय अधिकाऱ्यांना त्या संदर्भात चौकशी करुन नोटीस



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. भास्कर जाधव .....

देण्यास सांगितले होते. ती चौकशी पूर्ण झालेली आहे. परंतु सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्याची एक वेतनवाढ थांबवावी अशी मागणी केलेली आहे. आता त्याची बदली झालेली आहे. निश्चितपणे ही बाब सुध्दा तपासून घेऊन योग्य ती कारवाई केली जाईल.

----

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूर शहरातील नारायणा विद्यालयाच्या स्कूल बसचे ब्रेक फेल झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला निर्माण झालेला धोका

**मु. शी.** : नागपूर शहरातील नारायणा विद्यालयाच्या स्कूल बसचे ब्रेक फेल झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला निर्माण झालेला धोका यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभाताई फडणवीस ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते

"नागपूर शहरातील "नारायणा विद्यालय" नागपूर येथील सीबीएससी विद्यालयाची स्कूल बस दिनांक 13 डिसेंबर, 2012 रोजी लक्ष्मीनगर येथील माटे चौकात आल्यानंतर त्यात विद्यार्थी बसणे, बस सुरू झाल्यानंतर त्या गाडीचे ब्रेक फेल होणे, चालत्या गाडीतून वर्ग 5 ते 10 वर्गातील मुलांना धोका पत्करुन उतरविले जाणे, त्यामुळे पुढे विद्यार्थ्यांच्या जीवाला असलेला धोका टळणे, त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना सोडायला आलेल्या पालकांनी व विद्यार्थ्यांनी आरडाओरड करुन व प्रतापनगर पोलीस स्टेशनला फोन करुन बस जप्त करणे, त्याचबरोबर आर.टी.ओ.ने बस नादुरुस्ती असल्याबाबत पत्र देणे, यापूर्वी पालकांनी शाळा कमिटीकडे बसेसची तक्रार करुनही त्यात सुधारणा न होणे, या शाळेच्या पाचही बसेस या भंगार झालेल्या असणे, नागपूर शहरात वाढत असलेले विद्यार्थी बसेसचे अपघात, मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश काढून स्कूल बसेसच्या बाबत मार्गदर्शक सूचना देऊनही बसेसमध्ये सुधारणा न होणे, यात न्यायालयाच्या आदेशाचा भंग होणे, पालकांमध्ये व जनतेमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने नागपूर शहरातील व राज्यातील सर्व स्कूल बसेसची संपूर्ण चौकशी करण्याची आवश्यकता, शासनाने करावयाची उपाययोजना."

श्री. गुलाबराव देवकर ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...8...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. या अगोदर सुध्दा या गाड्यांच्या बाबतीत तक्रार झालेली आहे. या शाळेच्या बसमध्ये त्या कॉन्ट्रॅक्टरने ज्याला कलर ब्लाईंड म्हणतो असा ड्रायव्हर ठेवला होता. त्या ड्रायव्हरला रंग लाल आहे की हिरवा हे सुध्दा कळत नव्हते. लाल रंगाचा सिग्नल आहे की हिरव्या रंगाचा आहे हे तो मुलांना विचारत असे. पालकांनी तक्रार केल्यानंतर त्यांनी तो ड्रायव्हर बदलला. या संदर्भात सुप्रीम कोर्टाने नियम केलेले आहेत. स्कूल बसेस कशा असाव्यात याबाबत कडक नियम केलेले आहेत. त्या बसला तीन दरवाजे असले पाहिजेत, आरसे असले पाहिजेत, मदतनीस असला पाहिजे आणि त्या मुलांना सहजगत्या उतरता येईल अशा पायऱ्या असल्या पाहिजेत आणि या बसेस तपासल्या गेल्या पाहिजेत. समित्या तयार केल्या परंतु एकाही समितीची बैठक झालेली नाही. उत्तरामध्ये सुध्दा असे म्हटले आहे की, ज्या 357 शाळा आहेत त्यापैकी फक्त 70 शाळांनी समित्या केलेल्या आहेत. या ठिकाणी जी मुले शाळेमध्ये जातात त्या मुलांचा जीव धोक्यात आणावयाचा का ?

13 तारखेला जी घटना घडली त्या बसमध्ये 40 मुले होती. ही पाचवी ते दहावीची मुले होती. त्या गाडीचा एकही ब्रेक लागत नव्हता. लाकडी खुंटे घालून त्यांनी ते ब्रेक लावून मुलांना चालत्या बसमधून उतरविले. अशा प्रकारे मुलांचा जीव धोक्यात घालावयाचा का ? हा मुलांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. कोणीही पालक आपल्या मुलाला शाळेत मरण्यासाठी पाठवत नाही. या ठिकाणी ज्या गाड्या जप्त करण्यात आल्या त्यांच्यावर खटला दाखल करण्याऐवजी त्यांच्याशी तडजोड केली. यामध्ये तडजोड कशी काय होऊ  शकते ? या ठिकाणी 17 ऑक्टोबरला हिंदुस्थान गाडीचा मालक मयत झाला. बस 17 डिसेंबरला पकडली. आता त्यांच्याकडून तडजोड शुल्क स्वीकारले आणि गाडी सोडून दिली. तडजोड शुल्क स्वीकारुन पैसे कमविण्यासाठी परिवहन मंडळ आणि आरटीओ आहे का ? गाड्या नादुरुस्त आहेत म्हणून त्यांनी तडजोड शुल्क स्वीकारावयाचे आणि पुन्हा गाडी त्यांच्या ताब्यात द्यावयाची आणि सात दिवसात गाडी दुरुस्त करा असे म्हणावयाचे हे योग्य नाही. त्या गाडीची कंडीशन अतिशय खराब आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

सभापती महोदय, माझी विनंती आहे की, या 5 गाडया जप्त करण्यात याव्यात आणि त्याबाबतीत संपूर्ण चौकशी करुन त्यांच्याकडून कोणतेही शुल्क न स्वीकारता त्या गाड्यांचे परवाने रद्द करावेत. दुसरे असे की, महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: नागपूरमध्ये जेवढ्या स्कूल बसेस आहेत त्या स्कूल बसेस नसून कंत्राटदाराच्या बसेस स्कूल बसेस म्हणून वापरलेल्या आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, एक अभियान राबवून या सर्व स्कूलबसची तपासणी केली जाईल काय ? तसेच रिजेक्टेड गाड्या स्क्रॅपमध्ये काढून त्यांचे परवाने रद्द केले जातील काय ?

श्री. गुलाबराव देवकर : 13 तारखेला जो अपघात झाला त्यावेळी संबंधित अधिका-यांनी तेथे जाऊन तपासणी केली त्यावेळी त्यामध्ये फॉल्ट सापडलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे संबंधित अधिका-याने तडजोड न करता कायदेशीर कारवाई करावयास पाहजे होती. म्हणून संबंधित अधिका-याची चौकशी करुन नियमानुसार त्याच्यावर कारवाई करण्यात येईल. संबंधित बसचा परवाना कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल. याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याप्रमाणे सर्व स्कूलबसची तपासणी केली जाईल आणि यंत्रणा राबवून या बाबतीत कडक धोरण अवलंबिले जाईल, कायद्याची कडक अंमलबजावणी केली जाईल.

**उप सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना एक गोष्ट सांगू इच्छितो की, आरटीओचे जे दलाल बाहेर असतात ती मंडळी आरटीओच्या खोट्या सह्या करुन लायसन्स देतात. माझ्याकडे एक तक्रार आल्यानंतर मी संबंधित ट्रेनिंग स्कूलवर पुराव्यासकट गुन्हा दाखल करण्यास सांगितले. पण ठाण्याच्या आरटीओने त्याबाबतीत कारवाई केली नाही. ठाण्यातील आरटीओ हा स्वत:ला शासनापेक्षा वरचा समजतो काय ? त्याच्यावर तुम्ही गुन्हा दाखल कराल याबद्दल मला शंका नाही कारण मी हे सभागृहामध्ये सांगितलेले आहे. आरटीओने त्याच्यावर अद्यापपर्यन्त गुन्हा दाखल केला नाही म्हणून आरटीओवर आपण काय कारवाई करणार आहात ?

श्री. गुलाबराव देवकर : आपल्या सूचनेचा सन्मान ठेवून निश्चितपणे संबंधित आरटीओवर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : मी लक्षवेधी सूचनेवर बोलत नाही. आरटीओच्या खोट्या सह्या होतात असे आपण सांगितले. परंतु या विधान भवनामध्ये दाऊदचा जो पास दिला त्याबद्दल आम्हाला समजले पाहिजे. वर्तमानपत्रामध्ये यासंबंधीचे वृत्त प्रसिध्द झालेले आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : त्या प्रकरणाच्या बाबतीत मी आपणास माझी माहिती सांगतो. तो पास उचलून नेण्यात आला. यामध्ये प्रशासनाची कोणतीही जबाबदारी नाही. ज्या कोणी त्या पासावर फोटो चिकटविला आणि वर्तमानपत्रात प्रसिध्द केला त्याची चौकशी झाली पाहिजे आणि दोषी माणसाला शासन झाले पाहिजे या मताशी मी सहमत आहे.

श्री. प्रवीण पोटे : या अपघातासंबंधी मी आरटीओशी बोललो. आरटीओ पोलिसावर जबाबदारी ढकलत आहे आणि पोलीस आरटीओवर जबाबदारी ढकलत आहे. विद्यार्थ्यांसाठी वापरण्यात येणा-या स्कूलबसच्या बाबतीत शासनाने नियमावली केलेली आहे हे खरे आहे काय, असल्यास जे कोणी नियमाचे पालन करीत नसतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल काय, ज्या स्कूलबसेस कंडम झालेल्या आहेत त्यांचे परवाने रद्द केले जातील काय ? ज्या शासकीय शाळा आहेत त्या शाळांसाठी शासन स्कूलबसेस देईल काय ? या अपघातामध्ये 6 मुलांचा मृत्यू झ ालेला आहे. त्यापैकी कोणी डॉक्टर व्हावा कोणी इंजिनिअर व्हावा अशी त्यांच्या आईवडिलांची अपेक्षा होती. त्या मुलांच्या मोबदल्यामध्ये प्रत्येक पालकाला 10 लाख रु. नुकसान भरपाई देण्यात येईल काय ?

श्री. गुलाबराव देवकर : स्कूलबसच्या संदर्भात राज्य सरकारने आणि शिक्षण विभागाने एक धोरण तयार केलेले आहे. स्कूलबस कशी असली पाहिजे, तिला मागच्या बाजूने दरवाजा असला पाहिजे, सहाय्यक असला पाहिजे अशा 15 ते 20 सूचना धोरणामध्ये टाकलेल्या आहेत आणि त्याप्रमाणे स्कूलबस चालली पाहिजे असे कडक धोरण आणि नियंत्रण आपण ठेवलेले आहे. स्कूलबसची बारकाईने तपासणी करण्यात येत असते. ब-याचशा बसेसच्या बाबतीत कारवाई केलेली आहे, दंड वसूल केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे ज्या अतिशय खराब बसेस असतील त्या ताबडतोबीने बंद करण्यात येतील.

श्री. प्रवीण पोटे : मी मोबदल्या संबंधी प्रश्न विचारलेला आहे..

**उप सभापती** : मोबदल्या संबंधी सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.

---

...3..



MSS/ D/ KTG/ 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अकोट (जिल्हा अकोला) शहरातील भोईपुरा येथे शारदा देवी मूर्तीची समाजकंटकांनी केलेली विटंबना

**मु. शी.** : अकोट (जिल्हा अकोला) शहरातील भोईपुरा येथे शारदा देवी मूर्तीची समाजकंटकांनी केलेली विटंबना यासंबंधी श्री .दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अकोट (जिल्हा अकोला) शहरात दिनांक १९ ऑक्टोबर, २०१२ रोजी शहरातील भोईपुरा येथील नवनिर्माण शारदा उत्सव मंडळातील शारदा देवी मूर्तीची अल्पसंख्याक समाजातील काही समाजकंटकांनी विटंबना केल्याने तणावग्रस्त वातावरण निर्माण होणे, अतिसंवेदनशील अशा अकोट शहरात अशी घटना होऊनसुध्दा ठाणेदार भास्कर तवर यांनी शांतता समिती सभा न घेणे, दुर्गा देवी विसर्जन मिरवणूकीमध्ये पोलिस बंदोबस्तात हलगर्जीपणा करणे, त्यामुळे दंगल झाल्याची घटना उघडकीस येणे, शहरात संचारबंदी लागू असताना दंगलखोरांनी संचारबंदीला न जुमानता समोर दिसेल त्याला लक्ष्य करणे, दुर्गा देवीच्या विटंबनेनंतर अकोटचे लोकप्रतिनिधी यांनी १९ ऑक्टोबर, २०१२ रोजी शांततेच्या मार्गाने ठिय्या आंदोलन केले असले तरीही त्यांच्यावर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल करणे, त्यामुळे शहरातील नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोषाची व भीतीची भावना, दंगलीमध्ये ज्या लोकांचे कांही घेणे-देणे नाही अशा गरीब लोकांना जबाबदार धरुन त्यांच्याकडून अकोट पोलिसांमार्फत पैश्याची मागणी करण्यात येणे, जे लोक पैसे देण्यास तयार नाहीत त्यांची नांवे दंगलीसारख्या गुन्ह्यामध्ये अडकवित असणे, याप्रकरणी लोकप्रतिनिधीवर देखील गुन्हे दाखल करण्यात येणे, सदर गुन्हे तत्काळ मागे घेण्याबाबत राजकीय पक्षाच्या पदाधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्याकडून होत असलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सत्याचा विपर्यास कसा केला जातो याचे शासनाने वितरित केलेले निवेदन हे एक उदाहरण आहे. अकोटमध्ये प्रत्येक वेळी हिंदूंच्याच सणाला दंगल होते हे सत्य आहे. देवीवर दोन लहान मुले थुंकली. त्यांना पोलिसांनी पकडून आणले. आमदारांनी आग्रह धरला की, ज्यांनी त्या लहान मुलांना थुंकण्यास सांगितले त्यांना अटक करा. लहान मुलांना अटक करुन सुधारगृहामध्ये पाठवितो असे पोलिसांनी सांगितल्यानंतर आमदार म्हणाले की, त्यामध्ये मुलांचा दोष नाही. परंतु त्या मुलांना ज्यांनी थुंकण्यास सांगितले त्यांना अटक करा. हे सांगण्यासाठी आमदार मोटार सायकलवरुन तेथे गेले होते. तेथे जमाव जमला होता, हे बरोबर आहे. परंतु आमदारांनी तेथे जमाव नेला अशा प्रकारचे जे निवेदन दिलेले आहे ते असत्य आहे. जनतेला स्वत:चा स्वाभिमान नाही काय ? तेथे असलेल्या एसपीना 17 महिने झालेले आहेत. मी त्यांना पाहिलेले नाही. त्यांच्या 17 महिन्याच्या काळामध्ये 28 दंगली झाल्या आणि त्यापैकी ही एक दंगल आहे. ज्याच्या कार्यकाळात 28 दंगली होतात अशा एसपीच्या सांगण्यावरुन शासनाने जे उत्तर आम्हाला दिलेले आहे ते आम्ही कितपत मानायचे ? ते प्रकरण मिटविले म्हणून सांगितले. पोलिसांनी एफआयआरमध्ये मान्य केलेले आहे की, 12.00 वा. तक्रार आल्यानंतर 12.40 वा. पोलीस तेथे गेले आणि त्यांनी प्रकरण मिटवले. देवीची पूजा केली आणि दोन समाजातील तेढ मिटली. अशी घटना घडलेली असताना देखील निवेदनामध्ये ते नाकारलेले आहे. निवेदनामध्ये अफवा उठवली असा उल्लेख केलेला आहे. या सदनामध्ये जेव्हा अशा प्रकारचे निवेदन दिले जाते त्यावेळी पोलिसांचे मनोबल खच्ची होते आणि कुणाच्या पाठीशी उभे रहायचे ही खात्याची वृत्ती देखील दिसून येते. म्हणून मी या बाबतीत निषेध नोंदवितो.

सभापती महोदय, मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, आता गणेशोत्सव असो की दुर्गामातेची मिरवणूक असो त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त असतो. पोलिसांच्या उपस्थितीत दगडफेक झाली आणि त्या दगडफेकीत देवीचा हात तुटला. असे असताना निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, रामटेक हनुमान मंदिर या मंडळाच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या मंडळाच्या अल्पसंख्याक वस्तीतून दगड मारला असे सांगून मिरवणूक रस्त्यात थांबवली. त्या दगडफेकीमध्ये देवीचा हात तुटलेला होता. दगडफेक त्या वस्तीतून झाली होती. आपणाकडे सर्व नोंदी आहेत. जणूकाही काही घडलेच नसताना काही घडल्याचा आविर्भाव लोकांनी निर्माण केला असे जे असत्य

..5..



श्री. दिवाकर रावते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन केले ते निषेधार्ह आहे. मागच्या वेळी 19 नोव्हेंबरला दंगल झाली होती. मी सर्व दंगलीच्या वेळी तेथील परिस्थिती सांभाळण्याकरिता गेलो होतो.

सभापती महोदय, 12 जुलैला दंगल झाली त्यावेळी घरे जाळण्यात आली. त्यावेळी एक हजार रुपये अनुदान देण्यात आले. त्यावेळी हिंदूची घरे मोठ्या प्रमाणावर जळाली होती. दुस-या वेळी काही हिंदूंची आणि मोठया प्रमाणावर मुस्लिमांची घरे जळाली. त्यावेळी घरे बांधून देण्याचे आश्वासन दिले. हा दुजाभाव का निर्माण केला जात आहे ? यामुळे दंगली घडत आहेत. हे शासन कुणाला संरक्षण देत आहे काय ? कायदा सर्वांसाठी सारखा असेल तर सर्वांना एकेक हजार द्यावयास पाहिजे होते. पहिल्या दंगलीच्या वेळी एक हजार रु. दिले आणि नंतर घरे बांधून देत आहात.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 13:30

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, ही अत्यंत गभीर घटना आहे. पोलिसांनी स्थानिक आमदारांना घराच्या बाहेर पडू दिले नाही. त्या ठिकाणी कर्फ्यू लावला होता. मला देखील तेथे जाण्यास बंदी घालण्यात आली. त्यामुळे मी तेथे जाऊ शकलो नाही. दंगली संदर्भात सर्व आरोप त्यांच्यावर लावले आहेत ते योग्य वाटतात काय ? ही दंगल हिंदू लोकांनीच घडवून आणली अशा प्रकारचे शासनातर्फे निवेदन दिले आहे ते निषेधार्ह आहे. मला या गृह विभागास प्रश्न विचारण्याची देखील इच्छा नाही. मुस्लीम समाजातील काही तरुणांनी कळ काढली, त्यांनी देवीचा हात तोडला, ते लोक देवीवर थुंकले. त्यांच्या बाजूने निवेदन या ठिकाणी शासनाकडून आणले गेले आहे. जसे काही हिंदू लोक दोषी आहेत अशा प्रकारचा दोषारोप येथे निर्माण करता आहात. ही बाब अत्यंत निषेधार्ह आहे. शासनाच्या या निवेदनावर मला कोणताही प्रश्न विचारावयाचा नाही. मी शासनाच्या मुस्लीम प्रवृत्तीचा निषेध करुन सभात्याग करतो.

( सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते सभात्याग करतात.)

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, शासनातर्फे जे निवेदन करण्यात आले आहे त्या निवेदनात वस्तुनिष्ठ माहिती सदनासमोर ठेवली आहे. दंगलग्रस्त अकोट शहरात कर्फ्यू लावण्यात आला असताना स्थानिक आमदारांना बाहेर सोडण्याचा किंवा फिरायला देण्याचा प्रश्नच नव्हता. तेथे प्रतिबंधात्मक कलमे लावल्याचे घोषित केलेले असताना स्थानिक आमदार त्या कलमांचे उल्लंघन करुन तेथे गेले. या दंगली कोण घडवित आहे? स्पॉटवर सापडलेली माणसे, जाळपोळ करणारी माणसे पोलिसांनी पकडलेली आहे. तेथे कोणत्याही प्रकारचा दुजाभाव केला गेलेला नाही. पण या दंगलीतील खरे सूत्रधार कोण आहेत हे शोधण्यासाठी काही तज्ज्ञ व वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविले जाणार आहे. एकाच जिल्हयामध्ये वारंवार दंगली होत आहेत. दंगल घडविण्यामागचे खरे सूत्रधार कोण आहेत याचा शोध घेण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

महोदय,सन्माननीय सदस्यांनी एक प्रश्न उपस्थित केला त्या बाबतीत सांगू इच्छितो की, दंगलीमध्ये नुकसान कोणाचे होते हे पाहून मदत केली जात नाही तर ज्या वेळी जी धोरणे असतील त्याप्रमाणे मदत दिली जाते. यासंदर्भात शासनाचे नवीन धोरण आलेले आहे, त्यामध्ये सर्वांना सारखीच मदत दिलेली आहे. सरकारने अधिक मदत देण्याचे धोरण ठरविले तर अधिक

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

मदत मिळू शकते. मागच्या वेळी दंगलीमध्ये हिंदुचे नुकसान झाले होते, त्यांना मागच्या धोरणापेक्षा कमी मदत मिळाली असेल तर त्या काळातील धोरण तपासून बघू. त्यावेळच्या धोरणापेक्षा कमी मदत दिली गेली असेल तर अधिक मदत दिली जाईल. मदत देण्याच्या बाबतीत शासनाने दुजाभाव केलेला नाही आणि करणारही नाही.

---

**लक्षवेधी सूचना क्र.12 पुढे ढकलण्याबाबत**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे व इतर सदस्यांनी केलेल्या विनंती नुसार लक्षवेधी सूचना क्रमांक 12 पुढे ढकलण्यात आली आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 13 चर्चेला घेण्यात येईल.

-----

3...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मेहतर वाल्मिकी समाजासाठी नेमलेल्या पागे व लाड समितीच्याशिफारशींची अंमलबजावणी न होणे.

मु.शी.: मेहतर वाल्मिकी समाजासाठी नेमलेल्या पागे व लाड समितीच्या शिफारशीची अंमलबजावणी न होणे या संबंधी श्री.मोहन जोशी,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मेहतर वाल्मिकी समाजाला शासनाने मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पागे समिती, लाड समिती, मलकाना समिती, बर्वे समिती, राज्य आयोग यांची निर्मिती करुन शासनाचे धोरण निश्चित करणे, पागे / लाड समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय निर्गमीत केले असणे, परंतु प्रशासन प्रमुखांकडून तांत्रिक मुद्दे उपस्थित करुन या समाजाच्या तरुणांना, नोकरी, उद्योगधंदे, व्यवसायामधील योजनांपासून वंचित ठेवून त्यांचा हक्क डावलला जात असणे, कामगारांचे वारस ठेकेदारी पध्दतीमुळे बेरोजगार झाल्याने हालाखीच्या परिस्थितीमध्ये व्यसनाधीन होवून बळी पडणे, तसेच पुनर्वसन योजनेतील मालकी हक्काची घरे कामगारांच्या नावावर करण्याच्या शासनाच्या धोरणाची अद्याप अंमलबजावणी करण्यात आलेली नसणे, शासनाच्या सेवेत असणाऱ्या या समाजाच्या सफाई कामगारास त्याच्या शिक्षणाप्रमाणे शिपाई, जमादार, नाईक, कारकुन अशा पदावर पदोन्नती दिलेली नसणे, सरळसेवा भरती प्रक्रियेत निवड समितीवर या समाजाचा एकही प्रतिनिधी नसल्यामुळे अनुसूचित जातीत असूनही हा समाज अधिकच मागास होत असणे, उद्योग व्यवसायाकरिता अद्यापपर्यंत या समाजाच्या एकाही व्यक्तीला व्यावसायिक गाळा दिलेला नसणे, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५(४) व १६(४) नुसार मेहतर वाल्मिकी समाजास "दलितात पददलित" घोषित करुन त्यांना १३ टक्के आरक्षणामधील त्यांचा वाटा देण्यात यावा व त्यांच्यासाठी भरतीचे नियम शिथिल करणे, पागे / लाड समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे वारंवार शासन निर्णय देण्यात येवूनही त्याची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर

४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी...

ॲट्रॉसीटी ॲक्टनुसार कार्यवाही आणि खातेनिहाय चौकशी करण्याची होत असलेली मागणी, समाजकल्याण आयुक्त, पुणे यांनी सार्वजनिक आरोग्य, उच्च व तंत्र शिक्षण आणि वैद्यकीय शिक्षण सचिवांनी यासंदर्भात माहे मे, २०१२ मध्ये कळवूनही शासनाने काहीच कार्यवाही केलेली नसणे, तसेच ससून, औध सामान्य, उरो औंध, रुग्णालय, पुणे यांच्या प्रशासनिक अधिकाऱ्यांनी सामाजकल्याण आयुक्तांचा यासंदर्भात माहे मार्च, २०१२ च्या आदेशाला दाखवलेली केराची टोपली, मनोरुग्णालय, पुणे, पुणे विद्यापीठ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, पुणे मनपा पाटबंधारे विभाग, पुणे, राज्य कामगार विमा योजना कार्यालय, पुणे इत्यादींना सन २०१२ मध्ये आयुक्तांनी कळवूनही अंमलबजावणी केलेली नसणे, याची अंमलबजावणी करण्याची होत असलेली मागणी व या मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष आणि याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तसेच उपाययोजना."

श्री. शिवाजीराव मोधे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, 36 वर्षापूर्वी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये मेहत्तर वाल्मिकी समाजाला न्याय देण्यासाठी पागे समिती आणि लाड समिती निर्माण करण्याबाबतचा ठराव पास झालेला होता. परंतु अजून पर्यंत या समाजाला शासनाच्या माध्यमातून न्याय मिळावयास पाहिजे होता. तो मिळालेला नाही. या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक झाली. सन्माननीय उप मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक झाली. मुख्य सचिवांनी या संदर्भात अनेक आदेश पारित केले. तरी सुध्दा शासनाकडून या संदर्भात ठोस कार्यवाही का होत नाही या हेतूने ही लक्षवेधी सूचना मी सभागृहात उपस्थित केलेली आहे. राज्यातील सफाई कामासाठी ठेकेदारी पध्दत कायमची बंद करण्याबाबतचा निर्णय घेऊन शासन त्या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करील काय, सन 1993 पासून रोजंदारीवर काम करणाऱ्या आणि कायम झालेल्या कर्मचाऱ्यांना लाड समितीच्या शिफारशी नुसार वारसा हक्काचा लाभ देणार काय, अनुसूचित जातीच्या हाऊसिंग सोसायटीने महाराष्ट्र राज्य हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन कडून जे कर्ज घेतलेले होते, त्या सोसायटीने सदर कर्ज फेडलेले नाही ते कर्ज शासन माफ करणार काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. अनुसूचित जातीमध्ये अतिशय मागासलेला वर्ग म्हणजे मेहतर समाज आहे. श्री.लाड आणि श्री.पागे समित्यांनी वेगवेगळे निर्णय दिलेले आहेत. त्याची अंमलबजावणी करण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. एका वर्षापूर्वी माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली होती. सध्या जमाना आऊट सोर्सींगचा आहे. आऊट सोर्सींगमुळे नोकऱ्या जाण्याची दाट शक्यता आहे. ती प्रक्रिया वेगळया विभागाने केली होती. मला सांगण्यास आनंद होतो आहे की, जी पदे मंजूर आहेत, ती पदे रद्द करु नयेत अशा प्रकारचे माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट आदेश दिलेले आहेत. त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी विभागाकडून होत आहे. माननीय मुख्य सचिवांनी दिनांक 21 ऑक्टोबर,2011 रोजी एक परिपत्रक काढलेले आहे. आकृतीबंधामध्ये स्थायी वा अस्थायी पदांमुळे कोणत्याही सफाई कामगाराच्या वारसा हक्काच्या नियुक्ती बाबत अडचण निर्माण होणार नाही. तसेच सफाई कामगाराच्या बाबतीत तो निवृत्त असो किंवा मृत झालेला असो, ते रिक्त पद वारसालाच मिळाले पाहिजे अशा प्रकारचे माननीय मुख्य सचिवांनी आदेश दिलेले आहेत. अनुसूचित जातीच्या सोसायटीने घेतलेल्या कर्जाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, आठ दिवसापूर्वी

6...

मंत्रिमंडळाच्या बैठकीत एक चांगला निर्णय झालेला आहे. महाराष्ट्र राज्य फायनान्स कॉर्पोरेशन मुंबई यांचे अनुसूचित जाती, विमुक्त व भटक्या जमाती यांच्याकडे 46 कोटी रुपये मुद्दल आणि व्याज थकीत होते. वन टाईम सेटलमेंटमध्ये 31 कोटी रुपयांची कर्जमाफी मंत्रिमंडळाने मान्य केली आहे ही बाब सांगण्यास मला खूप आनंद होत आहे.

---------

7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : जानापुरी,ता.लोहा,जि.नांदेड येथील अनुदानित आश्रमशाळेत विद्यार्थिनींचे होत असलेले लैंगिक शोषण

**मु. शी**. : जानापुरी,ता.लोहा,जि.नांदेड येथील अनुदानित आश्रमशाळेत विद्यार्थिनींचे होत असलेले लैंगिक शोषण यासंबंधी श्री.रामनाथ मोते ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"आदिवासी आश्रमशाळा जानापूरी, ता. लोहा, जि.नांदेड ही शासनमान्य अनुदानित आश्रमशाळा असून या शाळेच्या व्यवस्थापनाच्या विरोधात असंख्य तक्रारी असणे, धर्मादाय आयुक्तांकडे नोंदविण्यात आलेल्या कार्यकारी मंडळाऐवजी एकाच कुटुंबातील व्यक्ती संस्थेचा कारभार पाहत असणे, संस्थेचे तथाकथित सचिव, शासकीय सेवेत असणे, मुख्याध्यापकांचे पद जाणीवपूर्वक रिक्त ठेवणे, एकच व्यक्ती प्राथमिक विभागात शिक्षक व माध्यमिक विभागात मुख्याध्यापक दाखविणे, एकच व्यक्ती माध्यमिक शिक्षक असतांना प्राथमिक विभागात मुख्याध्यापक दाखविणे, प्रशिक्षण पूर्ण केलेले नसतांनाही प्रशिक्षित शिक्षक म्हणून पगार घेऊन शासनाची दिशाभूल करणे,कर्मचाऱ्यांच्या पगारातून दरमहा ५ टक्के खंडणी वसूल करणे, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा घरगुती कामासाठी उपयोग करणे, शिक्षकांना वेळेवर वेतन न देणे, शाळेत बोगस पट दाखविणे, विद्यार्थीनींचे लैंगिक शोषण करणे, प्रकल्प अधिकाऱ्यांनी चौकशी करुन अप्पर आयुक्तांना अहवाल सादर करणे, अप्पर आयुक्तांनी चौकशी करुन आयुक्त कार्यालयास अहवाल सादर करणे, तथापि संबंधितावर अद्यापही कोणतीही कारवाई न होणे, विद्यार्थीनींचे लैगिंक शोषण व शिक्षकांना त्रास देणाऱ्या संस्थाचालकांना तसेच शासनाची फसवणूक करणाऱ्या शिक्षकांना शासनाने पाठिशी घालणे, याबाबत सदर परिसरात प्रचंड असंतोष असणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

८...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

9...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. जानापुरी,ता.लोहा,जि.नांदेड येथील अनुदानित आश्रमशाळेत विद्यार्थिनींचे लैंगिक शोषण तसेच शिक्षकांचे होत असलेले शोषण यासंबंधीची आहे. सभापती महोदय, या आश्रमशाळेची खात्यामार्फत दिनांक 27.10.12012 रोजी चौकशी झाली आहे. त्या चौकशीचा अहवाल शासनाकडे आलेला आहे. या शाळेबाबत गंभीर तक्रारी आहेत, त्या तक्रारींची चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. जो अहवाल आलेला आहे त्या अहवालाच्या अनुषंगाने अधिक वाट न पाहता तातडीने मान्यता काढून घेऊन तेथील विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे समायोजन करण्यात येईल काय, या शाळेत 402 विद्यार्थी पटावर असताना फक्त 167 विद्यार्थी आढळून आले. जवळ जवळ 200 पेक्षा जास्त विद्यार्थी बोगस आहेत. शासनाची फसवणूक होत आहे. म्हणून संबंधितांविरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल काय, या शाळेत मुलींची संख्या मोठया प्रमाणात आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून विद्यार्थीनींचे शोषण केले जाते, ज्या गोष्टी सभागृहामध्ये सांगता येणार नाहीत अशा प्रकारचे वर्तन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून आमच्या विद्यार्थिनींच्या बाबतीत घडते आहे. या संदर्भातील सी.डी.आपल्या मार्फत शासनास देऊ इच्छितो. या प्रकरणी ताबडतोब चौकशी करुन त्या पदाधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल केले जातील काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाला "होय" असे उत्तर आहे. दुसऱ्या प्रश्नाला देखील "होय" असे उत्तर आहे.तिसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात तपासून कारवाई केली जाईल. तेथे कोणालाही संरक्षण दिले जाणार नाही. तपासणी अंती दोष आढळून आले तर संस्थेची मान्यता कायम स्वरुपी रद्द करण्यात येईल.

-------------------

10.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** :खाजगी लक्झरी बसेसना जास्त कर आकारुन देण्यात येत असलेले परमीट.

**मु. शी.** :खाजगी लक्झरी बसेसना जास्त कर आकारुन देण्यात येत असलेले परमीट यासंबंधी श्री.किरण पावसकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेला पर्याय म्हणून खाजगी लक्झरी बसेसना जास्त कर आकारुन परमिट देणे, तथापि काही व्यवसायिक कर व पासिंग आकार न भरता, वापरात नसलेल्या गाड्या प्रवासी वाहतुकीसाठी वापरत असणे, तसेच काही बसेस कमी आसनाचा कर भरुन जास्त आसने बसमध्ये अनधिकृतपणे बसवून शासनाचा कररुपी महसूल बुडवत असणे, निता ट्रव्हल्स कंपनीच्या बसेस सर्रासपणे या नियमाचे उल्लंघन करीत असणे, त्याचप्रमाणे मुंबई, पुणे या शहरात महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे फक्त वातानुकुलीत स्लिपर बसेसना परवाना असतांना वातानुकूलित नसलेल्या बसेस सर्रासपणे रजिस्टर करुन परवाना देण्यात येणे, याशिवाय महाराष्ट्रात आंध्र, कर्नाटक, राजस्थान,गोवा आदि राज्यातून येणाऱ्या बसेसना कमी कर जुन्याच पध्दतीने आकारण्यात येणे, परिणामी महाराष्ट्र शासनाचे होत असलेले नुकसान याबाबत सखोल चौकशी करुन परिवहन कार्यालयाच्या आदेशानुसारच बसेस चालविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.गुलाबराव देवकर ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

11...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी कोणत्या बसेसना किती चार्जेस आकारतो आहोत या विषयी उत्तरात संपूर्णपणे तक्ताच दिलेला आहे. प्रती आसन 5500,6500,7000 रुपये असा चार्ज लावला जात आहे. उत्तरामध्ये नमूद केले आहे की, महामंडळाच्या एकूण बसेस 17646 आहेत. खाजगी स्वरुपाच्या बसेस 36406 आहेत. 2011-12 मध्ये कर व दंड वसुलीची रक्कम दिलेली आहे. आपल्याच रेट कार्ड प्रमाणे शासनास डबल कर मिळाला असता. मी एका कंपनीचे उदाहरण त्यांना लेखी स्वरुपात दिलेले आहे. नीता ट्रॅव्हलच्या बाबतीत मार्च मध्ये मी एक पत्र परिवहन आयुक्तांना दिले आहे. त्या पत्रात बसेसचे क्रमांक मी नमूद केले आहेत. एकाच क्रमांकाची बस मुंबई येथून गुजरातला जाण्यासाठी निघते आणि त्याच क्रमांकाची बस गुजरात येथून मुंबईकडे येते. त्या बसची व्हीडीओ फिल्म माझ्याकडे आहे. नॉन यूज म्हणून बसेस दाखविल्या जातात आणि त्याच बसेस चालविल्या जातात. त्या बसेसचे क्रमांक मी सभागृहात देऊ इच्छितो. अशा एकूण 20 बसेस आहेत. शासनाकडून फक्त तीन बसेसवर कारवाई केली आहे. नीता ट्रॅव्हल्सच्या 100 बसेस आहेत. शासनाने दिलेल्या निवेदनात फक्त 25 बसेस दाखविल्या आहेत....

यानंतर श्री.भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-15...... श्री.किरण पावसकर......

मी बसेसचे क्रमांक देतो. मी दिनांक 20.4.12 रोजी परिवहन आयुक्तांना पत्र दिले असून 14.9.2011 रोजी मंत्री महोदयांना पत्र दिले आहे. त्यामध्ये बसेसचा क्रमांक नमूद केलेला आहे. एमएच-04-4282, 4283, 4273, 4274, 4272 असे एकूण 20 बसेसचे क्रमांक आहेत. 20 बसेस नॉन यूजच्या आहेत. एकुण वाहनांची संख्या जास्त आहे. महाराष्ट्रातील त्यांच्या वाहनांची संख्या विचारात घेतली आणि रेट कार्ड व कर याचा हिशोब केला तर 18 ऐवजी 36 कोटी रुपयांचे राज्य शासनाला उत्पन्न मिळाले पाहिजे. मी शासनाला पुरावे देऊनही नीता ट्रॅव्हल्स कंपनीवर कारवाई होत नाही. भरारी पथक वेगळया ठिकाणी भरारी घेत असेल तर दोषी अधिकाऱ्यांवर किंवा परिवहन आयुक्तांवर कारवाई करण्यात येईल काय?

श्री.गुलाबराव देवकर : होय. पुरावा म्हणून वाहन क्रमांकाची यादी दिल्यानंतर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. जो कोणी अधिकारी कुचराई करेल, दुर्लक्ष करेल त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

**उप सभापती** : मंत्री महोदय, माननीय सदस्यांनी बसेसचे क्रमांक दिलेले आहेत त्या संदर्भात एका आठवड्याच्या आत चौकशी करुन या सर्व बसेसची माहिती घ्यावी. त्यात तथ्य असेल तर त्या बसेस ताबडतोब जप्त करण्यात याव्यात आणि त्यांच्यावर अद्याप कारवाई न केल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

श्री.गुलाबराव देवकर : होय.

श्री.जयप्रकाश छाजेड : महामंडळाच्या बसेसपेक्षा खाजगी बसेसची संख्या वाढलेली आहे. या बसेस एस.टी.महामंडळाच्या कार्यक्षेत्राबाहेर म्हणजे एस.टी.स्टॅण्डबाहेर उभ्या केल्या जातात. परिणामी महामंडळाचे नुकसान होते. पूर्वी पोलीस आणि एस.टी.महामंडळाच्या अधिकाऱ्यांना अशा बसेसवर कारवाई करण्याचे अधिकार होते. ते अधिकार पुन्हा त्यांना देण्याचा सरकार विचार करेल काय?

श्री.गुलाबराव देवकर : तसे करता येईल.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/पूर्वी श्री.गिते 13:40

**पृ. शी.** : जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्हयात कोकम फळावर प्रक्रिया करणारे युनिट स्थापन करणे

**मु. शी.** : जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्हयात कोकम फळावर प्रक्रिया करणारे युनिट स्थापन करणे यासंबंधी श्री.विजय सावंत ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोकम फळाला आयुर्वेदिक उपचारांमध्ये अनन्यसाधारण महत्व असल्याचे लक्षात घेऊन स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेंतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून सावंतवाडी तालुक्यातील विलवडे व कुडाळ तालुक्यातील ओरोस येथील कोकम प्रोसेसिंग युनिटचे काम सध्या प्रगतीपथावर असल्याची बाब लक्षात घेता या दोन्ही युनिटसाठी मिळून १ कोटी ३५ लाख १३ हजार रुपये एवढ्या निधीची मागणी दुसऱ्या टप्प्यासाठी करण्यात आली असल्याचा व तशा प्रकारचा आराखडा केंद्र शासनाला सादर करण्यात आल्यानंतरही अद्याप याबाबत निधीची केवळ प्रतीक्षाच करावी लागणे, सदरहू निधीतून प्रोसेसिंग युनिट उभारण्याबरोबरच दोनशे प्रशिक्षणार्थ्यांना कोकम प्रक्रियेचे प्रशिक्षण देणे व उत्पादित मालासाठी विपणन सर्व्हे करणे अशी कामे होणार असल्याने व ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराचे साधन उपलब्ध होणार असल्याने राज्य शासनाने यासंदर्भात केंद्र शासनाशी पाठपुरावा करुन हा निधी केंद्राकडून तातडीने उपलब्ध करुन द्यावा अशी कोकणवासीयांची वाढती मागणी, त्यासंदर्भात शासनाने करावयाची आवश्यक ती कार्यवाही व याबाबतची प्रतिक्रिया."

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-16........

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, कोकणातील कोकम प्रकल्प कित्येक दिवस बंद होता. शासनाने अहवाल तयार करुन केंद्र सरकारला कळविल्यानुसार या प्रकल्पाला केंद्र सरकारकडून किती अनुदान मिळणार आहे? पाठपुरावा करण्यामध्ये विलंब लागला तर प्रकल्पाची किंमत वाढू शकते. कोकम हे फळ अतिशय उपयुक्त आहे. हे फळ दुर्लक्षित राहिल्यामुळे कोकणाचे खूप नुकसान होत आहे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, एकूण 2.98 कोटी रुपयांचा प्रकल्प असून केंद्र सरकारचा हिस्सा म्हणून 1.86 कोटी रुपये अनुदान मिळणार आहे. त्यापैकी 50 टक्के रक्कम मिळाली असून उर्वरित निधी प्राप्त करुन घेऊन प्रकल्प सुरु करण्याची शासनाची भूमिका राहील.

श्री.किरण पावसकर : हे युनिट सुरु करण्यासाठी दुसऱ्या हप्त्याची रक्कम रु.1,35,13,000 मिळण्याबाबत केंद्र सरकारकडे मागणी केली आहे. कोकम हे फळ तयार झाल्यानंतर अधिक काळ टिकत नाही. त्यावर प्रक्रिया करण्यासाठी येणारा खर्च इतर प्रांतातील खर्चाच्या तुलनेत अधिक आहे. शासन 10 टक्के सुध्दा प्रक्रिया करण्यासाठी अनुदान देत नाही. कोकमाचा उपयोग लिपस्टीक तयार करण्यासाठी होऊ शकतो. म्हणून विशेष बाब समजून कोकम प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पासाठी शासन आर्थिक सहाय्य देणार आहे काय?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, हा प्रकल्प क्षेत्रावर आधारित आहे. हा प्रकल्प सुरु झाल्यानंतर संपूर्ण कोकणासाठी निश्चितपणे धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

----------

**उप सभापती** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 2.00 वाजता सुरु होईल..

( सभागृहाची बैठक दुपारी 1.45 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**आदिवासी विकास विभागाच्या भ्रष्टाचाराबाबत**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, विरोधी पक्षाने नियम 260 अन्वये प्रस्ताव दिला होता तो मात्र आजच्या कार्यक्रमपत्रिकेत दिसत नाही. त्यामुळे हा प्रस्ताव घेतला जाणार आहे की, नाही याबाबत आपल्याकडून आम्हाला माहिती हवी आहे. नागपूरमध्ये अधिवेशन होत असून आदिवासी विभागाने खरेदी केलेल्या वस्तूंमध्ये 6 हजार कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे.

**उप सभापती** : कामकाज पत्रिका बघून मी आपल्याला माहिती देतो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:तोंडी उत्तरे

**राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांना दोन वेतनवाढी देण्याचा घेतलेला निर्णय**

**(१) * ३४३०० डॉ.रणजित पाटील , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.भगवान साळुंखे , डॉ.सुधीर तांबे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे , श्री.रामनाथ मोते , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.जयवंतराव जाधव , श्री.हेमंत टकले , श्री.सतीश चव्हाण , श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक २९९९१ ला दिनांक १३ जुलै, २०१२ नूसार दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांना दोन वेतनवाढी देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर सुमारे सहा वर्ष शिक्षकांना हा पुरस्कार दिला जात असतानाही अद्यापपर्यंत वेतनवाढ देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे २००६ पासून आजपर्यंत पुरस्कार प्राप्त शिक्षकांना वेतनवाढ मिळाली नसून ते वेतनवाढी पासून वंचित राहिले आहेत तसेच गत ३ वर्षापासून गुणवंत पुरस्कार प्राप्त शिक्षकांना अनुज्ञेय असलेल्या वेतनवाढी प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, शिक्षकांची अवहेलना त्वरित थांबवून वेतनवाढ देण्याची मागणी बृहन्मुंबई माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघटनेने मा.शालेय शिक्षणमंत्री, यांच्याकडे दिनांक ४ सप्टेंबर, २०१२ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(६) अद्यापपर्यंत वेतनवाढ देण्याबाबत निर्णय झाला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री.राजेंद्र दर्डा यांच्या करिता** : (१), (२), (३), (४), (५) व (६) सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेत आगावू वेतनवाढीची तरतूद नाही. तथापि राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन जादा वेतनवाढीचा दर निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,माननीय मंत्रीमहोदयांना उत्तरामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची नाही.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेत आगावू वेतनवाढीची तरतूद नाही." परंतु राज्य शासनाने सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर दोन वर्षे अशा प्रकारच्या वेतनवाढी शिक्षकांना दिलेल्या आहेत. दि. १४ ऑगस्ट, २०१० चे शासनाचे परिपत्रक माझ्याकडे असून त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांसाठी अशा दोन वेतनवाढी अनुज्ञेय आहेत." मानव विकास करण्याचे काम



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :३४३००...**

डॉ. रणजित पाटील....

शिक्षकांचे असते. "प्रगल्भ महाराष्ट्र" म्हणून आपले अनुकरण आजूबाजूच्या राज्याने करुन शिक्षकांना चांगल्या कामगिरीबद्दल वेतनवाढी दिलेल्या आहेत. आपल्या येथे सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर असे काय झाले ? शिक्षकांना अशा प्रकारच्या दोन वेतनवाढी दिल्यामुळे राज्य शासनाच्या तिजोरीवर फारसा काही आर्थिक बोजा पडतो असे मला वाटत नाही. पुरस्कार प्राप्त शिक्षकांची संख्या २५ ते ३० असते. राज्याने तयार केलेली यादी दोन अडीच हजारांची असते व जिल्हयाने शिफारस केलेली यादी ५-५० शिक्षकांची असते. शिक्षकांना अधिकच्या दोन वेतनवाढीचा भार शासनाच्या तिजोरीवर अधिकचा पडत नसेल तर आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांना प्रोत्साहनपर वेतनवाढ दिले जाणार आहे काय ? तसेच यासंदर्भात किती कालावधीत विचार करुन ही वेतनवाढ लागू केली जाणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शिक्षकांना अगावू वेतनवाढी लागू करण्याचे शासनाचे धोरण आहे. ज्या दिवशी पुरस्कार मिळाला आहे त्या दिवसापासून त्यांना वेतनवाढी लागू होतील. परंतु सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर शासनाने असे ठरवले आहे की, राज्याचे जे काही कर्मचारी, अधिकारी आहेत त्यांच्यासाठीही एक सर्वंकष धोरण निश्चित केले जाणार आहे. यामध्ये केवळ शिक्षकच नाही तर सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा समावेश राहणार आहे. यासंदर्भात धोरण निश्चित झाल्यानंतर ज्या शिक्षकांना ज्या दिवशी पुरस्कार मिळाला त्या दिवसापासून त्यांना वेतनवाढ अनुज्ञेय राहील व हा लाभ सर्वांना मिळेल.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मंत्री महोदयांनी योग्य उत्तर दिलेले नाही. २०१० मध्ये लातूर येथे शिक्षकांचा राज्य पुरस्कार सोहळा झाला होता त्या समारंभात माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट सांगितले होते की, "मी येथून गेल्यानंतर शिक्षकांना दोन वेतनवाढी देईन." मी आपल्याला सांगू इच्छितो की, लातूर जिल्हयातील काही शिक्षकांना दोन वेतनवाढी देण्यात आल्या होत्या परंतु त्या नंतर वसूल सुध्दा करुन घेण्यात आल्या. आपण शिक्षकांचा सन्मान करता की, अपमान करता. त्यामुळे आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन वेतनवाढी दिल्या जाणार आहेत काय ?

..४..

**ता.प्र.क्र. :३४३००...**

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सर्वांना दोन वेतनवाढी देण्याचे कबूल करण्यात आले आहे. यासंदर्भात प्लॅनिंग,फायनान्स तसेच जीएडीचे सर्व नियम वेतन आयोगाला लागू असतात. एकदा यासंदर्भात धोरण निश्चित झाले व त्याबाबत निर्णय झाल्यानंतर सर्वांना वेतनवाढी देण्यात येतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा शासनाच्या शैक्षणिक विषयाचा प्रश्न नाही. आदर्श शिक्षकांच्या कार्यक्रमात माननीय मुख्यमंत्री एकदम खूश झाले व त्यांना वाटले की, लाखो शिक्षकांमधून आदर्श पुरस्कार मिळवणारे १००-१२५ शिक्षक असतात त्यामुळे त्यांनी शिक्षकांना वेतनवाढ देण्यात येईल असे सांगितल्यामुळे ते शासनाचे धोरणच झाले आहे. सन २०१० मध्ये शिक्षकांना दोन वेतनवाढी दिल्या जातील असे माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते आता २०१३ साल येत आहे. मुख्यमंत्री म्हणतात ते धोरण नाही असे माननीय मंत्री महोदयांना म्हणावयाचे आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मुख्यमंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे डिक्लेअर सुध्दा करण्यात आलेले आहे. आता जो पुरस्कार सोहळा होईल त्याच्या अगोदर सर्व निर्णय घेतला जाईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये म्हटले आहे की, सहाव्या वेतन आयोगामध्ये अशा प्रकारच्या वेतनवाढी देण्याच्या तरतुदी नाहीत. सहाव्या वेतन आयोगात अशा प्रकारच्या वेतनवाढी देण्याची तरतूद आहे. सन्माननीय हकीम साहेबांचा अहवाल शासनाने स्वीकारला आहे. पूर्वी वेतनवाढ किंवा अगावू वेतनवाढ देण्याची पध्दत वेगळी होती. त्यावेळी विशिष्ट रकमेने वेतनवाढ दिली जात होती. परंतु आता मात्र ३ टक्क्याने वेतनवाढ मिळते. तसेच ज्या शिक्षकांचे किंवा कर्मचाऱ्यांचे काम चांगले असेल, अतिउत्कृष्ट असेल अशांना वेतनवाढ देय आहे. त्यामुळे ही वेतनवाढ पे बँड आणि ग्रेड पे नुसार ३ टक्क्याने मिळते परंतु ही वेतनवाढ ३ टक्के नाही तर ४ टक्क्याने द्यावी असे आयोगाने आपल्या अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे हकीम साहेबांच्या अहवालाची अंमलबजावणी करुन आपण शिक्षकांना वेतनवाढ देणार आहात काय ?

..५...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :३४३००...**

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, पुरस्काराा संदर्भात जे काही धोरण आहे ते निश्चित करावयाचे आहे. अगावू वेतनवाढ देण्याच्या संदर्भात जी टेक्निकल बाब आहे ती एक रकमी राहणार की, कशी राहणार याबाबत अद्याप धोरण ठरविण्यात आलेले नाही. धोरण ठरविल्यानंतर त्या प्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

यानंतर श्री. ओटवणेकर....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन**

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य व आपणा सर्वांचे सहकारी व ज्यांची उंची लहान व कीर्ति महान आहे असे झुंजार कामगार नेते व माझे मित्र श्री.किरण पावसकर यांचा आज वाढदिवस आहे. त्यांचे मी सभागृहाच्या वतीने अभिष्टचिंतन करतो.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांचे सभागृहाच्या वतीने अभिष्टचिंतन करतो. मी सन्माननीय सदस्य श्री.किरण पासकर यांना सांगू इच्छितो की, आपल्या वाढदिवसानिमित्त आपण सर्व सन्माननीय सदस्य व पत्रकारांना आज रात्री जेवण द्यावे.

श्री.किरण पावसकर : होय.

====



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे..

**राज्यातील शाळांमध्ये मराठी हिंदी ऐवजी संस्कृत विषय घेऊन दहावी उत्तीर्ण झालेल्या तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांची वेतनवाढ न करण्याच्या शासनाने घेतलेला निर्णय**

**(2) * 34199 श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , डॉ.रणजित पाटील** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील शाळांमध्ये मराठी हिंदी ऐवजी संस्कृत विषय घेऊन दहावी उत्तीर्ण झालेल्या तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांची वेतनवाढ न करण्याच्या शासनाने निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास या संदर्भातील शासन निर्णय तब्बल 25 वर्षापूर्वी झालेला असून त्याची अंमलबजावणी राज्यभरात सुरु केली आहे हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, संस्कृत विषय घेऊन दहावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांची वेतनवाढ रोखण्याचा निर्णया विरुध्द शिक्षक संघटना एकवटल्या आहेत हे हि खरे आहे काय,

(4) असल्यास, या निर्णयाचा शासन फेरविचार करणार आहे काय,

(5) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) व (2) मातृभाषा मराठी नसलेल्या कर्मचाऱ्यांना एतदर्थ मंडळाच्या मराठी व हिंदी परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे तसेच निम्नस्तर हिंदी परीक्षांतून सूट अनुज्ञेय नसल्यास एतदर्थ मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(3) नाही.

(4) व (5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, 40-50 वर्षापूर्वी दहावीला हिंदी आणि मराठी या विषयाला ऑप्शनल संस्कृत हा विषय घेऊन जे पास झालेले आहेत त्यांच्याबाबत अचानक निर्णय झालेला आहे. त्यांनी संस्कृत हा विषय घेऊन दहावीची परीक्षा पास केली असली तरी आता हिंदी किंवा मराठी हा विषय घेऊन पुन्हा दहावीची परीक्षा दिली पाहिजे. अन्यथा त्यांची वेतनवाढ रोखली जाईल. यासंबंधात मी जो प्रश्न विचारला होता त्यास उत्तर देण्यात आलेले नाही. मी पुन्हा हा प्रश्न विचारतो आहे की, ज्यांनी संस्कृत हा विषय घेतला होता त्यांनी पुन्हा मराठी किंवा हिंदी विषय घेऊन दहावीची परीक्षा दिली पाहिजे असा आदेश आपण काढला आहे काय ?

**उप सभापती** : ही अफलातून आयडिया कोणाच्या डोक्यातून आली ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34199....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, असा कुठल्याही प्रकारचा आदेश काढण्यात आलेला नाही. हे शासनाचे पूर्वी पासूनचे धोरण आहे. शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना शासकीय भाषेत कामकाज करता आले पाहिजे असे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे मराठी भाषा ही सगळ्यांना आली पाहिजे अशा प्रकारचे धोरण आहे. ज्या शासकीय कर्मचाऱ्याने आपले दहावी पर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमातून घेतले असेल त्यांना कोणतीही परीक्षा द्यावी लागत नाही. ज्यांनी दुसऱ्या माध्यमातून शिक्षण घेतले असेल पण दहावीसाठी उच्च मराठी हा विषय घेतला असेल तर त्यांना देखील परीक्षेची अट नाही. ज्यांचे शिक्षण इंग्रजी, हिंदी व अन्य माध्यमातून झाले असेल व त्यांनी दहावीला लोअर मराठी हा विषय घेतला असेल तर त्यांच्यासाठी चार वर्षाच्या आत मराठीच्या दोन परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. त्याच पद्धतीने हिंदीच्या दोन परीक्षा देणे अनिवार्य आहे. असे शासनाचे पूर्वी पासूनचे धोरण आहे.

......

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कायम विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळांमधून "कायम" हा शब्द काढून टाकून 100 टक्के अनुदान देण्याबाबत**

**(3) * 33388 श्री.वसंतराव खोटरे , डॉ.सुधीर तांबे , श्री.विक्रम काळे , श्री.एम.एम.शेख , प्रा.सुरेश नवले , श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.रामनाथ मोते , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे : तारांकित प्रश्न क्रमांक 29965 ला दिनांक 24 जुलै, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांप्रमाणे कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक विद्यालयाचा कायम शब्द काढून त्यांना 100 टक्के अनुदान देण्याबाबतचे एक निवेदन महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानित कृती समितीचे अध्यक्ष यांनी मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक 10 ऑक्टोबर, 2012 रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) हे खरे आहे.

(2) व (3) कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांचा "कायम" शब्द काढण्यात येणार नसल्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, कायम विना अनुदान तत्वावर 11 वी व 12 वी च्या तुकड्या दिल्या आहेत. सन 2000 पासून हे धोरण राबविण्यात आले. त्यामधील माध्यमिक पर्यंतचा कायम शब्द काढल्याबद्दल आम्ही धन्यवाद दिले. परंतु, अकरावी आणि बारावीचा कायम शब्द काढलेला नाही. आता तर नकारात्मक उत्तर दिलेले आहे की, कायम शब्द काढण्यात येणार नसल्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे. माझ्याकडे कोर्टाचा निर्णय आहे. मुंबई उच्च न्यायालयात याचिक क्रमांक 138/2003, दाखल केली व दिनांक 8 एप्रिल 2005 रोजी कायम विनाअनुदानावर मान्यता असा शब्द परवानगीपत्रात वापरल्यामुळे कधीच अनुदान देता येणार नाही असा त्यातून अर्थ काढणे बरोबर नाही. दुसरी याचिका क्रमांक 8738/2005 च्या निकाल पत्रात दिनांक 23 जुलै 2006 रोजी माननीय उच्च न्यायालयाने सर्व प्रयोजनासाठी कायम विना अनुदान तत्त्वावर या शब्दाचा अर्थ विना अनुदान तत्त्वावर असाच वाचला पाहिजे असा निकाल दिला आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33388....

श्री.वसंतराव खोटरे....

माझे असे म्हणणे आहे की, कोर्टाच्या आदेशानुसार शासन निर्णय घेणार आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, विना अनुदान तत्त्वावर जे शिक्षक आहेत त्यांचा 18 तारखेला मोर्चा आला होता. तो मोर्चा टी पॉईंटवर अडविण्यात आला. सर्व शिक्षक काल पर्यंत थंडीत कुडकुडत थांबले होते. आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांशी त्यांची भेट घालून दिली. या सर्व गोष्टी लक्षात घेता शासन सकारात्मक विचार करून कायम शब्द काढणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मोफत आणि सक्तीचे शिक्षण कायद्या प्रमाणे 6 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे. आज राज्यामध्ये 7016 उच्च माध्यमिक शाळा आहेत. त्यातील 3120 शाळा अनुदानित आहेत. शासनाने आता कॉन्शियस डिसिजन घेतला आहे की, ज्युनिअर कॉलेजेसना अनुदान द्यायचे नाही. त्यानुसार शासनाचा निर्णय झालेला आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, आताच मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे की, अनुदान न देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. केंद्र व राज्य शासनाचे मुलींना 12 वी पर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचे, आदिवासींना व मागासवर्गीयांना मोफत शिक्षण देण्याचे धोरण आहे. असे असताना मग त्या वर्गातील 70 टक्के मुलांची फी शासन देणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मोफत शिक्षण उच्च माध्यमिक शाळांमधून देण्यात येते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, डॉ.तांबे यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे. 70 टक्क्याहून अधिक विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणे अनिवार्य आहे. त्यांना शिष्यवृत्ती देणे अनिवार्य आहे. असे असताना पूर्णपणे अनुदान देण्याचे धोरण शासन का अवलंबित नाही ? नई तालिममध्ये म.गांधी म्हणत होते की, विद्यापीठा पर्यंतचे शिक्षण मोफत देणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. आपण जर गांधींना मानत असाल तर ते पूर्ण कराल काय ? असा माझा प्रश्न आहे. कारण मंत्रिमहोदयांनी आताच सांगितले की, 6 ते 14 वयोगटा नंतरच्या मुलांना मोफत शिक्षण देणार नाही. ही अत्यंत निषेधार्ह अशी घोषणा आहे.

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33388...

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शासनाची सध्याची आर्थिक परिस्थिती बघून अनुदान न देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा निराधार नाही. आम्हाला पण त्याबाबत सहानुभूती आहे. भविष्यामध्ये शासनाची परिस्थिती सुधारली तर याचा विचार करता येईल.

**उप सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना विचारू इच्छितो की, शासनाची परिस्थिती खराब आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शासनाची आर्थिक परिस्थिती खराब आहे.

**उप सभापती** : ठीक आहे.

.....

..7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महिला सुधारगृहांच्या वाढत्या समस्यांबाबत**

**(4) * 34084 श्री.विनायकराव मेटे , ॲड.आशिष शेलार , श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्रीमती अलका देसाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे , ॲड.जयदेव गायकवाड , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , ॲड.अनिल परब , डॉ.दीपक सावंत , श्रीमती शोभाताई फडणवीस , डॉ.निलम गोऱ्हे , श्री.दिवाकर रावते , श्री.नितीन गडकरी :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील अनधिकृत डान्स बार, ऑर्केस्ट्रा बार आणि मुंबईच्या रेड लाईट परिसरातून सुटका करण्यात आलेल्या तसेच पीटान्वये झालेल्या कारवाईनंतर न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे तरूणींचे पुनर्वसन करुन त्यांच्या आयुष्याला नवे वळण देण्यासाठी त्यांना सुधारगृहात ठेवण्यात येते, हे खरे आहे काय,

(2) मुंबईतील चेंबुर देवनार येथील नवजीवन महिला सुधारगृहात दिनांक 10 सप्टेंबर, 2012 रोजी 17 महिला व दिनांक 27 ऑक्टोबर, 2012 रोजी 35 महिला पळून गेल्याचे तसेच सदर सुधारगृहातील रेखा यमप्पा हिच्या रुग्णालयामध्ये मृत्यू झाला व निशा सिंग या बारबालेने गळफास लावून आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(3) तसेच सदर सुधारगृह दलालांच्या ताब्यात असल्याचे माहे सप्टेंबर, 2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(5) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने दलालांवर व दलालांना मदत करणाऱ्या सुधारगृहातील कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(6) तसेच पळून गेलेल्या मुलींच्या शोध घेण्याबाबत व अशा घटनांना अळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(7) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड** : (1) होय.

(2) होय.

तथापि, दि.10.9.2012 रोजी नवजीवन महिला वसतिगृहामधील 17 महिला पळून गेल्या, त्यापैकी 2 महिला संस्थेत परत दाखल झाल्या. तसेच दि.27.10.2012 रोजी 36 महिला पळून गेल्या, त्यापैकी 12 महिलांना पोलिसांनी संस्थेत परत दाखल केले आहे. रेखा यमप्पा ही महिला एच.आय.व्ही.पॉझिटिव्ह असल्याने तसेच अशक्तपणा व ताप यामुळे दि.30.12.2011 रोजी दुपारी 4.00 वा. च्या दरम्यान रूग्णालयात मृत्यु झाला आहे. निशा सिंग या प्रवेशितेस मा.न्यायालयाने स्थानबध्दतेचे आदेश दिल्याने नाराज होवून तिने दि.26.3.2012 रोजी आत्महत्या केली आहे.

(3) नाही.

(4) होय.

(5) कामामध्ये निष्काळजीपणा झाला असल्याचे चौकशीमध्ये आढळले असून, सदर प्रकरणाबाबत संस्थेचे तत्कालीन अधीक्षक यांची अन्यत्र बदली करण्यात आली असून, त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर, संस्थेच्या तत्कालीन प्रभारी दोन अधिक्षिका, एक कनिष्ठ काळजी वाहक, एक स्वयंपाकी, नवजीवन महिला वसतिगृह यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच संस्थेतील सर्व काळजी वाहक यांची इतरत्र बदली करण्यात आली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34084...

तसेच उप आयुक्त (महिला विकास), विभागीय उप आयुक्त, माजी प्रभारी तीन अधिक्षक व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांना कारणे दाखवा नोटीस बजाबण्यात आली आहे.

(6) याबाबत गोवंडी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आली आहे. अशा घटना घडू नयेत. याकरीता 5 खाजगी सुरक्षा रक्षक नेमण्यात आले आहेत. संस्थेतील रिक्त पदे भरण्यात आली आहेत. प्रवेशितांना आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. संस्थेमध्ये सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत. परराज्यातील तसेच परदेशातील महिलांची मायदेशी रवानगी करण्याबाबत पोलीसांच्या सहकार्याने आवश्यक कार्यवाही सुरू आहे.

(7) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे की, निशा सिंग या प्रवेशितेस माननीय न्यायालयाने स्थानबद्धतेचे आदेश दिल्याने नाराज होऊन तिने आत्महत्या केली आहे. यातील गंभीर विषय असा आहे की, या मुली परत परत पळून का जात आहेत, त्या मागचे कारण काय आहे हे त्यातून स्पष्ट होत नाही. यात अधिकारांचा कोणता निष्काळजीपणा झालेला आहे, मुली परत येऊन पळून का जात आहेत यासंबंधी मला स्पष्टीकरण पाहिजे आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्री.भारवि.. 14:20

ता.प्र.क्र. 34084....

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, या सभागृहाच्या सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली आहे आणि त्या समितीमध्ये सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे या देखील सदस्य आहेत. या समितीने मधल्या काळात त्या संस्थेला भेटी दिलेल्या आहेत. परंतु त्याचा अहवाल अजून प्राप्त झालेला नाही. क्राईम विभागाचे डी.सी.पी. श्री.पोटे यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी केस संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. त्या संदर्भात मला मिळालेल्या माहिती नुसार तिच्या बरोबर असलेल्यांना सोडण्याची ऑर्डर मिळाली होती. परंतु तिला सोडण्याची ऑर्डर मिळाली नव्हती. त्या ठिकाणी विविध समित्यांनी भेटी दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, आज सकाळी अशाच विषयावरील चर्चेला उत्तर देताना मी सांगितले होते की, त्याठिकाणी डीसीपीने भेट दिली. लोकलेखा समितीने भेटी दिली आहे. त्या शिवाय श्रीमती स्वाती चव्हाण यांनी दिलेल्या अहवालानुसार कार्यवाही करण्यास सुरुवात केलेली आहे. वेलकम गिफ्ट देण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. तेथील सर्व कर्मचाऱ्यांची पदे भरण्यात आलेली आहेत. त्या ठिकाणी समुपदेशकाचे पद भरलेले आहे, परंतु ते अजून रुजू झालेले नाहीत. या शिवाय स्नानगृह, प्रसाधन गृह , करमणुकीची साधने उपलब्ध करुन दिलेली आहेत. एनजीओंना ॲप्रोच केलेले आहे. व्यावसायिक प्रशिक्षण सुरु केलेले आहे. या प्रकरणामध्ये जे जे अधिकारी दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. निष्काळजीपणा केला म्हणून दोन जिल्हा पर्यवेक्षक अधिकारी, एक जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, एक कनिष्ठ काळजीवाहक तसेच स्वयंपाकी यांना निलंबित करण्यात आलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सकाळी या सदनामध्ये महिलांवर होणा-या अत्याचाराच्या संदर्भात चर्चा झाली. या ठिकाणी प्रश्न विचारण्यात आलेला आहे की, मुंबईतील अनधिकृत डान्स बार, ऑकेस्ट्रा बार आणि मुंबईच्या रेडलाईट परिसरातून सुटका करण्यात आलेल्या तसेच पीटान्वये झालेल्या कारवाईनंतर न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे तरुणींचे पुनर्वसन करुन त्यांच्या आयुष्याला नवे वळण देण्यासाठी त्यांना सुधारगृहात ठेवण्यात येते, हे खरे आहे काय ? या सर्व मुली अल्पवयीन नाहीत. या सर्व मुली परप्रांतातून आलेल्या आहेत. तेव्हा त्या त्या प्रांतातील मुलींना त्यांच्या घरी पाठवून द्यावे. त्या मुली सुधारगृहातून पळून जाऊ नयेत म्हणून





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 34084....

श्री.दिवाकर रावते....

आपण चार कर्मचा-यांची नियुक्ती करायची. त्या पळून गेल्या असतील तर त्यांना शोधून आणायचे हे सर्व कशासाठी ? तेव्हा माझा प्रश्न आहे की, त्या मुलींना त्यांच्या प्रांतात पाठवून देण्यात येईल काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विचारलेला प्रश्न अतिशय महत्वपूर्ण आहे. आपल्याकडे भारतातील 11 महिला आणि 1 बालक आहे. तर बांगला देशातील 56 महिला आणि दोन बालके आहेत. मध्यंतरीच्या काळात मी गृह विभाग आणि बांगला देशच्या कॉन्स्युलेटला बोलाविले होते. परंतु बांगला देशचे कॉन्स्युलेट दिल्ली येथे आहे. या मुलींना त्यांच्या घरी पाठवावयाचे असेल तर त्यांची होम इन्क्वायरी करावी लागते. ट्रॅव्हल परमीट यावे लागते. मध्यंतरी नऊ मुलींचे ट्रॅव्हल परमीट आल्यानंतर त्यांना त्यांच्या घरी पाठविण्यात आले आहे. आपण रेस्क्यू फाऊन्डेशनच्या माध्यमातून 13 मुलींच्या बाबतीत सांगितलेले आहे. बांगला देशातील मुली आपल्या देशात येतात हा अतिशय गंभीर विषय आहे. तेव्हा अशा मुलींचे फॉर्म भरणे, कॉन्स्युलेटला पाठविणे, कॉन्स्युलेटकडे त्यांच्या होमची इन्क्वायरी करुन त्यांच्या नावावर ट्रॅव्हल परमीट आणणे याच कामासाठी महिला व बाल कल्याण विभागाच्या आणि गृह विभागाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल.

श्री.विजय गिरकर : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, रेखा यमप्पा ही महिला एय.आय.व्ही पॉझीटीव्ह असल्याने तसेच अशक्तपणा व ताप आल्यामुळे तिचा रुग्णालयात मृत्यू झाला. माझा प्रश्न आहे की, ती महिला एच.आय.व्ही.ने बाधित होती आणि तिला ताप आला होता हे आपण कशाच्या आधारे सांगत आहात ? आपल्याकडे पोस्टमार्टेम रिपोर्ट आहे काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, पोस्टमार्टेम रिपोर्ट पटलावर ठेवण्यात येईल.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील विविध आरोग्य विमा कंपन्यांच्या माध्यमातून सरकारने प्रिमियमपोटी भरलेली कोट्यवधी रुपयांची रक्कम कंपन्यांनी हडप केल्याबाबत**

**(5) * 33729 श्री.मोहन जोशी , श्री.संजय दत्त , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे , श्री.जयवंतराव जाधव , श्री.हेमंत टकले , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.सतीश चव्हाण , श्री.अनिल भोसले , श्री.धनंजय मुंडे** : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राष्ट्रीय स्वास्थ विमा योजनेच्या माध्यमातून रुग्णांना उपचार मिळण्याऐवजी विमा कंपन्यांकडून सरकारच्या निधीची हप्त्याच्या माध्यमातून मोठ्याप्रमाणात लूट करणाचा उद्योग सुरू असल्याचे व त्यामुळे सुमारे 59 कोटी 27 लाख रुपयांचा दावा अदा न करता हा निधी या कंपन्यानी हडप केल्याचा आरोप मा. कामगारमंत्री यांनी माहे ऑगस्ट, 2012 मध्ये वा त्या दरम्यान केला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले व तद्नुसार शासनाची व गरीब नागरिकांची फसवणूक करणाऱ्या विमा कंपन्यांवर शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) तसेच गरीबांसाठी फायद्याची असलेली योजना प्रभावीपणे राबविण्यात येण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ** : (1) होय,

(2) व (3). दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना सन 2008 पासून राज्यात कामगार विभागामार्फत राबविण्यात येत आहे. राज्य मंत्री मंडळाच्या दि.21.4.2011 रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सदर योजना ज्या जिल्ह्यांत लागू होणार आहे, त्या जिल्ह्यांतील राज्यातील/केंद्राच्या इतर आरोग्य योजना बंद करण्याचाही निर्णय घेतला आहे. सार्वजनिक आरोग्य विभोगामार्फत सदर योजनेची अंमलबजावणी राज्यातील 8 जिल्ह्यात करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सदर जिल्ह्यातील राष्ट्रीय स्वास्थ्य विमा

..4..

ता.प्र.क्र.33729...

श्री.हसन मुश्रीफ....

योजना बंद करण्यात आली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या उपरोक्त निर्णयाप्रमाणे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजनेच्या उर्वरित जिल्ह्यातील अंमलबजावणीची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागाने हाती घेतली असल्याने राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना टप्प्या टप्प्याने बंद करण्याचे नियोजित आहे.

(4) या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर अंमलबजावणी व आढावा समितीची स्थापना करण्यात आली आहे. तसेच राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीचीही स्थापना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासकीय रुग्णालये नोंदणीकृत करुन खाजगी रुग्णालयांना स्पार्धात्मक वातावरण निर्माण होऊन लाभार्थ्यांना दर्जेदार सेवा उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाने या योजनेत सक्रीय सहभागी होण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, या देशातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना आरोग्य सेवेचा मोफत लाभ मिळावा यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या माध्यमातून राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना लागू करण्यात आली. ज्या विमा कंपन्या आहेत त्यामध्ये न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी, नॅशनल इन्शुरन्स कंपनी, टाटा एआयजी कंपनी, जनरल इन्शुरन्स कंपनी अशा विविध विमा कंपन्यांनी 59 कोटी 27 लाख रुपयांचे दावे अदा केले नाहीत हे शासनाने उत्तरामध्ये मान्य केलेले आहे. केवळ नफा मिळवण्यासाठी या कंपन्या या योजनेमध्ये सहभागी झालेल्या आहेत. त्व्हा या कंपन्याची सीबीआय मार्फत चौकशी करण्यासाठी राज्य शासन केंद्र सरकारकडे आग्रह धरणार काय ? या योजनेमध्ये केंद्र सरकारचा 75 टक्के वाटा आहे तर राज्य सरकारचा 25 टक्के वाटा आहे. या योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्याची आवश्यकता आहे. परंतु हा विषय कामगार विभागाकडे दिलेला आहे. खरे म्हणजे हा विषय सार्वजनिक आरोग्य विभागाकडे द्यावयास पाहिजे होता. तेव्हा ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरित करण्यात येईल काय ?

..5..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33729...

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, राष्ट्रीय स्वास्थ विमा योजनेसाठी केंद्र सरकारकडून 75 टक्के आणि राज्य सरकारकडून 25 टक्के हिस्सा देण्यात येतो. बीपीएल धारकाच्या पाच सदस्यांकरिता ही योजना आहे. त्यासाठी वर्षाला 30 हजार रुपये इतका प्रीमियम भरण्यात येतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ही योजना आरोग्य विभागाने राबवावयास पाहिजे होती. प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय यांनी या योजनमध्ये सामील व्हावे असे अनेकवळा सांगूनही ते् सामील झाले नाहीत. केंद्र सरकारकडून निधी मिळाला म्हणून कामगार विभागाने ही योजना राबवण्यास सुरुवात केली. सन 2008-09 ते सन 20012-13 या चार-पाच वर्षामध्ये विमा कंपन्यांना जवळपास प्रिमियम पोटी 215 कोटी रुपये दिलेले आहेत, त्यापैकी त्यांनी फक्त 81 कोटी रुपयांचे क्लेम अदा केले आहेत. म्हणजे त्यांनी जवळपास 134 कोटी रुपये हडप केले असे मी म्हणणार नाही. परंतु अशा योजना विमा कंपन्यांच्या फायद्यासाठी केल्या आहेत असे माझे स्पष्ट मत आहे. तेव्हा याची चौकशी व्हावी असे पत्र मी केंद्रीय कामगार मंत्री श्री.मल्लिार्जून यांना दिले आहे. याची चौकशी सीबीआयकडे द्यावी असे म्हटले आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी हस्तक्षेप करुन ही योजना आरोग्य विभागाकडे हस्तांतरित करावी अश्ी मी त्यांना विनंती केलेली आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना लागू आहे किंवा आपण महाराष्ट्रामध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना लागू करणार आहोत. तेव्हा ही राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना टप्प्याटप्प्याने बंद करण्याचे नियोजित आहे असे लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. फक्त 8 जिल्ह्यांमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना लागू करण्यात आली आहे. काही ठिकाणी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना नाही आणि राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना सुध्दा नाही. तेव्हा या संदर्भात शासनाचे काय धोरण आहे ? राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना लागू होईपर्यंत राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना चालू ठेवणार आहात काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी योजना 8 जिल्ह्यांसाठी लागू करण्यात आली त्याठिकाणी ही योजना बंद करण्यात आली आहे. उर्वरित जिल्ह्यांसाठी ही योजना चालू राहणार आहे. फक्त ही योजना आरोग्य विभागाने चालवावी अशी विनंती आहे.

---- यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील खादी ग्रामोद्योग बंद पडण्याबाबत**

**(६) * ३३६६७ ॲड.आशिष शेलार, श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील , डॉ. नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील कोल्हापूर सांगली, पुणे, सोलापूर, धुळे व जळगावसह २० खादी ग्रामोद्योग कसेबसे कार्यरत आहेत आणि सातारा, सिंधुदुर्ग, रत्नागिरीसह १० खादी ग्रामोद्योग बंद पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खादी ग्रामोद्योग संघाला, खादी ग्रामोद्योग आयोगातर्फे १० ते २० टक्के रिबेट व अनुदान दिले जात होते, ते ही आता बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व खादी ग्रामोद्योगांना वाचवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप शासनाने कोणती ही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नारायण राणे :** (१) होय.

(२) खादी व ग्रामोद्योग आयोगा कडून दिला जाणारा सूट (रिबेट) सन १/४/२०१० पासून बंद आहे.

(३) व (४) खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत खादी व ग्रामोद्योग संघाना सवलत (रिबेट) देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार, खादी विक्रीवर सवलत जाहीर केली जाते.

खादी सूट (रिबेट) बाबत शासनाच्या वस्त्रोद्योग संघाना सवलत (रिबेट) देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार, खादी विक्रीवर सवलत जाहीर केली जाते.

खादी सूट (रिबेट) बाबत शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाने खादी व ग्रामोद्योग मंडळास सन १९९१-९२ ते २००३-०४ या कालावधीत मंजूर केलेल्या रु.३,२५,५५,८६८/-.सूट दाव्यांपैकी (रिबेट क्लेम) खादी व ग्रामोद्योग मंडळाने रु ७९,४३,२८१.९४ इतका खर्च केल्यावर मंडळाकडे शिल्लक व अखर्चित असलेली रक्कम रु. २,४६,१२,५८६.०६ शासन जमा करण्यासंबंधी खादी व ग्रामोद्योग मंडळास दि. ५/११/२०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. परंतु खादी व ग्रामोद्योग मंडळाने वरीलप्रमाणे कार्यवाही केली नसल्यामुळे सन २००८-०९ चे सूट दाव (रिबेट क्लेम) खादी व गामोद्योग मंडळास मंजूर करण्यात आले नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता मिळण्याबाबत**

**(7) *34920 श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो गाणार , श्री.वसंतराव खोटरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.एम.एम.शेख , प्रा.सुरेश नवले , श्री.चंद्रकांत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 31312 ला दिनांक 17 जुलै, 2012 रोजीच्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) माध्यमिक शाळांमधील पायाभूत पेक्षा वाढीव (2001 ते 2008) 918 पदांना संयुक्त सचिव समितीने मान्यता दिल्यानुसार हा प्रस्ताव उच्च स्तरीय समितीसमोर केव्हा ठेवण्यात आला होता,

(2) 918 पदांबाबत उच्च स्तरीय समितीने केव्हा व काय निर्णय घेतला आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(4) अनुदानित शाळांमधील पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्यात शासनस्तरावरून प्रचंड विलंब होत असल्याने या पदांवर कार्यरत शिक्षकांना पूर्वलक्षी प्रभावाने सर्व लाभासह शासन मान्यता देणार आहे काय ?

**श्रीमती फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1), (2), (3) व (4) राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक संवर्गातील 918 पदांचा प्रस्ताव चक्रीय पद्धतीने उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता सर्व शिक्षा अभियान इत्यादी योजना विचारात घेवून विभागातील एकूण मंजूर पदे व प्रत्यक्षात भरलेली पदे यांचा सविस्तर तपशील सादर करण्याबाबत निदेश प्राप्त झाले आहेत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी मी जे प्रश्न विचारले होते, त्या सर्व प्रश्नांना एकच उत्तर दिलेले आहे. म्हणून माझा पहिला स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, मागील अधिवेशनामध्ये उत्तर देताना शासनाने तत्वत: 918 पदांना मान्यता दिली होती.म्हणून माझा पहिला स्पेसिफीक प्रश्न असा होता की, माध्यमिक शाळातील पायाभूत पेक्षा वाढीव म्हणजे 2001 ते 2008 पर्यंतच्या 918 पदांना संयुक्त सचिव समितीने मान्यता दिल्यानुसार हा प्रस्ताव उच्चस्तरीय समिती समोर केव्हा ठेवण्यात आला होता याचे उत्तर मिळालेले नाही. याबाबतीत तारीख सांगावी. तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, पायाभूतपेक्षा वाढीव पदांच्या बाबतीत सांगावयाचे तर याठिकाणी आपण त्याचा सर्वशिक्षा अभियानाशी संबंध जोडून याबाबत फेर आढावा घेण्याबाबत निर्देश दिले आहेत असे सांगण्यात आले.पण सर्वशिक्षा अभियानाचा आणि माध्यमिक शिक्षकांच्या पदाचा तसा कोणताही संबंध नाही. त्यामुळे तो मुद्दा येथे लागू होत नाही. माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, जर त्यांनी तुम्हाला भरण्यात आलेली पदे आणि मंजूर पदे याबाबतीत विचारले असेल तर मला माननीय मंत्री महोदयांकडून अशी माहिती पाहिजे की, आपण जिल्हा स्तराचा किंवा तालुका स्तराचा किंवा त्या शाळेचा, संस्थेचा विचार न करता, 2002 पासून राज्यस्तरावर पायाभूतचे जे धोरण आले त्या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

त्यावेळी पायाभूतमध्ये माध्यमिक शिक्षकांची किती पदे मंजूर होती? तसेच आता तेथे भरलेल्या पदांची संख्या किती आहे?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, संयुक्त सचिव समितीसमोर 918 शिक्षक पदांना त्यांच्याकडून मान्यता मिळालेली आहे. त्यानंतर हा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीकडे दि.31-7-2012 व दिनांक 19-10-2012 रोजी पाठविण्यात आला. उच्चस्तरीय समितीने अधिकची माहिती मागविली होती. त्यांचे असे म्हणणे होते की, सर्व राज्यांच्या सर्व योजनांच्या ठिकाणी सर्व प्रकारची किती पदे आहेत ? त्यापैकी किती पदे भरलेली आहेत आणि किती पदे रिक्त आहेत ? याबाबत सर्व माहिती पाठवावी. पण सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ते खरे आहे की याची गरज नाही. पण त्यांनी असा अभिप्राय पाठविल्यानंतर विभागाने त्यांना पत्र लिहीले आणि हे खरे आहे की, या पध्दतीची अजिबात गरज नाही आणि खाजगी अनुदानित, माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थी वाढीमुळे पदे निर्माण होतात. प्रत्येक शाळा घटक धरुन शिक्षकांची संख्या निश्चित करण्यात येते. यामुळे पदांच्या बाबत सर्वशिक्षा अभियान आहे त्याचा याच्याशी काही संबंध नाही म्हणून याला मान्यता द्यावी यासाठी आपण उच्चस्तरीय समितीला पत्र देखील लिहिलेले आहे.

-----

. . . .2ए-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यात रोजगार हमी योजनेच्या कामात मृत कामगाराची नावे हजेरी पटावर दाखवून गैरव्यवहार केल्याबाबत**

**(8) * 34973 श्री.संदिप बाजोरिया , श्री.सतीश चव्हाण , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.किरण पावसकर** : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथे रोजगार हमी योजनेच्या कामात आर.एफ.ओ.नी मृत कामगाराची नावे हजेरी पटावर दाखवून गैरव्यवहार केल्याची घटना माहे ऑगस्ट, 2012 च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर आर.एफ.ओ.वर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.नितीन राऊत** : (1) होय.

(2), (3) व (4) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, यावतमाळ यांनी दि. 25/10/2012 रोजी तहसिलदार, केळापूर यांना दिले आहेत चौकशीअंती दोषी आढळून येणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

श्री.संदिप बाजोरिया : सभापती महोदय, हा यवतमाळ जिल्ह्यासाठी हा गंभीर विषय आहे आणि माननीय मंत्री महोदय या जिल्ह्याचे पालक मंत्री देखील आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामध्ये रोजगार हमी योजनेमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या प्रश्नामध्ये असे उत्तर दिले आहे की, "चौकशीअंती दोषी आढळून येणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल." यामध्ये सगळया अधिकाऱ्यांनी, तेथे एक श्री.मरगळे नावाचे आर.एफ.ओ.आहेत, त्यांनी पाच मृतक हजेरीपटावर दाखवून जवळपास 5 कोटी रुपये लुटलेले आहेत. त्यामुळे श्री.मरगळे यांना निलंबित करण्यात येणार आहे काय? याबाबत संबंधितांची चौकशी झालेली आहे काय? त्यातून काय निष्पन्न झाले आहे? त्यांच्या विरोधात स्पष्टपणे पुरावे उपलब्ध असताना त्यांना कधी निलंबित करण्यात येणार आहे?

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, श्री.सुबोध वसंतराव काळपांडे यांची महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधील भ्रष्टाचाराबाबत सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार



ता.प्र.क्र.34973 . . . .

श्री.नितीन राऊत . . . .

यांच्यामार्फत मला प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने मी जिल्हाधिकारी यांना सखोल चौकशीचे आदेश दिले होते.याबाबतीत चौकशी झाली आणि सदर प्रकरणामध्ये उपलब्ध असलेली कागदपत्रे, संबंधितांचे बयान तसेच प्रतिज्ञा लेखन याच्या अवलोकनावरुन संबंधित वन विभागाने सादर केलेल्या हजेरीपटामध्ये तसेच पोस्टामध्ये द्यावयाच्या मजुरांच्या याद्यांमध्ये मृतकांची नावे नोंदविल्याची बाब निदर्शनास येते. सदर प्रकरणामध्ये दोषी वन विभागाचे अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

----

. . . 2 ए-8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**राज्यातील 39 अनुदानित सैनिकी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे 24 महिन्याचे वेतन थकीत असल्याबाबत**

**(9) *33538 श्री.मितेश भांगडिया, श्री.विनोद तावडे, श्री.वसंतराव खोटरे, डॉ.सुधीर तांबे , श्री.विक्रम काळे,श्री.एम.एम.शेख,प्रा.सुरेश नवले,श्री.नागो गाणार,डॉ.रणजित पाटील** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील 39 अनुदानित सैनिकी शाळेमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे वेतन 24 महिन्यांपासून निधी अभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय

(2) 39 सैनिकी विदयालया पैकी गोंडवाना सैनिकी विदयालय, गडचिरोली येथील शिक्षकांनी थकीत वेतन मिळावे या करीता दिनांक 2 ऑक्टोबर, 2012 पासून आमरण उपोषण केले, व त्याबाबतचे एक निवेदन दिनांक 28 नोव्हेंबर, 2012 रोजी मा.मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना मा.जिल्हाधिकारी, जिल्हा गडचिरोली यांचे मार्फत दिले आहे, हे खरे आहे काय,

(3) तसेच नागपूर जिल्हयातील किती व कोणत्या शाळांचा थकित वेतनात समावेश आहे,

(4) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(5) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने सदर शाळांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा** : (1) अंशत: खरे आहे, सलग 24 महिन्याचे वेतन थकीत नसून, विविध जिल्ह्यांचे विविध महिन्याचे वेतन थकित आहे.

(2) अशंत खरे आहे. सदर निवेदन दिनांक 26 सप्टेंबर, 2012 रोजी देण्यात आले आहे.

(3) नागपूर जिल्ह्यातील योजनांतर्गत बाबी खाली माँवैष्णवी संचलीत राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा नागपूर यांचा समावेश आहे.

(4) कार्यवाही सुरु आहे.

(5) सदर निवेदनाच्या अनुरोधाने फेब्रुवारी 2012 पूर्वीचे थकीत वेतन अनुदान रु.160.58 लक्ष व सन 2012-13 च्या नियमित वेतनासाठी कमी पडणारे रु.302.16 लक्ष असे एकूण रु.462.74 लक्ष रकमेचे पुनर्विनियोजन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

. . . .2 ए-5



ता.प्र.क्र.33538 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, आदिवासी सैनिकी शाळेबाबत सांगावयाचे तर महाराष्ट्रामध्ये 39 अनुदानित सैनिकी शाळा आहेत. त्यामध्ये आदिवासींची एकेक तुकडी देखील आहे. परंतु जवळपास 22 महिन्यापासून त्याठिकाणी वेतन देण्यात आलेले नाही.

यानंतर श्री.बरवड . . .

.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33538.... श्री. वसंतराव खोटरे...

शासनाने या ठिकाणी बरोबर उत्तर दिले आहे की, आता तरतूद केलेली आहे. हे पुनर्विनियोजन किती दिवसात अदा करणार ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, राज्यात एकूण 40 अनुदानित शाळांपैकी 23 शाळांमधील 206 शिक्षक आणि 132 शिक्षकेतर असे एकूण 338 पदे योजनांतर्गत बाबीखाली वेतनपात्र आहेत. जो उशीर झालेला आहे त्याचे कारण असे आहे की, शाळांकडून वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव विलंबाने आलेले आहेत. प्रस्ताव आल्यानंतर त्यातील त्रुटी पाहून त्या त्रुटींची पूर्तता करणे यामुळे विलंब झालेला आहे. 2012 पूर्वीचे जे दायित्व आहे ते 1 कोटी, 60 लाख 58 हजार रुपये आहे व 2012-2013 मध्ये नियमित अनुदान देण्यासाठी जादाचे 3 कोटी 2 लाख 16 हजार रुपये अशा एकूण 4 कोटी 62 लाख 74 हजार रुपयांच्या अतिरिक्त तरतुदीबाबत पुनर्विनियोजनासाठी प्रस्ताव देण्यात आलेला आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई महानगरपालिकेने सुधारित केलेल्या प्राथमिक शालेय संहितेची (ग्रँड-इन-कोड) अंमलबजावणी करण्याबाबत**

**(१०) * ३४५८२ श्री.विनायक राऊत , श्री.नागो पुंडलिक गाणार , डॉ.रणजित पाटील , श्री.नितीन गडकरी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने प्राथमिक शिक्षणांचे व्यवस्थापन गतिमान करण्यासाठी तसेच काळाची आव्हाने पेलण्यासाठी प्राथमिक शालेय संहिता (ग्रँड इन कोड) सुधारित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सुधारित ग्रॅड-इन-कोड ला शासनाने मान्यता दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) मुंबई महानगरपालिकेने सुधारित केलेल्या ग्रँड-इन-कोड ला शासनाची मंजुरी मिळाल्यानंतरही सुधारित ग्रँड-इन-कोड ची अंमलबजावणी करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सक्षम समिती व आयुक्त यांनी मंजूर केलेल्या तसेच शासनाने मान्यता दिलेल्या सुधारित ग्रँड-इन-कोड ची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करीत आहे,

(५) नसलयास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) व (२) होय.

(३) नाही, राज्यात बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ लागू करण्यात आला असून त्यामधील तरतूदी व त्याअंतर्गत नियम व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय यामध्ये काही बाबतीत विसंगती निर्माण होत असल्यामुळे ती दूर करुन सुधारीत शाळा संहितेस शिक्षण समिती महानगरपालिका यांची मंजूरी घेण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 1 आणि 2 मध्ये शासनाने 'होय' असे उत्तर दिलेले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या शाळा चालवित असताना ग्रँड-इन-कोड महत्वाचे आहे. मुंबई महानगरपालिकेने जे सुचविले ते महाराष्ट्र शासनाने मंजूर केले. एप्रिल, 2010 च्या आसपास महाराष्ट्र शासनाने शालेय संहिता मंजूर करुन मुंबई महानगरपालिकेकडे अंमलबजावणीसाठी पाठविली. प्रश्न क्रमांक 3 मध्ये जे उत्तर दिलेले आहे ते पाहिले तर त्याचा प्रश्न क्रमांक 1 आणि 2 यांच्याशी कोठे संबंध आहे असे वाटत नाही. जी शालेय संहिता महाराष्ट्र शासनाने मंजूर केली आहे त्यामध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण खात्याच्या अधिकाऱ्यांना नाही. 2010 साली महाराष्ट्र शासनाने जी शालेय संहिता मंजूर केली त्यांची तंतोतंत अंमलबजावणी करण्याचे आदेश मुंबई महानगरपालिकेला देणार का ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

ता. प्र. क्र. 34582 ......

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, प्राथमिक शिक्षण हे मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्राखाली येते. मुंबई महानगरपालिकेमध्ये मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांकरिता खाजगी प्राथमिक शाळा संहितेस 20 एप्रिल, 2010 रोजी शासनाने मान्यता दिली. दरम्यानच्या काळात 2009 मध्ये शिक्षणाचा अधिकार कायदा आला. महाराष्ट्र शासनाने जी संहिता मंजूर करुन दिली होती ती त्यांच्याकडे पडून होती. पण 2009 मध्ये जेव्हा शिक्षणाचा अधिकार कायदा आला तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की, त्यामध्ये काही विसंगती आहेत आणि त्या दुरुस्त करण्याची गरज आहे. मग त्यांनी शिक्षण समितीची मान्यता घेऊन नवीन प्रस्ताव केलेला आहे. अजून तो नवीन प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही. राज्य शासनाकडे त्यांचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे शासन त्याला मान्यता देईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाला की नाही हे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले नाही. सुधारित प्रस्ताव राज्य शासनाकडे प्राप्त झाला आहे का, जर सुधारित प्रस्ताव प्राप्त झाला असेल तर तो मंजूर करणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकलेले दिसत नाही. मी आताच सांगितले की, मुंबई महानगरपालिकेकडून सुधारित प्रस्ताव यावयाचा आहे. त्यांनी प्रस्ताव पाठविल्यानंतर तो मंजूर होईल. अंमलबजावणी करणे हे त्यांचे काम आहे.

-----

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील अर्धवेळ ग्रंथपालांना पुर्णवेळ पदात रूपांतरीत करणेबाबत**

**(११) * ३४९३६ डॉ.सुधीर तांबे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे , श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.रामनाथ मोते , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.कपिल पाटील , श्री.एम.एम.शेख , प्रा.सुरेश नवले : तारांकित प्रश्न क्रमांक ३०००१ ला दिनांक २४ जुलै ,२०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व अर्धवेळ ग्रंथपाल तसेच खाजगी माध्यमिक शाळांमधील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ पदात रूपांतरीत करण्याच्या संदर्भातील प्रस्ताव क्षेत्रीय यंत्रणाकडून उच्चस्तरीय सचिव समितीपुढे प्रस्ताव ठेवण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा** : (१), (२) व (३) राज्यातील १०६७ अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ पदात रूपांतरीत करण्याचा प्रस्ताव शासनाने अमान्य केला आहे.

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, राज्यामध्ये अर्धवेळ ग्रंथपाल काम करीत आहेत. एक हजार मुलांमागे पूर्णवेळ ग्रंथपालाचे पद शासनाने मंजूर केलेले आहे. आता सर्वत्रच विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहे. आयटीआयमध्ये सुध्दा आपण आता 30 विद्यार्थ्यांची तुकडी करतो. 500 विद्यार्थ्यांमागे एक पूर्णवेळ ग्रंथपाल करावा अशी आमची मागणी आहे. हे ग्रंथपाल आयुष्यभर अर्धवेळ काम करतात. त्यांना शासकीय नोकरांच्या कोणत्याही सुविधा मिळत नाहीत. परंतु शासन ही मागणी अमान्य करीत आहे. खरे तर याचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावयास पाहिजे. मी पुन्हा माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी याचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा. एक हजार विद्यार्थ्यांची अट 500 विद्यार्थ्यांपर्यंत आणण्याचा विचार शासन करील का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शासनाने या बाबतीत कॉन्शस निर्णय घेतलेला आहे की, या पध्दतीचा प्रस्ताव मान्य करता येत नाही. एक हजार विद्यार्थी असतील तरच पूर्णवेळ ग्रंथपाल मान्य होऊ शकतो. त्यामुळे 1 हजार 67 पदांचा जो प्रस्ताव होता तो अमान्य करण्यात आलेला आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, जीवनामध्ये पुस्तक वाचनाला फार महत्व आहे आणि म्हणूनच 'ग्रंथ हेच गुरु' असे म्हटले जाते. पण आपले सरकार पुस्तक वाचनाला चालना देत नाही. विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचावीत म्हणून ग्रंथपाल नेमावयाचे आहेत. सातत्याने 27 वेळा हा प्रश्न

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 34936 ..... श्री. विक्रम काळे ....

सभागृहामध्ये आलेला आहे. सभापती महोदय, आपण सुध्दा मार्चच्या अधिवेशनामध्ये निदेश दिले होते की, हा प्रश्न शासनाने तातडीने सोडविला पाहिजे. आता या ठिकाणी शासन नकारात्मक उत्तर देत आहे. आपण विद्यार्थी संख्येची अटच घालू नका. ज्या ठिकाणी शाळा आहे त्या ठिकाणी ग्रंथपाल अशी मान्यता देणार का आणि या बाबतीत तातडीने निर्णय घेणार का ? सभापती महोदय, या बाबतीत आपण आम्हाला न्याय द्यावा. आपल्याला शिक्षणाच्या बाबतीत कळवळा आहे. आपल्याला शिक्षणाची जाणीव आहे. आपण शासनाला निदेश द्यावेत.

प्रा. फौजिया खान :सभापती महोदय, असे करता येत नाही. कारण 500 विद्यार्थ्यांची अट आहे. जर 500 पर्यंत विद्यार्थीसंख्या असेल तरच अर्धवेळ ग्रंथपाल असू शकतो आणि 1 हजार विद्यार्थीसंख्येसाठी पूर्णवेळ ग्रंथपाल असू शकतो असा नियम आहे. त्या नियमानुसार काम करण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...6...

**राज्यातील उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक शाळा नसल्यामुळे अर्ध्यावर शिक्षण सोडणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(१२) * ३४३५५ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५७१० ला दिनांक २२ मार्च, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात. :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक शाळा नसल्यामुळे अर्ध्यावर शिक्षण सोडणाऱ्या मुलींचे प्रमाण सातत्याने वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे,

(३) असल्यास, शासनाचे याबाबत धोरण काय आहे ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२) व (३) गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबविल्या जातात. उदा. उपस्थिती भत्ता, मोफत शिक्षण, गणवेश व लेखन साहित्य, पुस्तकपेढी, अहिल्याबाई मोफत प्रवास योजना, सर्व शिक्षा अभियान, मानव विकास मिशन अंतर्गत योजना.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये 'हे खरे नाही' असे उत्तर दिले असले तरी दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये शासनाने अप्रत्यक्षपणे ही वस्तुस्थिती मान्य केलेली आहे. ज्या ठिकाणी गरज आहे, ज्या ठिकाणी व्यवस्था नाही, प्राथमिक शाळांना जोडून माध्यमिक उर्दू शाळा नाहीत त्या ठिकाणी अशा अनुदानित प्राथमिक शाळांना जोडून अनुदानित माध्यमिक उर्दू शाळा देणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी ज्या ज्या ठिकाणी चौथीपर्यंत शाळा आहे त्या ठिकाणी पाचवीचा वर्ग सुरु करणे आवश्यक आहे. कारण आपल्याला शिक्षणाच्या अधिकाराखाली इलेमेंटरी सायकल करावयाची आहे. उर्दू शाळेमध्ये जर चौथीचा वर्ग असेल तर पाचवीचा वर्ग देणे आणि ज्या ठिकाणी सातवीचा वर्ग असेल त्या ठिकाणी आठवीचा वर्ग देणे ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. हे आम्ही सर्व माध्यमांसाठी करणार आहोत. पण खासकरुन उर्दू माध्यमासाठी हे लवकरात लवकर करण्यात येईल.

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, बऱ्याच ठिकाणी उर्दू माध्यमाच्या माध्यमिक शाळा आहेत त्या ठिकाणी अकरावी, बारावीला परवानगी नाही. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये मुलींचे शिक्षण त्याच ठिकाणी थांबते. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्या ठिकाणी आपण कनिष्ठ महाविद्यालयाला परवानगी देणे गरजेचे आहे. तसे धोरण शासन घेणार का ?

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 34355.....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ज्युनिअर कॉलेज सुध्दा देण्याची गरज आहे. तसेच मायनॉरिटी एज्युकेशनच्या बाबतीत जे वेगवेगळ्या प्रकारचे इश्यूज आहेत त्यासाठी शालेय शिक्षण विभागाकडून मायनॉरिटीच्या एज्युकेशनसाठी नवीन धोरण करण्याची बाब विचाराधीन आहे. त्यावर काम चालू आहे. अनेक प्रकारचे जे प्रश्न आहेत त्या बाबतीत मायनॉरिटी एज्युकेशन पॉलिसी लवकरच येणार आहे.

----

...8....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात माती नाला बांध, बंधारे, शेततळयाची दुरूस्ती, विहीर पुनर्भरण या कामात झालेला गैरव्यवहार**

**(१३) * ३३९०६ प्रा.सुरेश नवले , श्री.संजय दत्त , डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील मुखेड हा सर्वाधिक जास्त निधी मिळवणारा तालुका असला तरी माती नाला बांध, बंधारे, शेततळयांची दुरूस्ती, विहीर पुनर्भरण या कामात जवळपास १०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१२ च्या सुमारास निर्दशनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहराची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या गैरव्यवहारात संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप याबाबत कोणतीच कारवाई झाली नसल्यास त्यामागील कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव देवकर, डॉ.नितीन राऊत यांच्याकरिता** : (१) होय.

(२), (३) व (४) उक्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नांदेड यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उपवनरंक्षक, नांदेड व उपसंचालक सामाजिक वनीकरण यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. चौकशीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, सहा महिन्यापूर्वी चौकशीचे आदेश दिलेले आहेत पण अद्याप ती चौकशी झालेली नाही. ही चौकशी कधी पूर्ण होणार आणि त्याचा अहवाल कधी येणार?

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ D/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 14:50

ता.प्र.क्र. 33906 ...

श्री. गुलाबराव देवकर : एक महिन्याच्या आत अहवाल मागविला जाईल. अहवाल आल्यानंतर जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सामाजिक वनीकरणामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे चित्र दिसत आहे. 100 कोटीचा भ्रष्टाचार झाल्याचे प्रश्नात नमूद केलेले आहे. माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी सांगितले की, शासनाकडे निधी नाही, शासनाची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. असे असताना 100 कोटीचा भ्रष्टाचार कसा काय होतो ? या भ्रष्टाचारामध्ये किती अधिकारी गुंतलेले आहेत आणि त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : चौकशी अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे हे आधीच सांगितलेले आहे. एक महिन्यामध्ये चौकशी अहवाल प्राप्त करुन घेऊन जे अधिकारी दोषी आढळतील त्यांना निश्चितपणे कडक शासन केले जाईल. सामाजिक वनीकरण असेल किंवा वन विभाग असेल, जेथे जेथे गैरव्यवहार आढळून येईल तेथे तेथे बारकाईने लक्ष ठेवून कारवाई करण्यात येईल.

**उप सभापती** : पुढील अधिवेशनामध्ये या कारवाईचा तपशील सभागृहात मांडावा.

श्री. गुलाबराव देवकर : होय.

----

**ता.प्र.क्र. 33357बाबत**

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय अनुपस्थित असल्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्यात येत आहे.

---

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जळगाव जिल्ह्यातील जिल्हापरिषदेच्या शाळांमधील सुमारे ५००० विद्यार्थ्यांना प्रथम सत्र उलटूनही गणवेश न मिळाल्याबाबत**

**(१५) * ३३९६९ श्री.मनीष जैन :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील जिल्हापरिषदेच्या शाळांमधील सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वाटप करण्यात येणारे गणवेश विद्यार्थ्यांना अद्याप मिळाले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गणवेश वाटपास उशीर झाल्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच सदर विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप लवकरात लवकर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. फोजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) जळगाव जिल्ह्यातील भडगाव व चाळीसगाव हे तालुके वगळता इतर तालुक्यांमध्ये गणवेशाचे वाटप पुर्ण झाले आहे.
(२), (३), (४) व (५) भडगाव व चाळीसगाव या तालुक्यातील गटसमन्वयकाचे पद रिक्त असल्याने व गट साधन केंद्रातील आर्थिक व्यवहारासाठी गठ समन्वयकाची सही असणे आवश्यक असल्याने या दोन तालुक्यांमध्ये निधी वितरणास विलंब झाला होता. सदर तालुक्यांत प्रतिनियुक्तीने गट समन्वयकाची नियुक्ती करुन निधी शाळा स्तरावर वितरित करण्यात आला आहे.

श्री. मनिष जैन : जळगाव जिल्ह्यात मागील वर्षी देखील गणवेश घोटाळा झाला होता, लाखो रुपयांचा अपहार झाला होता. त्याबाबतीत चौकशी करण्यात येत आहे. यावर्षी ऑक्टोबर महिन्यापर्यन्त गणवेश वाटप झालेले नाही. निधी शाळास्तरावर वितरित करण्यात आलेला आहे असे छापील उत्तरामध्ये सांगितलेले आहे. काही तालुक्यामध्ये थेट निधी वितरित केला जातो तर काही तालुक्यामध्ये गणवेशाचे वाटप केले जाते. याबाबतीत शासनाचे काय धोरण आहे हे स्पष्ट करावे. ज्यांना गणवेश पुरवठा करण्याचे टेंडर दिले होते त्यानी गणवेशाचा पुरवठा का केला नाही, शासन त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सर्वशिक्षा अभियानअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील सर्व अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या मुलांना तसेच दारिद्ररेषेखालील पालकांच्या मुलांना मोफत गणवेशाचे वाटप केले जाते. मागील वर्षी कापड देऊन कपडे शिवून घेण्याचे धोरण होते. पण 2012-13साठी या योजनेमध्ये बदल करुन दोन गणवेशासाठी 400 रुपये या प्रमाणे शालेय व्यवस्थापन समितीला निधी वितरित करण्यात आला. जळगाव जिल्हयामध्ये 1,48,604 विद्यार्थ्यांना

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33969...

प्रा.फौजिया खान......

गणवेशाचे दोन जोड उपलब्ध करुन दिलेले आहेत. भडगाव आणि चाळीसगाव येथील गटसमन्वयकाचे पद रिक्त असल्यामुळे गणवेशाचे वाटप झालेले नाही. ते पद प्रतिनियुक्तीवर भरण्यात आलेले आहे.

--

**ता.प्र.क्र. 35012**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यात औद्योगिक विकास महामंडळाच्या भुखंड, शेड व गाळे यांचे दर वाढविण्याच्या प्रस्तावाबाबत

**(१७) *  ३३३१०    श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , ॲड.आशिष शेलार , श्री. विजय गिरकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक विकास महामंडळाचे भूखंड, शेड व गाळे यांचे दर वाढविण्याचा प्रस्ताव दिनांक २० डिसेंबर, २०१० रोजीच्या संचालक मंडाळाच्या सभेत मांडण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही दरवाढ करण्याबाबत चालढकल करण्यात येऊन प्रत्येक्षात ही दरवाढ माहे सप्टेंबर, २०११ मध्ये करण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ही दरवाढ उशिरा झाल्यामुळे ओद्योगिक विकास महामंडळाचे अब्जावधी रूपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(४) तसेच दिनांक २७ डिसेंबर, २०१० ते डिसेंबर २०११ या कालावधीत किती चौरस फुट व कोणत्या ठिकाणी भूखंडाचे वाटप करण्यात आले,

(५) असल्यास, याप्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. सचिन अहिर, श्री.नारायण राणे यांच्याकरिता :** (१), (२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंड वाटपाच्या दरात सुधारणा करण्याबाबतच्या प्रस्तावावर महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि.२७ डिसेंबर, २०१० रोजी संपन्न झालेल्या बैठकीस चर्चा करण्यात आली होती. सदर बैठकीत महामंडळाचे भूखंड, शेड व गाळे वाटपाचे दर वाढविण्याचा प्रस्ताव विचाराधीन असला तरी त्यावर अंतिम निर्णय होईपर्यंत भूखंड वाटप प्रक्रिया न थांबविता प्रचलित दराने वाटप करण्यास हरकत नाही. असा निर्णय घेण्यात आला होता. तात्कलीन परिस्थितीत जागतिक मंदीचे वातावरण पाहता दरवाढ प्रस्तावावर अभ्यास करुन शिफारस देण्यासाठी प्रधान सचिव (उद्योग) व मुख्य कार्यकारी अधिकारी (म.औ.वि.म.) यांची समिती नियुक्त करण्यात आली होती. त्यांचे शिफारस प्राप्तीनंतर महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. ६ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या बैठकीत भूखंड वाटपाच्या प्रिमियम दरात वाढ करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तथापी सदर बैठकीचे कार्यवृत्त अंतिम करण्यापूर्वीच भुखंडाचे दर वाढविण्यासंदर्भात उद्योजकांच्या संघटनांकडून प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार करुन महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि.३० नोव्हेंबर, २०११ रोजी झालेल्या बैठकीत पुन: चर्चा करुन दि. ६ सप्टेंबर, २०११ च्या बैठकीचे इतिवृत्त भूखंड वाटपाच्या दरात काही दुरुस्त्यासह मंजूर करण्यात आले. महामंडळाच्या संचालक मंडळाने वरील प्रमाणे इतिवृत्तास मान्यता दिल्यानंतर दि. ६ जानेवारी, २०१२ च्या परिपत्रकान्वये भूखंड वाटपाच दरात सुधारणा करण्यात आली आहे. त्यामुळे दरवाढ उशिरा झाल्यामुळे औद्योगिक विकास महामंडळाचे अब्जावधी रुपयांचे नुकसान झाले अशी वस्तुस्थिती नाही.

(४) दिनांक २७ डिसेंबर, २०१० ते डिसेंबर, २०११ या कालावधीत महामंडळाच्या ११७ औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण १७,७६,९७,१७९.८ चौरस फुट क्षेत्रफळाच्या महामंडळाच्या विविध औद्योगिक क्षेत्रामध्ये वाटप केलेलया भूखंडाची यादी सोबत जोडली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

..५..



ता.प्र.क्र. ३३३१०

दि.२७/१२/२०१० ते डिसेंबर- २०११ या कालावधीमध्ये वाटप केलेल्या भूखंडाच्या क्षेत्राचा औद्योगिक क्षेत्र निहाय तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | औद्योगिक क्षेत्राचे | वाटप करण्यात आलेले क्षेत्र | क्षेत्र चौ.फुटामध्ये |
|---|---|---|---|

| | नांव | चौ.मी. | |
|---|---|---|---|
| १. | डोबिंवली | २००० | २१५२० |
| २. | अति.अंबरनाथ | १,३६,६६० | १४७०४६१.६ |
| ३. | बदलापूर | ७,००० | ७५३२० |
| ४. | कल्याण भिवंडी | १,०९० | ११७२८.४ |
| ५. | अति.कल्याण भिवंडी | ३७,९९९ | ४०८८६९.२४ |
| ६. | अति.मुरबाड | ५०० | ५३८० |
| ७. | टी.टी.सीस. | १०,४३६ | ११२२९१.३६ |
| ८. | तळोजा | १८,५५२ | १९९६१९.५२ |
| ९. | अति.पाताळ गंगा | ४,०५,०४७ | ४३५८३०५.७२ |
| १०. | विळे भागाड | ६८,७११ | ७३९३३०.३६ |
| ११. | रत्नागिरी | १,६७,४०९ | १८०१३२०.८४ |
| १२. | लोटे परशुराम | २२,५९४ | २४३१११.४४ |
| १३. | गाणे खडपोली | ८,०९३ | ८७०८०.६८ |
| १४. | दापोली | ५,१०४ | ५४९१९.०४ |
| १५. | कुडाळ | ७३,८७४ | ७९४८८४.२४ |
| १६. | चाकण | ३८८५९९६ | ४१८१३३१७ |
| १७. | तळेगांव | १६३८७ | १७६३२४.१२ |
| १८. | रांजणगांव | १३९६२२ | १५०२३३२.७२ |
| १९. | जेजूरी | ५३५४६ | ५७६१५४.९६ |
| २०. | बारामती | ४१७१९ | ४४८८९६.४४ |
| २१. | इंदापूर | ६०८३० | ६५४५३०.८ |
| २२. | पणदरे | ६४५१ | ६९४१२.७६ |
| २३. | कुरकुंभ | ११८१६० | १२७१४०१.६ |
| २४. | राजीव गांधी मा व तं.उ.ट.१ | २२०० | २३६७२ |
| २५. | राजीव गांधी मा व तं.उ.ट.३ | २०३३४ | २१८७९३.८४ |
| २६. | तळेगाव सॉफ्टवेअर पार्क | ५२९० | ५६९२०.४ |
| २७. | कुरकुंभ ओ.क्षे. | ४६१६० | ४९६६८१.६ |
| २८. | इंदापूर ओ.क्षेत्र | १३०९६२ | १४०९१५१.१२ |
| २९. | जेजूरी | २६६२९ | २८६५२८.०४ |
| ३०. | शिरोली | १५७०० | १६८९३२ |
| ३१. | गोकुळ शिरगाव | १०३०० | ११०८२८ |

..6..



| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | आजरा | २२०० | २३६७२ |
| ३३. | कागल हातकंणगले | २४५७०० | २६४३७३२ |
| ३४. | अति.सातारा | ८६०० | ९२५३६ |

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

| | | | |
|---|---|---|---|
| ३५. | कराड | १२४०० | १३३४२४ |
| ३६. | वाई | ४७०० | ५०५७२ |
| ३७. | खंडाळा | ६८००० | ७३१६८० |
| ३८. | लोणद | ८०० | ८६०८ |
| ३९. | शिराळा (वि.कें.) | २३०६२४ | २४८१५१४.२४ |
| ४०. | विटा (वि.कें.) | ३७४५८ | ४०३०४८.०८ |
| ४१. | जत (छोटे) | १५०२ | १६१६१.५२ |
| ४२. | अति.पलूस (वाईन पार्क) | २००० | २१५२० |
| ४३. | पलूस (छोटे) | १३७० | १४७४१.२० |
| ४४. | कवठेमहंकाळ (छोटे) | ५७० | ६१३३.२० |
| ४५. | अति.कडेगांव (विव्हर्स पार्क) | २०० | २१५२ |
| ४६. | चिचोली | १९२७९० | २०७४४२०.४० |
| ४७. | टेंभूर्णी (वि.कें.) | ३३९१२८ | ३६४९०१७.२८ |
| ४८. | मंगळवेढा (वि.कें.) | ६३२३ | ६८०३५.४८ |
| ४९. | नागपूर (हिंगणा) | १३८० | १४८४८.८ |
| ५०. | बुटीबोरी | ३७८१६९ | ४०६९०९८.४४ |
| ५१. | उमरेड (वि.के.) | २००० | २१५२० |
| ५२. | सावनेर (वि.के.) | १९५१ | २०९९२.७६ |
| ५३. | भिवापूर (लघु) | ४७३० | ५०८९४.८ |
| ५४. | पारशिवानी (लघु) | ३९५९ | ४२५९८.८४ |
| ५५. | वर्धा | ८०८१७ | ८६९५९०.९२ |
| ५६. | देवळी (वि.के.) | ६८०९० | ७३२६४८.४ |
| ५७. | कारंजा (लघु) | २४२५ | २६०९३ |
| ५८. | चंद्रपूर | ५१०६७ | ५४९४८०.९२ |
| ५९. | अति.चंद्रपूर | ४८६७८ | ५२३७७५.२८ |
| ६०. | अति.वरोरा | ४५८३०० | ४९३१३०८ |
| ६१. | भद्रवती (लघु) | ७९०० | ८५००४ |
| ६२. | सिंदेवाही (लघु) | २५०० | २६९०० |
| ६३. | चिमूर (लघु) | १७४० | १८७२२.४ |
| ६४. | लाखांदूर (लघु) | ८०००० | ८६०८०० |
| ६५. | देवरी (वि.के.) | १५२००० | १६३५५२० |
| ६६. | गडचिरोली (वि.के.) | १४१८० | १५२५७६.८ |

..7..



| | | | |
|---|---|---|---|
| ६७. | अहेरी (लघु) | ४००० | ४३०४० |
| ६८. | अतिरिक्त अमरावती औ.क्षेत्र | २३,०८१५५ | २४८३५७४७.८ |
| ६९. | वरुड लघू औ.क्षेत्र | १२,००० | १२९१२० |

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

| | | | |
|---|---|---|---|
| ७०. | चांदूर रेल्वे लघू औ.क्षेत्र | ३२,००० | ३४४३२० |
| ७१. | अकोला विकास केंद्र | १,७३,९२२.५० | १८७१४०६.१ |
| ७२. | अकोला विकास केंद्र (वाहतूक नगर) | ३२०२१.७४ | ३४४५५३.९२२४ |
| ७३. | मुर्तिजापूर विकास केंद्र | २६३५ | २८३५.६ |
| ७४. | तेल्हारा लघू औ.क्षेत्र | ३४५० | ३७१२२ |
| ७५. | पातूरा लघू औ.क्षेत्र | ३०४० | ३२७१०.४ |
| ७६. | मानोरा लघू औ.क्षेत्र | १७,२०० | १८५०७२ |
| ७७. | खामगांव औ.क्षेत्र | ९८६० | १०६०९३.६ |
| ७८. | मलकापूर औ.क्षेत्र | ५५,५२२ | ५९७४१६.७२ |
| ७९. | चिखली विकास केंद्र | ४७,५९८ | ५१२१५४.४८ |
| ८०. | मेहकर लघू औ.क्षेत्र | ८०,००० | ८६०८०० |
| ८१. | अतिरिक्त अमरावती औ.क्षेत्र | २३,०८,१५५ | २४८३५७४७.८ |
| ८२. | वरुड लघू औ.क्षेत्र | १२,००० | १२९१२० |
| ८३. | चांदूर रेल्वे लघू औ.क्षेत्र | ३२,००० | ३४४३२० |
| ८४. | अकोला विकास केंद्र | १,७३,९२२.५० | १८७१४०६.१ |
| ८५. | अकोला विकास केंद्र (वाहतूक नगर) | ३२०२१.७४ | ३४४५५३.९२२४ |
| ८६. | मुर्तिजापूर विकास केंद्र | २६३५ | २८३५२.६ |
| ८७. | तेल्हारा लघू औ.क्षेत्र | ३४५० | ३७१२२ |
| ८८. | पातूरा लघू औ.क्षेत्र | ३०४० | ३२७१०.४ |
| ८९. | मानोरा लघू औ.क्षेत्र | १७,२०० | १८५०७२ |
| ९०. | खामगांव औ.क्षेत्र | ९८६० | १०६०९३.६ |
| ९१. | मलकापूर औ.क्षेत्र | ५५,५२२ | ५९७१४६.७२ |
| ९२. | चिखली विकास केंद्र | ४७,५९८ | ५१२१५४.४८ |
| ९३. | मेहकर लघू औ.क्षेत्र | ८०,००० | ८६०८०० |

२०-१२-२०१२ ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC-८
MSS/ D/ KTG/ D/ KTG/ पूर्वी श्री. बरवड
ता.प्र.क्र. ३३३१०

| | | | |
|---|---|---|---|
| ९४. | जिंतूर | २३६५० | २५४४७४ |
| ९५. | हिंगोली | ३०८० | ३३१४० |
| ९६. | देगलूर | ३९३६९ | ४२३६१० |
| ९७. | किनवट | ५२०० | ५५९५२ |
| ९८. | अतिरिक्त धुळे | ३३,७१२ | ३,६२,७४१ |
| ९९. | नरडाणा | १६,२४,५०० | १,७४,७९,६२० |

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

| | | | |
|---|---|---|---|
| १०० | नवापूर | ३६,७४६ | ३,९५,३८७ |
| १०१ | अतिरिक्त जळगांव | ७,२४० | ७७,९०२ |
| १०२ | भुसावळ | १७,३८४ | १,८७,०५१ |
| १०३ | वाळूज | ९५०९९ | १०२३२६५ |
| १०४ | शेंद्र पंचतारांकित | २३६१४१ | २५४०८७७ |
| १०५ | पैठण | ५९५५२ | ६४०७७९ |
| १०६ | बीड | ८३७ | ९००६ |
| १०७ | जाफ्राबाद | ३६४३ | ३९१९८ |
| १०८ | अंबड | ३५६० | ३८३०५ |
| १०९ | भोकरदन | ५९७७ | ६४३१२ |
| ११० | परतूर | २२०० | २३६७२ |
| १११ | उस्मानाबाद | ३७५० | ४०३५० |
| ११२ | उमरगा | ६३७५४ | ६८५९९३ |
| ११३ | अति.लातूर | ५३३३२ | ५७३८५२ |
| ११४ | भूम | २७३० | २९३७४ |
| ११५ | सिन्नर | ८७७२८ | ९४३९५३ |
| ११६ | नेवासा | १०६८०० | ११४९१६८ |
| ११७ | श्रीरामपूर | ३८०२१० | ४०९१०५९ |
| | एकूण | १६५१४६०८.४८ | १७७६९७१७९.८ |

ॲड. आशिष शेलार : 20 डिसेंबर 2010 रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेत दर वाढविण्याचा प्रस्ताव आला त्यास 6 जानेवारी 2012ला मान्यता मिळाली. मधल्या काळामध्ये उद्योजकाकडून निवेदन आले असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. उद्योजकाकडून निवेदन आल्यानंतर रिव्ह्यू संबंधी चर्चा झाली आणि त्यानंतर दर संमत झाला. या मधल्या काळात भूखंडाचे वाटप नवीन दराने झाले असते तर महामंडळाला खूप फायदा झाला असता. या मधल्या काळात किती भूखंडांचे वाटप झाले ? नवीन दर आणि जुने दर यामधील तफावत काढली तर महामंडळाला किती नुकसान झालेले आहे ?

..9..



ता.प्र.क्र. ३३३१०...

श्री. सचिन अहिर : दरम्यानच्या काळात 17.76 लाख चौ.फू. भूखंडाचे वाटप केलेले आहे. 117 लोकांना हे भूखंड दिलेले आहेत. इंडस्ट्रिज्ची परिस्थिती सारखी बदलत असते. ही परिस्थिती बदलत असताना ज्या ज्या वेळी अशी निवेदने येतात त्यावेळी त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार मंडळाला आहेत. त्यावेळी दरवाढ करण्यात आली नाही मात्र परिस्थती चांगली झ ाल्यांनतर आणि रिव्ह्यू घेतल्या नंतर दरवाढ केलेली आहे. त्यामुळे यामध्ये कोणतेही नुकसान झ

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ालेले नाही.  आता महामंडळाची बैठक झाली त्यावेळी देखील असोशिएशनकडून हे वाढलेले दर कमी करावेत अशी मागणी आली. तो प्रस्ताव बोर्डाच्या विचाराधीन आहे.

ॲड. आशिष शेलार : 117 भूखंडाचे वाटप झालेले आहे. त्या काळामध्ये दराची निश्चिती चालू होती. त्यामुळे या काळातील सर्व व्यवहाराची चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. सचिन अहिर : नाही.

श्री. विनायक राऊत : 117 भूखंड वाटप करीत असताना टेंडर प्रोसिजरचा अवलंब केला होता काय ?

श्री. सचिन अहिर : होय.

---

**ता.प्र.क्र.34704**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**बृहन्मुंबई,ठाणे, रायगड जिल्ह्यात व्यवसायनिहाय व राज्यातील इतर जिल्ह्यांत माथाडी बोर्डाचे लेखा परिक्षण सहा वर्षापासून न केल्याबाबत**

**(१९) * ३३६३४ श्री.नरेंद्र पाटील , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.किरण पावसकर :**
सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई,ठाणे, रायगड जिल्ह्यात व्यवसायनिहाय लेखा परिक्षण व राज्यातील इतर जिल्ह्यातील असलेल्या माथाडी बोर्डाचे लेखा परिक्षण गत सहा वर्षापासून करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यातील व्यवसायाचे तसेच इतर जिल्ह्यातील माथाडी बोर्डाचे लेखा परिक्षण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ** : (१) अंशत: खरे आहे.
(२),(३) व (४)
मंडळांच्या लेखापरीक्षणातील विलंब टाळण्यासाठी दि.१७.७.२०१२ च्या शासननिर्णयानुसार लेखा परीक्षण पॅनल तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला असून लेखा परीक्षक पॅनल तयार करण्याची कार्यवाही चालू आहे. त्याद्वारे मंडळांच्या लेखा परीक्षणाचे काम पूर्ण करुन घेण्यांत येईल.

श्री. नरेंद्र पाटील : महाराष्ट्रामधल विविध माथाडी मंडळांचे ऑडिट न झाल्यासंबंधीचा प्रश्न मी विचारलेला आहे. काही माथाडी मंडळांचे ऑडिट 9-9 वर्षे झालेले नाही तर काही माथाडी मंडळांचे ऑडीत 5-5वर्षे झालेले नाही. ज्या माथाडी मंडळांच्या चेअरमनने इतकी वर्षे ऑडिट केले नाही त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ KTG/ D/ प्रथम श्री.देवदत्त 15:00

ता.प्र.क्र.33634...

श्री.नरेंद्र पाटील : माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराने माझे समाधान झालेले आहे.परंतु राहिलेले ऑडीट पुढील वर्षाच्या मार्च महिन्यापर्यंत पूर्ण होईल काय?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माथाडी कामगारांच्या सर्व अध्यक्षांना या बाबतीत पूर्वीच सूचना दिलेल्या आहेत. पूर्वी लेखा परीक्षकांसंबंधी मंत्रालयातून मान्यता घेण्यात येत होती, ती पध्दत आता बंद केलेली आहे. आता माथाडी कामगार मंडळाने लेखा परीक्षक नेमण्यासंबंधीचे अधिकार दिलेले आहेत. त्या लेखा परीक्षकांनी प्रत्येक वर्षाचे त्या त्या वर्षात ऑडीट केले नाही तर त्यांच्यावर कारवाई करण्यासंबंधीचे आदेश यापूर्वीच दिलेले आहेत.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-----------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) DD-2

**मानतीय मंत्री महोदयांच्या सभागृहातील उपस्थितीबाबत**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आज 19 तारांकित प्रश्नांवर चर्चा केली त्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. आज 19 प्रश्नांपर्यंत चर्चा होईल असे कोणालाही वाटले नाही म्हणून आम्ही गाफील राहणे समजू शकतो, परंतु माननीय मंत्री महोदय देखील गाफील राहतात या गोष्टीचे मला आश्चर्य वाटले. माननीय मंत्र्यांना सकाळी भेटावयास गेलो तर माननीय मंत्री महोदय हे ब्रिफींग घेत आहेत असे आम्हाला सांगितले जाते. कामगार मंत्री अचानकपणे सभागृहात आल्यामुळे त्यांच्या तारांकित प्रश्नावर चर्चा होऊ शकली. माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नव्हते म्हणून काल हे सभागृह आठ वेळा तहकूब करण्यात आले होते. आज सभागृहामध्ये माननीय मंत्री उपस्थित नसल्यामुळे तारांकित प्रश्न राखून ठेवावा लागला. मी या सभागृहात सदस्य म्हणून आल्यापासून प्रथमच बघितले की, मंत्री नसल्यामुळे प्रश्न राखून ठेवला गेला. माननीय सभापतींना माननीय मंत्र्यांनी विनंतीपत्र दिले तर तो प्रश्न पुढे ढकलण्यात येतो. शालेय शिक्षण राज्य मंत्री माननीय प्रा.फौजिया खान एका तारांकित प्रश्नाचे उत्तर देत होत्या. त्यांना उत्तरातील आकडा वाचता येत नव्हता. याचा अर्थ त्यांची तयारी नव्हती हे सिध्द झाले. त्यांना उत्तरातील आकडा सांगता येत नव्हता. आम्ही काहीही बोललो नव्हतो. आम्हाला निश्चित असा आकडा सांगा. त्यानी आम्हाला सांगितले की, आकडा सांगण्याची काही आवश्यकता नाही. तयारी न करता माननीय मंत्री महोदय सभागृहात उत्तरे देण्यासाठी येतात हे बरोबर नाही. या सदनाचा सन्मान राखला गेला पाहिजे. सरकारच्या मंत्र्याच्या अशा भूमिकांमुळे आम्हाला सतत अपमानास्पद व्हावे लागते. आम्ही तीन वेळा निवडून आलो, आम्हाला निवडणुकीत कोण पाडणार. आमच्याकडे लाल दिव्याची गाडी आहे, आम्ही उत्तर दिले काय आणि नाही दिले काय याच्याने काही फरक पडणार नाही. आम्हाला कोणी हात लावू शकणार नाही असे त्यांना वाटते. या राज्यात अशी परिस्थिती आलेली आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांना विधिमंडळाच्या अस्तित्वाबाबत विचार करावा लागेल अन्यथा येणाऱ्या एक-दीड वर्षांमध्ये येणाऱ्या अधिवेशनांमध्ये फार कठीण काळ तुम्हाला भोगावा लागेल हे मी आत्ताच सांगू इच्छितो.

3...



ABG/ D/ KTG/ KTG/ D/ प्रथम श्री.देवदत्त 15:00

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माझ्या नावाचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला असल्यामुळे मला बोलण्याची संधी द्यावी. मी तारांकित प्रश्नाची तयारी करुन आले नाही अशा प्रकारचा माझ्यावर हेत्वारोप करण्यात आलेला आहे. मी या ठिकाणी सर्व प्रश्नांची व्यवस्थितपणे उत्तरे दिलेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी जो हेत्वारोप केलेला आहे, तो कृपया रेकॉर्डमधून काढून टाकण्यात यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : सदर हेत्वारोप रेकॉर्डमधून काढून टाकण्यात येईल.

----------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांची तेरावी,चौदावी,पंधरावी,सोळावी,सतरावी, अठरावी,एकोणिसावी, विसावी, एकविसावी,बाविसावी, तेविसावी, चोविसावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची तेरावी, चौदावी,पंधरावी, सोळावी,सतरावी, अठरावी, एकोणिसावी, वीसावी, एकविसावी, बाविसावी, तेविसावी, चोविसावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची तेरावी, चौदावी,पंधरावी, सोळावी,सतरावी, अठरावी, एकोणिसावी, वीसावी, एकविसावी, बाविसावी, तेविसावी, चोविसावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात. )

--------

5...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.व मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** :वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, वांद्रे,मुंबई यांचा सन 2010-2011 या वर्षाचे वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

--------

श्री.भास्कर जाधव (माजी सैनिकांचे कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित,पुणे यांचा सन 2007-2008 या वर्षाचा सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

----------

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त यांचे तीन विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक निवेदनासह सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : तीन विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक निवेदनासह सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--------

6...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 1987 साली मंजूर झालेल्या पुणे शहराच्या विकास आराखडयाची अंमलबजावणी या विषयावरील श्री.अनिल भोसले व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिनांक 8 ऑगस्ट,2011 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

---------

7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे</u>

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सन 2012-2013 या वर्षाचे अर्थविवरण पत्रक व कामाचा कार्यक्रम आणि सन 2011-2012 चे सुधारित अंदाज सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** :सुधारित अंदाज सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

8...

**उप सभापती** : सन्माननीय वन मंत्र्यांनी फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड याचा अहवाल सभागृहासमोर ठेवावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड हे महाराष्ट्राच्या अखत्यारित आहे की खाजगी आहे. या सभागृहात तो अहवाल मांडण्यासाठी आलेला आहे याचा अर्थ ते महामंडळ राज्य शासनानेच आहे. सदर महामंडळाचे नाव इंग्रजीमध्ये का छापण्यात आले आहे ? सहा महिन्यात नाव बदलावे असा या सभागृहात ठराव झाला आहे. त्यामुळे हा अहवाल मांडता येणार नाही. सदर कंपनीचे नाव आणि अहवाल मराठीत असला पाहिजे. तशी सुधारणा करुन तो अहवाल सभागृहासमोर मांडला पाहिजे. या अहवालाच्या बाबतीत सुधारणा करुन पुढच्या अधिवेशनात तो अहवाल मांडावा.

**उप सभापती** : हा अहवाल सदना समोर आणला आहे, या अहवालातील वाक्यरचना इंग्रजी ऐवजी मराठी भाषेत रुपांतरीत करुन  दुरुस्तीसह सदर अहवाल सभागृहापुढे मांडण्यात यावा.

-------

9...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, औरंगाबाद आणि उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे सन 2011-2012 चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--------

श्री. राजेंद्र गावित (आदिवासी विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित,नाशिक-2 यांचा सन 2007-2008 या वर्षाचा नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुणे विद्यापीठाचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोलापूर विद्यापीठाचा सन 2009-2010 या वर्षाचा सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोलापूर विद्यापीठाचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** :अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा सेहेचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2011-2012 या वर्षाचा एकेचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा एकोणचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके व ठराव समितीचा अहवाल
सादर करणे व संमत करणे.

श्री.चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 21 डिसेंबर, 2012 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 20 डिसेंबर, 2012 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. त्यानुसार खालील अशासकीय विधेयकांना वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

पुर:स्थापनार्थ :

1. सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 15- महाराष्ट्र प्रसवपूर्व निदान तंत्राच्या वापराचे विनियम करण्याबाबत विधेयक 2012, डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांचे — 5 मिनिटे

(गतसत्रात घेतलेल्या बॅलेटमध्ये आलेली अशासकीय विधेयके)

2. सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 8- महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक 2011, श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांचे — 40 मिनिटे
3. सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 13- महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक 2011, श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांचे — 35 मिनिटे
4. सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 9- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक 2011, श्री.विजय सावंत, वि.प.स. यांचे — 35 मिनिटे
5. सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 4- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक 2011, श्री.विनोद तावडे, वि.प.स.यांचे-चर्चा अपूर्णावस्थेत. — 35 मिनिटे

**उप सभापती** : अशासकीय विधेयके व ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अशासकीय विधेयके व ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे

श्री.अनिल भोसले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा सव्विसावा, सत्ताविसावा व अठ्ठाविसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उप सभापती** : अंदाज समितीचा सव्विसावा, सत्ताविसावा व अठ्ठाविसावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

प्रा.सुरेश नवले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा दहावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उप सभापती** : लोकलेखा समितीचा दहावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-----

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे

श्री.रामनाथ मोते (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा अकरावा व बारावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उप सभापती** : पंचायती राज समितीचा अकरावा व बारावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाच्या पटलावर विविध अहवाल सादर केले जातात. परंतु अशा एखाद्या अहवालावर चर्चा करण्याची संधी आम्हाला मिळत नाही. आदरणीय सभापतींनी मागील अधिवेशनात सांगितले होते की, पुढील अधिवेशनात दिवस निश्चित करुन त्या दिवशी एखाद्या अहवालावर चर्चा ठेवण्यात येईल. जे विविध अहवाल सादर झाले आहेत ते मी वाचले. समित्यांचे जे कामकाज चालते त्या कामकाजामध्ये माननीय सदस्य सहभागी होतात. समित्यांच्या बैठकांमध्ये अधिकाऱ्यांच्या साक्षी पुराव्याची नोंद होत असते. त्यानंतर समितीच्या अहवालामध्ये व्यक्तींवर, खात्यावर किंवा बाबींवर शिफारस केली जाते. गेल्या दहा वर्षात अशा अहवालातील शिफारशींबाबत काय कारवाई झाली याची आम्हाला काहीही माहिती मिळालेली नाही. समितीपुढे साक्ष होत असताना अधिकाऱ्यांना निलंबित केले जाईल, चौकशी केली जाईल अशी चर्चा होत असते. परंतु अहवाल सादर केला जातो त्यातील शिफारशींबाबत काय होते हे कोणाला कळून येत नाही. आपण या संदर्भात सभागृहाला मार्गदर्शन करावे. अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्यानंतर त्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी झाली किंवा नाही हे सभागृहाला कळून येण्यासाठी कोणता मार्ग असावा हे आम्हाला आपल्याकडून अपेक्षित आहे.

**उप सभापती** : आपली मागणी योग्य आहे. या संदर्भात निश्चितपणे आपल्याला जी कार्यवाही अपेक्षित आहे ती करण्याच्या संदर्भात मी माननीय सभापतींशी चर्चा करेन आणि त्यातून मार्ग काढण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो मुद्दा मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. अधिवेशन काळातील पहिला आठवडा कामकाज न होऊ शकल्यामुळे वाया गेला आहे. तो वाया गेलेला वेळ आम्ही भरुन काढला आहे.

...6...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..........

या आठवड्यात दररोज सकाळी विशेष बैठकीच्या माध्यमातून व रात्री उशिरा कामकाज चालवून जास्तीत जास्त कामकाज पूर्ण करण्यास आम्ही सहकार्य केले आहे. काल तीन-चार वेळा सभागृहात मंत्री महोदय उपस्थित नव्हते, त्यामुळे कामकाज राखून ठेवण्यात आले तर काही वेळेला सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागले होते. सत्ताधारी पक्ष विदर्भाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत आहे. सत्ताधारी पक्षाचा विदर्भाकडे पाहण्याचा दृष्टीकोन योग्य नाही. त्यामुळे माझी मागणी आहे की, पुढील अधिवेशनाच्या कामकाजामध्ये 75 टक्के कामकाज हे विदर्भाशी संबंधित असावे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, मागील आठवड्याचा संपूर्ण कालावधी यांनी वाया घालविला आहे. सरकारची अधिवेशन चालविण्याची तयारी होती. माननीय सदस्यांनी केलेले आरोप मागे घ्यावेत अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी माझे वक्तव्य ऐकले नाही असे मला वाटते. मागील आठवड्यात सभागृहाचे कामकाज होऊ शकले नाही. सभागृहाचा वेळ वाया गेला. या आठवड्यात विशेष बैठक व उशिरा कामकाज करुन आम्ही मागील आठवड्याचे कामकाज पूर्ण करण्यास सहकार्य केले आहे. त्यामुळे पुढील अधिवेशनात कामकाजपत्रिकेवरील 75 टक्के कामकाज हे विदर्भाचे असले पाहिजे अशी माझी सूचना आहे. विदर्भाला त्या माध्यमातून न्याय दिला पाहिजे.

सभापती महोदय, वित्त राज्यमंत्री यांनी आमदार निधी वाढवून दिला जाईल असे जाहीर केल्याबद्दल वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे. अधिवेशन सुरु असताना हा निर्णय सभागृहाला कळलेला नाही. तो सभागृहाचा अधिकार आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मुद्दा मांडत असताना मंत्री महोदय सभागृहात नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागले असे म्हटले आहे. एखाद्या विभागाच्या मंत्रीमहोदयांना सभागृहाच्या कामानिमित्त विधानसभेत थांबणे आवश्यक झाले तर ते या सभागृहात उपस्थित राहू शकत नाहीत. तसे घडल्यामुळे मंत्री महोदय या सभागृहात उपस्थित राहू शकले नव्हते ही वस्तुस्थिती आहे. म्हणून माझी विनंती आहे की, माननीय सदस्यांचे वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे.

**उप सभापती** : अशा गोष्टी होत असतात. आपण मोकळ्या मनाने मान्य करायचे असते.

...7...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>शासकीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे निमंत्रण माननीय सदस्यांना न मिळणे</u>**

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या मंत्री व राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. काल महाराष्ट्र शासनाने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्काराचे वितरण केले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे कार्य काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आहे याची आपल्याला कल्पना आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

सुदैव असे आहे की, या विभागाचे मंत्री पद व राज्य मंत्री पद महिलांना मिळाले आहे. पुरस्काराचे वाटप होतांना विधानमंडळाच्या कोणत्याही सदस्यांना कळविण्यात आले नव्हते, बोलाविण्यात आले नव्हते. काल वर्तमानपत्रात जाहिरात वाचली व त्यामध्ये पुरस्कार वितरणाची वेळ सकाळी 10 ते 4 अशी देण्यात आली होती. मी पुरस्कार वितरण सोहळयाच्या ठिकाणी दुपारी 3.00 वाजता गेलो होतो परंतु तेथे काहीही नव्हते. त्यामुळे मी मंत्रीमहोदया वर्षा गायकवाड यांना फोन लावला तेव्हा त्यांनी सांगितले की, आम्ही सकाळी 10.00 वाजताच कार्यक्रम उरकून टाकला आहे. जर असा प्रकार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या पुरस्काराच्या बाबतीत होणार असेल तर ते बरोबर नाही. पुरस्कार सुरु करण्यासाठी आम्ही अनेक वर्ष प्रयत्न केले आहेत. अशा कार्यक्रमामध्ये लोकप्रतिनिधी म्हणून सन्माननीय सदस्यांना बोलावले गेले पाहिजे, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचे पाईक म्हणून आम्हाला बोलावले पाहिजे, आमचा अधिकार डावलण्यात येऊ नये एवढीच आमची विनंती आहे.

प्रा. वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री ) : सभापती महोदय, मी कधीही उध्दटपणे बोलत नाही. पुण्यश्लोक अहिल्याबाई पुरस्कारासाठी माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्री येऊ शकले नाहीत. सन्माननीय राज्यमंत्री 2.00 वाजता आल्या, आम्ही तेथे 2.30 वाजेपर्यंत होतो. उलट सन्माननीय सदस्यांना कार्यक्रमाच्या ठिकाणी येण्यास विलंब झाला. भविष्यामध्ये अशा कार्यक्रमांसाठी सर्व आमदारांना पत्रिका देण्यात येतील. पुढच्या वेळेस सभागृहातच सर्वाना निमंत्रण पत्रिका दिल्या जातील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सदनामध्ये शासनाने संयमाने काम केले पाहिजे. विरोधी पक्षाचे किंवा इतर सदस्यांचे काय म्हणणे आहे हे शांतपणे ऐकून मंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे. आपण माननीय मुख्यमंत्र्यांकडून संयम कसा पाळायचा असतो ते शिका.

सभापती महोदय, यासंदर्भात मला एकच खुलासा करावयाचा आहे की, आमचे सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे, जय भिम यांनी असा उल्लेख केला की, आम्ही पहिल्या आठवडयात

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

कामकाज होऊ दिले नाही. त्यांना मी सांगू इच्छितो की, अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयात आम्ही कामकाज केले नाही असे ते म्हणत असले तरी पहिल्या आठवडयात प्रश्नोत्तरे तसेच डॉ.बाबासाहेबांच्या स्मारकाच्या संदर्भातील पूर्ण चर्चा झाली, सगळयांनी आपले अभिनंदन केले. ही संधी आम्ही तुम्हाला दिली होती त्याचे थोडे तरी ऋण माना.

**उप सभापती** : मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक मी अर्ध्या तासासाठी स्थगित करीत आहे.

( दुपारी 3.23 ते 4.00 मध्यंतर)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरा नंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

**नियम 93 अन्वयेचे निवेदन पटलावर ठेवण्याबाबत.**

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली होती तिला अनुलक्षून शासनाने निवदेन करावे असे निदेश आपण दिले होते. पण तेच सन्माननीय आता सदस्य सभागृहात उपस्थित नसतील तर ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास अनुमती देण्यात यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे. ते निवेदन आपण सभागृहाच्या पटलावर ठेवावे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मुंबईतील कामगार नगर नं.1,न्यू प्रभादेवी रोड या वस्तीतील लोकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण याबाबत श्री.रामदास कदम, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 26 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, कालची नियम 93 अन्वयेची निवेदने आज घेण्यात येतील असे मला माननीय सभापती महोदयांनी सांगितले होते. ती निवेदन आज आपण घेणार आहात की नाही या बाबत आम्हाला अवगत करावे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कालची नियम 93 अन्वयेची निवेदने उद्या घेण्यात येतील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : व्यवसाय शिक्षण संस्थेने रूपये 1 ते 2 लाख इतकी अनामत रक्कम शासनाकडे जमा करणे याबाबत श्री.कपिल पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 21 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळातर्फे व्यावसायिक अभ्यासक्रमाचे विविध कोर्सेस चालतात. हे कोर्सेस अत्यंत गरीब मुलांसाठी असतात. जी मुले शाळेत शिकत नाही, पुढचे उच्च शिक्षण घेऊ शकत नाही ती हे कोर्सेस करीत असतात. हे कोर्सेस व्यवसाय शिक्षण देणाऱ्या संस्थांमार्फत शिकविले जातात. अशा संस्थांकडून शासन आता रूपये 1 ते 2 लाख इतकी रक्कम अनामत म्हणून घेणार आहे. आपण असे जर केले तर या संस्था चालू शकणार नाही. त्यामुळे ही जी अट आहे ती आपण ताबडतोब रद्द केली पाहिजे. ही कल्पना कोणाच्या डोक्यातून आली आहे ? एका बाजूला राज्य शासन म्हणते की, गरिबांना सवलती दिल्या पाहिजेत. हे कोर्सेस करणारी मागासवर्गीय, गरिबांची, शेतकऱ्यांची, कामगारांची मुले असतात. त्यांची सोय करण्या ऐवजी आपण जी लाख दोन लाख रूपयांची अट घालत आहात ती ताबडतोब रद्द केली पाहिजे. तसेच, फी मध्ये देखील सवलत दिली पाहिजे. कारण फी प्रचंड आहे. त्याची पुनर्रचना करावी. अनेक ठिकाणी संस्था जाणीवपूर्वक बंद करण्याचा उद्योग सुरू झालेला आहे. श्री.आसावा नावाचे अधिकारी आहेत त्यांना आपण आधी बदलावे किंवा त्यांना समज द्यावी. त्यांना इतरत्र काम द्यावे. हे जे मंडळ आहे ते गरिबांसाठी चालले पाहिजे अशी माझी मागणी आहे. हे कोर्स कोकणातील अनेक गरीब मुले शिकत आहेत. विदर्भ,मराठवाड्यात अशा संस्था जास्त आहेत. त्यामुळे आपण सहानुभूतीपूर्वक विचार करावा.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी अतिशय महत्त्वाचा मुद्दा येथे मांडला आहे. राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळातर्फे चौथी पासून ते दहावी पास पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी विविध कोर्सेस चालविले जातात. हे कोर्सेस सहा ते दोन वर्षाचे असतात. हे कोर्सेस शासकीय तंत्र शाळेतून चालविले जातात. त्यांना अल्पदरात शिकविले जाते. या कोर्सची वर्षभराची फी रूपये 180/- इतकी आहे. तसेच 2658 संस्थांमधून देखील विविध कोर्सेस चालविले जातात. यात साधारण 63 हजार विद्यार्थी असतात. हे कोर्सेस कायम स्वरूपी विना अनुदानावर चालविले जातात. हे कोर्सेस कायम विना अनुदानावर चालत असल्यामुळे आपण फी स्ट्रक्चर देऊ शकलो नव्हतो. आता आम्ही प्रस्ताव तयार केला आहे की, कायम विना अनुदानित संस्था खर्च करते त्या अनुषंगाने त्यांची फी किती असावी हे आम्ही प्रिस्क्राईब्ड करणार आहोत. येत्या महिन्या भरात त्या त्या संस्थेला ती फी कळविणार आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..6

श्री.डी.पी.सावंत...

सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न संस्थांकडून घेत असलेल्या अनामत रकमेसंबंधीचा आहे. आम्ही त्यांच्याकडून डिपॉझिट घेणार आहोत. काही संस्था अशा असतात की,, त्या मध्येच बंद करून जातात. त्यामुळे प्राध्यापकांचे मानधन बुडते. मुलांचे कोर्सेस बुडतात. अशा संस्थांना आळा घालण्यासाठी आपण एकेक लाख रूपये डिपॉझिट ठेवतो. जेव्हा संस्था बंद करतील त्यावेळी त्यांची देयके नसतील तर ते डिपॉझिट त्या संस्थेला आपण परत करतो. हे डिपॉझिट जास्त वाटत असेल तर शासन त्यावर नक्की विचार करेल आणि डिपॉझिट कमी करण्याचा प्रयत्न करू.

....

..7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : नागपूर जिल्ह्यात सार्वजनिक व्यवस्थे अंतर्गत अन्नधान्याची वाहतूक करणाऱ्या कंत्राटदाराने शासनाकडे केलेली दरवाढीची मागणी याबाबत सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, भगवान साळुंके, डॉ.रणजित पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 24 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...8 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सदर प्रश्न हा नागपूर सार्वजनिक वितरण व्यवस्थेशी संबंधित आहे. सन 2006 पासून नियमित कंत्राटदार नियुक्त होऊ न शक्ल्यामुळे भाडे तत्त्वावर कंत्राटदार नेमला असून बीपीएलच्या नागरिकांना अन्नधान्याचा पुरवठा करीत आहोत. यासंबंधी दर सहा महिन्यांनी तक्रारी येत आहेत. सन 2005 सालचे दरपत्रक दिले होते ते जुने व अव्यवहार्य आहे. हा प्रश्न या सदनामध्ये तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून देखील उपस्थित झाला होता. बीड व इतर जिल्ह्यातील ठेकेदाराला सुधारित दर वाढवून दिलेले आहेत त्याच धर्तीवर नागपूर जिल्ह्यासाठी या कंत्राटदाराला वाढीव दर लागू करणार आहात काय व त्या संबंधीचा निर्णय शासन 15 दिवसात घेणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मधल्या काळात काही कंत्राटदार हायकोर्टात गेल्यामुळे टेंडर काढायला विलंब झालेला आहे. आता हायकोर्टाने केस डिसाईड केलेली आहे. त्यामुळे रितसर टेंडर निघत आहे. नागपूरचे वाहतूक कंत्राटदार, एकाच दराने अनेक वर्षापासून अन्नधान्याचा पुरवठा करीत आहेत त्यामुळे दरामध्ये वाढ करावी अशी मागणी करीत आहेत. नुकतीच 21 नोव्हेंबर रोजी मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्यात होल सेल इंडेक्स प्रमाणे त्या त्या जिल्ह्यातील वाहतूकदारांना त्यांचा दर वाढवून दिला पाहिजे असा निर्णय झाला. त्या कंत्राटदाराने केव्हा अर्ज केला आहे हे सर्व पाहून पुढील कार्यवाही करण्यात येईल. कारण हा निर्णय नुकताच झ ालेला आहे. त्यामुळे त्यांनी कधी अर्ज केला आहे या सर्व गोष्टी पाहून मग निर्णय घेऊ.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, मागील पाच वर्षापासून राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया....

सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी मागच्या वेळी लक्षवेधी सूचनेवरील प्रश्नोत्तराच्या वेळी सांगितले होते की, 15 दिवसात प्रत्येक जिल्ह्यामध्ये एकसूत्रता आणू. बीड आणि उस्मानाबादमध्ये 40 टक्के आणि 20 टक्के दर वाढवून दिले आहेत.माझा प्रश्न असा आहे की, संपूर्ण जिल्ह्यातील बीपीएल आणि एपीएलच्या लोकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत धान्य पुरवठा करता येत नाही. त्याकरिता त्या ठिकाणी एकसूत्रता आणून त्यामध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश करणार काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, एकसूत्रता आणण्याचा निर्णय घेतला आहे. होलसेल प्राईस इंडेक्सप्रमाणे दर वाढवून देऊन त्यामध्ये नागपूरचा देखील समावेश करु.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी./मु. शी.** : महामंडळांनी त्यांचे वार्षिक अहवाल सी.डी.व्दारे वितरित करणे याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, विविध महामंडळांचे अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात. त्यानंतर त्या अहवालांच्या प्रती सन्माननीय सदस्यांच्या पिजन होलमध्ये टाकण्यात येतात. त्यामध्ये फार मोठया प्रमाणावर कागद वाया जातात. एकप्रकारे पर्यावरणाच्या दृष्टीने ही बाब योग्य नाही. म्हणून त्यावेळी मी माननीय सभापतींकडे हे अहवाल सी.डी. च्या स्वरुपात सर्व सन्माननीय सदस्यांना वितरित करण्यात यावेत अशी मागणी केली होती. आज मला या ठिकाणी नमूद करण्यास आनंद होत आहे की, महाराष्ट्र राज्य माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सहावा अहवाल सी.डी. व्दारे वितरित करण्यात आला आहे व त्याच्या प्रती देखील त्यांनी वितरित केल्या आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण मंडळ यांनी मराठी व इंग्रजी डेटा सी.डी. च्या स्वरुपात सर्व सन्माननीय सदस्यांना वितरित केले आहेत. याबद्दल मी या दोन्ही मंडळांचे अभिनंदन करतो. अशाप्रकारे या पुढील काळात सर्व महामंडळांनी आपले अहवाल सी.डी. च्या स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवावेत. कायदेशीरदृष्टया मुद्रित स्वरुपामध्ये अहवाल आवश्यक असेल त्या व्यतिरिक्त इतर अहवाल सी.डी. च्या स्वरुपात सन्माननीय सदस्यांना वितरित केले तर पर्यावरणाचा समतोल साधण्यास मदत होईल. ही बाब विशेष उल्लेखाव्दारे मी सभागृहापुढे मांडीत आहे."

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विशेष उल्लेखांची यादी सभागृहासमोर ठेवणे

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : आज गुरुवार, दिनांक 20 डिसेंबर, 2012 रोजी सभागृहात उपस्थित करण्यासाठी अनुमती दिलेले विशेष उल्लेख पटलावर ठेवण्यात येतील.

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री. दिवाकर रावते, डॉ. सुधीर तांबे सर्वश्री. सतीश चव्हाण, सुभाष चव्हाण, संदिप बाजोरिया, चंद्रकांत पाटील, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री विक्रम काळे, मोहन जोशी, संजय दत्त, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. दीपक सावंत यांनी दिलेले विशेष उल्लेख सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

(प्रेस :- येथे सोबत जोडलेले विशेष उल्लेख छापावेत.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचनेवरील निवेदनाबाबत

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, काल नियम 93 अन्वये सूचनेवरील निवेदन पुकारण्यात आले त्यावेळी माझ्या नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या सूचनेवरील निवेदन उद्या चर्चेकरिता घेण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले होते. सदर निवेदन आज सुध्दा चर्चेकरिता घेण्यात आले नाही. उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे ते पटलावर ठेवता कामा नये, त्या निवेदनावर आम्हास प्रश्न विचारण्याची संधी मिळावी एवढीच विनंती आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे, ते निवेदन उद्या चर्चेकरिता घेण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**. : राज्यातील बऱ्याच भागात विशेषत: विदर्भ व मराठवाड्यात पाऊस कमी झाल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती

**मु.शी** : राज्यातील बऱ्याच भागात विशेषत: विदर्भ व मराठवाड्यात पाऊस कमी झाल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती या विषयावर सर्वश्री सुभाष चव्हाण, विक्रम काळे, मोहन जोशी, किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतीश चव्हाण, संजय दत्त, रमेश शेंडगे, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री. अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.एम.एम.शेख, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. शरद रणपिसे, प्रकाश बिनसाळे, अमर राजुरकर, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री जयवंतराव जाधव, राम पंडागळे, प्रा.सुरेश नवले, श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु...)

डॉ. पतंगराव कदम (मदत व पुनर्वसन मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा घडवून आणली. त्यामध्ये प्रामुख्याने माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले, सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, अमरसिंह पंडीत, डॉ. सुधीर तांबे, माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील, दीपक साळुंखे, चंद्रकांत पाटील, विनायक राऊत, सतीश चव्हाण, विजय सावंत, माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे, माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, सर्वश्री रमेश शेंडगे, धनंजय मुंडे, प्रभाकर घार्गे, ॲड. जयदेव गायकवाड, माननीय सदस्य सर्वश्री भगवानराव साळुंखे, विक्रम काळे अशा अनेक सन्माननीय सदस्यांनी अत्यंत पोटतिडिकीने आपले विचार मांडले.

सभापती महोदय, एखादे दुसरे वर्ष सोडले तर दुर्दैवाने सातत्याने या राज्यामध्ये दुष्काळ पडत आहे. गेल्या वर्षी पडलेला दुष्काळ या वर्षी कंटिन्यू राहिला आहे. गेल्या वर्षी राज्याच्या ज्या भागामध्ये दुष्काळ होता त्याच भागामध्ये या वर्षी दुर्दैवाने पुन्हा दुष्काळाचे संकट आले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या अनेक भागामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झालेला आहे. या संदर्भात मी मराठवाडयातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची औरंगाबादला एक बैठक घेतली होती. त्या भागामध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम....

पुढील काही महिन्यात पिण्याच्या पाण्याची परिस्थिती अत्यंत कठीण होणार आहे. त्याचप्रमाणे पश्चिम महाराष्ट्राच्या सातारा, सांगली या तालुक्यांमध्ये माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते भेट देऊन व पहाणी करुन आले. माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे हे स्कूटरवर जाऊन पाहणी करुन आले. तावडे साहेब, तुमची ही नाटके बंद करा हो, काही तरी कामे खरोखरच करा. तुम्ही स्कूटरवरुन गेलात मला आनंद आहे. तुम्ही आमचे मित्र असल्यामुळे मी तुमचे कौतुक केले. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाल्याप्रमाणे आपण राजकारणाच्या पलीकडे जाऊन या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. लोकांच्या अडचणी, समस्या सोडविण्यासाठी आपल्याला कसे पुढे जाता येईल याचा आपण विचार केला पाहिजे.

संकटात सापडलेल्या माणसाला मदत करणे हे महाराष्ट्राचे कल्चर आहे. आपण शासनामध्ये बसत असलो, विधिमंडळामध्ये बसत असलो तरी प्रत्यक्षात गावामध्ये परिस्थिती फार वेगळी आहे. त्या परिस्थितीला तोंड देण्याचा विचार या सरकारने सुरुवातीपासून केला आहे. आम्ही या करिता ऑगस्ट पासून तयारी केली पाहिजे असे ज्यावेळी आपण सांगतो त्यावेळी ऑगस्ट हा टंचाईच्या बाबतीत विचार करावयाचा महिना नाही. आम्ही 22 ऑगस्टला एक जी.आर. काढला व त्याप्रमाणे ठिकठिकाणी चारा डेपो सुरु केले. जिल्हाधिकाऱ्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासंबंधी सर्व अधिकार दिले. अधिकाऱ्यांनी स्पॉटवर जाऊन त्या ठिकाणी निर्णय घेतला पाहिजे या करिता ते अधिकार प्रांताधिकारी व तहसीलदार यांच्यापर्यंत दिले गेले. प्रत्येक वेळी जिल्हाधिकारी व आयुक्तांकडून त्याबाबतची माहिती घेतली. माझ्या अध्यक्षतेखाली सब कमिटी नियुक्त करण्यात आली. मी अनेक पालक मंत्र्यांना सांगितले की, जे सदस्य नाहीत त्यांनी देखील या सब कमिटीच्या मिटींगला उपस्थित राहण्यास हरकत नाही. आपापल्या भागामध्ये पिण्याचे पाणी, जनावरांना चारा आणि रोजगार हमी योजनेचे काम या तीन गोष्टींची नेहमी मागणी असते. मागेल त्याला काम मिळाले पाहिजे, जनावरांसह पाणी मिळाले पाहिजे, जनावरांना चारा मिळाला पाहिजे. तो पुरविण्याबाबत अधिकाऱ्यांना सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

गेल्या वर्षी मोठया जनावराला 40 रुपये दर होता तर छोटया जनावराला 20 रुपये दर होता तो वाढवून या वर्षी आम्ही मोठया जनावराला 80 रुपये दर केला व छोटया जनावराला 40 रुपये दर केला. शेतकऱ्याचे पशुधन जगले पाहिजे, टिकले पाहिजे या करिता सुरुवातीला पंचायत समितीच्या गणामध्ये छावण्या सुरु करण्यास परवानगी दिली.



DGS/ D/ KTG/ 16:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम....

त्यानंतर आवश्यकतेनुसार अधिक छावण्या सुरु करण्यास हरकत नाही असे जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले. त्याप्रमाणे महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी छावण्या निघाल्या.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम . . . .

त्यानंतर पैसेवारी जाहीर केली.त्याप्रमाणे नाशिक विभागातील ...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याबाबतीत विभागवार माहिती द्यावी.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी जिल्हावार माहिती सांगतो. आपला जिल्हा सोडला तर अमुक ठिकाणी टंचाई आहे, अमुक ठिकाणी टँकर सुरु करावयाचे आहेत अशी विदर्भातील कोणत्याही जिल्हाधिका-यांकडून मागणी आली नाही. फक्त याबाबतीत बुलढाणा मधून मागणी आली आहे.

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : मराठवाड्याच्या बाबतीत काय ?

डॉ.पतंगराव कदम : सन्माननीय सदस्यांनी थोडे थांबावे. एवढी कसली घाई आहे. मी सांगू इच्छितो की, दिनांक 25-11-2012 रोजीच्या शासन निर्णयानुसार नाशिक विभागामध्ये 2073 गावे, पुणे विभागामध्ये 1283 गावे, औरंगाबाद विभागामध्ये 2894 गावे असून ही माहिती 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांच्या संबंधातील आहे. आज रोजी शासनाने 6250 गावात 50 पैशापेक्षा कमी सुधारित हंगामी पैसेवारी घोषित केली आहे. राज्यात 842 गावे आणि 3467 वाड्याना 1210 टँकरव्दारे पाणी पुरवठा केला जात आहे. जनावरांचे चारा डेपो दि.16-8-2012 पासून बंद करण्यात आले आहेत. चारा डेपोसाठी आतापर्यंत 366 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. आज रोजी राज्यामध्ये जनावरांच्या 335 छावण्या असून त्यामध्ये 2 लक्ष 35 हजार 622 मोठी व 3 लाख 484 हजार लहान अशी मिळून 2 लाख 66 हजार 116 जनावरे आहेत. जिल्हानिहाय छावण्यांची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे. अहमदनगरमध्ये 107, उस्मानाबाद आणि जालना येथे 2, बीडमध्ये 5, पुणे येथे 1, सातारामध्ये 90, सांगलीमध्ये 19, सोलापूरमध्ये 119 इतकी असून छावणीवर झालेला खर्च 122 कोटी रुपये इतका आहे. आज अखेर पर्यंत केलेला एकूण खर्च 489 कोटी इतका आहे.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत 19,445 कामे सुरु असून, 1 कोटी 1 लाख 4000 मजूर काम करीत आहेत. पाणी पुरवठा विभागामध्ये पाणी टंचाईकरता व विविध उपाययोजना केलेल्या आहेत तसेच टँकरसाठी 168 कोटी रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे.तसेच जिल्हावार टँकरची स्थिती अशी आहे की, नाशिकमध्ये 32,जळगावमध्ये 21, अहमदनगरमध्ये 193, पुणे 45, सातारा 186, सांगली 111, सोलापूरमध्ये 289, औरंगाबादमध्ये

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

117, जालना 85, बीड 85, नांदेड 4, उस्मानाबाद 98 आणि बुलढाणा 14 अशा एकूण 13 जिल्हयातील  टँकर्स्ची संख्या 1210 आहे. टंचाईसाठी एकूण किती निधी दिला तर एमआर-ईजीएसच्या कामांसाठी एकंदर 1261 कोटी इतका खर्च झालेला आहे आणि एकंदर कामाचे दिवस 5 कोटी 38 लाख इतके आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यामध्ये राज्याचा निधी किती आणि केंद्र शासनाचा निधी किती आहे?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडेसाहेब यांच्या भाषणामध्ये दुष्काळासाठी जमीन महसूल, फी माफी, कर्ज वसुली इ.सवलती देण्यात याव्यात अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. त्या दहा सवलती मंजूर करण्यात आलेल्या आहेत. तथापि सन्माननीय सदस्यांना असे आश्वासित करण्यात येते की, 31 तारखेला अंतिम पैसेवारी होईल. त्याबाबतीत काही अडचण येणार नाही. माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी चारा वाहतुकीच्या बाबतीत अतिशय इंटरेस्टटींग आणि भयानक कथा सांगितली. त्याबाबत ताबडतोब सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्याचे आदेश दिलेले असून माननीय गृहमंत्र्यांनी खालच्या स्तरापर्यंत आदेश पोचविले आहेत. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपल्याला जर असे प्रकार होत असल्याचे दिसले तर ते आमच्या निदर्शनास आणून द्यावेत. याबाबतीत कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. "somebody's opportunity" असे जे होते ते बिलकूल खपवून घेतले जाणार नाही. म्हणून त्यासंबंधीच्या तक्रारी माझ्याकडे द्याव्यात.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय,मी याठिकाणी नोटीस दिलेली नाही म्हणून सन्माननीय सदस्यांचे नाव घेत नाही. पण एका सन्माननीय सदस्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे 50 कोटीची बिले दिली आहेत आणि जिल्हाधिकारी यांनी सर्व तपासल्यानंतर ते बिल 4 कोटी पर्यंत आणले आहे. मी त्यांचे नाव देईन. मी लेखी तक्रार देईन.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी याची चौकशी करतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, . . . .

डॉ.पतंगराव कदम : मी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, जरा थांबा. सन्माननीय सदस्यांनी जे मत व्यक्त केलेले आहे त्याबाबत उत्तर दिल्यानंतर मी इतर





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुद्यांकडे येतो. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी दुष्काळ पडू नये यासाठी शासनाने चिंतन करण्याची गरज आहे असे सांगितले आणि ही गोष्ट खरी आहे. राज्यामध्ये दुष्काळ निर्माण झाला की आम्ही चारा, पिण्याचे पाणी देतो. पण अशा वेळी अनेक कमिट्यांनी दुष्काळी तालुक्यांची यादी तयार केली आहे. परंतु आता याबाबतीत ठोस निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे.यासंबंधात उद्या सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री स्टेटमेंट करतील. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते हे बाहेर निघून गेले आहेत. पण मी त्यांची भानगड काढणार होतो. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. श्री.दिवाकर रावते यांनी सांगली जिल्ह्याच्या आणि महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत धक्कादायक बातमी दिली. त्यांनी असे सांगितले आहे की, सांगली जिल्ह्याच्या जत तालुक्यातील 42 गावे दुष्काळाला कंटाळून कनार्टकमध्ये जाणार आहेत. तथापि मी अत्यंत नम्रपणे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांना सांगतो की, माझी कोणतेही चॅलेंज स्विकारण्याची तयारी आहे. मी त्या जिल्ह्याचा पालक मंत्री आहे. 15 ऑगस्टला झेंडा वंदन झाल्यानंतर माननीय श्री.दिवाकर रावते साहेब, त्या गावातील सर्व सरपंच, प्रमुख कार्यकर्ते ही बातमी आल्यावर बेचैन झाले. आमच्या मित्र पक्षाच्या एका बोगस नेत्याने हा उद्योग केला होता.

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : हा नेता कोण आहे ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, छोट्या-मोठ्या माणसाची नावे घेऊन त्यांना मोठे करण्याची गरज नाही. त्यांनी त्या बातम्या रेडिओ आणि टी.व्ही.वर दिल्या की, ही माणसे तिकडे जाण्यास निघाली आहेत. पण ती बिचारी माणसे मला 15 ऑगस्ट रोजी दुपारी भेटली आणि त्यांनी सांगितले की, या सगळया खोट्या बातम्या असून आम्हाला बदनाम केले जात आहे. आम्हाला जत, कवठेमहांकाळ दिलेला आहे, आम्ही कर्नाटकमध्ये कशासाठी जाणार, आम्ही वेडे आहोत काय? उलट त्या सीमेवरील लोक सातत्याने मागणी करीत आहेत की, आम्हाला तुमच्या भागामध्ये समाविष्ट करावे आणि आम्ही येथून कर्नाटकमध्ये कशासाठी जाणार. त्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांना सांगू इच्छितो की, ही कोणीतरी बोगस बातमी दिली. मात्र ही बातमी टी.व्ही.वर दाखविण्यात आली होती ही गोष्ट खरी आहे नंतर माझ्याशी माननीय श्री.उद्धवजी ठाकरे

4..



डॉ.पतंगराव कदम . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सुध्दा बोलले. ते म्हणाले की, तुम्ही तेथे कशासाठी गेलात? मी म्हटले की, अहो, त्या माणसाने मला हार घातला. ते म्हणाले की, हार घातला पण तो कोणी घातला? अशा प्रकारे माझे त्यांच्याशी बोलणे झाले.अशा प्रकारचे एलीमेंट समाजामध्ये, निरनिराळ्या पक्षामध्ये आहेत आणि ते अशाच प्रकारचे उद्योग करीत असतात.

श्री.रामदास कदम (खाली बसून) : राष्ट्रवादीचे लोक असे करीत असतात.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी असे कोणाबद्दल काही म्हणणार नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांना सांगू इच्छितो की, ही गोष्ट खरी नाही हे मला मुद्दाम आपल्याला सांगावयाचे आहे. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.पाडुरंग फुंडकर यांनी . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला कोणी शिकविलेले नाही. आम्ही शिवसेना प्रमुखांचे सैनिक आहोत. रोखठोक सांगावयाचे नाहीतर आरपार करावयाची आम्हाला सवय आहे.माननीय श्री.उद्धवजी ठाकरे 42 गावांमध्ये आले होते. त्याठिकाणी लोकांना बोलाविले होते आणि तेथे तीन ते साडेतीन हजार लोकांचा मेळावा झाला. याबाबतीत वर्तमानपत्रामध्ये बातम्या आल्या आहेत आणि तुम्हाला पाहिजे असेल तर त्याचे कात्रण मी तुम्हाला तुमच्या वाढदिवसाच्या दिवशी साभार देतो. तुमच्यात बगावत झाली होती. पण तुम्ही पालकमंत्री म्हणून सांभाळले असे आपण सांगितले तर आम्हाला अभिमान वाटेल की, मी पालक मंत्री आहे, मी स्वत: तेथे गेलो, त्यांच्याबरोबर बसलो, त्यांची समजूत काढली. पण असत्य बोलू नका आणि ते चुकीचे आहे असेही बोलू नका. मी तेथे होतो. त्याठिकाणी मेळावा झाला. सगळे सरपंच भेटले. मी तुम्हाला त्या सभेची व्हिडिओ कॅसेट देतो. लोक तुमच्याबद्दल काय बोलत होते. ते पहा आणि ऐका. तेव्हा या गोष्टी सदनाच्या पटलावर आणताना येथे काहीतरी बनवाबनवी सुरु आहे आणि तुम्ही सगळे खरे सांगत आहात अशा प्रकारचा ढोंगीपणा आणि साधुगिरी करण्याचा प्रयत्न करु नका. माननीय श्री.उद्धवजींना हार घातले म्हणून ते खुष झाले असे म्हटले आहे ते अत्यंत चुकीचे आहे. तुमचे पालक मंत्रीपद खोटे आहे म्हणून लोकांनी बगावत केली.तुम्हाला जे काही हिशोब चुकते करावयाचे आहेत ते तुम्ही राष्ट्रवादी पक्षाबरोबर करावेत. आम्हाला त्याबाबतीत काही देणेघेणे नाही.

5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, निरनिराळ्या मंत्र्यांनी, आमदारांनी तालुके घुसडले. पण सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदमसाहेब, ही वस्तुस्थिती फार वेळ टिकली नाही. कारण सुरुवातीला केंद्र शासनाला अपेक्षित होते की, तुम्ही दुष्काळ जाहीर करावा.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम .....

त्याची लगेच तपासणी झाली. तपासणी केल्यानंतर जी पैसेवारी आली ती फायनल जाहीर केलेली आहे. अवर्षण भागात डीपीएपीचे 75 टक्के पेरणी याच मुद्यावर तालुके घोषित करण्यात येत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी पीक पैसेवारीचे निकष बदलण्याची मागणी केली. आम्ही कृषी मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमलेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी मला पत्र दिले. आम्ही कमिटी नेमलेली आहे. पूर्वी भगवंतराव गायकवाड कमिटी नेमली, नारायण राणे कमिटी नेमली तरीही लोकांचे असे म्हणणे आहे की, त्यामध्ये दोष आहेत. त्यामुळे आता माननीय कृषी मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी स्थापन केलेली आहे. त्याचा जी.आर. काढलेला आहे.

श्री. रामदास कदम : ही कमिटी किती दिवसात निर्णय घेणार आहे ? आपण त्यांना कालावधी दिला पाहिजे.

डॉ. पतंगराव कदम : आम्ही त्यांना आपल्या साक्षीने विनंती करतो की त्यांनी लवकरात लवकर या बाबत निर्णय घ्यावा. पंधरा दिवसात वगैरे मी म्हणणार नाही. आम्ही एकदा त्यांच्याशी चर्चा करु. माननीय कृषी मंत्री शेजारी बसलेले आहेत. हे काम लवकरात लवकर करु असे ते म्हणत आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित, डॉ. सुधीर तांबे, श्री. धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील इत्यादी सर्व सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतला. या पुढचे दिवस भयानक येतील असे वाटावयास लागले आहे. कारण जानेवारी फेब्रुवारीमध्ये काय अवस्था होईल, मार्च, एप्रिल, मे महिन्यामध्ये काय अवस्था होईल या बाबतीत आपल्याला जून महिन्यापर्यंतचा विचार करावा लागेल. अन्नधान्याचा तुटवडा नाही पण बेसिक प्रश्न पिण्याच्या पाण्याचा आहे. त्या बाबतीत त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांना नियोजन करण्यास सांगितले आहे. पाण्याच्या बाबतीत पुढच्या महिन्यामध्ये तुम्ही काय करणार, त्याच्या पुढच्या महिन्यामध्ये काय करणार असे नियोजन करण्यास सांगितले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तुम्ही कार्यालयामध्ये दुष्काळी भागाच्या जिल्हावार बैठका घ्या. त्या बैठका तर मी घेईनच परंतु प्रत्येक जिल्ह्यामध्ये मी स्वत: जाईन.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

डॉ. पतंगराव कदम .....

प्रत्यक्षात कामाची कार्यवाही कशा पध्दतीने चालू आहे याचा आढावा घेईन. या सर्व परिस्थितीमध्ये माझी ठाम भूमिका आहे. सरकारच्या बजेटला कट लागला तरी चालेल परंतु अडचणीमध्ये असलेल्या लोकांना ठोस मदत झाली पाहिजे. मेहरबानी म्हणून नाही तर कर्तव्य म्हणून या अडचणीच्या काळामध्ये सरकारने त्यांच्या मागे उभे राहिले पाहिजे या भूमिकेतून आम्ही काम करणार आहोत. कॅबिनेट सबकमिटीमध्ये सदस्यांना जर आपल्या जिल्ह्याचे प्रश्न घेऊन यावयाचे असेल तर त्यांनाही माझे निमंत्रण आहे.

दर मंगळवारी दुपारी 3.00 वाजता मी कॅबिनेट सबकमिटीची बैठक घेतो. बुधवारला कॅबिनेटची बैठक असते. त्यामुळे फायनान्शियल इम्लिकेशन्स असतील तर कॅबिनेट त्याचा विचार करते. परंतु हा प्रश्न अतिशय कठीण आहे, लोकांच्या जिव्हाळ्याचा आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे यामध्ये राजकारण न आणता लोकांना खऱ्या अर्थाने मदत कशी होईल, त्याची शेवटपर्यंत अंमलबजावणी कशी होईल हे पाहणे आवश्यक आहे. कारण आम्ही फक्त आदेश काढते पण अंमलबजावणी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार हे अधिकारी करतात. त्या ठिकाणी अंमलबजावणी बरोबर होते की नाही या बाबतीत आपल्यापैकी कोणीही तक्रारी दिल्या तर त्याची चौकशी केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी मोठे प्रकरण सांगितले. ते प्रकरण आपण माझ्याकडे द्यावे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे प्रकरण सांगितले त्या बाबतीत काल चौकशी करण्याचे मान्य केले. त्या पध्दतीने आपण ते प्रकरण दिले तर त्याचीही चौकशी करण्यात येईल. या आपत्तीचा फायदा घेणारे जर कोणी असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : आपण ज्या दहा गोष्टींची घोषणा केली त्या दहा गोष्टी कोणत्या ते या सभागृहामध्ये सांगावे. जसा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सर्वात महत्वाचा आहे त्याच पध्दतीने दुसरा महत्वाचा प्रश्न म्हणजे शेतकऱ्यांचे विजेचे कनेक्शन कापणे सुरु झालेले आहे. आज सुध्दा आम्हाला फोन आले की, झपाट्याने विजेचे कनेक्शन्स कापले जात आहेत. दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांना सूट देऊन आपण त्यांचे विजेचे कनेक्शन कापावयास नको पण ते कनेक्शन कापण्यास सुरुवात केलेली आहे. त्या संदर्भात शासन काय करणार आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. शासनाने आदेश काढलेले आहेत. दहा सवलतींमध्ये हा विषय आहे की, दुष्काळी भागातील कनेक्शन्स तोडावयाचे नाहीत आणि तोडले असल्यास ते जोडावेत. पण वीज खात्याने अनेक ठिकाणी सरकारचे, कॅबिनेटचे निर्णय न मानता कनेक्शन्स तोडलेले आहेत. त्यावर दोन दिवस गंभीर चर्चा झाली. आताही कॅबिनेटमध्ये तीच चर्चा झाली. कॅबिनेटपेक्षा आणखी कोणता मोठा अधिकारी आहे का ? सकाळी या संदर्भात चर्चा झाली. विधानसभेतील विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथराव खडसे यांनीही मुद्दा उपस्थित केला होता. आपण आधीच 50 टक्के सवलत देतो. आता 33 टक्के सवलत देणार आहोत. या दहा गोष्टींमध्ये आपण ती 33 टक्केची सवलत देतो. म्हणून या ठिकाणी हे पैसे घेऊन कोणत्याही टंचाईग्रस्त गावातील कनेक्शन्स तोडता कामा नये. जर तोडले असतील तर ते जोडावयास लावू. या संदर्भात विधानसभेत मी एकट्याने उत्तर दिलेले नाही. कृषीची बाब असेल तर माननीय कृषी मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांना सांगितले. विजेच्या बाबतीत ऊर्जा मंत्री श्री. राजेश टोपे यांना सांगितले. तुमचे काय म्हणणे आहे ते मांडावे असे मी त्या त्या खात्याच्या मंत्र्यांना सांगितले. नाही तर मी जाहीर करणार आणि पुन्हा वीज तोडली जाणार हे आपल्याला चालणार नाही. हा प्रश्न गंभीर आहे. 50 पैशाच्या खाली पैसेवारी असणारी जी गावे आहेत, ज्या ठिकाणी टंचाई आहे त्या ठिकाणी एकंदर 50 आणि 33 म्हणजे 83 टक्के सवलत आपण देत आहोत. राहिलेले पैसे भरण्याची लोकांना थोडी सवय राहिली पाहिजे अशी अपेक्षा आहे.

प्रा. सुरेश नवले : माननीय मंत्री महोदयांनी अतिशय संक्षिप्त उत्तरात बरेच विवेचन केलेले आहे. पण त्यामध्ये सर्वात महत्वाचा विषय असा आहे की, ग्रामीण भागातील जे विद्यार्थी आहेत, दुष्काळग्रस्त भागातील जे विद्यार्थी आहेत त्यांच्या शैक्षणिक शुल्काचा अंतर्भाव यामध्ये आहे की नाही हे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी हा विषय उपस्थित केला होता. ही सवलत दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देत असताना मी काल जे महत्वाचे तीन मुद्दे उपस्थित केले होते त्या मुद्यांना स्पर्श होत असल्याचे त्यांच्या भाषणात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित ....

जाणवले नाही. दुष्काळी भागात आणि खासकरुन मराठवाड्यात एमजीनरेगामध्ये रोजगार हमीची जी काही कामे आहे त्यातील कोणतेही काम कमांडमध्ये करता येत नाही. आपल्याला जायकवाडीचा विषय सातत्याने दिसतो. त्याबाबत आपण सातत्याने ऐकतो.

काल शासनाने माननीय उच्च न्यायालयामध्ये शपथपत्र दाखल केलेले आहे की, आता जायकवाडीला एक थेंबभर सुध्दा पाणी मिळणार नाही. त्या पार्श्वभूमीवर काल मी जो मुद्दा स्पष्टपणे मांडला होता की, कमांडमध्ये जी काही कामे करता आली पाहिजेत ती कामे आता आपल्याला एमजीनरेगामध्ये करता येणार नाहीत. लाभक्षेत्रामध्ये रोजगार हमीची कोणतीही कामे करता येणार नाहीत. आपल्याला केवळ रस्त्याची कामे करता येणार आहेत. रस्ते करीत असताना आपल्याला भूसंपादन करावे लागते. भूसंपादनाचा कॉम्पोनंट एमजीनरेगामध्ये नाही. त्या ठिकाणी आपल्याला पाझ़ार तलावाची कामे करता येणार नाहीत. कारण तेच आहे की त्यामध्ये भूसंपादनाचा कॉम्पोनंट नाही. या पार्श्वभूमीवर आमचे अधिक अवलंबत्व, गेवराई तालुक्यातील अवलंबत्व, जालना जिल्ह्यातील अवलंबत्व, बीड जिल्ह्यातील थेट परळी ते माजलगावपर्यंतचे आमचे अवलंबत्व साधारणपणे 37 टक्के आहे. 37 टक्के अवलंबत्व असणाऱ्या भागात जर आम्हाला दुष्काळी कामेच करता येणार नाहीत. त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. आम्हाला पाणी आणावयाचे आहे. साधारणत: 50-50 किलोमीटर लांबून पाणी आणावे लागणार आहे. आम्हाला जर एमजीनरेगामधून कामे करता येणार नसतील तर त्या भागातील सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी काल सांगितल्याप्रमाणे जे सव्वाचार ते साडेचार लाख मजूर स्थलांतरित झालेले आहेत ते जेव्हा मार्चमध्ये परत येतील तेव्हा त्यांना काम राहणार नाही. या बाबत माननीय मंत्री महोदयांच्या भाषणामध्ये उल्लेख झालेला नाही. महाविद्यालयीन शुल्क, शालेय शुल्क या दोन्ही मुद्यांच्या संदर्भात आणि तिसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे जे काही शेतीचे कर्ज आहे त्या हप्त्यांचे पुनर्गठन या संदर्भात अतिशय महत्वाचा धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित...

सभापती महोदय, मी पुनश्च सांगतो. आमच्या कर्जाच्या हप्त्याचे आणि ते देखील शेतीच्या कर्जाच्या हप्त्याचे पुनर्गठन होणे गरजेचे आहे. काल सांगितल्या प्रमाणे 78 गावामध्ये पेरण्या झ ालेल्या नाहीत. आमच्याकडे रब्बी हंगाम होत नाही. आमच्याकडे खरिपाच्या कापसाची लागवड खोडव्यापर्यन्त जाते. आम्हाला रोजगार हमी योजनेची कामे मिळणार नाहीत. शैक्षणिक शुल्क भरण्यास पैसे नाहीत. कर्जवसुली बाबत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन आणि गावात दवंडी देऊन वसुली करण्याचे काम चालू आहे. 58 लोकांवर जिल्हा बँकेने केसेस दाखल केलेल्या आहेत. जनावरांना चारा नाही, लोकांना पिण्यासाठी पाणी नाही. अशा वेळी दुभती जनावरे शिल्लक राहाणार नाहीत. दोन वर्षापूर्वी घेतलेल्या गायीच्या कर्जाची वसुली आता करणार असाल तर विदर्भामध्ये जे होत ते नव्याने मराठवाड्यामध्ये होण्यास सुरुवात होईल. आत्महत्येचे सत्र मराठवाड्यात सुरु होईल. मी जे तीन मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याचा मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

डॉ. पतंगराव कदम : कमांड एरियामध्ये नरेगाची कामे करण्यास परवानगी दिलेली आहे. माझ्या अध्यक्षतेखाली 6 मंत्र्यांची कमिटी नेमली होती. नरेगाच्या कामाचे निकष शिथिल केलेले आहेत. शासनाने जे काही 10 निर्णय घेतलेले आहेत ते मी वाचून दाखवितो. जमीन महसूलात सूट दिलेली आहे. सरकारी कर्जाचे पुनर्गठन करण्याचे आदेश गेलेले आहेत. वीज बिलामध्ये 33 टक्के सूट दिलेली आहे. रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या कामांच्या निकषात बदल केलेले आहेत. परीक्षा शुल्क माफी दिलेली आहे.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, मी शैक्षणिक शुल्कात माफी द्यावी अशी मागणी केलेली आहे.

डॉ. पतंगराव कदम : शैक्षणिक शुल्क आणि परीक्षा फी माफी... तेच आहे.....शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यास टँकर आणि बैलगाडी मार्फत पाणी पुरवठा करणे, पाटबंधारे प्रकल्पातील पाण्याचे पिण्यासाठी अग्रहक्काने रिझर्व्हेशन केले जाईल. चारा डेपो ऐवजी चारा छावण्या केलेल्या आहेत. वीज जोडणी खंडित न करणे, खंडित केली असेल तर पुन्हा जोडणी करणे असे 10 आदेश आज जारी केलेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री. विनोद तावडे : माननीय मंत्री महोदयांनी मागील अधिवेशनामध्ये पॅकेज घोषित केले होते. आता केन्द्राकडे 3519 कोटी रुपयाची मागणी केलेली आहे. केन्द्रकडून जे काही पॅकेज मिळेल ते मिळेल. पण माननीय मंत्री महोदय, साडेतीन हजार कोटीचे पॅकेज घोषित करतील काय ? वीज बिल भरले नाही म्हणून कनेक्शन तोडण्यात आले. काल एका बैठकीत माननीय मंत्री महोदय प्रा. लक्ष्मण ढोबळे यांना सांगितले की, आपण आटपाडीला टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी जेवढे पैसे देतो त्याच्या निम्मी रक्कम वीज बिलांची आहे. लहान लहान योजनासाठी मंत्री महोदय पैशाची घोषणा करतील काय ?

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, काल मी माझ्या भाषणामध्ये एका गोष्टीचा उल्लेख केला तो म्हणजे मरठवाड्याला 18 वेळा दुष्काळाशी सामना करावा लागलेला आहे. हा दुष्काळ सुलतानी आहे. शासन निर्मित हा दुष्काळ आहे. भविष्यात राज्यामध्ये शासननिर्मित दुष्काळ होणार नाही यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ? मी माझ्या भाषणात काही उपाययोजना सुचविलेल्या आहेत. त्यामधील एक उपाययोजना अशी आहे की, छोट्या छोट्या नद्या नाल्यातील पाणी पाईपाद्वारे पाटबंधारे प्रकल्पात टाकले तर ते बंधारे पूर्ण क्षमतेने भरतील. समुद्रामध्ये जाणारे पाणी अशा त-हेने पाटबंधारे प्रकल्पात टाकले तर त्याचा चांगला उपयोग होईल. कोकणामध्ये सर्वात जास्त पाऊस पडतो आणि सर्वांत जास्त दुष्काळ कोकणामध्ये आहे. याबाबतीत मंत्रीमहोदय काय उपाययोजना करणार आहे. आपण कोकणासाठी जे पॅकेज जाहीर करता ते पैसे कोठे जातात हे तुम्हा आम्हाला माहीत आहे. हे पैसे अन्य कुणाच्या घशात न जाता ते शेतक-यापर्यंत कसे पोहोचतील यादृष्टीने खबरदारी घ्यावी.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे आणि सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी राज्यातील दुष्काळावर मात करण्यासाठी कायम स्वरुपी काय उपाययोजना करणार आहात असे विचारुन जी व्यथा व्यक्त केली, तशीच व्यथा विधानसभा सभागृहात देखील अनेक सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे. राज्यातील दुष्काळाच्या संदर्भात आमच्या सातत्याने बैठका होत आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदय उद्या यासंबंधी निवेदन करतील. स्व.वसंतराव नाईक हे या राज्याचे मुख्यमंत्री होते, त्यावेळी त्यांनी पाणी आडवा आणि पाणी जिरवा अशी घोषणा केली होती. पाणी अडविले पाहिजे, पाणी जमिनीत जिरविले पाहिजे यासाठी छोटे छोटे बंधारे

श्री.जयंत प्र.पाटील : जमिनीत पाणी जिरत नसून पैसा जिरतो आहे..

डॉ.दीपक सावंत : पैसा जिरतो आहे...

डॉ.पतंगराव कदम : पैसा जिरतो आहे असे माझे म्हणणे नाही. अशा लोकांना हुडकून काढून त्यांचे विरुध्द कारवाई करु. माझ्याकडून कोणत्याही अधिकाऱ्याची पाठराखण होणार नाही. दुसऱ्या मुद्याबाबत माहिती सांगू इच्छितो की, मी रायगड जिल्हयाचा पालक मंत्री असताना कोकणासाठी चार जिल्हयांच्या पालक मंत्र्यांची एक संघटना तयार केली होती. कोकणाच्या प्रश्नासंबंधी एकत्रित विचार केला गेला पाहिजे म्हणून संघटना तयार केली होती. कोकणात पाऊस भरपूर पडतो, परंतु ते सर्व पाणी वाहून जाते. त्यामुळे कोकणातील गावांमध्ये पिण्यासाठी पाणी नसते याची मला पूर्णपणे जाणीव आहे. कोकणात मोठी धरणे होणार नाहीत. तेथे छोटे छोटे बंधारे घेण्याची कल्पना सुरु झाली. माझ्याकडून रायगड जिल्हयाचे पालकमंत्रीपद काढून घेतले आणि माझी नेमणूक दुसऱ्या जिल्हयासाठी करण्यात आली व माझ्या पालकमंत्री पदावर दुसऱ्याची नेमणूक करण्यात आली. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेते म्हणाले राज्य शासनाने केंद्र सरकारकडे 3519 कोटी रुपयांची मागणी केली आहे. राज्य शासनाने केंद्र सरकारकडे 3200 कोटी रुपयांची मागणी केली आहे, केंद्राकडून पहिल्या हप्त्यात 572 कोटी रुपये मिळाले आहेत. दिनांक 22 व 23 नोव्हेंबर, 2012 रोजी केंद्र सरकारची कमिटी येऊन गेली. केद्र शासनाकडून आर्थिक मदत मिळाली तर अतिशय उत्तम आहे. परंतु हे शासन केंद्र सरकारच्या आर्थिक मदतीवर अवलंबून नाही. दुष्काळाच्या बाबतीत जो जो पैसा लागेल, तो पूर्ण खर्च करण्याची राज्य सरकारची तयारी आहे. बाकी एखादी योजना मागे राहील. परंतु टंचाईच्या लोकांना सरकार पैसा कमी पडू दिला जाणार नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : शेळया-मेंढयासाठी छावण्या सुरु करण्यात येतील काय या प्रश्नाचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तरच दिले नाही.

डॉ.पतंगराव कदम : जनावरांसाठी छावण्याचा विचार केला जातो. तसा शेळया-मेंढयांना चरण्यासाठी वन विभागात वेगळा भाग देण्याचे आमचे प्रयोजन आहे.

श्री.रमेश शेंडगे : शेळया-मेंढयांसाठी वेगळया छावण्या सुरु कराव्यात.

डॉ.पतंगराव कदम : तुम्ही तुमच्या तालुक्यात छावणीचा प्रयोग करुन बघा.

----------

3...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय कृषि मंत्र्यांचे उत्तर सुरु होण्यापूर्वी मला हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. मराठवाड्यातील पाणी टंचाईच्या बाबतीतील विषय या सभागृहात काल मांडला आहे. काल पासून दुष्काळावरील चर्चेवरुन असे निदर्शनास आले आहे की, मराठवाड्यात जेवढी पाणी टंचाई आहे तेवढी टंचाई महाराष्ट्रातील इतर भागात नाही. मराठवाडा पिण्याच्या पाण्यासाठी टाहो फोडत होता. त्या ठिकाणचे पालकमंत्री जे होते, त्यांनी परतीचा पाऊस आला तर पाणी देऊ असे सांगितले. आमचे पाणी वर अडविले आहे. अडविलेले पाणी खालच्या गावांना दिले जात नाही हा वेगळा विषय आहे. यासंदर्भात मोठी चर्चा झाली. नगर, नाशिक आणि मराठवाडा असा एक लढा उभा राहिला. मराठवाडयास पाणी मिळाले पाहिजे म्हणून आदरणीय श्री.उध्दवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढला. या मोर्चा अगोदर मी त्या ठिकाणी गेलो होतो, लोकांना आवाहन केले होते, पत्रकार परिषदा घेतल्या होत्या. माननीय पालक मंत्र्यांनी या बाबतीत माघार घेतली नाही, परंतु नगरमध्ये लोकांची जमवाजमव करुन सदरचे पाणी कॅनॉलव्दारे शेतीला सोडू पण मराठवाडयास पाणी दिले जाणार नाही अशी घोषणा केली. आज दुष्काळावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय कृषि मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील उभे आहेत. एक थेंब पाणी सोडले तर मी राजीनामा देईन अशा प्रकारची त्यांनी घोषणा केली. अशा प्रकारची घोषणा करुन त्यांनी मराठवाड्याचा अवमान केलेला आहे. त्यांचे उत्तर ऐकण्याची आमची तयारी आहे. त्यांनी घोषणा करुन मराठवाड्यातील जनतेचा घोर अपमान केलेला आहे, त्यामुळे त्यांनी मराठवाड्यातील लोकांची माफी मागितली पाहिजे. तरच त्यांना या सभागृहात उत्तर देता येईल अन्यथा कृषि मंत्री म्हणून आम्हाला उत्तर देण्याचा त्यांना नैतिक अधिकार नाही.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : हा हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (कृषि मंत्री ) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले मांडला व त्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे व अन्य सन्माननीय सदस्यांनी कृषि विभागा विषयी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. आपापले विचार मांडले.

श्री.दिवाकर रावते : माननीय कृषि मंत्र्यांनी प्रथम मराठवाड्यातील जनतेची माफी मागावी.

( घोषणा )

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे विधान गैरसमजुतीवर आधारित आहे. पाण्याच्या प्रश्नावरुन राजकारण करण्याची त्यांची भूमिका असेल तर माझा नाईलाज आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी जी भावना व्यक्त केली आहे. परंतु त्यांच्याच आमदारांनी सदरचे पाणी सोडण्यास विरोध केला होता हे आपणाला नाकारता येणार नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांच्याकडून अर्धवट भूमिका या ठिकाणी मांडली जात आहे. त्याचा आम्ही निषेध व्यक्त करतो. त्यांनी पूर्ण आणि स्वच्छ अशी भूमिका मांडली पाहिजे. त्यांच्याच आमदारांनी पाणी देण्यास विरोध केला होता, त्यामुळे कृषि मंत्र्यांनी माफी मागण्याचा प्रश्नच येत नाही. किंबहुना त्यांचे आमदार अशा पध्दतीने वागले म्हणून त्यांच्या आमदारांनी मराठवाडयातील जनतेची माफी मागावी.

(गोंधळ)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो गैरसमजुतीवर आधारित आहे. पाण्याच्या प्रश्नाचे कोणत्या हद्दीपर्यंत राजकारण करावे याला काही मर्यादा आहेत. या पाण्याच्या संदर्भात वेगळी भूमिका सर्व पातळयांवर निर्माण करण्याचा प्रयत्न होत होता. पाणी राष्ट्रीय संपत्ती आहे. मराठवाड्याला पाणी द्यावयाचे की द्यावयाचे नाही हा मुद्दाच नव्हता. या बाबतीत मी कोणाला दोष देणार नाही. त्या ठिकाणी मी काय बोललो आहे, प्रत्यक्षात काय छापून आले आहे, याबाबतीत काय दाखविले गेले, हे सांगण्यापेक्षा वस्तुस्थिती समजवून घेण्याचा हा प्रश्न आहे. जायकवाडी प्रकल्पामध्ये डेड स्टोरेज होता. तो 26 टी.एम.सी.एवढा होता. मी त्यावेळी असे म्हणालो की, वरच्या धरणातील पाणी खालच्या गावातील लोकांना पिण्यासाठी दिले पाहिजे याला कोणाचा विरोध नव्हता. डेड स्टोरेजचे पाणी आपण कसे वापरणार आहोत?

महोदय,गुजरातमध्ये दुष्काळ पडला त्यावेळी सौराष्ट्रामध्ये पाण्याच्या संदर्भात चांगली योजना राबविली गेली, सौराष्ट्रामध्ये जो प्रयोग गुजरात राज्याने केला तसा प्रयोग जायकवाडी प्रकल्पातील डेड स्टोरेजच्या बाबतीत राबवून पाहिला पाहिजे. या अनुषंगाने पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली होती. औरंगाबाद महापालिकेसाठी एवढा अट्टाहास चालू होता. औरंगाबाद महापालिका क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची 40 टक्के गळती आहे. त्या गळती संदर्भात

5...



ABG/ KTG/ D/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 16:50

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील...

वृत्तपत्रात मोठया प्रमाणात टीका झालेली आहे. मी सांगितले की, औरंगाबाद महापालिकेची व्यवस्था दुरुस्त करा. औरंगाबाद महापालिका चालविणे शक्य नसेल तर ती महानगरपालिका बरखास्त करा. त्यावेळी असा प्रश्न उपस्थित करण्यात आला की, मी पाण्याचे राजकारण करतो आहे. औरंगाबाद महानगरपालिकेची पाण्याची गळती 40 टक्के एवढी आहे.

महोदय, जालना शहराचा पाण्याचा प्रश्न होता. सध्या नवीन धरणे झालेली आहेत, त्यात वस्तुस्थिती अशी आहे की, या धरणातून कालवे निघालेले आहेत. जी जुनी धरणे आहेत, भंडारदरा, गोदावरी खोऱ्यातील धरणे, यांचे 80 कि.मी.पर्यंत नदीच्या प्रवाहातून पाणी येते. पीक-अप वेअर बांधलेले आहेत आणि तेथून डावे आणि उजवे कालवे निघालेले आहेत. पाण्याच्या नाश खालपर्यंत होणार आहे, तो होऊ नये अशी माझी भावना आहे. जायकवाडीमधील डेड स्टोअरेजचे काय करावयाचे असा खरा प्रश्न आहे. जायकवाडी धरणाच्या कालव्यातून जालन्याला पाणी दिले जाते...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे पाटील..........

चार-पाच कि.मी.ची पाईपलाईन टाकण्याचे काम शिल्लक होते. ते काम झाले तर धरणातील पाणी डायरेक्ट पंप करता येईल. उपाययोजना कोणतीच करायची नाही आणि मागणी मात्र करायची. पाटबंधारे विभागाच्या रेकॉर्डवर आलेले आहे.

गोदावरी नदीच्या पात्रात पाणी सोडल्यानंतर परळीपर्यंत त्यातील 75 टक्के पाण्याचा लॉस होतो. पाणी सोडण्यापूर्वी उपलब्ध पाणी साठयाचा प्रभावी वापर आपण कसा करणार आहोत या संदर्भात जलसंधारण विभागाकडे किंवा महापालिकेकडे उपाययोजना आहे का? मी त्या जिल्हयाचा पालकमंत्री असताना शिवसेनेच्या महापौरांना आणि तेथील खासदारांना सोबत घेऊन गेलो होतो. मी स्वत: धरणातील गाळ काढण्यासाठी ड्रेझर देण्याची तयारी दर्शविली होती. माझी एवढी अपेक्षा होती की, उपलब्ध पाणी साठयाचा प्रभावी वापर होण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी. माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंबंधी भूमिका मांडल्यानंतर कॅबिनेटमध्ये निर्णय झाला आणि पाणी सोडण्यावर शिक्कामोर्तब झाले. त्याला कोणी विरोध केला नाही. यासंबंधी माझी भूमिका स्पष्ट असल्यामुळे राजीनामा द्यायचा किंवा अन्य काही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. मी माझ्या भूमिकेशी ठाम राहिलो. अगोदर उपलब्ध असलेला पाणी साठा कसा वापरणार याबाबत मी भूमिका मांडली होती. जायकवाडीचे पाणी खाली आले तरी बॅकवॉटरमध्ये लिफ्ट चालू आहेत. पाणी वरच्या भागातून कशासाठी खाली आणायचे? जायकवाडीतील पाण्यावर गंगापूर तालुक्यात लिफ्ट चालू आहे. त्यावर कोणाचे नियंत्रण नाही.

सभापती महोदय, आमचा पाणी सोडण्यास विरोध आहे असे म्हटले जाते. विखे पाटील यांचा जायकवाडीतील पाणी सोडण्यास विरोध आहे असे म्हटले जात असले तरी आपण एकाच राज्यामध्ये रहात आहोत. किमान पाण्यासाठी प्राथमिकता दिली पाहिजे. त्यासाठी विरोध करण्याचा प्रश्न नाही. आपली अकार्यक्षमता आहे, यंत्रणा कुचकामी ठरत चालली आहे ते अपयश झ ाकण्यासाठी जो प्रयत्न सुरु आहे त्याला माझा आक्षेप आहे. या प्रकरणामध्ये राजकारण करु नये.

श्री.दिवाकर रावते : मंत्री महोदयांनी आता निवेदन केले. भविष्यामध्ये कॅनॉलमधून पाणी सोडल्यानंतर पाण्याचा लॉस होईल असे सांगण्यात आले. 14 मीटरपर्यंत डेड स्टॉक खाली गेला आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न होता. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, यापुढे जोपर्यंत दुष्काळी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

परिस्थिती आहे तोपर्यंत फक्त पिण्याकरिता पाणी देण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत शेतीसाठी पाणी दिले जाणार नाही. असे असतानाही नगर आणि नाशिकच्या भागामध्ये पिण्याचे पाणी देत नाही, त्याचवेळी कॅनालमधून शेतीसाठी पाणी सोडून शासनाच्या निर्णयाची होळी केली जात आहे. सभापती महोदय, औरंगाबाद खंडपीठामध्ये याचिका दाखल झाली आहे. तेथील खासदार म्हणाले की, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी पुण्यातील पाणी उपलब्ध करुन द्यावे. आम्ही आमच्या भागातील पाणी देणार नाही. महाराष्ट्राच्या जनतेला अशाप्रकारे वागणूक देणार असाल तर मराठवाड्याच्या लोकांनी तुम्हाला का स्वीकारावे? म्हणून तुम्ही दिलगीरी व्यक्त करा किंवा मी जाहीरपणे बोललो नाही असे म्हणा.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्यांच्या इच्छेप्रमाणे मी बोलावे हे शक्य होणार नाही. मी भूमिका मांडली, त्या अनुषंगाने दिलगीरी व्यक्त करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. मराठवाड्याला पाणी सोडण्याबाबत आमचा विरोध नाही. धरणामध्ये पाण्याची उपलब्धता आहे, ते पाणी केव्हाही सोडता येईल.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत (रोजगार हमी योजना मंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी मांडलेल्या प्रस्तावावर विचार मांडत असताना जलसंधारण व रोजगार हमी योजनेविषयी माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे, माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, रामदास कदम, अमरसिंह पंडित, श्रीमती शोभाताई फडणवीस व राणा जगजितसिंह पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांचे बँकेत खाते नसते, त्यामुळे त्यांना वेळेवर पेमेंट मिळत नाही, पोस्टामध्ये खाते उघडण्यास विलंब होतो असा मुद्दा माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडला आहे. पेमेंट करण्यासाठी निधीची कमतरता नाही. पोस्टामार्फत मजुरांना पेमेंट दिले जाते, त्यामध्ये विलंब होत होता. आता थेट निधी देण्याची व्यवस्था सुरु केली आहे आणि त्याची कार्यवाही सुरु आहे. नरेगाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात कामे सुरु केली आहेत. माननीय सदस्यांना पिजन होलद्वारे नरेगाच्या कामांची सद्यस्थिती दर्शविणारी पुस्तिका वितरित केली आहे. आजच्या घटकेला नरेगाच्या कामावर जवळपास 1 लाखापेक्षा जास्त मजूर उपस्थित आहेत. 1600 कोटी रुपयांची कामे आजच्या तारखेला पूर्ण झालेली आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी माझ्या भाषणामध्ये एक मुद्दा मांडला होता. स्व.यशवंतराव चव्हाण केंद्रात मंत्री असताना या राज्याचे मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांनी 1972 च्या दुष्काळाच्या काळात एका महिन्यात 45 लाख मजुरांना काम उपलब्ध करुन दिले होते. 2012 मध्ये 1972 पेक्षा भयावह दुष्काळ पडलेला आहे. असे असताना केवळ 1 लाख मजूर रोहयोच्या कामावर उपस्थित आहेत. म्हणून मंत्री महोदयांनी प्रत्येक गावात रोहयोचे एक काम सुरु करावे.

डॉ.नितीन राऊत : मजूर उपस्थिती 1,19, 783 इतकी आहे. मागणीनुसार नरेगा योजनेमध्ये काम दिले जाते. प्रत्येक गावामध्ये किमान एक गावतलाव व एक पाझर तलाव झाला पाहिजे. सिमेंट रस्ते, जनावरांसाठी शेड, कुक्कुटपालनासाठी शेड अशी कामे केली जातात. किमान 10 कोटी रुपये द्यावेत अशी मागणी केली गेली. ग्रामसभा जितकी कामे मंजूर करेल त्या कामांना निधी उपलब्ध करुन देणार आहोत. 45 लाख मजूर 1972 च्या काळात रोहयोच्या कामावर उपलब्ध होते असे माननीय सदस्यांनी सांगितले. आता मजूर कामावर येत नाहीत यात तुमचा आमचा दोष नाही.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत...........

सभापती महोदय, जलसंधारणाबाबत सांगू इच्छितो की, दुष्काळी क्षेत्रातील 6250 गावांमधून मागणी आलेली आहे. 4 हजार नवीन कामे विभागाकडे आलेली असल्यामुळे 800 कोटी रुपयांचा निधी लागणार आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत.....

दुष्काळाचा सामना करण्यासाठी पिण्याचे पाणी, जनावरांना चारा उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे तसेच जलसंधारणाची कामे मोठया प्रमाणात सुरु करण्यात आलेली आहेत. मी नियम सोडून बोलत नसतो. लघू पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून नरेगामध्ये सुध्दा कामे होत असतात. आपल्याला खारपाणपट्टयातील कामे करण्यासाठी मापदंडात बदल करावा लागणार आहे. कोकणात कामे करण्यासाठी आपल्याला मापदंडात बदल करावे लागणार आहेत. पाणी उपलब्धता प्रमाणपत्राचा उल्लेख अनेक सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. आम्ही अनेक चांगले विषय मार्गी लावण्याचे काम करीत आहोत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या वर्षाच्या अखेर नरेगाच्या माध्यमातून 2500 कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. गावाकडे चला, गाव समृध्द करा ही जी महात्मा गांधीची संकल्पना होती त्या संकल्पनेनुसार आपण चाललो आहोत व त्यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करावे एवढे बोलून मी थांबतो.

श्री. रामदास कदम : स्थलांतर होणार नाही याची दक्षता शासन घेईल काय ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, होय.

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता ) :सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मदत व पुनर्वसन,रोजगार हमी व जलसंधारण विभागाचे उत्तर झाले परंतु या चर्चेच्या निमित्ताने महसूल व पाणी पुरवठा विभागाचे उत्तर झालेले नाही. काल सुध्दा महसूल मंत्री सभागृहात नसल्यामुळे 9 पैकी 4 वेळा कामकाज बंद झाले होते. पहिल्या आठवडयात आम्ही काम केले नाही म्हणून सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे मोर्चे घेऊन हिंडत होते. सभागृहात काल सुध्दा महसूल मंत्री नव्हते आज सुध्दा नाहीत. दुष्काळाच्या विषयाच्या संदर्भात सरकारला गांभीर्य नाही. सभागृहात महसूल व पाणी पुरवठा मंत्री नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज थांबविण्यात यावे अशी विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की,...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण शासनाला का वाचवता? त्यांना लाज नाही. असे असतांना आपण त्यांना का वाचवता ? सरकार बेजबाबदार आहे असे तालिका सभापतींनी म्हटले पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत : सभापती महोदय, ज्येष्ठ मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले आहे, कृषी मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे तसेच रोजगार हमी मंत्री म्हणून मी उत्तर दिलेले आहे. पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात मदत व पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी आपली भूमिका मांडलेली आहे. सन्माननीय सदस्यांचे समाधान सुध्दा झाले होते. विधानसभेत चर्चा सुरु असल्यामुळे तेथे मंत्री बसलेले आहेत.

श्री. विनोद तावडे : मंत्री येथे उपस्थित नसले की, सदर मंत्री खालच्या सभागृहात बसलेले आहेत असे सांगितले जाते. परंतु खालच्या सभागृहात नगरविकास राज्य मंत्री श्री. भास्कर जाधव साहेबांना सन्माननीय सदस्य श्री. प्रताप सरनाईक आणि सन्माननीय सदस्य श्री. एकनाथ शिंदे प्रश्न विचारीत आहेत त्याची उत्तरे काय पाणी पुरवठा मंत्री देत आहेत ? दुष्काळाच्या बाबतीत सरकार गंभीर नाही हेच यावरुन दिसून येते. दुष्काळाचे या सरकारला काही पडले नाही हे तुम्ही मान्य करा.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : सभागृहात मंत्रीमहोदय उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 5.15 ते 5.25 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी**.

**विधान मंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभा संबंधी व विधान भवन परिसरामध्ये नवीन इमारत बांधण्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. महाराष्ट्र विधानमंडळाचे अमृत महोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहोत. याची सांगता नागपूरमध्ये होईल येईल अशी घोषणा करण्यात आली होती. त्याची सांगता कधी होणार आहे. येथे मला एक निवेदन करावयाचे आहे की, विधान मंडळ परिसरामध्ये एक चांगली इमारत बांधून त्यात मिटींग हॉल देखील करण्यात यावा. आताच आमची वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राने आयोजित केलेली बैठक याच इमारतीतील कक्ष क्र.2 मध्ये झाली. या मिटींगची वेळी दुपारी 3.00 ते 4.00 अशी होती. आमची मिटींग पूर्ण न होताच आम्हाला बाहेर पडावे लागले. श्री.नागेश केसरी व श्री.गोयल साहेब तेथे होते. या समितीमध्ये दोन्ही सदनातील सदस्य उपस्थित होते. तेथे दुसरी मिटींग असल्यामुळे आम्हाला कमी वेळात आमची मिटींग संपवावी लागली. आज या इमारतीमध्ये मिटींग हॉल नाही.

**तालिका सभापती** : यासंबंधी माननीय सभापती योग्य तो निर्णय घेतील.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**. : राज्यातील बऱ्याच भागात विशेषत: विदर्भ व मराठवाड्यात पाऊस कमी झाल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती

**मु.शी** : राज्यातील बऱ्याच भागात विशेषत: विदर्भ व मराठवाड्यात पाऊस कमी झाल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती या विषयावर सर्वश्री सुभाष चव्हाण, विक्रम काळे, मोहन जोशी, किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतीश चव्हाण, संजय दत्त, रमेश शेंडगे, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री. अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवड,एम.एम.शेख, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. शरद रणपिसे, प्रकाश बिनसाळे, अमर राजुरकर, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री जयवंतराव जाधव, राम पंडागळे, प्रा.सुरेश नवले,श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरू....

प्रा.लक्ष्मण ढोबळे (पाणी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, या प्रस्तावावर माननीय पुनर्वसन मंत्र्यांनी विस्ताराने उत्तर दिलेले आहे. मी स्वत: या प्रश्नावर उत्तर दिले पाहिजे काय, असे विचारल्यानंतर मी एकत्रितपणे उत्तर दिलेले आहे, असे माननीय मंत्री डॉ.पतंगराम कदम यांनी सांगितल्यामुळे मी थांबलो. यामुळे आपणा सर्वांना थोडासा मन:स्ताप झाला.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय पाणी पुरवठा मंत्री नसल्यामुळे माननीय पुनर्वसन मंत्री म्हणाले की, पाणी देऊ, टॅन्कर पुरवू. त्यांनी दुष्काळामुळे भयावह परिस्थिती निर्माण होणार आहे हे सांगितले. त्यानंतर आपण आला. त्यामुळे आम्हाला बरे वाटले. कारण गावात रात्री बारा बारा वाजेपर्यंत फिरलेले आपण एकमेव मंत्री आहात. आपण वगळता येथील एकही मंत्री मला दुष्काळी गावात फिरताना दिसलेला नाही. गेले असतील तर मला माहीत नाही. ज्या गावाची तक्रार होती त्या गावात जाऊन आपण फिरलात. पाण्यासाठी कोणती उपाययोजना करता येईल हे आपण पाहिले. आपण अधिकाऱ्यांना देखील जागवले हे आम्हाला माहीत आहे म्हणूनच आम्हाला आपल्याकडून उत्तर हवे होते. मी आता जे काही बोलणार आहे ते राजकारणासाठी बोलणार नाही.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

अधिकृत बोलणार आहे. त्यांनी सांगितले की, आमच्या मित्र पक्षाकडे बघू नका. मी जे सांगतो ते बरोबरच आहे. तेव्हा आपल्या पक्षाकडून कोणीही आक्षेप घेण्यास उठले नाही की, हे आमचे खाते आहे, त्यावर आमचे मंत्री उत्तर देतील. हेच मला आपल्या निदर्शनास आणावयाचे आहे. आपल्या व्यथेशी आम्ही समरस आहोत. एवढेच मला सांगावयाचे आहे.

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, येथे सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याला सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराम कदम साहेबांनी विस्ताराने उत्तर दिलेले आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे राज्यात आज 980 टँकर सुरू आहेत. ज्या जिल्ह्याला आपण टँकरने पाणी पुरवठा करीत आहोत त्या जिल्ह्यासाठी आता खाजगी टँकर देखील मिळत नाही अशी परिस्थिती आहे. सुदैवाने विदर्भ व उत्तर खानदेश येथील परिस्थिती इतकी अडचणीची नाही. या भागात टँकर फार प्रकर्षाने जाणवतो अशी परिस्थिती देखील नाही.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मण ढोबळे...

तरी देखील ज्या भागात मे-जून-जुलै या तीन महिन्यांमध्ये अधिकाधिक टँकर लागतील ते देण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, ज्या नऊ उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे त्यासंबंधी विभागवार बैठका घेऊन चर्चा केलेली आहे. त्यामध्ये एखादी बुडकी असेल तर ती अधिक खोल करणे, विहिरीतील गाळ काढणे, एखादा हापसा घेणे, चांगला हापसा असेल तर तो अधिग्रहीत करणे, गावाजवळ दहा कि.मी.च्या परिसरातील विहिरीला चांगले गोड पाणी असेल तर ती अधिग्रहीत करणे अशा प्रकारच्या नऊ उपाय योजना करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांकडून आयुक्तांकडे वेळेवर माहिती आली नाही तर आयुक्तांना सचिवांकडे जो अहवाल पाठवावयाचा असतो तो एका जिल्ह्याचा थांबला की तो चार-पाच जिल्ह्याचा थांबतो. त्यामुळे निधी देण्यास उशीर होतो आणि ती अक्षम्य अशाप्रकारची गोष्ट आहे. तेव्हा तो निधी वेळेत मिळाला पाहिजे. या गोष्टी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या कानावर घातल्या आहेत.

सभापती महोदय, आपण हजारो रुपये पाण्यावर खर्च केले. परंतु विजेची बिले एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहेत की, ही वाढलेली बिले सरपंचाना भरणे शक्य होत नाही. रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणारा माणूस आता सरपंच झालेला आहे. त्याला ते पैसे भरणे शक्य होत नाही. जर विजेचे बिल भरले आणि नंतर त्याची 50 टक्के वसुली करणे त्या सरपंचाला शक्य होत नाही अशी वस्तुस्थिती आहे. अनेक दिवस चाललेल्या या व्यवस्थेबद्दल माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आणि माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी अतिशय सहानुभूतीपूर्वक विचार केलेला आहे. जर चार हजार रुपये बिल आले असेल तर ते शासन भरायचे आणि नंतर दोन हजार रुपये ग्रामपंचायतीकडून घ्यायचे. परंतु आता टंचाईसदृश्य परिस्थती असलेल्या गावांमध्ये 50 टक्क्यातील 33 टक्के बिल हे शासनाच्या वतीने भरण्यात येईल अशाप्रकारची भूमिका माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घेतलेली आहे. हे पैसे डायरेक्ट एमईआरसीकडे भरण्याची भूमिका घेतल्यामुळे थोडासा रिलिफ मिळेल आणि केवळ विजेच्या बिलामुळे, पाणीपट्टीमुळे ज्या ठिकाणच्या योजना बंद आहेत त्या योजना सुरु होण्यास थोडीशी मदत होईल अशी माझी अपेक्षा आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मण ढोबळे...

सभापती महोदय, आपण या सर्व उपाय योजना करीत असलो तरी पाणी कोठून आणणार हा आपल्यासमोर प्रश्न आहे. आपल्याकडे असलेले पाणी आपण नीटपणे वापरले पाहिजे. जायकवाडी धरणामध्ये 11 टीएमसी पाणी आणले, निळवंडे धरणातून पाणी आणले किंवा आणखी कोठून पाणी आणले तरी पाणी जपून वापरण्याची काळजी घेतली पाहिजे. उपलब्ध पाण्याचा जपून वापर केला पाहिजे. सांडपाण्याचा देखील काटकसरीने वापर केला पाहिजे अशा पध्दतीच्या सूचना आम्ही दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, आऊट सोर्सिंग करुन जीएसडीएच्या विभागातील निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना परत बोलावून त्यांच्याकडून सर्व्हे करुन आणखी काही ठिकाणी पाण्याचे नवे बोअर घेता येतील काय, तसेच त्या ठिकाणी सौरऊर्जा पंप बसविण्याचा विचार करता येईल काय याची आम्ही काळजी घेतलेली आहे.

सभापती महोदय, शासन कोणत्या प्रकारच्या उपाय योजना करीत आहेत हे मी येथे सांगत असलो तरी अस्मानीचा जोर सुल्तानीच्या अनंतपट असतो. निसर्ग कोपला किंवा रागावला तर त्यास माणसाची मदत किती मिळणार ?

सभापती महोदय, बाष्पीभवनामुळे उजनी धरणातील पाणी दर महिन्याला चार टीएमसीने कमी होत आहे. असे कमी होणारे पाणी आापणास थांबवावयाचे असेल तर त्यासाठी एकप्रकारची पावडर वापरली जाते ज्यामुळे बाष्पीभवन थांबविले जाते. हा प्रयोग जर यशस्वी झाला तर जेथे मोठा कॅचमेंट एरिया आहे किंवा मोठे धरण आहे तेथील पाणी वाचविण्यासाठी काही प्रयत्न करता आले तर दृष्टीने देखील आम्ही विचार केलेला आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे काही ठिकाणी पाण्याचा गैरवापर करण्यात येतो. पाणी दिसले की मोटार चालू करण्यात येते. तेव्हा आपणास अशा सर्व गोष्टींवर मात करावी लागेल. पाणी वाचविण्यासाठी शहरातील मोठ्या बांधकामांची कामे थांबवावी लागतील. पाण्याचा वापर पिण्यासाठीच झाला पाहिजे.

..3..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मण ढोबळे...

सभापती महोदय, मी औरंगाबाद शहरामध्ये बैठकीसाठी गेलो होतो.औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये हजारो गळत्या आहेत. या गळत्या फक्त औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये आहेत आणि अन्य ठिकाणी नाहीत असे नाही. मी ज्या सोलापूर जिल्ह्याचा पालकमंत्री आहे त्या ठिकाणी देखील अशा गळत्या आहेत. तेव्हा या गळत्या थांबवून ते पाणी काटसकरीने कशाप्रकारे उपलब्ध होईल या दृष्टीने काळजी घेतली पाहिजे. तसेच सांडपाण्याचा उपयोग जनावरांच्या चाऱ्यासाठी कसा करता येईल याची विचार करीत आहोत.

सभापती महोदय, हे अधिवेशन संपल्यानंतर आपणा सर्व मंडळींना विश्वासात घेऊन, जिल्ह्यात, विभागीय पातळीवर बैठका घेऊन आणि आपण दिलेल्या सूचनांचा आदर करुन लोकांना मोठ्या प्रमाणात पाणी कसे उपलब्ध करुन देता येईल याची जबाबदारी आमच्यावर राहील. रानातील कणसापेक्षा गावातील माणसे जगवणे हे आमचे कर्तव्य राहील, एवढे बोलून माझे उत्तराचे भाषण पूर्ण करतो.

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, संभाजीनगर शहरामध्ये 40 टक्के पाण्याची गळती आहे असा उल्लेख येथे दोन वेळा झाला. ही गळती अचानक झालेली नाही. माननीय मंत्री महोदयांनी त्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केलेली आहे. मी जे सांगत आहे ते माननीय मंत्री महोदयांनी दोषारोप समजू नये. त्या विभागाचे पालकमंत्री सत्तारुढ पक्षाचे आहेत. ते त्या ठिकाणी काम करीत नव्हते असे आपण वारंवार नकळतपणे सांगत आहात. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण येथे उपस्थित आहेत. त्यांना दम मिळाला असल्यामुळे आता ते बोलणार नाहीत. ते रोखठोक बोलणारे आहेत.

सभापती महोदय, संभाजीनगरमध्ये 40 टक्क्े पाण्याची गळती होत असेल तर त्यामध्ये पाण्याची चोरी किती आहे याची मला माहिती नाही. सन्माननीय सदस्य श्री.किशनचंद तनवाणी हे येथे उपस्थित नाहीत अन्यथा त्यांनी माहिती दिली असती. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण ही माहिती देऊ शकतील. काही ठिकाणी पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती न झाल्यामुळे गळती होत आहे. संभाजीनगर महानगरपालिकेकडे पैसे नाहीत. एका बाजूला योजना चालू करण्याकरिता अमाप पैसे उपलब्ध करुन दिले असे काल सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी सांगितले तर दुसरीकडे योजनांची दुरुस्ती होत नाही. तेव्हा प्रथम उपलब्ध असलेले पाणी वाचविले पाहिजे मग नवीन पाण्याचा विचार केला पाहिजे. जे पाण्याची चोरी करीत आहेत त्यांच्यावर येत्या पंधरा दिवसामध्ये कारवाई करावी. संभाजीनगर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी पत्रक काढलेले आहे की, "आम्ही कोणाचीही गय करणार नाही." तेव्हा आपण जाती, लिंग भेद याच्या पलीकडे जाऊन कारवाई करणार काय ?

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्या ठिकाणी कुणाच्याही आड धर्म येता कामा नये, तो आला तर थांबता कामा नये. अशाप्रकारची कडवट उपाय योजना करण्यासाठी हिंमत दाखविणार काय? याचे कारण या संभाजीनगर शहराची दोन वेळा बदनामी झाली आहे.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औरंगाबाद शहरातील पाण्याच्या गळतीचा उल्लेख केला. 40 टक्के पाण्याच्या होणाऱ्या गळतीमध्ये औरंगाबाद महानगरपालिकेचा वाटा सर्वात जास्त आहे. या बाबत मी अनेक वेळा आयुक्तांकडे, महापौरांकडे आणि शिवसेनेचे खासदार माननीय श्री. खैरे साहेबांना निवेदन देऊन सांगितले. अवैध नळ जोडण्या दिल्या जातात, महानगरपालिकेचे अधिकारी ज्यांना पाहिजे त्यांना नळ जोडण्या देतात. हे मी आज देखील आपल्याला त्या ठिकाणी जाऊन दाखवू शकतो. त्याचे ऑडिट कुठेही होत नाही. तेथील अधिकारी वर्ग पूर्णपणे दबलेल्या अवस्थेत काम करीत आहे. प्रत्यक्षात 40 टक्के पाणी वाया जात आहे परंतु ते कोठे जाते हे आपल्याला माहीत नाही. ते बांधकामासाठी वापरले जाते काय? तेथील नागरिकांना महानगरपालिकेने पाण्याचे कनेक्शन दिले नाही तर प्लंबर कनेक्शन देतो.

श्री. बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी औरंगाबादचा पालक मंत्री आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले म्हणणे या ठिकाणी मांडून विरोधी पक्षाची भूमिका बजावली त्याबद्दल माझी हरकत नाही. जायकवाडी धरणामध्ये खूप कमी पाणी साठा राहिल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होणार होता. सहयाद्रीच्या रांगामधील भंडारदरा, निळवंडे,दारणा, मुळा या सर्व धरणांमधून आम्ही पाणी घेऊन साडे अकरा टीएमसी पाणी जायकवाडी धरणामध्ये सोडण्यात आले. जवळ जवळ साडे सहा ते सात टीएमसी पाणी त्या धरणामध्ये पोहोचले आहे. त्या धरणातील पाणी व्यवस्थितपणे सर्वांना पुरविण्याची आता महानगरपालिकेची जबाबदारी आहे. वरच्या भागातील मंडळींनी जायकवाडी धरणामध्ये पाणी सोडण्यासाठी खूप सहकार्य केले. ते पाणी आपल्याला काटकसरीने वापरावे लागेल. त्या करिता पहिल्यांदा पाण्याची चोरी थांबवावी लागेल, पाण्याचा अपव्यय टाळावा लागेल. ही महानगरपालिकेची जबाबदारी असल्यामुळे मी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, त्यांच्या नेतृत्वाखाली ही महानगरपालिका काम करते. त्यांनी जायकवाडी धरणामध्ये पाणी सोडण्यासाठी आग्रहाची भूमिका घेतली होती, धरणामध्ये पाणी सोडले जात नाही म्हणून शासनाच्या विरुध्द राग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात....

व्यक्त केला होता. तेव्हा त्यांनी एकदा औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये जाऊन त्यांची कडक शिस्त दाखवून द्यावी. महानगरपालिकेमार्फत सर्व नागरिकांपर्यंत वेळेवर पाणी पोहोचविण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारावी एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पाण्याची गळती थांबविणे हे नगरसेवकांचे काम नाही, बेकायदेशीर जोडण्या तोडणे हे नगरसेवकांचे काम नाही ते प्रशासनाचे काम आहे. स्वत:च्या चुका झाकण्याचे काम करु नका. तुमच्याबद्दल मी चांगले बोललो होतो. परतीचा पाऊस आला नाही तर तुम्ही परत जाणार कां, एवढाच प्रश्न तुम्हाला विचारला होता. त्यानंतर तुम्ही स्वत: पुढाकार घेऊन 3 टीएमसी पाणी सोडण्याचा निर्णय घेतला हे देखील मला माहीत आहे. तुमचा आयुक्त कसा काम करीत आहे हे मी तुम्हाला सांगावयास हवे काय? 200-500 रुपये न नाकारणारा माणूस त्या ठिकाणी आयुक्त म्हणून नेमला आहे तो प्रशासन कसे चालविणार? तुम्ही तुमच्या प्रशासनाबद्दल या ठिकाणी कडवटपणे सांगा, तुमच्या विभागीय आयुक्तांना याची दखल घ्यायला सांगा. तुम्ही त्या आयुक्ताला बोलवा, आणि जर हे काम झाले नाही तर तुला निलंबित करु असे सांगा.

सभापती महोदय, याच सभागृहामध्ये आपण कायदा मंजूर केला आहे की, बेकायदेशीर कामाच्या आड जो नगरसेवक येईल त्याचे नगरसेवक पद तत्काळ रद्द होईल. त्यामुळे त्याठिकाणी नगरसेवक कोणत्या पक्षाचे आहेत हा विषय नाही. आमची त्या ठिकाणी सत्ता आहे हा विषयच नाही. सत्ता धोरण ठरविते, सत्ता काम करीत नाही. या ठिकाणी सुध्दा तुम्ही धोरण ठरविता, परंतु तुम्हाला खड्डयात घालण्याचे काम हे अधिकारी करतात हे लक्षात ठेवा. मी राजकीय बोलत नसल्यामुळे आपण देखील राजकीय बोलू नका, मी तुम्हाला कधीही दोष दिला नाही. त्या महानगरपालिकेमध्ये आमची सत्ता आहे हे तुम्हाला माहीत नाही काय? तेथील 40 टक्के पाणी वाया जात असेल तर ती अत्यंत गंभीर स्वरुपाची घटना आहे. त्यामुळे गोरगरीब लोकांना पाणी मिळणार नाही यासाठी मी सांगत असतांना त्यामध्ये नगरसेवकांचा संबंध कुठे येतो? त्यांनी जर तुमच्या कामांना विरोध केला असेल तर बेकायदेशीर कामांना संरक्षण देणाऱ्या नगरसेवकाचे नगरसेवक पद रद्द होते हे आपल्याला माहीत आहे. जर कुणी अनधिकृतपणे नळाची जोडणी करीत असेल तर त्याच्याविरुध्द तुम्ही कारवाई करा, त्या जोडण्या आपण कापून टाका.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, महापौर आणि उप महापौर यांच्या सुध्दा जबाबदाऱ्या आहेत. केवळ प्रशासनाला दोष देऊन चालणार नाही तर प्रशासन आणि नगरसेवक या दोघांनी मिळून काम करणे आवश्यक आहे. माननीय श्री. रावते साहेबांनी हे त्यांना सांगावे एवढीच माझी इच्छा आहे.

श्री. लक्ष्मणराव ढोबळे : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये एकूण 22 महानगरपालिकांपैकी जवळ जवळ 16 महानगरपालिकांमध्ये पाण्याच्या गळतीची समस्या आहे. आपण औरंगाबाद महानगरपालिका चालवीत आहात म्हणून त्या ठिकाणी दोष आहे असे म्हणणार नाही. परंतु मोठया कष्टाने जायकवाडी धरणाकरिता मिळालेले पाणी वापरतांना त्या मधील गळत्या कमी झाल्या पाहिजेत, नळाखाली लावलेली घागर फुटलेली असता कामा नये. याबद्दल या ठिकाणी सूचना करण्यात आली होती. सुधारणात्मक कामामध्ये ऑडिट करण्याची तरतूद आमच्या सुजल-निर्मल व नगरुत्थानांतर्गत आहे. तशाप्रकारे वॉटर ऑडिट, मीटर ऑडिट आणि एनर्जी ऑडिट हे केवळ औरंगाबाद महारनगरपालिकेपुरते मर्यादित नाही तर अनेक महानगरपालिकांमध्ये करुन त्या ठिकाणी पाणी वापरामध्ये शिस्त लावू. आपण केलेल्या सूचनेप्रमाणे या बाबत कडक अशी कारवाई करु.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाच्या वतीने मांडण्यात आला आहे. या प्रस्तावावरील मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण झाल्यानंतर प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्यांनी राईट ऑफ रिप्लाय मांडावयाचा असतो. आम्ही या ठिकाणी प्रश्न विचारल्यानंतर आपण उत्तर देत नाही. ज्या माननीय सदस्यांनी हा प्रस्ताव मांडला आहे त्यांना शासनाला विचारण्याचा अधिकार आहे. संबंधित माननीय सदस्य सभागृहात उपस्थित आहेत काय, ते राईट ऑफ रिप्लाय मांडणार आहेत काय? हा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाच्या वतीने मांडण्यात आला असल्यामुळे तो गांभीर्याने घेतला पाहिजे. दुष्काळाच्या विषयावर चांगला प्रस्ताव मांडल्याबद्दल संबंधित माननीय सदस्यांचे मी अभिनंदन करतो. त्याबद्दल आमचे दुमत नाही.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : सत्ताधारी पक्षाच्या वतीने माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी हा प्रस्ताव मांडला असला तरी इतर माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये राईट ऑफ रिप्लाय झालेला आहे आणि त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मणराव ढोबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी मराठवाडयातील पाण्याचे नियोजन करुन पाणी टंचाई दूर करावी अशी भूमिका मांडली. प्रा. सुरेश नवले यांनी बीड जिल्ह्यातील आणि मराठवाडयातील पाण्याचे नियोजन करावे अशी भूमिका मांडली. माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडीत यांनी बीड जिल्ह्यातील पाणी टंचाईबाबत आणि माजलगावच्या पाणी पुरवठयाबाबत भूमिका मांडली. सर्व माननीय सदस्यांनी मांडलेल्या भूमिका मी लिहून घेतल्या आहेत. वेळेअभावी प्रत्येक मुद्याबाबत उत्तर देता येत नसले तरी त्यांच्या मुद्यांबाबत मी लेखी उत्तर प्रत्येक माननीय सदस्यांकडे पाठविण्याची व्यवथा करीन. ज्या ज्या ठिकाणी अडचण येईल त्या ठिकाणी जिल्हा पातळीवर बैठक घेऊन, विभागीय पातळीवर बैठक घेऊन, लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन, त्यांनी केलेल्या सूचनांचा आदर करुन त्या ठिकाणी पाणी पुरवठा करण्याबाबत मी प्रयत्न करीन एवढेच या निमित्ताने सांगू इच्छितो.

**तालिका सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी आपला अंतिम आठवडा प्रस्ताव आता मांडावा.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सन २००५ पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सुरु असलेले सत्र

**मु.शी.**: सन २००५ पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सुरु असलेले सत्र या विषयावर सर्वश्री. विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.चंद्रकांत पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, विनायक राऊत, डॉ.रणजित पाटील, श्री. सुमंत गायकवाड, ॲड. आशिष शेलार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम २५९ अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"सन २००५ पासून सुरू झालेल्या शेतकऱ्यांच्या दुर्दैवी आत्महत्यांचे सत्र अद्यापही थांबलेले नसणे, शासनाने या आत्महत्त्या थांबविण्यासाठी घोषित केलेल्या पॅकेजमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, विदर्भातील शेतकऱ्यासाठी शासनाने केलेल्या सर्व घोषणा फसव्या असल्याचे लक्षात येणे, गतवर्षी मा.मुख्यमंत्र्यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी घोषित केलेल्या सोयाबीन, धान व कापूस पॅकेजचे वितरण यावर्षी शेतकऱ्यांना पेरणी होईपर्यंत न होणे, पॅकेज घोषित करतानाच कोरडवाहू शेतीसाठी कोरडवाहू मिशन स्थापन करण्यात येईल व या मिशनमार्फत कोरडवाहू शेतीसाठी १० हजार कोटी रुपये खर्च करण्यात येतील, अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी करणे, परंतु या वर्षी अर्थसंकल्पामध्ये केवळ २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणे, कापूस उत्पादक शेतकरी संकटात असताना कृषी विद्यापीठांकडून कापसाच्या बीटीयुक्त बियाण्यांची एकही जात विकसित करण्यात न येणे, चुकीच्या पध्दतीने आणेवारी काढल्यामुळे दुष्काळ पडून सुध्दा शेतकरी दुष्काळाच्या सवलतीपासून वंचित राहणे, स्वामीनाथन समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे कापूस, सोयाबीन व धान या पिकांना उत्पादन खर्चावरील आधारित भाव देण्यास शासनास अपयश येणे, विदर्भातील संत्रा या अतिशय महत्त्वाच्या पिकावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांस प्रोत्साहन देण्यात शासनाला अपयश येणे, या सर्व बाबींमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र अद्यापही सुरू असणे, आत्महत्यांचे हे सत्र सुरू असताना, सावकारी विधेयक मंजूर करुन घेण्यास महाराष्ट्र शासनास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

अपयश येणे, शेतकऱ्यांशी संबंधित एकही समस्या सोडविण्यात शासनास अपयश आल्याने संपूर्ण विदर्भासहीत राज्यातील सर्व शेतकऱ्यांमध्ये शासनाविषयी पसरलेला तीव्र असंतोष व याबाबतची शासनाची प्रतिक्रिया व करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधिमंडळ सचिवालयाने कृषी आणि पणन विभागाकडे प्रस्ताव अग्रेषित केला असून मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित असल्यामुळे महसूल राज्यमंत्र्यांनी या सभागृहामध्ये उपस्थित राहण्याचे कारण नाही.

**तालिका सभापती** : टीक आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, यामध्ये अडचण अशी झाली आहे की, माननीय मंत्री प्रा. ढोबळे साहेब आपण प्राध्यापक आहात. जे विद्यार्थी मध्ये केव्हा तरी लेक्चरसाठी येतात त्यांना कंटिन्युएशन नसते. आपण महसूल विभागाबद्दल बोलत आहात, मागील आठवडयात मांडलेल्या दुष्काळाच्या विषयावरील चर्चा आता संपली आहे. त्यामुळे केव्हा तरी मध्येच वर्गामध्ये यायचे आणि आल्यानंतर डुलकी काढावयाची. त्यामुळे वर्गात काय चालले आहे हे समजत नाही ही आपली अडचण आहे.

**तालिका सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते आपण आपला प्रस्ताव मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी माझा प्रस्ताव मांडतो. परंतु मुद्दा असा आहे की, मघाशी माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सांगितल्याप्रमाणे दुष्काळाच्या महत्वाच्या विषयावरील प्रस्ताव असतांना त्या प्रस्तावावरील चर्चेचा पहिला दिवस वाया गेला असे माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित म्हणाले.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

याठिकाणी राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळाच्या परिस्थितीबाबत चर्चा करण्यासाठी सत्ताधारी बाकावर 6 सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत आणि विरोधी पक्षाच्या बाकावर 14 सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत. त्यामुळे या विषयाच्या बाबतीत कोणाला किती सिरिअसनेस आहे हे दिसून येते. तसेच माननीय मंत्री महोदयांना देखील सिरिअसनेस नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, अशा परिस्थितीमध्ये सदनाचे कामकाज तहकूब केले पाहिजे. सभागृहाचा वेळ वाया गेला आहे. माननीय मंत्री महोदय देखील उपस्थित नाहीत.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी आपले म्हणणे लवकर मांडावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शासन या प्रस्तावाचा अवमान करीत आहे त्याबद्दल आम्ही शासनाचा धिक्कार करतो, निषेध करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझे बोलणे पूर्ण होऊ द्या. सभापती महोदय, आम्ही शासनाचा धिक्कार करतो, निषेध करतो. याठिकाणी जो प्रस्ताव देण्यात आला आहे त्याचा शासनाने पूर्णपणे अवमान केलेला असून त्याबद्दल निषेध म्हणून आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, विरोधी पक्षाची या विषयावर चर्चा करण्याची तयारी दिसत नाही.

(विरोधी पक्षनेते माननीय श्री.विनोद तावडे सभागृहात येतात)

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री उत्तर देत नाहीत. विरोधी पक्षाच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना मांडल्या आहेत त्याच्याशी मी सहमत आहे. सदनातील कामकाज झाले पाहिजे. आज विदर्भातील प्रश्नाच्या संदर्भातील अंतिम आठवडा प्रस्ताव सदनासमोर आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना मी सांगू इच्छितो की , आपल्याला संधी मिळाली आहे. हे खरे आहे. त्यामुळे थोड्याफार प्रमाणात शाऊटींग ब्रिगेडचे मेंबर झाले पाहिजे. पण आम्ही नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती. मात्र सत्ताधारी आणि



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

विरोधी पक्षाची दिलेली सूचना एकत्र करण्यात यावी अशी माननीय सभापती यांनी विनंती केल्यावर आम्ही ते मान्य केले होते. नाहीतर आमचा याबाबत वेगळा प्रस्ताव आला असता.

विधान सभेमधील आणि विधान परिषदेमधील प्रोसीजर थोडी वेगळी आहे. त्यामुळे त्यांना ती पुढील अधिवेशनापर्यंत हळूहळू कळेल.

----

2 आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या संदर्भात आपण ऑन लेग रहावे. आपण उद्या सकाळी .. . .

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी याठिकाणी प्रस्तावातील ज्या गोष्टींचा उल्लेख केला आहे, त्या संबंधातील भावना केवळ विरोधी पक्षाकडील सन्माननीय सदस्यांच्या आहेत असे नाही तर सत्ताधारी बाकावर बसलेले जे संवेदनशील सन्माननीय सदस्य आहेत, श्री.रामभाऊ पडांगळे यांच्यासारखे जे सन्माननीय सदस्य आहेत ते या भावनांशी सहमत असतील. कारण शेतकरी, शेतमजूर यांच्या ज्या यातना आहेत त्या चळवळीमध्ये काम केलेल्या सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांच्यासारख्या लोक प्रतिनिधींना कळतात. त्यामुळे ते पक्षाच्या भिंती पार करुन शेतकरी, दीन-दलित, दुबळे यांच्या बाजूने उभे रहातात, तसे ते रहातील. कारण शासनाने शेतकऱ्यांकडे ज्याप्रकारे दुर्लक्ष केले आहे आणि या अधिवेशनामध्ये सत्ताधारी बाकावरील जी उपस्थिती होती, तसेच माननीय मंत्री महोदयांच्या अनुपस्थितीमुळे जो गोंधळ होत होता ते पाहिल्यावर असे म्हणावेसे वाटते की,

कष्टाचे डोंगर रचता-रचता सारेच घाव सोसून झाले
आता सुखाच्या श्वासासाठी मात्र मरण स्वस्त झाले
दरवर्षी मायबाप सरकार येते
शेतकऱ्यांचे प्रश्न तसेच ठेऊन जखमेवर मीठ चोळून जाते.

अशा प्रकारे आपण याठिकाणी हा जो व्यवहार दाखवित आहात, अशा वेळी विदर्भातील दुष्काळाच्या परिस्थितीत होरपळणाऱ्या शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले जाते.नऊ-नऊ वेळा सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत म्हणून सभागृह स्थगित करावे लागते. मग माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना येथे दिलगिरी व्यक्त करावी लागते. दुष्काळच्या प्रश्नावर विरोधकांना कामकाज बंद करुन माननीय मंत्री महोदयांना सदनामध्ये बोलवून घ्यावे लागते आणि आम्ही याबाबत आणखी काही बोलले पाहिजे काय? तसेच माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांचे उत्तर ऑल इज वेल . पण मूळ उत्तर काहीच नाही अशी स्थिती आहे.



श्री.विनोद तावडे ....

असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

सभापती महोदय, विदर्भातील शेतकऱ्यांच्या विषयाबाबत विरोधकांकडून अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला जात असतांना कापसाला 6 हजार रुपये , सोयाबीनला 4 हजार रुपये आणि धानाला अडीच हजार रुपये भाव मिळावा अशी आमची अपेक्षा आहे त्यानुसार हा भाव शासनाने आश्वासित केला पाहिजे आणि तसा तो करावा अशा प्रकारची विधायक सूचना आम्ही या प्रस्तावाच्या बाबत चर्चा करताना करणार आहोत असे मी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांना सांगू इच्छितो. आम्ही केवळ टीका करण्याचे काम करीत नाही तर याबाबतीत पॉझिटीव्हली काय केले पाहिजे हे देखील सांगत असतो. पण ते सांगितल्यानंतर देखील ते करण्याची शासनाची कुवत नाही, क्षमता नाही हे यातील दुर्दैव आहे. त्यामुळे विरोधकांच्या प्रस्तावाच्या माध्यमातून .. . .

**तालिका सभापती** : या प्रस्तावावरील चर्चा आता थांबविण्यात येत आहे.

. . . .2 आर-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-12-2012 (असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही) 2आर-5

APR 5.50

**पृ.शी./मु.शी.** : स्त्रीभ्रूण हत्येविरोधात जनजागृतीचा संदेश देणारा कांचन अधिकारी दिग्दर्शित 'मोकळा श्वास' या

चित्रपटाच्या विशेष खेळाच्या आयोजनाबाबत घोषणा

. **तालिका सभापती** : मला सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की,अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा उद्या सकाळी घेण्यात येईल. यानंतर मी पुढीलप्रमाणे घोषणा करीत आहे.

"सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, हिवाळी अधिवेशनानिमित्त नागपूर येथे आलेल्या सर्व माननीय मंत्री, राज्यमंत्री तसेच विधान परिषदेचे सन्माननीय सदस्य, मंत्रालय व विधान मंडळातील सर्व अधिकारी, पत्रकार यांचेसाठी स्त्रीभ्रूण हत्येविरोधात जनजागृतीचा संदेश देणारा कांचन अधिकारी दिग्दर्शित "मोकळा श्वास" या चित्रपटाच्या विशेष खेळाचे आयोजन मा.ना. श्री.पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा.ना.श्री.अजित पवार, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवार, दिनांक 20 डिसेंबर, 2012 रोजी रात्रौ 9.00 वाजता सिनेमॅक्स चित्रपट गृह, व्हेरायटी स्क्वेअर, सीताबर्डी, नागपूर येथे करण्यात आले आहे, आपणा सर्वांची उपस्थिती यावेळी प्रार्थनीय आहे."

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार, दिनांक 21 डिसेंबर 2012 रोजी सकाळी 9.30 ते 11.30 या वेळेमध्ये सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीमध्ये विरोधी पक्षाच्या महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये (वीज दरवाढ व आदिवासी विकास विभागामार्फत सन 2006 ते 2009 या कालावधीत करण्यात आलेल्या विविध वस्तुंची खरेदी यासंबंधातील प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 58 मिनिटांनी शुक्रवार,दिनांक 21 डिसेंबर 2012 च्या सकाळी 9.30 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही